कांड ३

प्रपाठक १.

आपण प्रजा निर्माण कराव्या, अशी प्रजापतीला इच्छा झाली. तेव्हा त्याने विशेष अशा काही नियमांचे पालन ज्यात करावे लागते, असे 'अग्निष्टोम'यज्ञरूपी तपाचे आचरण केले व त्या तपःसामर्थ्याने त्याने प्रथम 'सर्प' उत्पन्न केले. प्रजा निर्माण कराव्या अशी त्याला पुन्हा इच्छा झाली व त्याने पूर्वीप्रमाणेच दुसऱ्या वेळी 'अग्निष्टोम'यज्ञरूप तप केले. त्या तपाच्या प्रभावाने त्याने 'पक्षी' निर्माण केले. प्रजा निर्माण करण्याविषयी प्रजापतीला पुन्हा इच्छा झाली व त्याने तिसऱ्या खेपेस 'अग्निष्टोम'यज्ञरूप तपाचेच अनुष्ठान केले. मात्र, या वेळच्या अग्निष्टोमाचे प्रसंगी 'दीक्षितवाद' म्हणजे दीक्षिताने पठण करावयाचा पुढे दर्शविण्यात येणारा एक मंत्रसंघ त्याला आढळला, अर्थात् त्याच्या बुध्दीला स्फुरला व तो त्याने पठण केला. अशा प्रकारे तिसऱ्या खेपेचे 'अग्निष्टोम'रूप तप कसलेही वैकल्य न राहता यथासांग झाल्यामुळे त्या तपाच्या प्रभावाने प्रजापती हा उत्कृष्ट अशा 'मनुष्य' इत्यादि प्रजा निर्माण करू शकला.

जो यजमान 'अग्निष्टोम' यज्ञ करीत असताना स्नान व भोजन यासंबंधी विशिष्ट अशा नियमपालनरूप व्रताचे आचरण करून 'दीक्षितवाद'संज्ञक मंत्राचे पठण करतो, तो त्या मंत्रप्रभावाने आपल्या ठिकाणी प्रजा उत्पन्न करतो.

दीक्षा घेतलेला यजमान जर एखादा अमेध्य म्हणजे अपवित्र पदार्थ पाहील तर त्याची दीक्षा त्याच्या पासून दूर निघून जाते. अर्थात् ती निष्फल होते. शिवाय 'अपवित्र' पदार्थाचे दर्शन केल्याचे पाप त्याला लागून त्याच्या ठिकाणचे दीक्षाजन्य तेज नष्ट होते. यास्तव, 'माझे मनच संयमित झालेले नाही, माझे चक्षुरिंद्रियही दरिद्री आहे, म्हणजे पवित्र असेल तेवढीच वस्तू पहावयाची, अशा प्रकारची नियमनशक्ती त्याच्या ठिकाणी नाही, दर्शनीय अशा प्रकाशरूप वस्तूंमध्ये भगवान् सूर्य हाच श्रेष्ठ आहे, अर्थात् चक्षुरिंद्रियाचा अमेध्यदर्शनरूप दोष नष्ट करण्यास तोच समर्थ आहे, हे दीक्षे, मन व चक्षू त्या दोन्ही इंद्रियांच्या ठिकाणी असणारे दोष तू लक्षात घेऊ नको, आणि अल्पदोषकारी अशा माझा परित्याग करू नको', अशा अर्थाचा

'अबध्दं मनो' इत्यादि मंत्र दीक्षिताने पठण करावा. म्हणजे दीक्षा त्याला सोडून जात नाही. अर्थात् निष्फळ होत नाही. त्याला पाप लागत नाही व त्याचे तेजही नष्ट होत नाही.

अंतरिक्षात असणारी उदके ही 'अशांत' म्हणजे प्रक्षुब्ध, अर्थात् दोष उत्पन्न करणारी असतात. वृष्टिरूपाने अंतरिक्षातून खाली पडणाऱ्या पर्जन्योदकांनी जर यजमानाला भिजविले तर ती उदके यजमानाचे ओज, बल, दीक्षा व तप यांचा नाश करतात. यासाठी 'हे उदकांनो, मला भिजवून चिंब करणारी तुम्ही माझ्या ठिकाणी शरीरबल स्थापन करा, ओज स्थापन करा व इंद्रियबलही स्थापन करा. माझी दीक्षा नष्ट करू नका, त्याचप्रमाणे माझ्या तपाचाही नाश करू नका, अशा अर्थाचा 'उन्दतीर्बलं' इत्यादि मंत्र म्हणावा. असे केल्याने यजमानाने दीक्षा, ओज, व तप हे सर्व आपल्या ठिकाणी स्थापन केल्याप्रमाणे होते. अर्थात् त्याचे ओज, बल व दीक्षा यांना ती पर्जन्योदके नष्ट करीत नाहीत. त्याचप्रमाणे त्याचे तपही नाहीसे करीत नाहीत.

दीक्षा घेतलेल्या यजमानाची अग्नी ही देवता आहे. म्हणजे अग्नी हा त्या दीक्षितावर स्वामित्व करीत असतो. यास्तव दीक्षा ग्रहण केलेला यजमान घराबाहेर पडून जर कोठे प्रयाण करील, तर त्याचा स्वामी असलेला अग्नी त्याच्यावर रागावून दृष्टीआड होतो. अर्थात्, स्वामिरहित अशा त्या दीक्षिताला मार्गात आडवे येऊन मारण्यास राक्षस समर्थ होतात. म्हणून ' हे रथ, माझ्या गृहापेक्षा अत्यंत प्रशस्त अशा 'देवयजन' स्थलाला अनुलक्षून तू तिकडे चल, बृहस्पती हा तुझ्या पुढे चालणारा असो', असा अर्थ असलेला 'भद्रादभिश्रेयः' हा मंत्र म्हणावा. कारण, देवांच्या समुदायामधील बृहस्पती हा ब्राह्मण आहे. अर्थात् पूर्वोक्त मंत्र म्हटल्याने यजमानाने जणु काय बृहस्पतीलाच स्पर्श करून त्याच्या मागोमाग चालल्यासारखे होते. आणि तो बृहस्पती त्या दीक्षित यजमानाला उत्कृष्ट प्रकारे प्रवासातून पार पाडतो.

'पृथ्वीच्या पृष्ठभागी असलेल्या ह्या देवयजनाचे ठिकाणी म्हणजे यज्ञभूमीचे जागी आता आम्ही येऊन पोचलो आहो,' अशा अर्थाचा 'एदमगन्म' हा पहिला मंत्रविभाग पठण करावा. कारण, जो यजन करतो, तो पृथ्वीच्या

ठिकाणी असलेल्या 'देवयजन'संज्ञक स्थलामध्ये येत असतो. नंतर, 'पूर्वी जेथे सर्व देव प्रेमाने एकत्र राहत असत', असा अर्थ असलेला 'विश्वेदेवा. पूर्वे' हा दुसरा विभाग म्हणावा. 'ऋत्विज' झालेले जे ब्राह्मण असतात, तेच सर्व देवांच्या स्वरूपाने देवयजनाच्या ठिकाणी प्रेमाने एकत्र राहत असतात. 'ऋक्सामाभ्यां यजुषा संतरन्त:' असा पूर्वोक्त मंत्राचा तिसरा विभाग असून ऋक् साम व यजु या तिन्ही प्रकारच्या मंत्रसमूहाच्या योगाने अग्निष्टोमयज्ञरूपी समुद्र तरून जाणारे आम्ही', असा त्या विभागाचा अर्थ आहे. अग्निष्टोमाचे जो यजन करीत असतो तो ऋक् व साम या दोन प्रकारच्या आणि यजुमंत्राच्या साहाय्याने यागरूपी समुद्रातून उत्तम प्रकारे तरून जातो. या विभागाचे पठण केल्यावर 'भरपूर अशा धनसमृध्दीने व उत्कृष्ट अशा अन्नसमृध्दीने हर्षित होऊ,' अशा अर्थाचा 'रायस्पोषेण समिषा मदेम' हा चौथा मंत्रविभाग पठण करावा. त्या योगाने यजमानाने जणू काय मंत्रविभागात व्यक्त केलेल्या आशीर्वादाचीच जणू याचना केल्याप्रमाणे होते. (अनुवाक १).

१ हे देवतात्मक सोमराजा, तुझ्या पुढेच दिसत असलेला व विकत घ्यावयास योग्य असा हा वल्लीरूप तुझा भाग प्रात:सवनामध्ये गायत्रीछंदात्मक मंत्राने संस्कार करण्याला योग्य आहे, ही गोष्ट मज यजमानाच्यासाठी गायत्री छंदाची अभिमानिनी देवता तुज सोमराजाला विदित करो. २ हे देवतात्मक सोमराजा, तुझ्या पुढे दिसत असलेला व विकत घेण्यास योग्य असा हा वल्लीरूप तुझा भाग माध्यंदिन सवनामध्ये 'त्रिष्टुप्'छंदात्मक मंत्राने संस्कार करण्याला योग्य आहे, असे मज यजमानासाठी त्रिष्टुप्छंदाची अभिमानिनी देवता तुज सोमराजाला सांगो. ३ हे देवतात्मक सोमराजा, तुझ्या समोर दिसत असलेला व विकत घेण्याला योग्य असा हा वल्लीरूप तुझा भाग तृतीय सवनामध्ये 'जगती'छंदात्मक मंत्राने संस्कार करण्यास योग्य आहे, असे मज यजमानासाठी जगती छंदाची अभिमानिनी देवता तुज सोमराजाला कळवो. ४ हे देवतात्मक सोमराजा, गायत्र्यादि तीन छंदांच्या अक्षरसंख्येने मापले जाणारे जे चतुर्विंश, चतुश्चत्वारिंश व अष्टाचत्वारिंश नांवाचे 'छंदोम' संज्ञक 'स्तोम' आहेत, त्या छंदोमसंज्ञक स्तोमांच्या साम्राज्याला तू प्राप्त हो, असे मज यजमानाचे वचन त्या त्या स्तोमाची अभिमानिनी देवता तुज सोमराजाला बोलून दाखवो.

जो यजमान देवतारूप सोमराजाला 'साम्राज्य' लोकाला प्राप्त करून

वल्लीरूप सोम विकत घेतो, तो स्वजातीय लोकांमध्ये साम्राज्याला प्राप्त होतो. गायत्र्यादि छंद व त्यांनी उपलक्षित असे 'छंदोम'संज्ञक स्तोम म्हणजेच देवतात्मक सोमराजाचा 'साम्राज्य' लोक होय. वल्लीरूप सोम विकत घेण्याच्या पूर्वीच 'एष ते गायत्रः' इत्यादि चार मंत्रांनी त्याचे 'अभिमंत्रण' करावे. म्हणजे, त्या वल्लीरूप सोमराजाला स्पर्श करून पूर्वोक्त चार मंत्र म्हणावेत. असे केल्याने देवतात्मक सोमराजाला 'साम्राज्य' लोकाला प्राप्त केल्यानंतर यजमानाने वल्लीरूप सोम विकत घेतल्यासारखे होते व तो यजमान स्वकीय लोकामध्ये 'साम्राज्य' स्थितीला प्राप्त होतो.

'चमस' संज्ञक पात्रात 'तनूनप्त्रे त्वा.' इत्यादि मंत्रांनी जे आज्य घेतलेले असते, त्यास 'तानूनप्त्र' अशी संज्ञा आहे. या'तानूनप्त्र' संज्ञक आज्याची 'प्रतिष्ठा' म्हणजे महत्त्व जो जाणतो, तो प्रतिष्ठेला प्राप्त होत असतो. कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, 'तानूनप्त्र' संज्ञक आज्य कोणी प्राशन करीत नाहीत अथवा त्या आज्याचे अग्नीत हवनही करीत नाहीत. मग, 'तानूनप्त्र' कोणत्या ठिकाणी प्रतिष्ठित होते? म्हणजे, प्राशनाच्या किंवा हवनाच्या अभावी 'तानूनप्त्रा'ला प्रतिष्ठा म्हणजे महत्त्व ते काय असणार? परंतु 'मनाने प्रजापतीच्या ठिकाणी तानूनप्त्राची स्थापना केली जात असल्यामुळे त्याला प्रतिष्ठा, अर्थात् महत्त्व आहे', असे बुध्दिमान् पंडिताने ब्रह्मवाद्यांच्या म्हणण्याला उत्तर द्यावे.

'प्रजापतौ त्वा मनसि जुहोमि' हा 'प्रजापतीच्या ठिकाणी तुझे हवन मी करतो आहे, असे मी आपल्या मनात स्मरतो', अशा अर्थाचा मंत्र म्हणून 'तानूनप्त्र' संज्ञक आज्याचे तीन वेळ 'अवघ्राण' करावे म्हणजे हुंगावे. अशा प्रकारे तीन वेळ हुंगणे हीच त्या 'तानूनप्त्र' संज्ञक आज्याची प्रतिष्ठा होय. हे जो जाणतो, तो समाजात प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

'आश्रावण' केल्यापासून म्हणजे 'आश्रावय' असे म्हटल्यापासून आहुती देईपर्यंत एकाच जागी उभे राहणे, हा 'प्रतिष्ठा' शब्दाचा अर्थ आहे. जो कोणी अध्वर्यूची 'प्रतिष्ठा' जाणतो, म्हणजे आता सांगितल्याप्रमाणे उभे राहण्याचा प्रकार जाणतो, तो प्रतिष्ठेला प्राप्त होतो. अमुक एका स्थळी उभे राहून पुढे पाऊल न टाकता मी होम करीन असे अध्वर्यूला वाटेल, त्या स्थळी उभे राहून अध्वर्यूने 'आश्रावण' करावे. हीच अध्वर्यूची 'प्रतिष्ठा' होय. हे

ज्याला समजते तो प्रतिष्ठेला प्राप्त होतो. ज्या ठिकाणी उभे राहून 'आश्रावण' केले असेल, तेथून पुढे पाऊल टाकून, किंवा चालत जाऊन आहुती दिली तर तो अध्वर्यू प्रतिष्ठेपासून च्युत होतो. यास्तव, आहवनीयाच्या सन्निध ज्या ठिकाणी उभे राहून 'आश्रावण' केले असेल, तेथेच उभे राहून आहुती द्यावी. असे करणे अध्वर्यूच्या प्रतिष्ठेला कारणभूत होत असते.

अध्वर्यूचे स्वसत्तात्मक असे काय आहे, हे जो जाणतो, तो स्वसत्तात्मक अशा वस्तूंना संपन्न होतो. 'जुहू' इत्यादि कोणतीही स्रुची ही अध्वर्यूची स्वसत्तात्मक वस्तू होय. ज्याची देवता 'वायू' आहे, असे 'ऐंद्रवायव' इत्यदि सोमरस भरून घेण्याचे कोणतेही पात्र, अध्वर्यूचे स्वकीय होय. त्याचप्रमाणे सोमरस ज्यात ओतून घेतला जातो, ते चौकोनी पाळ्यासारखे असलेले 'चमस' संज्ञक पात्र हे अध्वर्यूचे स्वसत्तात्मक होय. ज्याने आहुती द्यावयाची आहे, असे जे 'वायव्य' संज्ञक किंवा 'चमस' संज्ञक पात्र, अथवा स्रुची असेल, त्या पात्राला अन्वारंभण म्हणजे स्पर्श न करता जर 'आश्रावण' केले, तर तो अध्वर्यू स्वसत्तात्मक अशा वस्तूपासून च्युत होईल. यास्तव, वायव्य किंवा चमस संज्ञक पात्राला स्पर्श करून म्हणजे ते पात्र हातात घेऊन 'आश्रावण' करावे. म्हणजे स्वकीय अशा कोणत्याही वस्तूपासून अध्वर्यू च्युत होत नाही.

जो कोणी अध्वर्यू सोमरसाचे प्रतिष्ठापन न करता 'स्तोत्रा' चे 'उपाकरण' करतो त्याचा 'सोम' अप्रतिष्ठित होतो, 'स्तोम' अप्रतिष्ठित होतो, 'उक्थे' म्हणजे 'शस्त्रे' अप्रतिष्ठित होतात, यजमान अप्रतिष्ठित होतो व स्वत: अध्वर्यूही अप्रतिष्ठित म्हणजे प्रतिष्ठेपासून च्युत होतो. 'वायव्य' संज्ञक पात्रात सोमरस भरून घेणे हीच सोमाची प्रतिष्ठा होय. कारण 'वायव्य' संज्ञक पात्र हे सोमरसाचा आधार म्हणजे आश्रयस्थान आहे. 'चमस' नांवाचे पात्र हे देखील सोमरसाचे आश्रयस्थान असल्यामुळे चमस पात्रात सोमरस ओतून घेणे हीही सोमाची प्रतिष्ठा होय. 'वायव्य' किंवा 'चमस' संज्ञक पात्रात घेतलेला सोमरस ही स्तोमाची प्रतिष्ठा असून स्तोम ही शस्त्रांची प्रतिष्ठा होय. यास्तव, सोमरसाने 'ग्रह' संज्ञक वायव्य पात्र भरून घेतल्यानंतर अथवा चमस पात्रात सोमरस ओतून घेतल्यानंतर 'स्तोमा' चे 'उपाकरण' करावे. असे केल्याने सोमाला प्रतिष्ठापित केल्यासारखे होते, स्तोमाला प्रतिष्ठापित केल्यासारखे होते, उक्थांना

म्हणजे 'शस्त्रांना' प्रतिष्ठेला प्राप्त केल्यासारखे होते, यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होतो व स्वत: अध्वर्यूही प्रतिष्ठित होतो. (अनुवाक २).

'सोमक्रयणी' नांवाच्या गाईला सात पावले चालवावयाची असते. ती सातवे पाऊल जेथे टाकते, त्या ठिकाणी एक आज्याची आहुती देण्यात येत असते. त्या आज्याने त्या पावलाची जेवढी जागा माखली जाईल तेवढ्या जागेतील 'पांसू' म्हणजे मातीचे कण एका भांड्यात भरून घ्यावयाचे असतात. या पांसूंनाच 'पद' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. सोमक्रयणी गाईच्या पदाचे (पावलाचे अर्थात् पदपांसूचे जे संभरण करतात म्हणजे भांड्यामध्ये पदपासूंचा संग्रह करतात, त्या योगाने जणू काय यज्ञाचेच संभरण म्हणजे यज्ञाचाच संग्रह केल्याप्रमाणे होते. 'हविर्धान' संज्ञक दोन शकट म्हणजे गाडे हे जणू काय यज्ञाचे मुख होय. जेव्हा हे दोन गाडे गार्हपत्याजवळून पूर्वेस तोंड करून चालू केले जातात, तेव्हा आज्याने भिजलेल्या पदपांसूंनी गाड्यांच्या कण्याच्या अग्रभागाला अंजन म्हणजे वंगण करावे. असे केले असता हविर्धानरूपी यज्ञमुखाचे ठिकाणी पदपांसुरूप यज्ञाला जोडून टाकल्यासारखे होते.

प्राग्वंश किंवा प्राचीनवंश नामक मंडपात पश्चिम बाजूस असलेल्या गार्हपत्यातील थोडासा अग्नी पूर्व बाजूस असलेल्या 'शालामुखीय' अग्नीजवळ आणतात व तेथून तो अग्नी पूर्व दिशेस असलेल्या पशूची अंगे शिजविण्याच्या जागेकडे घेऊन जातात. त्याचप्रमाणे पत्नीशाळेत असलेल्या पत्नीला शालामुखीय अग्नीजवळ घेऊन येतात. पश्चिम दिशेस गार्हपत्यासन्निध असलेले हविर्धान संज्ञक दोन्ही गाडेही अनुक्रमे पूर्व दिशेस चालू करीत असतात. असे झाल्यानंतर 'पुरातनगार्हपत्य' संज्ञक अग्नीचे विशिष्ट स्थान म्हणजे जवळचा प्रदेश शून्य, अर्थात् रिकामा होतो. आपल्या जवळचे ठिकाण रिकामे झाल्याबद्दल तो अग्नी आपल्या मनात वारंवार चिंतन करीत असतो व त्या योगाने क्रुध्द होऊन यजमानाची प्रजा व पशू यांचा नाश करण्यास तो समर्थ होत असतो. यास्तव, 'आप्री' संज्ञक प्रयाजविषयक याज्यामंत्रांनी संतुष्ट केलेल्या पशूला जेव्हा उत्तरेस तोंड करून घेऊन जातात तेव्हा पुरातन गार्हपत्यातील काढून घेतलेला अग्नी पशूची अंगे शिजविण्यासाठी घेऊन जावा. त्या योगाने पुरातन गार्हपत्याला भागयुक्त केल्यासारखे होते. मग तो यजमानाच्या प्रजा व पशू यांचा नाश करीत नाही.

'आहवनीय' अग्री हा यजमानरूप आहे. यासाठी त्यातून थोडा अग्री काढून घेतला आणि पशूची अंगे शिजविण्याच्या चुलीत घालण्यासाठी तो नेला गेला, तर यजमानाच्या शरीराचाच जणू लचका तोडून काढल्यासारखे होईल. यासाठी पूर्वी सांगितल्याप्रमाणे पुरातन गार्हपत्यातील अग्री काढून घेऊन तो पशूची अंगे शिजविण्यासाठी न्यावा. किंवा लौकिक अरणींचे मंथन करून उत्पन्न केलेला अग्री त्यासाठी उपयोगात आणावा. असे केले म्हणजे यजमानाचे शरीराचा लचका तोडल्यासारखे होत नाही. अर्थात् यजमान संपूर्ण शरीराने युक्त असा होतो.

यजन करण्यासाठी पशूची जी 'अंगे' काढलेली असतात, त्यांपैकी जर एखादे अंग वा अनेक अंगे काही निमित्ताने नष्ट झाली, तर यजनाचे वेळी जितकी अंगे नष्ट झाली असतील तितक्या संख्येइतकी आज्याची अवदाने घेऊन यजन करावे. अशाप्रकारे केलेली अवदानक्रिया हेच त्या अंगे नष्ट झाल्याबद्दलच्या दोषाचे प्रायश्चित होय.

जे कोणी वैरी यज्ञामध्ये नियुक्त केलेल्या पशुसंबंधाने यजमानाशी कलह करतील अथवा 'हा पशू आमचा आहे' असे म्हणून तो जर घेऊन जातील तर जो यजमान अशा प्रकारचे वैरी मृत्यू पावावे अशी इच्छा करील, त्याने 'नमो वृक्ति' अशी पदे जीत आहेत अशी 'कुविदंग यवमंतो' ही ऋचा म्हणून 'आग्नीध्रा'च्या धिष्णियाचे ठिकाणी असलेल्या अग्रीवर एक आज्याहुती द्यावी म्हणजे जो अग्री त्या वैऱ्यांशी 'नमो वृक्ति' म्हणजे 'नमस्कार्यत्व' वर्ज्य करतो, म्हणजे बंधू, मित्र किंवा शिष्टजन हे त्या वैऱ्यांना 'नमस्कार' देखील करणार नाहीत, अशाप्रकारे त्यांना बहिष्कृत करतो. अर्थात्, अशा प्रकारच्या मानहानीला प्राप्त झालेले ते वैरी झुरून झुरून लौकरच मृत्यू पावतात. (अनुवाक ३).

१ पूर्वी उत्पन्न झालेल्या व आता उत्पन्न होत असलेल्या ज्या या प्रजा आहेत, त्या सर्व प्रजापतीपासून उत्पन्न झाल्या आहेत. यास्तव त्या प्रजापतीला हे पशो तू स्वर्गलोकी जाणार असल्याविषयीचे वृत्त कथन कर. तुझे वृत्त नीट लक्षात घेणारा तो प्रजापती तुझ्या स्वर्गप्राप्तीला अनुमोदन देवो. २ पशूंचा अधिपती असलेल्या हे अग्रिदेवा, आज आम्ही उत्तम प्रकारे अनुष्ठित करीत असलेल्या या अग्निष्टोमसंज्ञक यज्ञकर्मामध्ये तुझ्यासाठी हा

पशू यूपस्तंभाला मी बांधीत आहे. तर या माझ्या करण्यास तू अनुमती दे. आम्ही कल्याणकारक अशा यज्ञाने यजन करीत आहोत. हे पशुरूपी हविर्द्रव्य देवांना प्रिय असो. ३ हे पशो प्राचीन कालचे देव, तुझा वृत्तांत नीट रीतीने जाणून तुझ्या शरीरावयवापासून ऊर्ध्व दिशेस संचार करणारा तुझा प्राण ग्रहण करोत. 'हा पशू आता आमच्या आधीन झालेला आहे' असे समजून तुझ्या प्राणाचा स्वीकार करोत. देव ज्या मार्गांनी जातात येतात, त्याच मार्गांनी तू स्वर्गलोकी जा. आणि अवशिष्ट अशा शरीरावयवांनी तू धान्यामध्ये प्रविष्ट होऊन रहा. ४ पशूंचा स्वामी असलेला रुद्रदेव द्विपाद (मनुष्य) व चतुष्पाद अशा ज्या पशूंच्यावर स्वामित्व करतो, त्यांपैकीच त्या पशुस्वामीपासून आम्ही विकत घेतलेला हा पशू यज्ञियभागत्वाला प्राप्त होवो. यजमानाला धनपुष्टी प्राप्त होवोत. ५ यूपस्तंभाला बांधल्या जाणाऱ्या या पशूला अनुलक्षून जे त्याचे आई, बाप, भाऊ इत्यादि पशूही बध्द झाल्यासारखे होऊन मनाने व नेत्रांनी त्या पशूकडे न्याहाळून पाहत आहेत, त्या पशूंना अग्निदेव प्रथम मुक्त करो. त्याचप्रमाणे प्रजापतीदेवही आपल्या प्रजेशी एकमत होऊन त्यांना मुक्त करो. ६ सर्व जातीचे, निरनिराळी रूपे धारण केलेले आणि वर्गदृष्ट्या परस्परभिन्न असूनही पशुत्वाच्या दृष्टीने एकरूप असलेले जे वन्यपशू आहेत त्यांना वायुदेव प्रथम मुक्त करो. त्याचप्रमाणे प्रजापती देवही आपल्या प्रजेशी एकमत होऊन त्या पशूंना मुक्त करो. ७ हे देवहो यागद्वारा जगदुत्पत्तीला कारणभूत होणाऱ्या या पशूला यज्ञासाठी त्याच्या आईबापांपासून मुक्त करणारे तुम्ही यजमानाला स्वर्गलोक प्राप्त करून द्या. 'उपाकरण' क्रियेने सुसंस्कृत व हविर्भक्षक देवांच्या ठिकाणी समर्पित झालेले जे जे अंग या पशूच्या ठिकाणी असेल, ते ते अंग अन्नरूप होऊन देवांच्या जीवनाला उपकारक होवो. आणि ते यजमानाला स्वर्गलोकही प्राप्त करून देवो. ८ पशूच्या प्राणाशी जणू काय संलग्न झालेला यजमानाचा प्राण पशूपासून वेगळा होवो. आम्ही करीत असलेला यज्ञ चलनशील अशा पशूच्या प्राणांसह देवांच्याकडे जाणारा होवो. पशुरूपी अन्न देवांच्या जीवनाला कारणभूत होवो. आणि त्या योगाने यजमानाचे मनोरथ सफल होवोत. ९ हा पशू त्याला मारीत असताना दुःखाने आक्रोश करील अथवा पायांची हालचाल करून ऊर बडवून घेईल त्यामुळे जे पाप निष्पन्न होणार त्या पापापासून अग्निदेव मला मुक्त करो. त्याचप्रमाणे त्या पशूला अनेक प्रकारे जो उपद्रव

होईल त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व पापापासूनही अग्निदेव मला मुक्त करो. १० पशूच्या शरीराची चीरफाड करणाऱ्या हे देवहो, देवांनी व्याप्त अशा या यज्ञाला तुम्ही जवळ येऊन चालू करा. पशूला त्याच्या गळ्याशी बांधलेल्या पाशापासून मुक्त करा. त्याचप्रमाणे पशूला बध्द केल्याच्या दोषापासून यजमानालाही पूर्ण मुक्त करा. ११ भूदेवी पशूच्या गळयाला बांधलेला हा पाश मोकळा करो. पशूंना आणि पशुपती देवाला माझ्या अपराधाची निवृत्ती होण्याकरिता मी नमस्कार करतो. १२ जो पुरुष आमचा द्वेष करण्याची इच्छा करीत असेल त्याला मी पायाखाली पालथा घालीन. आम्ही ज्याचा द्वेष करतो त्याच्या गळ्यात मी हा फास अडकवीन. १३ हे अग्निदेवा यज्ञाला व्यापून राहणारे जे देव आहेत, त्यांनी देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेणारा व पशूशरीराचे कच्चे मांस शिजवून परिपक्व करणारा म्हणून तुलाच निश्चित केले आहे. हे जातवेद, ज्या अर्थी तू दृढ असे शरीर धारण करणारा होऊन उत्साहपूर्ण होणारा आहेस, त्या अर्थी हविर्द्रव्ये वाहून नेण्याचे कामी तू प्रीतियुक्त हो. १४ जन्मजात ज्ञानी अशा हे अग्निदेवा, या वपेच्यासह तू देवांच्याकडे जा. ज्या अर्थी तू मानवी होत्यांच्या पूर्वीचा अर्थात् देवांचा होता झालेला आहेस त्या अर्थी तू घृताने आपले ज्वालारूपी शरीरावयव वृध्दिंगत कर. 'स्वाहा' असे म्हणून समर्पण केलेले हविर्द्रव्य देव सेवन करोत. १५ ज्या देवांना आहुती देतांना मंत्राच्या आरंभी 'स्वाहा' असे म्हणावे लागते, त्या देवांना वपाहोमापूर्वी ही आज्याहुती समर्पण असो. १६ मंत्राच्या शेवटी 'स्वाहा' असे म्हणून ज्यांना आहुती द्यावयाची असते त्या देवांना ही आहुती समर्पण असो. (अनुवाक ४).

पशू हे 'प्राजापत्य' म्हणजे प्रजापतीपासून उत्पन्न झालेले असून रुद्र या नांवाचा अग्नी हा त्यांचा अधिपती आहे. यास्तव, ह्या दोन देवतांच्या प्रतिपादक असलेल्या 'प्रजापतेर्जायमाना:' व 'इमं पशुं पशुपते' ह्या दोन ऋचांनी पशूचे 'उपाकरण' करावे. म्हणजे प्रजापती व रुद्रसंज्ञक अग्नी या दोघा देवांना सांगून पशूचे आलभन, अर्थात् हनन केल्यासारखे होते. आणि असे करणे आपल्या अनपराधत्वाला कारणभूत होते. दोन मंत्रांनी पशूचे 'उपाकरण' करावे. कारण यजमान हा द्विपाद आहे. यास्तव, दोन मंत्रांनी केलेले 'उपाकरण' त्याच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. पशू हे 'पांक्त' म्हणजे चार पाय व शेपूट ह्या पांच अवयवांनी युक्त आहेत. यास्तव, पशूचे उपाकरण

केल्यानंतर 'प्रजानन्तः प्रतिगृह्णन्ति' इत्यादि पांच मंत्रांनी पांच आज्याहुती द्याव्यात. म्हणजे त्या योगाने पंचावयवयुक्त अशा पशूंचेच जणू संपादन केल्यासारखे होते. शामित्रशालेकडे जो पशू नेला जातो, तो खरोखर मारण्याकरिताच नेला जातो. त्याला यजमान जर स्पर्श करील तर तो मरेल. कारण, स्पर्श केल्याने पशूच्या प्राणाशी यजमानाचा प्राण संलग्न होत असतो. अर्थात् पशूचा प्राण जातो तेव्हा यजमानाचा प्राणही जात असतो. यास्तव, पशूच्या प्राणापासून यजमानाचा प्राण वेगळा रहावा म्हणून 'नाना प्राणो यजमानस्य पशुना' हा मंत्र म्हणावा. पशूला मारतांना त्याला अनेक प्रकारे दु:ख दिल्यामुळे जे पाप लागते, त्याची शांती होण्याकरता 'यत्पशुर्मायुमकृत' या मंत्राने एक आज्याहुजी द्यावी. 'शमितार उपेतन' हा मंत्र अध्वर्यू व यजमान यांनी म्हणावा. म्हणजे, त्या मंत्रात निर्दिष्ट असलेल्या क्रिया शमित्यांना करावयास सांगितल्याप्रमाणे होते. होमासाठी जेव्हा 'वपा' आणली जाते, तेव्हा अग्नी पासून 'यज्ञ' दूर जात असतो. यास्तव, 'त्वामु ते दधिरे' हा मंत्र म्हणून वपेवर एक आज्याहुती द्यावी. असे केल्याने यज्ञ अग्नीच्या जवळ येतो. आणि वपा परिपक्व होण्यालाही ही आहुती उपयुक्त होते. 'पुरस्तात् स्वाहाकृतयः' म्हणजे मंत्राच्या आरंभी 'स्वाहा' असे म्हणून ज्यांना आहुती द्यावी लागते, ते देव निराळे असून 'उपरिष्टात् स्वाहाकृतयः' म्हणजे मंत्राच्या शेवटी 'स्वाहा' असे म्हणून ज्यांना आहुती द्यावी लागते, ते देव निराळे आहेत. 'स्वाहा देवेभ्यः' असे म्हणून पहिल्या प्रकारच्या देवांच्यासाठी वपाहोमापूर्वी आहुती द्यावी आणि 'देवेभ्यः स्वाहा' असे म्हणून दुसऱ्या प्रकारच्या देवांच्यासाठी वपाहोमानंतर आज्याहुती द्यावी. अशाप्रकारे वपाहोमापूर्वी व नंतर आहुती दिल्याच्या योगाने दोन्ही प्रकारच्या देवांना प्रसन्न केल्यासारखे होते. (अनुवाक ५).

ज्या देवतेच्या प्रतिपादक मंत्राने यज्ञसंबंधी जे कर्म करावयाचे ते तसे न करता जो कोणी भलत्याच मंत्राने यज्ञाचा उपचार करतो, म्हणजे यज्ञसंबंधी कर्म करतो, तो त्या देवतांच्यापासून दूर होतो. अर्थात् त्या देवतांच्याशी असलेला त्याचा संबंध सुटतो आणि त्यामुळे तो दरिद्री होतो. आणि ज्या देवतेच्या मंत्राने जे यज्ञकर्म करावयाचे, तसे जो करतो, तो देवतांच्या पासून दूर न होता धनसंपन्न होतो. यास्तव, अग्निदेवताप्रतिपादक अशा १ 'अग्ने नय.' या मंत्राने 'आग्नीध्र' संज्ञक मंडपाला स्पर्श करावा. 'विष्णु' देवतेचा उल्लेख असलेल्या २ 'इदं विष्णुर्विचक्रमे' ह्या मंत्राने 'हविर्धान' मंडपाला स्पर्श

करावा. 'अग्नि' पदाने युक्त असलेल्या ३ 'अग्न आयूंषि' या मंत्राने स्रुचांना स्पर्श करावा. ४ 'आ वायो भूष शुचिपा' ह्या 'वायू'देवताप्रतिपादक मंत्राने 'वायव्य' संज्ञक सोमपात्रांना आणि ५ 'आधा ये अग्निमिन्धते' ह्या 'इंद्र' प्रतिपादक 'सद' नामक मंडपाला स्पर्श करावा. सारांश, 'यथादेवत' म्हणजे ज्या देवताप्रतिपादक मंत्राने जे यज्ञकर्म करावयाचे त्याप्रमाणे जो करतो, तो देवतांच्या पासून दूर होत नसून धनवान् होतो. ६ हे द्रोणकलश, तुझ्या स्वरूपाने असणाऱ्या पृथ्वीला ज्योतिरूप अग्नीसह मी या ठिकाणी मांडून ठेवतो. ७ हे आधवनीय, तुझ्या स्वरूपाने असणाऱ्या वायूला अंतरिक्षासह मी या ठिकाणी मांडून ठेवतो. ८ हे पूतभृत्, तुझ्या स्वरूपाने असणाऱ्या वाणीला द्युलोकातील सूर्यासह मी या ठिकाणी मांडून ठेवतो. ९ तुज सूर्याच्या प्रकाशाने पाहून घेतलेल्या ह्या तीन स्रुचा एकमेकीशी न चिकटतील अशा रीतीने मी या ठिकाणी मांडून ठेवतो. १० हे उपांशुपात्र, अग्निदेवता व गायत्री छंद तुझे रक्षण करोत. तू 'उपांशु' नामक सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. ११ हे अंतर्याम, सोम देवता व त्रिष्टुप् छंद तुझे रक्षण करो. तू 'अंतर्याम' संज्ञक सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १२ हे ऐंद्रवायव, इंद्र देवता व जगती छंद तुझे रक्षण करो. तू इंद्र व वायू यांच्यासाठी भरून घ्यावयाच्या सोमरसाचे पात्र आहेस. १३ हे मैत्रावरुण, बृहस्पतिदेवता व अनुष्टुभ् छंद तुझे रक्षण करो. तू मित्र व वरुण यांच्या उद्देशाने सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १४ हे आश्विन उभयता अश्विनीकुमार व पंक्तिछंद तुझे रक्षण करो. तू उभयता अश्विनीकुमारांच्यासाठी सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १५ हे शुक्र, सूर्य देवता व बृहतीछंद तुझे रक्षण करो. तू 'शुक्र' संज्ञक सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १६ हे मंथिन्, चंद्र देवता व सतो बृहती छंद तुझे रक्षण करो. तू 'मंथि' संज्ञक सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १७ हे आग्रयणस्थाली, विश्वेदेवसंज्ञक देवता व उष्णिक् छंद तुझे रक्षण करोत. तू 'आग्रयण' संज्ञक सोमरस भरून घेण्याचे पात्र आहेस. १८ हे उक्थ स्थाली, इंद्रदेवता व 'ककुत्' छंद तुझे रक्षण करोत. तू उक्थ शब्दाने उपलक्षित असलेल्या 'शस्त्र' संबंधी सोमरस ग्रहणाचे पात्र आहेस. १९ हे ध्रुवस्थाली, पृथिवी देवता व विराट् छंद तुझे रक्षण करोत. 'ध्रुव' नामक सोमरस भरून घेण्याचे तू पात्र आहेस. (अनुवाक ६).

प्रमादामुळे किंवा आळसाने यज्ञकर्मात चूक करणारा अध्वर्यू इच्छिलेल्या मनोरथाला विफल करतो. अर्थात् अशा प्रकारच्या अध्वर्यूच्या हातून प्रमादामुळे किंवा आळसामुळे यज्ञकर्मात होणाऱ्या चुकांचे निवारण करणे यजमानाला अशक्य होत असल्याने त्याचा मनोरथ भग्न होत असतो. प्रमादामुळे अथवा आळसाने यज्ञकर्माचा बिघाड केल्याने संकटग्रस्त होणारा अध्वर्यू यजमानाचा नाश होण्यापूर्वी स्वतःच नाश पावत असतो. यास्तव, स्वतःचा नाश न व्हावा म्हणून होत्याने 'प्रातरनुवाक' संज्ञक मंत्रसंघाचे पठण करावयास प्रारंभ करण्यापूर्वीच अध्वर्यूने पुढे सांगितल्या जाणाऱ्या मंत्राने 'आग्नीध्र' मंडपातील अग्नीवर एक आज्याहुती द्यावी. त्या योगाने अध्वर्यू हा प्रथम आपल्याला संकटातून मुक्त करून सुखी होतो व त्या आहुतीच्या प्रभावाने यजमानालाही दुःख प्राप्त न होता ती आहुती त्याला सुखी करण्याला कारणभूत होते. 'आसन्यान्मा मंत्रात् पाहि कस्याश्चिदभिशस्त्याः' हाच तो आहुती देण्याचा मंत्र असून ' वैऱ्यांच्या मुखातून उत्पन्न होणाऱ्या अभिचाररूप मंत्रापासून हे देवा तू माझे पालन कर. त्याचप्रमाणे कसल्याही प्रकारच्या मजवर येणाऱ्या अपवादापासून माझे रक्षण कर,' असा त्या मंत्राचा अर्थ आहे.

परस्पराविषयी मत्सरभावाने युक्त झालेले दोन यजमान जेव्हा 'अग्निष्टोम' इत्यादि सोमयाग करीत असतात, तेव्हा पूर्वोक्त 'आसन्यान्मा मंत्रात्' ह्या मंत्राने आहुती न देता पुढे सांगितल्या जाणाऱ्या पांच मंत्रांनी पांच आज्याहुती द्याव्यात.

१ 'संवेशाय त्वोपवेशाय त्वा गायत्र्या अभिभूत्यै स्वाहा' हा पहिल्या आहुतीचा मंत्र असून ' हे अग्ने, माझे निजणे व बसणे खात्रीपूर्वक व्यवस्थित पणे व्हावयासाठी व गायत्रीछंदाच्या अभिमानिनी देवतेपासून वैऱ्याचा नाश व्हावा म्हणून तुला ही आज्याहुती समर्पण असो,' असा त्या मंत्राचा अर्थ आहे. २ 'संवेशा. त्रिष्टुभोऽभिभूत्यै स्वाहा' हा दुसऱ्या आहुतीचा मंत्र असून 'त्रिष्टुप्छंदाभिमानी देवतेपासून' एवढयाच फरकाखेरीज त्या मंत्राचा पूर्वीप्रमाणेच अर्थ आहे. ३ 'संवेशाय जगत्या. स्वाहा' हा तिसऱ्या आहुतीचा मंत्र असून 'जगती छंदाच्या देवतेकडून' या फरकाखेरीज बाकीच्या मंत्राचा पूर्वी प्रमाणेच अर्थ आहे. ४ 'प्राणापानौ मृत्योर्मा पातं स्वाहा' हा चौथा मंत्र असून 'हे प्राण व अपान वायू हो, मृत्यूपासून माझे रक्षण करा' असा त्या मंत्राचा

अर्थ आहे. ५ 'प्राणापानौ मा मा हासिष्टं स्वाहा' हा पांचव्या आहुतीचा मंत्र असून 'हे प्राणापानहो, माझा परित्याग करू नका मला सोडून जाऊ नका, तुम्हाला ही आहुती समर्पण असो', असा त्या मंत्राचा अर्थ आहे.

ज्या यजमानांचे सोमयाग परस्परांविषयी मत्सरबुध्दीने प्रेरित होऊन चालत असतात, ते यजमान परस्परांच्या हितास अडथळा होण्याची इच्छा करीत असतात. 'देवतांची अनुकूलता मला असावी, दुसऱ्याला असू नये, प्राण व अपान या दोन वायूंचे आनुकूल्य मलाच असावे, दुसऱ्यास असू नये', असे दोघेही मानीत असतात. अशा स्थितीत अध्वर्यूने स्वतःच्या व यजमानाच्या कल्याणासाठी 'संवेशाय त्वा.' इत्यादि मंत्रांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणे पांच आहुती द्याव्यात. कारण, अध्वर्यू किंवा यजमान या दोघांचेही दुःखरहित व मृत्युभयरहित अशा प्रकारे निजणे बसणे होण्याला गायत्र्यादि छंदच कारणीभूत होत असल्याने 'छंद' हेच जणू काय संवेश व उपवेश म्हणजे निजणे व बसणे आहेत असे समजावे. सारांश, जो 'संवेशाय.' इत्यादि मंत्रांनी आज्याहुती देतो, त्याच्या यज्ञात प्रवृत्त झालेल्या छंदांच्याकडून प्रतिस्पर्धाच्या यज्ञातील छंद विनाशित, अर्थात् निष्फल केले जातात. त्या योगाने अध्वर्यू काय किंवा यजमान काय देवता व प्राणापानसंज्ञक दोन वायू हे स्वाधीन म्हणजे अनुकूल झाल्यामुळे निर्भयपणे व सुखाने निजण्या बसण्याला समर्थ होतो.

अमात्सर्यबुध्दीने प्रेरित होऊन चालू असलेल्या यज्ञात उद्गात्यांनी म्हणजे सामगायक ऋत्विजांनी नेहमीप्रमाणे 'अग्न आ याहि वीतये' इत्यादि ऋचांच्या आश्रयाने गाइली जाणारी 'आज्य' संज्ञक 'स्तोत्रे' म्हणजे सामे न गातां, 'प्रेतिवंत' म्हणजे उत्कृष्ट गतीचा बोधक 'प्र' हा शब्द ज्यात आहे,. अशा 'प्र वो वाजा अभिद्यव:' इत्यादि ऋचांच्या आश्रयाने आज्यसंज्ञक स्तोत्रे गावीत. ती यजमानाला विजय संपादन करून देतात. ज्या ऋचांनी 'आज्य' संज्ञक 'स्तोत्रां'चा प्रारंभ होतो, त्यांना 'प्रतिपत्' अशी संज्ञा आहे. मात्सर्यप्रेरित यज्ञात 'मरुत्वत्' शब्दाने युक्त असलेल्या 'प्रतिपत्' संज्ञक ऋचा उपयोगात आणाव्यात. त्या यजमानाला विजय मिळवून देण्याला कारणभूत होतात. त्याचप्रमाणे नित्याप्रमाणे 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्राचे ठिकाणी 'बृहत्' किंवा 'रथंतर' हे एकच साम न गातां 'बृहत्' व 'रथंतर' ही दोन्ही सामे गावीत. कारण 'रथंतर' हे साम जणू काय पृथ्वीरूप असून 'बृहत्' हे

अंतरिक्षरूप आहे. यास्तव, दोन्ही सामांचा समुच्चय करून गान केले असता तो यजमान पृथ्वी व अंतरिक्ष या दोन्ही लोकांपासून प्रतिस्पर्ध्याला च्युत करतो. 'रथंतर' साम हे जणू काय वर्तमानदिनस्वरूप असून 'बृहत्' हे जणू काय उद्याच्या दिवसाप्रमाणे आहे. यास्तव, ह्या दोन सामांचा ज्या यज्ञात उपयोग केला जातो, त्या यज्ञाचा यजमान आजच्या व उद्याच्या दिवसांपासून प्रतिस्पर्ध्याला च्युत करतो. 'रंथतर' हे भूतकालरूप असून 'बृहत्' हे भविष्यकालरूप आहे. यास्तव, ह्या दोन्ही सामांचे गान करविणारा यजमान भूत व भविष्य ह्या दोन्ही काळांच्यापासून प्रतिस्पर्ध्याला च्युत करतो. 'रथंतर' हे परिमितरूप असून 'बृहत्' हे अपरिमितरूप आहे. ह्या दोन्ही सामांचे समुच्चयाने गान केल्या जाणाऱ्या यज्ञाचा यजमान प्रतिस्पर्ध्याला परिमित व अपरिमित अशा दोन्ही प्रकारच्या श्रेयापासून च्युत करतो.

विश्वामित्र व जमदग्नी या दोघा ऋषींनी वसिष्ठ ऋषीशी स्पर्धा केली. वसिष्ठाचा पराभव करण्याला साधनभूत असे 'ममाग्ने वर्चो विहवेष्वस्तु' ह्या ऋचेने आरंभ होणारे 'विहव्य' संज्ञक सूक्त जमदग्नीला आढळले आणि त्याने 'वैश्वदेव' संज्ञक शस्त्रामध्ये नेहमीप्रमाणे 'आ नो भद्राः क्रतवः' ह्या सूक्ताचे पठण न करता 'विहव्य' संज्ञक सूक्त पठण केले. आणि त्या सूक्ताच्या प्रभावाने जमदग्नीने वसिष्ठाचे इंद्रियसामर्थ्य नष्ट करून टाकले. यास्तव, मत्सरबुध्दीने चालू असलेल्या यज्ञात होता जर 'वैश्वदेव' शस्त्रात आता सांगितल्याप्रमाणे 'विहव्य' संज्ञक सूक्ताचे 'शंसन' म्हणजे पठण करील, तर त्या यज्ञाचा यजमान जमदग्नीने वसिष्ठाचे जसे इंद्रियसामर्थ्य नष्ट केले, त्याचप्रमाणे आपल्या प्रतिस्पर्ध्यांचे इंद्रियसामर्थ्य नष्ट करील. देवतेच्या उद्देशाने फक्त हविर्द्रव्याचा त्याग करणे हा 'यज्ञ' असून अंगोपांगसहित जो 'यज्ञ' त्यास क्रतु अशी संज्ञा आहे. ज्या यजमानाचे यज्ञक्रतू संख्येने अधिक होतील तो यजमान प्रतिस्पर्ध्याच्या यज्ञातील देवतांचा नाश करतो, असे कोणी विद्वान म्हणतात. यास्तव, प्रतिस्पर्धी असलेल्या यजमानाचे अनुष्ठान द्वादशस्तोत्रयुक्त 'अग्निष्टोम' नामक सोमयज्ञाने समाप्त होईल तर दुसऱ्याने पंचदशस्तोत्रयुक्त 'उक्थ्य' नांवाचा सोमयाग करावा. प्रतिस्पर्धाचा 'उक्थ्य' यज्ञ होईल, तर दुसऱ्याने एकोणतीस स्तोत्रांनी युक्त असा 'अतिरात्र' नांवाचा 'क्रतु' करावा. तात्पर्य आपण संख्याधिक्याने केलेल्या यज्ञाच्या योगाने यजमान प्रतिस्पर्ध्याच्या यज्ञदेवतांचा नाश करून स्वतः अत्यंत धनकनकसंपन्न होतो. (अनुवाक ७).

१ हे उदकांनो, तुम्ही ह्या मोठ्या कुंभामध्ये म्हणजे घागरीमध्ये तुडुंब भरून घेण्याला अत्यंत योग्य व देवांनी ज्यांची कीर्ती ऐकली आहे, अशी आहात. तुम्ही माझ्या प्राणाला तृप्त करा, अपान वायूला तृप्त करा, व्यान वायूला तृप्त करा, नेत्रांना तृप्त करा, कानांना तृप्त करा, मनाला तृप्त करा, वाणीला तृप्त करा, जीवात्म्याला तृप्त करा, हस्तपादादि अवयवांना तृप्त करा, प्रजेला तृप्त करा, पशूंना तृप्त करा, घरांना तृप्त करा, नोकराचाकरांना तृप्त करा, पुत्रभृत्यादिसमूहासहवर्तमान असलेल्या मला तृप्त करा. तुम्ही केलेल्या तृप्ततेच्या योगाने तृप्त झालेले माझे गण तृष्णारहित असे होवोत.

सर्व प्रकारच्या ओषधी ह्या सोमराजाच्या प्रजाच आहेत. अर्थात् सोमराजाच्या त्या ओषधिरूप प्रजा वल्लीरूप सोमराजाला आम्हाला द्यावयास समर्थ आहेत. सोमराजा हा 'ऐंद्र' म्हणजे इंद्रदेवतात्मक आहे.

२ सर्वजनांवर उपकार करण्यासाठीच उत्तम जन्मलेल्या विशेषत: यज्ञकर्मासाठीच उत्पन्न झालेल्या औषधींनो, आम्ही तुम्हाला अंत:करणाने वृद्धिंगत करीत आहो. तुमच्या सेवेमध्येच आम्ही तत्पर राहू. देदीप्यमान अशा सोमवल्लीरूप ओषधी इंद्राशी एकमत होऊन 'प्रात:सवन' संज्ञक कर्माकरता सोमाला अनुमोदन देवोत.

हा वरील मंत्र म्हणून सोमराजाला अभिमंत्रण करावे. म्हणजे त्या योगाने, सोमराजाची प्रजा असलेल्या ओषधी, व त्याची स्वकीय असलेली देवता इंद्र यांची विशेषत्वाने याचना करून सोमाचा 'अभिषव' म्हणजे कुटण्याचा विधी केल्याप्रमाणे होते.

कुटल्या जाणाऱ्या सोमाचा जो अंश प्रथमच भूमीवर सांडेल तो यजमानाचे इंद्रियसामर्थ्य, प्रजा व पशू यांचा अत्यंत नाश करण्यास समर्थ होतो.

३ भूमीवर सांडलेल्या हे सोमांशा, तू प्रजा व धनसमृध्दी यांच्यासह माझ्याकडे परत आला आहेस त्या अर्थी माझा इंद्रियसमुदाय व त्याच्या ठिकाणचे सामर्थ्य यांचा नाश करू नको.

वरील अर्थाच्या 'आमास्कान्' या मंत्राने भूमीवर सांडलेल्या सोमाच्या अंशाचे अभिमंत्रण करावे. असे केल्याने मंत्रात व्यक्त झालेल्या फळांची प्राप्ती

होण्याविषयीच्या आशीर्वादाचीच याचना त्या सोमांशाजवळ केल्यासारखे होते. आणि तो आशीर्वाद यजमानाची इंद्रिये, त्यांचे सामर्थ्य, प्रजा व पशू यांचा घात न होण्याला कारणभूत होतो.

४ जो सोमरसाचा बिंदू पृथ्वीवर गळतो, त्याचा होम केल्यावर तो पूर्वीचे असलेले जन्मस्थान जे पृथ्वी, त्या ठिकाणी संचार करतो. नंतर, अंतरिक्षरूपाने असणाऱ्या ह्या दुसऱ्या जन्मस्थानात संचार करतो आणि त्यानंतर तिसरे जन्मस्थान असलेल्या द्युलोकाला अनुलक्षून संचार करतो. या प्रमाणे त्रैलोक्यात संचार करणाऱ्या ह्या सोमरस बिंदूला ज्या दिशेस हा गळला त्या दिशेस सोडून इतर असलेल्या होमयोग्य अशा सात दिशांच्या ठिकाणी मी आपल्या मनाने आहुतिरूपाने समर्पण करतो.

वरील मंत्र म्हणून सोमरसबिंदूला अभिमंत्रण करावे (अनुवाक ८).

जो कोणी यजमान देवांची कीर्ती ज्यामध्ये आहे अशा यज्ञकर्माशी देवांची व मनुष्यांची कीर्ती ज्यात आहे, अशा यज्ञकर्माशी मनुष्यांची योजना करतो, तो स्वर्गलोकी देवांच्यामध्ये राहून देवांना योग्य अशा कीर्तीने युक्त होतो, त्याचप्रमाणे इहलोकी मनुष्यसमुदायामध्ये मानवोचित अशा कीर्तीने संपन्न होतो. अशा प्रकारे दोन्ही प्रकारची कीर्ती मिळण्यासाठी 'आग्रयण' संज्ञक 'ग्रह' पात्र सोमरसाने भरून घेण्यापूर्वी अंशु, उपांशु, अंतर्याम इत्यादि 'ग्रह' पात्रे सोमरसाने भरून घेतांना 'उपांशु' म्हणजे शेजारच्या मनुष्यास ऐकू जाणार नाही अशा हलक्या स्वरात मंत्र म्हणून भरून घ्यावीत. आणि 'आग्रयण' ग्रहानंतर जी 'उक्थ्य' इत्यादि ग्रहपात्रे भरून घ्यावयाची ती 'उपब्दिमत्' म्हणजे शेजारच्या मनुष्यास थोडेसे ऐकू जाईल इतक्या स्वरात मंत्र म्हणून भरून घ्यावीत. 'उपांशु' स्वरात मंत्र म्हणून ग्रहपात्रे भरून घेतल्याने देवांना कीर्ती प्राप्त होते व शेजाऱ्यास किंचित् ऐकू जाईल अशा 'उपब्दिमत्' स्वरात मंत्र म्हणून ग्रहपात्रे भरून घेतल्याने मनुष्यांना कीर्ती मिळते. सारांश, अशा योजनेने तो यजमान देवांचे यश वाढेल अशा यज्ञकर्माशी देवांची योजना केल्यामुळे देवसमुदायात देवोचित अशा यशाने संपन्न होत असून मनुष्यांचे यश वृध्दिंगत होईल अशा प्रकारे मनुष्यांची यज्ञकर्माशी योजना केल्यामुळे मनुष्यसमुदायात मनुष्योचित अशा यशाला संपादन करतो. 'प्रातःसवन' संज्ञक कर्म समाप्त झाले म्हणजे 'अग्निः प्रातःसवने पातु अस्मान्' या मंत्राने आहवनीयावर

एक आज्याहुती द्यावी. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

१ स्वत:च्या महिम्याने सर्व विश्वाला सुख प्राप्त करून देणारा, सर्व मानवांचे ठिकाणी स्वामित्वाचे नाते असलेला आणि सर्वांना पवित्र करणारा हा अग्निदेव प्रात:सवनसंज्ञक अनुष्ठानाची समाप्ती आम्ही केली असल्याने आमचे संरक्षण करो. तो आम्हाला धन देवो. त्याच्या अनुग्रहाने आम्ही दीर्घायुषी आणि ज्यांच्यासह आम्ही खाणेपिणे करतो, त्या सर्वांच्यासह सुखी होऊ.

'माध्यंदिन' सवनाचे अनुष्ठान संपल्यावर 'विश्वे देवा मरुत..' या मंत्राने आज्याहुती द्यावी. त्याचा अर्थ पुढील प्रमाणे आहे.

२ विश्वेदेव, मरुत् आणि इंद्र ह्या दुसऱ्या माध्यंदिनसवनसंज्ञक अनुष्ठानामध्ये आमचा परित्याग न करोत. दीर्घायुष्याने संपन्न असे आम्ही ज्यांना प्रिय असलेली स्तोत्रे उच्चारतो, त्या देवांच्या अनुग्रहबुध्दीचे ठिकाणी आम्ही विश्वस्त होऊन राहू.

तृतीय सवनाचे अनुष्ठान समाप्त झाल्यावर 'इदं तृतीयं सवनं..' या मंत्राने आज्याहुती द्यावी. याचा अर्थ पुढील प्रमाणे आहे.

३ जे सत्यपणाने चमसगणाला प्रेरणा करते झाले, ते इंद्राचे स्नेहसंबंधी व स्वर्गलोकाला प्राप्त झालेले 'ऋभु' नामक देव विद्वान् अशा ऋत्विजांनी अनुष्ठिलेल्या या तिसऱ्या सवनसंज्ञक कर्माला अत्यंत धनसंपन्न करून आमच्या या कल्याणरूप यागाला अनुलक्षून प्राप्त करोत.

'आहवनीय' अग्नीच्या ठिकाणी ज्या आहुती दिल्या जातात, त्यांमध्ये दोन भेद आहेत: 'आयतनवती' व 'अनायतना'. 'आघार' संज्ञक संतत धारेच्या रूपाने ज्यांचे स्थान नियमित केले जाते अशा 'आघारवती' संज्ञक ज्या आहुती त्या 'आयतनवती' असून अंशु व उपांशु या नांवाच्या सोमरसाच्या ज्या आहुती त्या 'अनायतना' होत. 'ऐंद्रवायव्य' संज्ञक सोमरसाने भरलेले ग्रहपात्र, तत्संबंधी हवन करण्याकरता उचलून घेतल्यानंतर ते अध्वर्यूने आपल्या डाव्या हातात धरावे आणि उजव्या हाताने परिप्लव नामक लाकडी पात्रात भरून घेतलेल्या सोमरसाची दक्षिण दिशेस असलेल्या परिधिसंधीपासून ईशान्येच्या कोपऱ्यापर्यंत अविछिन्न व सरळ अशी धार पाडवून आघारसंज्ञक आहुती द्यावी. आहुती देतांना 'अध्वरो यज्ञो.' हा मंत्र म्हणावा. त्याचा अर्थ पुढील

प्रमाणे आहे.

४ हे देवहो, ओषधी, पशू, आमचे आप्तजन आणि सर्व भूतमात्र यांच्या सुखासाठी चाललेला हा यज्ञ हिंसारहित असो. हे सोमदेवा, तू हिंसारहित आहेस. तू संतुष्ट हो आणि या सोमरसाला घृताप्रमाणे आहुतिरूपाने सिंचित कर.

सोमदेवतेला उद्देशून या आयतनवती आहुती जो देतो तो आयतनवान म्हणजे अधिष्ठानयुक्त होतो. जो हे जाणतो तो देखील आयतनवान होतो. या योगे त्याने अंतरिक्ष व पृथ्वी यांना घृतसिंचित केल्याप्रमाणे होते व घृतसिंचित झालेले ते अंतरिक्ष व पृथ्वी हे लोक सर्व प्राणिमात्रांना उपजीव्य होतात. इतकेच नव्हे तर हे जो जाणतो तोही इतरांना उपजीव्य होतो.

नंतर रुद्रदेवदेला उद्देशून 'संस्राव' संज्ञक सोमरसाच्या अवशिष्ट भागाचे हवन करते वेळी 'एष ते रुद्र भागो' हा मंत्र म्हणावयाचा असतो. त्याचा

५ हे रुद्रा, क्रूर देवा, हा संस्रावसंज्ञक भाग तुझा आहे. ज्या भागाविषयी तू देवांच्याजवळ याचना केलीस तो हा भाग तू सेवन कर. तू गाईचे पालन, धनाचा भरपूर साठा, उत्कृष्ट पुत्र व एका वर्षात पिकणारी धान्यें यांचे संरक्षण या सर्व गोष्टी जाणतोस, यास्तव, या सर्वांचा लाभ आम्हास करून दे.

'मनू' नामक ऋषीने आपल्या मुलांना आपल्याजवळचे धन वाटून दिले. त्याचा 'नाभानेदिष्ठ' नांवाचा सर्वांत धाकटा मुलगा आपल्या गुरूच्या घरी ब्रह्मचर्याश्रमाचा स्वीकार करून वेदाध्ययन करीत होता. त्याला मनूने काहीच भाग दिला नाही. गुरुगृहातून नाभानेदिष्ठ जेव्हा परत आला, तेव्हा त्याने आपल्या पित्याला 'माझ्या इतर बंधूंप्रमाणे मला आपल्या धनाचा भाग का दिला नाहीत?' असे विचारले तेव्हा मनू म्हणाला, 'बाळा नाभानेदिष्ठा, मी तुला भागरहित केला नाही.' तुला धनाचा भाग मिळण्याची मी निराळीच व्यवस्था केली आहे.

'सध्या 'अंगिरस' या नांवाचे हे ऋषी सत्राचे अनुष्ठान करीत आहेत. परंतु, स्वर्गप्राप्तीला साधनभूत असणाऱ्या 'नाभानेदिष्ठ' संज्ञक शस्त्रादिकांचे त्यांना ज्ञान नसल्यामुळे त्यांना स्वर्गलोकाचे ज्ञान होणार नाही. यासाठी

तू त्या ठिकाणी जा आणि शस्त्रादिकांचे प्रतिपादक असे जे 'ब्राह्मण' म्हणजे विवेचक वाङ्.मय तू शिकला आहेस, ते त्यांना सांग. म्हणजे त्याप्रमाणे ते शस्त्रादिकांचे अनुष्ठान करतील. सत्राची समाप्ती झाल्यावर जेव्हा ते अंगिरस स्वर्गलोकी जावयास निघतील, तेव्हा सत्ररूप यागाकडे उपयुक्त करून शिल्लक राहिलेले आपले सर्व पशू ते तुला देतील आणि अशा रीतीने तुला जो भाग मिळेल, तो मीच दिल्याप्रमाणे समज.'

मनूने सांगितल्याप्रमाणे नाभानेदिष्ठ अंगिरसऋषी जेथे 'सत्र' करीत होते, तेथे गेला, शस्त्रप्रतिपादक 'ब्राह्मण' त्याने अंगिरसांना सांगितले व त्यांनी त्याप्रमाणे अनुष्ठान केले. 'सत्र' संपल्यावर स्वर्गलोकी जातांना अंगिरसांनी उरलेले सर्व पशू नाभानेदिष्ठाला दिले. अंगिरसांनी दिलेले पशू आपल्या घरी घेऊन जाण्याच्या इच्छेने नाभानेदिष्ठ त्या पशूंच्या जवळून हिंडत आहे, इतक्यात 'रुद्र' नांवाचा देव तेथे आला व हे सर्व पशू माझे आहेत, असे म्हणाला. मला हे पशू अंगीरसांनी दिले आहेत असे नाभानेदिष्ठाने रुद्राला सांगितले. तेव्हा रुद्र पुन्हा म्हणाला की, यज्ञाकडे खर्च होऊन शिल्लक राहिलेल्या पशूंवर अंगिरसांचे स्वामित्व नाही. यास्तव, त्यांनी दिलेले हे पशुरूपी द्रव्य त्यांची मालकी नसतांना दिलेले असल्यामुळे ते घेऊन जाणे तुला योग्य नाही. यज्ञ झाल्यानंतर यज्ञभूमीवर जे काही शिल्लक उरते ते सर्व माझ्या मालकीचे आहे. यास्तव, माझ्या आज्ञेखेरीज यज्ञभूमीचे ठिकाणी कोणीही पाऊल टाकू नये. आता, तुला जर हे यज्ञावशिष्ट पाहिजे असेल, तर यज्ञात मला विभागी कर. यज्ञामध्ये मला भाग दे. म्हणजे मग अंगीरसांनी तुला दिलेले पशू मी मारणार नाही. तेव्हा नाभानेदिष्ठाने रुद्राला 'मंथि' नामक ग्रहाच्या संस्रावाचा भाग दिला. म्हणजे सोमरसाने भरलेल्या 'मंथि' संज्ञक ग्रहपात्राने सोमरसाचे हवन करून त्या पात्रात उरलेल्या सोमरसाची परिधीच्या बाहेर स्थापित केलेल्या अंगाराचे ठिकाणी रुद्राप्रीत्यर्थ आहुती दिली. त्यामुळे रुद्र संतुष्ट झाला व त्याने नाभानेदिष्ठाला मिळालेल्या पशूंची हिंसा न करता, ते पशू त्याला घरी नेऊ दिले.

हे आख्यान जाणणारा अध्वर्यू ज्या यज्ञात रुद्राप्रीत्यर्थ 'मंथि' ग्रहाच्या संस्रावाचे हवन करील त्या यज्ञातील अवशिष्ट राहणाऱ्या पशूंच्यावर रुद्र आपले स्वामित्व असल्याचे मानीत नाही. अर्थात् ते पशू रुद्राकडून मारले

जात नाहीत. (अनुवाक ९)

१ मी वाग्देवतेला प्रिय होईन. वाणींचा पालक असलेल्या देवाला मी प्रिय होईन. हे वाग्देवी वाङ्.मयामध्ये जे अत्यंत मधुर असे पद असेल त्या ठिकाणी मला स्थापन कर. सरस्वतीला ही आहुती समर्पण असो. २ हे वाग्देवते, योनिभूत अशा ऋचेने सामाच्या आवृत्तीला समृध्द कर. गायत्र सामासह रथंतर सामाला समृध्द कर. गायत्र सामाच्याच मार्गाने म्हणजे चालीने 'बृहत्' सामाची समृध्दी कर. ३ हे सोमा तुझ्या रसाचा जो बिंदू भूमीवर पडेल, 'अधिषवण' संज्ञक दोन फळ्यांच्यावरून कुटणाऱ्यांच्या हातातून निसटलेला तुझ्या वल्लीचा जो अंशु म्हणजे तुकडा जमिनीवर पडला असेल, अथवा अध्वर्यूच्या दशापवित्रातून सोमरस गाळतांना तुझा जो रसबिंदू भूमीवर पडला असेल, तो 'स्वाहा' असा उच्चार करून मी इंद्राला आहुतीरूपाने समर्पण करतो. ४ हे इंद्रा साळींच्या भाताच्या लाह्यांचा समूह, पुरोडाश, भाजक्या सातूंचे पीठ व भाजलेले सातू, सोमरस, मंथी व शुक्र नांवाचे ग्रहपात्र यांच्यामधून जो अंश किंवा रसबिंदू पृथ्वीवर पडला असेल तो 'स्वाहा' या मंत्राचा उच्चार करून मी तुज इंद्राला आहुतीरूपाने अर्पण करतो. ५ हे सोमा, माधुर्ययुक्त व इंद्रियांची शक्ती वाढविणारा तुझ्या रसाचा जो बिंदू 'स्वाहा' असे म्हणून आहुतिरूपाने समर्पित केला असतांना देखील द्युलोक, पृथ्वी किंवा अंतरिक्ष यांपैकी कोणत्याही ठिकाणावर पडला असला तरी तेथून परत येऊन देवांना प्राप्त होतो, तो रसबिंदू 'स्वाहा' या मंत्राचा उच्चार करून मी इंद्राला आहुतिरूपाने समर्पित करतो.

'बहिष्पवमान' संज्ञक स्तोत्राचे म्हणजे सामाचे गान करण्यासाठी जे ऋत्विज 'आस्राव' संज्ञक स्थलाकडे जात असतात, त्यांमध्ये अध्वर्यू हाच प्रथम सर्वांच्या पुढे नियुक्त होऊन चालत असतो. यास्तव त्यानेच स्तोमाची योजना करावी. म्हणजे 'बहिष्पवमान' संज्ञक स्तोत्र 'प्रस्तोता' इत्यादि सामगायकांच्या ठिकाणी नियुक्त करावे. अर्थात् स्तोत्र गाण्याची प्रस्तोता वगैरे ऋत्विजांना अधिकृत सूचना द्यावी, असे श्रौतकर्मकुशल विद्वान म्हणत असतात. ती सूचना देत असतांना 'वागग्रेगा अग्र एतु' हा मंत्र अध्वर्यूने म्हणावा. असे केल्याने त्याने यज्ञमुखाच्या ठिकाणी म्हणजे बहिष्पवमान स्तोत्राच्या प्रारंभाचे ठिकाणी वाग्देवदेची योजना केल्याप्रमाणे होते. या मंत्राचा अर्थ पुढीलप्रमाणे

आहे.

६ 'अग्रभागी जाणारी वाग्देवता ऋत्विजांच्या पुढे जावो. कारण ती वाग्देवता देवांच्याकडे सरळ रस्त्याने जाणारी, मज अध्वर्यूच्या ठिकाणी यश स्थापन करणारी, पशूंच्या ठिकाणी प्राणांना स्थिर ठेवणारी आणि माझ्या व यजमानाच्या ठिकाणी पुत्रपौत्रादिरूप प्रजा धारण करणारी आहे.'

ऐंद्रवायव इत्यादि 'ग्रह' संज्ञक सर्व पात्रे सोमरसाने भरून घेतल्यानंतर जर ऋत्विज बहिष्पवमान स्तोत्र गाण्यासाठी 'आस्ताव' स्थानाकडे गेले तर त्यांनी जणू काय यज्ञाला राहण्याकरिता गृहरूप असे स्थानच निर्माण केल्यासारखे होते. यास्तव ऐंद्रवायवादि सर्व 'ग्रह' घेतल्यानंतर ऋत्विजांनी बहिष्पवमान स्तोत्र गाण्याकरिता जावे.

'यस्ते द्रप्स: स्कंदति' इत्यादि मंत्रांनी आहवनीयाग्नीचे ठिकाणी आहुती दिल्यानंतर तेथून माघारी न फिरता ज्या अर्थी ऋत्विज बहिष्पवमान स्तोत्र गाण्यासाठी जातात त्याचप्रमाणे सामगायक ऋत्विज पुनरावृत्तिरहित अशा 'उपास्मै गायता नर:' इत्यादि नऊ ऋचांच्या आधारे 'बहिष्पवमान' संज्ञक साम गाऊन देवतांचे स्तवन करतात, त्या अर्थी सोमाकडे न येता झालेल्या या अनुष्ठानामुळे यज्ञाला काही विघ्न येऊ नये म्हणून यजमानाने बहिष्पवमानाचे गान झाल्यावर सोमराजाजवळ परत यावे. आणि पुढे दिलेल्या 'विष्णो त्वं नो अंतम:...' या मंत्राने सोमराजाचे उपस्थान करावे. या मंत्राचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

७ 'हे भगवन् विष्णो, तू सर्वदा आमच्या अगदी सन्निध राहणारा आहेस. आमचे अपराध सहन करणाऱ्या हे देवा तुझ्या संबंधी असलेल्या सोमरसाच्या धारा मधुर असा रस गाळीत असतात. त्या अर्थी त्या गाईची कास जशी केव्हाही क्षीण न होता भरपूर दूध देते त्याप्रमाणे भरपूर असे सोमरसाचे दोहन करोत.'

वरील मंत्र म्हणून उपस्थान केले असता निरनिराळ्या पात्रात फार वेळा ठरून राहिल्यामुळे सोमरसाचे जे स्वरूप शुष्क झालेले असते, तेच पुन्हा परिपुष्ट होते. (अनुवाक १०).

१ अग्नीच्या अनुग्रहाने सर्व लोक धन संपादन करतात. इतकेच

नव्हे तर त्या धनाची अत्यंत पराक्रमी पुत्र व कीर्ती यांच्यासह दिवसानुदिवस वाढच होत जाते. २ शत्रूंचे प्राण हरण करणाऱ्या हे अग्निदेवा, पुन्हा पुन्हा आमच्या हातून घडावा म्हणून आम्ही प्रार्थना करीत असलेला हा यज्ञ गाई, मेंढ्या व घोडे यांनी युक्त, त्याचप्रमाणे मनुष्यांसह देवांच्याशी मैत्री करणारा, केव्हाही कोणाकडून पराभूत न होणारा, भरपूर अन्नाने युक्त, पुत्रपौत्रादि प्रजा देणारा, दीर्घकाळ चालणारा, भरपूर धनाने संपन्न, विस्तीर्ण मूळ असलेला म्हणजे मूलभूत अनुष्ठानांमध्ये वैकल्यरहित व विद्वत्सभेने युक्त असा होवो. ३ हे सोमदेवा तू सर्व बाजूंनी वाढत रहा. विश्वातील भूतमात्राची उत्पत्ती करण्यास समर्थ असे वीर्य तुझ्याकडे चालून येवो. निरनिराळ्या प्रकारचे अन्न आमच्यासाठी एकत्र जमविण्यास तू कारणभूत हो. ४ हे सोमा, पिण्याला योग्य असे दुग्धादि सर्व रस तुझ्याजवळ येवोत. त्याचप्रमाणे सर्व प्रकारची अन्ने व सर्व प्रकारच्या प्रजोत्पादनशक्तीही तुजकडे चालत येवोत. हे सोमा शत्रूंचा पराभव करणारा तू अन्नरस व प्रजोत्पादनशक्ती यांच्या योगाने वृद्धिंगत होऊन यजमानाला देवत्व प्राप्त होण्यासाठी द्युलोकाचे ठिकाणी श्रवणमनोहर आणि विविध प्रकारची उत्कृष्ट अन्ने संपादन करून ठेव. ५ देवसमुदायात अग्रगण्य व गर्भाच्या ठिकाणी सर्व प्रकारची रूपे निर्माण करणाऱ्या त्वष्ट्रनामक देवाला या यज्ञामध्ये आम्ही आपल्याजवळ बोलावीत आहोत. तो आमचे इतरांच्याहून विशेष आत्मीयतेने पालन करणारा होवो. ६ हे त्वष्ट्रदेवा, दानशील असा तू ज्यापासून लौकिक व वैदिक कर्मांत कुशल, उत्कृष्ट उत्साही, म्हणजे कोणतेही कार्य झटपट करणारा, सोम कुटण्यासाठी दगडी बत्त्यांची जुळवाजुळव करणारा, अर्थात् सोमयाग करणारा व देवांच्या सेवेची सदैव इच्छा करणारा शूर पुत्र उत्पन्न होईल, अशा प्रकारचे जे असेल ते सत्वर प्राप्त होणारे व नेहमी वाढत राहणारे धन तू विशेषतः आम्हाला दे. ७ हे त्वष्ट्रदेवा, सुखकर असा होऊन तू या यज्ञाचे ठिकाणी ये. आणि आमचे पोषण करण्याविषयी इतरांची अपेक्षा न करता समर्थ असलेला तू दरएक यज्ञात आमचे उत्कर्षपूर्वक पालन कर. ८ तीनही वर्णांतील लोकांची सेवा करणारा, उत्तमप्रकारे सर्वांचा पोषक, दीर्घायुषी, कोणतेही कार्य सत्वर करणारा व देवांनी ज्याच्यावर कृपा करण्याची इच्छा करावी, अशा प्रकारचा पराक्रमी पुत्र ज्याच्या प्रसादाने उत्पन्न होतो तो त्वष्टादेव, चाकाच्या सर्व अऱ्यांना मधला तुंबा जसा आधार असतो, त्याप्रमाणे सर्व कुटुंबीयांना आधारभूत

होईल अशी पुत्रपौत्रादि प्रजा आम्हाला विशेषत्वाने प्राप्त करून देवो. आणि देवांचे हविर्द्रव्यरूपी अन्नही त्यांना प्राप्त करून देवो. ९ अन्नप्रद अशी सरस्वतीदेवी अन्नाच्या योगाने आमचे पूर्णपणे रक्षण करो. १० यजनीय अशी सरस्वती देवी आमच्या यज्ञाला द्युलोकातून खाली उतरून येवो. मेरूसारख्या अत्यंत उंच व विस्तीर्ण अशा पर्वतावरून उतरून येवो. आमच्या निमंत्रणास मान देणारी व घृताचे सेवन करणारी अशी आमच्या यज्ञाला आलेली ती सरस्वती देवी, सुख प्राप्त करणारी अशी आमची स्तुतिरूपी वाणी मनापासून श्रवण करो. ११ सरस्वत्नामक देवाचा विश्वातील सर्व पदार्थांचा निदर्शक व क्षुधित अशा बालकाप्रमाणें असणाऱ्या आमचे पालन करण्याविषयी ज्ञात असलेला यज्ञरूपी जो स्तन, तो स्तन पिळून आम्ही त्याची धार काढीत आहो. अशा प्रकारे अनेकवार धार काढूनच आम्ही प्रजा व अन्न यांच्या उपभोगाला प्राप्त झालो आहोत. १२ हे सरस्वत्, हे समुद्र, तुझ्या ज्या मधुर व घृतासमान उदकाचा वर्षाव करणाऱ्या धारा आहेत, त्या तुझ्या धारांच्या संबंधी असणारे सुख आम्हाला प्राप्त झाले आहे. १३ ज्याच्यासाठी केलेल्या कर्मानुष्ठानाला अनुलक्षून सर्व प्रकारचे पशू प्राप्त होतात, म्हणजे ज्याच्या करिता कर्म केले असता यजमानाला सर्व पशू प्राप्त होतात, वृष्टिरूपी उदके ज्याच्या व्रताचे सेवन करतात, ज्याच्या व्रताच्या ठिकाणी म्हणजे हवनरूप कर्माच्या ठिकाणी भरपूर धनाचा पालक असलेला यजमान एकनिष्ठतेने राहत असतो, त्या सरस्वत्नामक देवाला आम्ही आमच्या संरक्षणासाठी बोलावीत आहोत. १४ देदीप्यमान, उत्कृष्ट पंखांनी युक्त, अत्यंत मोठे, असे पक्ष्याचे रूप धारण करणारा, उदकांची वृष्टी करणारा व औषधींचा मंजरीरूप गाभाच असलेल्या त्या सरस्वत् नामक देवाला आम्ही आपल्या रक्षणासाठी बोलावीत आहोत. १५ जी तू देवांची भगिनी आहेस, त्या दीर्घ अशा स्तोत्राने स्तविली जाणाऱ्या हे सिनीवाली देवी, तू तुला आहुतिरूपाने दिलेले हविर्द्रव्य सेवन कर. आणि आमची प्रजा वृद्धिंगत कर. १६ हे ऋत्विग्यजमानहो, सुंदर हात व सुंदर बोटे असलेली, सुलभपणाने प्रसवणारी व पुष्कळ यज्ञांना जन्म देणारी जी सिनीवाली देवी, त्या प्रजांचे पालन करणाऱ्या सिनीवाली देवीप्रीत्यर्थ तुम्ही हविर्द्रव्याची आहुती समर्पण करा. १७ हे ऋत्विज आणि यजमान हो, तुमच्या पुत्रपौत्रादि जनांच्या कार्यसिध्दीसाठी सर्व जगाच्यावर उत्कृष्टत्वाने स्थित असणाऱ्या इंद्रदेवाला आम्ही बोलावीत आहोत. तो इंद्र

इतरांच्याहून आम्हालाच अधिक प्रिय मानणारा असो. १८ अग्निचयनाचे अनुष्ठान करणारे यजमान अग्न्यादि देवांच्याबरोबर अर्ध्या हविर्भागाचे धारण करण्याकरता इंद्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी विटांची विशेष रीतीने मांडणी करून त्यांवर स्थापित केलेल्या अग्नीचे ठिकाणी अग्निष्टोमादि सोमयागाचे अनुष्ठान पार पाडण्यास समर्थ असलेले यजमान तद्विषयक अशा आपल्या बुध्दी एकाग्र करतात, त्या अर्थी त्यांनी इतर देवांच्या बरोबर अर्धा हविर्भाग सेवन करण्याकरता इंद्राला बोलावणे साहजिकच आहे. हे इंद्रा तू शूर मनुष्यांना धन देणारा व आमच्या बलाचे संवर्धन करणारा होऊन आम्हाला गाई, म्हशी, बैल इत्यादि पशूंनी गजबजलेल्या संघाच्या ठिकाणी प्रामुख्याने स्थापन कर. १९ काळ्या रंगाचे, उदकरसाचे हरण करणारे, पसरलेल्या पंखाप्रमाणे दिसणारे मेघ सूर्यमंडळाला आच्छादित करून द्युलोकात उड्डाण करीत असतात. आणि मग आपल्या उदरांच्या ठिकाणी उदकांची स्थाने निर्माण करून इहलोकाचे ठिकाणी आकर्षित होऊन वळतात. त्यानंतर पृथिवी पर्जन्यवृष्टिरूपी उदकांनी भिजून चिंब होते. २० अग्नीचे जणू केसच अशा सोनेरी वर्णाच्या ज्वाला ज्याच्यासह उत्पन्न होत आहेत असा हा, पुनर्नवावनस्पतीच्या हवनातून उत्पन्न होणारा धूर, गतिशील वायूप्रमाणे आकाशाला रंगविण्यासाठीच जणू प्रसरण पावत आहे. विद्युत्संपर्कामुळे देदीप्यमान असूनही मेघरूपात परिणत होणारा हा पुनर्नवोद्भूत धूम, उष:काळाला झाकाळून टाकल्याकारणाने सूर्योदय झाल्याचेही ज्यांच्यामुळे ध्यानात येत नाही, अशा विपुलसंख्य मेघांच्या समवेत आमच्यासाठी पर्जन्याच्या वर्षावाला घेऊन येवो. पाण्याची अपेक्षा करणारी, पिके उपजविणारी जी क्षेत्रे आहेत ती क्षेत्रे, या जलवर्षावाच्या योगाने विपुल प्रमाणात पिकांना उपजवून यशस्वी होवोत. ती क्षेत्रे सत्य म्हणजे पेरणीच्या दृष्टीने अमोघ, अर्थात् सुक्षेत्रे आहेत, अशी त्यांची कीर्ती होवो. २१ हे पुनर्नव, तुझ्यापासून उद्भवलेल्या धूमाचे माहात्म्य असे आहे की, पक्ष्याप्रमाणे अंतरिक्षात उंचावर संचार करणारे ते त्वदुत्पन्न धूम पुनश्च खाली उतरून पृथ्वीवर सर्वत्र उदकांचा वर्षाव करतात त्यावेळी आकाशात संचार करणारा नीलवर्णी कृष्णमेघही जलवर्षावासाठी प्रवृत्त होऊन वृषभाप्रमाणे पुन:पुन: गर्जना करू लागतो. ज्याकाळी हे घडून येते त्यावेळी आमचे जणू कल्याण करणाऱ्या, आमच्यावर जणू अनुग्रह करणाऱ्या आणि म्हणूनच हसतमुख वाटणाऱ्या जलवृष्टींच्या समवेत मेघ आकाशात गोळा होतात. तेही गर्जू लागतात आणि नंतर जलधारांची

वृष्टी होते. २२ ज्यावेळी मरुतांच्याशी संबंधित अशी म्हणजे वारे वाहू लागल्यानंतर पर्जन्यवृष्टी होते त्यावेळी आकाशात विजेचाही कडकडाट होतो. पान्हा फुटल्यावर आपल्या वत्साकडे बघून हंबारव करणाऱ्या गाईप्रमाणेच त्यावेळी ती वीज भासते. गाईने वत्साला कवटाळावे त्याप्रमाणे ती वीज मेघाला चिकटून राहते. २३ हे मरुतांनो, वज्रसदृश आयुधे धारण करून तुम्ही जेव्हा क्रीडा करता, त्यावेळी पृथ्वीवर इतस्ततः आणि अंतरिक्षात ऊर्ध्व मार्गाने मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आणि उन्नततत्त्वामुळे स्वर्गापेक्षाही उंचावलेले दिसणारे पर्वत भेदरून जातात. तुमच्या गर्जनेने या पर्वतांची उन्नत शिखरेही विकंपित होतात. परंतु, असे असले तरी, पाण्याप्रमाणे सर्वांना व्यापून टाकीत आवेगपूर्ण गतीने सर्वत्र संचार करण्याची तुमची क्रीडा तुम्ही चालूच ठेवा. २४ अश्वाप्रमाणे सर्वत्र अप्रतिहत संचार करणाऱ्या हे मरुत्‌देवा, सर्व दिशांत ऐकू जाईल अशी गर्जना कर. मेघगर्जनेप्रमाणे गडगडाट कर. मेघांच्या उदरात जलरूपी गर्भाचे आधान कर. उदकाने तुडुंब भरलेल्या मेघासह म्हणजे त्या मेघावर रथाप्रमाणे आरूढ होऊन सर्वत्र संचार कर. ज्याचे तोंड मोकळे केले आहे आणि खाली म्हणजे पृथ्वीकडे वळविले आहे, अशा परवालीसदृश असणाऱ्या मेघाला आपल्याबरोबर पृथ्वीकडे सुखाने वाहून ने. पृथ्वीवरील जे प्रदेश अधोभागी म्हणजे खोलगट जागेत आहेत ते, पर्जन्यवृष्टीच्या योगाने पाण्यात तुडुंब भरून जावोत, व तेणेकरून पृथ्वीवरील दुसऱ्या उन्नत जागी म्हणजे उंचवट्यावर असलेल्या प्रदेशांच्याशी समतल होवोत. २५ हे अजर म्हणजे विनाशरहित अग्ने, ही उदके तुझी स्थाने आणि तुझ्या ज्वाला यांना प्रसंगी नासवून टाकतात. पण तू मात्र, ज्याप्रमाणे गायवगैरे पशू तृण भक्षण केल्यावर तदुत्पन्न दूध त्यांच्या ठिकाणी सुस्थित ठेवतात, त्याचा व्यर्थ नाश होऊ देत नाहीत, त्याप्रमाणे ती उदके मेघांच्या उदरात संचित होऊन राहतील, त्यांचा नाश होणार नाही, असे कर. २६ हे अग्ने, हे जगद्वेत्त्या, हे देवा, हे अन्नवान्, मरणरहित असलेल्या तुझी निवासस्थाने पुष्कळच आहेत. तुझी महानता केवढी व कशी आहे याची पृच्छा करणाऱ्या जिज्ञासूशी तू बंधुवत् आचरण ठेवतोस. अखिल विश्वातील प्राणिमात्रावर प्रेम करतोस. हे अग्ने, ऐंद्रजालिकांच्या ज्या अनंत माया पूर्वापार इहलोकी प्रचारात आल्या आहेत त्या देखील सर्वच्या सर्व तुझ्या ठिकाणी चांगल्या प्रकारे प्रस्थापित होऊन राहिल्या आहेत. त्या मायांचे देखील तू अधिष्ठान आहेस. २७ हे मरुत्‌देवा, आमच्यासाठी अंतरिक्षातून

उदकांचा वर्षाव कर. नंतर सर्वव्यापक आणि वर्षणशील अशा इंद्रदेवतेशी संबंधित असलेल्या पर्जन्योद्भूत उदकधारांचे सिंचन कर. हे बलसंपन्न देवा, पाण्याचा संतत वर्षाव करीत करीत, गर्जना करणाऱ्या मेघासह तू अंतरिक्षातून आमच्याकडे ये. आम्हाला प्राणदान करणारा तू आमचा पालनकर्ता पिताच आहेस. २८ यज्ञभूमीत प्रविष्ट होणारे ऋत्विज यजमानांच्याकडून दूध आणि घृत यांचे सम्यक्तया सिंचन करवून घेतात. त्याप्रमाणे, उदकांचे दान करण्यात तत्पर असणारे हे मरुत्, उदकांचे उत्तमप्रकारे सिंचन करतात. घोडा हा अन्य पशूंहून गुणदृष्ट्या अत्यंत श्रेष्ठ असतो म्हणून त्या अश्वाला 'अत्य' म्हणतात. अशा अश्वाला अश्वशिक्षक योग्य शिक्षण देऊन रेतसेचनार्थ योग्य दिशेकडे वळवितो त्याप्रमाणे हे मरुत्देव वेगाने संचार करणाऱ्या मेघांना योग्य ठिकाणी जलवर्षाव करण्यासाठी वळवितात आणि त्यांच्यातील उदके भलत्याच ठिकाणी उत्सन्न न होता योग्य ठिकाणी आणि नैरंतर्याने त्यांचा वर्षाव करवितात. २९ एखादी बुभुक्षित आणि तृषार्त कन्या आपल्या मातापितरांच्या पुढे आक्रोश करून आपली तहानभूक निवारण करण्यासाठी प्रार्थना करते त्याप्रमाणे, हे ऋत्विज आणि यजमान हो ! सर्व विश्वावर उदकांचा वर्षाव करणाऱ्या त्या जलदात्या मरुतांची तुम्ही प्रार्थना करा. तहानलेल्या कन्येला तिचे आईवडील 'भिऊ नकोस, रडू नकोस, तुला हवे ते देतो' इत्यादि बोलून जसे तिचे सांत्वन करतात त्याप्रमाणे हे मरुत्देव या ऋत्विजांना व यजमानांना आश्वस्त करोत. ३० हे मरुतांनो, द्यु आणि पृथ्वी या दोनही लोकांना, घृताप्रमाणे मधुर अशा उदकाने आप्लावित करा. भूमीवर ज्या उदकांचे सिंचन केलेत त्या उदकांच्या कडून समस्त ओषधी सारगर्भ म्हणजे सत्त्वसंपन्न करा. उदकांना मेघांच्या द्वारे वाहून नेणाऱ्या हे मरुतांनो, ज्या प्रदेशात तुम्ही मधुर उदकांचे सिंचन कराल त्या प्रदेशातील अन्नपदार्थात ऊर्जेचे म्हणजे पोषक अंशाचे आणि तेथील प्रजेच्या ठिकाणी सद्बुध्दीचे आरोपण करा. ३१ सर्व जगाला सूर्य दृष्टीस पडावा म्हणूनच किरणरूपी घोडे त्या जातमात्राचे ज्ञान असणाऱ्या अशा देदीप्यमान सूर्याला अत्यंत उंच अशा उदयाचलावर वाहून आणीत असतात. ३२ मित्र, वरुण व अग्नी यांचा अर्थात् उपलक्षणाने त्रैलोक्यातील प्राणिमात्राचा जणू नेत्रच, आणि अत्यंत आश्चर्यकारक, अनेकरंगांनी युक्त व जणू काय किरणांचे एकत्र झालेले सैन्यच असे हे आदित्यमंडल उदयास आले आहे. या मंडळाच्या ठिकाणी असणारा भगवान् सूर्यनारायण स्थावर

व जंगम अशा सर्व जगाचा आत्माच असून त्याने द्युलोक, पृथ्वी व अंतरिक्ष व्यापून टाकले आहे. ३३ और्व, भृगु आणि अप्नवान् या ऋषींच्या प्रमाणेच मीही समुद्रात वास्तव्य करणाऱ्या शुध्द अग्नीला आवाहन करतो. ३४ जगाला प्रसविणाऱ्या सवित्याची निर्मिती आणि भगदेवतेचा जणू प्रसाद असे समजूनच समुद्रात वास्तव्य करणाऱ्या अग्नीचे मी आवाहन करतो. ३५ ज्याच्या ज्वालांचा ध्वनी वाऱ्याप्रमाणे जाणवतो, जो सर्ववेद्यवेत्ता आहे, पर्जन्याप्रमाणेच सर्व मनुष्यमात्रांकडून ज्याची अपेक्षा केली जाते अशा समर्थ आणि समुद्रात वास्तव्य करणाऱ्या अग्नीचे मी आवाहन करतो. (अनुवाक ११).

प्रपाठक २

वेदमंत्रांचे गान करून केलेले जे देवतांचे स्तवन त्याला 'साम' अशी संज्ञा असून सामाच्या विशिष्ट आवृत्ती करून केलेल्या स्तवनास 'स्तोत्र' असे नांव आहे. साम आणि स्तोत्र हे शब्द समान अर्थानेही योजिले जातात. सोमयागातील मुख्य दिवशी बहिष्पवमान, माध्यंदिन पवमान आणि आर्भव पवमान या नांवाने व्यक्त केली जाणारी तीन 'पवमान' संज्ञक 'स्तोत्रे' आहेत. जो कोणी यजमान 'पवमान' संज्ञक स्तोत्रांचे अन्वारोह म्हणजे पवमान स्तोत्राच्या ठिकाणी यजमानाला आरूढ करणारे अर्थात् पवमान स्तोत्रांची यथार्थ प्राप्ती करून घेणारे मंत्र जाणून यज्ञ करतो तो पवमान स्तोत्रांच्या ठिकाणी आरूढ होतो. त्याला पवमान स्तोत्रांची पूर्णत्वाने प्राप्ती होते व तो पवमान स्तोत्रापासून केव्हाही वियुक्त होत नाही. 'हे बहिष्पवमान, तू श्येन पक्ष्याप्रमाणे म्हणजे ससाण्यासारखा शीघ्रगती असून गायत्री छंदाशी तुझा निकट संबंध आहे म्हणून मी तुझ्या ठिकाणी अनुक्रमाने आरोहण करतो, तुझ्या संनिध येतो. या यज्ञानुष्ठानातून मला निर्विघ्नपणे पार पाड', अशा अर्थाचा पहिला 'अन्वारोह' मंत्र असून, 'हे माध्यंदिन तू उत्कृष्ट पंख असणाऱ्या गरुडाप्रमाणे शीघ्रगामी आहेस, त्रिष्टुभ् छंदाशी तुझा निकट संबंध आहे आणि म्हणूनच मी तुझ्या ठिकाणी आरोहण करीत आहे. तू मला यज्ञानुष्ठानातून सुखाने पार ने' अशा अर्थाचा दुसरा अन्वारोह मंत्र आहे. 'हे आर्भव पवमान, तू भास नांवाच्या पक्ष्याप्रमाणे उंच भरारी मारण्यास समर्थ आहेस. जगती छंदाशी तुझा आत्मीयपणाचा संबंध आहे, यास्तव मी तुझ्या ठिकाणी आरूढ होत आहे, तर या यज्ञानुष्ठानातून तू मला सुखाने पैलतीरी नेऊन पोचीव,'

असा अर्थ व्यक्त करणारा तिसरा अन्वारोहसंज्ञक मंत्र होय. पवमानसंज्ञक स्तोत्रांच्या गायकाकडून प्राप्त होणाऱ्या फलांच्या ठिकाणी यजमानाला आरूढ म्हणजे स्थापन करणारे असे हे तीन मंत्र असल्याने त्यांना पवमानांचे अन्वारोह अशी यथायोग्य संज्ञा आहे. ह्या मंत्रांना जाणून जो यज्ञ करतो तो तीनही पवमानांच्या ठिकाणी अनुक्रमाने आरूढ होतो व पवमानांच्या पासून तो वियुक्त होत नाही. प्रत्येक पवमान स्तोत्राची इतर दोन पवमान स्तोत्रांशी 'संतति' म्हणजे अविछिन्नता कशी आहे हे जो जाणतो तो यजमान संपूर्ण आयुष्याला प्राप्त होतो. आयुमर्यादा पूर्ण होण्याच्या पूर्वी मरत नाही. तो पशुसंपत्तीने संपन्न होतो व त्याला पुत्रपौत्रादि प्रजाही प्राप्त होते. सोमरस ज़्या पात्रांत भरून घेतला जातो त्या पात्रांना 'ग्रह' असे नांव आहे. प्रत्येक पवमानासंबंधी एक अशा रीतीने तीन पवमानांच्या संबंधाने तीन ग्रह घ्यावयाचे असतात आणि त्याप्रमाणे द्रोणकलश, आधवनीय, पूतभृत् या नांवाचे तीन ग्रह मंत्र न म्हणता सोमरसाने प्रारंभीच भरून घेतलेही जातात आणि नंतर ऐंद्रवायव इत्यादि ग्रह मंत्रपठणपूर्वक भरून घेण्यात येतात. परंतु मंत्रपठणावाचून सोमरसाने भरून घेतलेले ते द्रोणकलशादि तीन ग्रह घेऊन न घेतल्यासारखेच होत असते. यास्तव त्या ग्रहांचे समंत्रक ग्रहण केल्यावाचून जर 'पवमान' संज्ञक 'स्तोत्र' गाण्याची सामगायक ऋत्विजांना आज्ञा दिली तर अध्वर्यूने यजमानाला पवमान स्तोत्रापासून विच्छिन्न केल्यासारखे होते. आणि यजमान पवमान स्तोत्रापासून तोडला गेला म्हणजे अध्वर्यूचा प्राणही त्याला सोडून जातो. यास्तव ऐंद्रवायव इत्यादि सर्व ग्रह सोमरसाने भरून घेतल्यानंतर अध्वर्यूने 'प्रजापतिदेवाला अर्पण करण्यासाठी उपयाम संज्ञक मंत्राने तुला सोमरसाने भरून घेतला आहे,' अशा अर्थाचा मंत्र म्हणून द्रोणकलशाला स्पर्श करावा. 'इंद्रासाठी तुला भरून घेतला आहे', अशा अर्थाचा मंत्र म्हणून आधवनीय कलशाला स्पर्श करावा. 'सर्व देवांच्यासाठी तुला भरून घेतला आहे', असा अर्थ व्यक्त करणारा मंत्र म्हणून पूतभृत्नामक ग्रहाला स्पर्श करावा. म्हणजे तीनही पवमानांचा परस्परांशी संबंध जोडल्यासारखे होते. आणि यजमानाला सर्व आयुष्य मिळते, आयुष्य संपण्यापूर्वी तो मरत नाही. तो पशुमान होतो व त्याला प्रजाही प्राप्त होते. (अनुवाक १).

सोमयागाच्या मुख्य दिवशी तीन वेळ सोम कुटून त्याचा रस तयार करावा लागतो. सकाळच्या सोम कुटून रस काढण्याच्या अनुष्ठानाला प्रात:सवन,

दुपारच्याला माध्यंदिन सवन, आणि सायंकाळच्याला तृतीय सवन असे म्हणतात. एवं च, सोमयज्ञाच्या मुख्य दिवशी ही तीन सवने व्हावयाची असतात. परंतु प्रातःसवन व माध्यंदिन सवन या दोहोमध्येच प्रत्यक्षतः सोमवल्ली कुटून रस काढला जातो. आणि तृतीय सवनात सोमवल्लीचा चोथा कुटून त्यापासून निघेल तो रस काढण्यात येतो. आणि त्यामुळे प्रत्यक्ष सोमवल्लीचे तुकडे कुटण्याच्या अभावी नुसता चोथा कुटून तो कुटणारे यजमान जणू काय तृतीय सवनाला लुप्त करतात. म्हणजे त्याच्या यथार्थ स्वरूपाचा जणू नाशच करतात. यास्तव असे न व्हावे म्हणून प्रातःसवनाचे अनुष्ठानात 'उपांशु' नांवाच्या ग्रहाचे हवन झाल्यानंतर त्या 'उपांशु' संज्ञक ग्रहपात्रावर एक सोमवल्लीचा तुकडा ठेवण्यात येऊन तृतीय सवनाची वेळ येईपर्यंत तसाच राखला जात असतो. तृतीय सवनाचे अनुष्ठानप्रसंगी तो तुकडा पाट्यावर कुटण्यासाठी ठेवलेल्या चोथ्यात मिसळून त्यावर 'वसतीवरी' नामक घागरीतील पाणी शिंपडावे आणि मग त्या तुकड्यासह चोथा कुटून त्याचा रस काढावा. अशाप्रकारे त्या तुकड्यासह चोथा कुटल्याच्या योगाने इतर दोन सवनांप्रमाणे ह्या सवनातही सोमवल्ली कुटल्यासारखे होते आणि ते तृतीय सवन बहुवंशी चोथा कुटून केले गेले असले तरी देखील ते स्वरूपतः लुप्त किंवा नष्ट होत नाही. असे केल्याने सर्वच सवने प्रत्यक्ष सोमवल्ली कुटून तिचा रस काढल्यासारखी आणि यथार्थ फल देण्याविषयी सारखीच समर्थ केल्याप्रमाणे होते.

१ समुद्राच्या उदरात त्याचे जणू काय पायच अशा लाटा ज्याप्रमाणे एका मागोमाग हेलकावत असतात त्याचप्रमाणे हे आधवनीय व पूतभृत् नांवाचे दोन मोठमोठाले ग्रह-मातीचे-डेरे म्हणजे जणू काय दोन समुद्रच असून त्यांच्या ठिकाणी त्यांच्या पायाप्रमाणे धावणाऱ्या सोमरसाच्या लाटा एकामागोमाग हेलावत असतात. सोमरसाने अथांग भरलेल्या या दोन कलशरूपी समुद्रांपैकी दिवसरूप असलेल्या 'पूतृभूत्' नामक समुद्राला लोक आपल्या दृष्टीने पाहू शकतात आणि त्यातून तरून पुढे जातात. आणि दुसऱ्या आधवनीय नामक समुद्राला तो अदृश्य असल्यामुळे लोक पाहू शकत नाहीत. आणि काळोखासारख्या भासणाऱ्या त्या समुद्रातून पुलाप्रमाणे उपयोगी पडेल अशा नौकेसारख्या साधनानेच लोक पैलतीरी जातात. २ केसाप्रमाणे भासणाऱ्या तेजस्वी रविकिरणांनी युक्त आणि त्रिभुवनांच्या ठिकाणी असलेल्या सर्व लोकांना आपल्या किरणांनी प्रकाशित करतो असा एक सूर्य अहोरात्ररूपी दोन वस्त्रे

सतत परिधान करीत असतो. दिवस आणि रात्र यांच्यामध्ये केव्हाही खंड पडत नाही. सूर्याच्या दोन वस्त्रांमध्ये रात्रीरूपी वस्त्र मलिन आणि दिवसरूपी वस्त्र पांढरे स्वच्छ आहे. सूर्य जेव्हा रात्रीरूपी काळे वस्त्र पांघरतो तेव्हा त्याचे स्वरूप लोकांच्या डोळ्याआड होते आणि जीर्ण झालेले व कृष्णवर्ण असे रात्रीरूपी वस्त्र परतून घेऊन सूर्य जेव्हा दिवसरूपी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करतो तेव्हा त्याचे लोकांना दर्शन होते. हा द्रोणकलशसंज्ञक ग्रह म्हणजे दुसरा आदित्यच आहे. सूर्य जसा केव्हा अदृश्य तर केव्हा दृश्य होतो तसाच हा द्रोणकलशही केव्हा हविर्धानसंज्ञक गाड्याखाली लपून अदृश्य होतो आणि पुन्हा बाहेर येऊन दिसू लागतो.

पुरातन काळी असुरांच्यावर जय मिळविण्यासाठी देव यज्ञामध्ये जेव्हा एखादे अद्भुत कर्म करीत तेव्हा असुरांना ते कळत असे आणि ते आपल्या यज्ञात तसे करीत. यामुळे देवांना जय मिळेना. तेव्हा सर्व देवांनी एकत्र बसून विचार केला आणि जयप्राप्तीचा उपाय म्हणून सोमयागरूपी महायज्ञ करण्याचे त्यांनी निश्चित केले. मात्र या महायज्ञाच्या अनुष्ठानाचे स्वरूप यत्किंचितही असुरांना कळणार नाही अशी दक्षता देवांनी घेतली होती. व तदनुसार महायज्ञाचे अनुष्ठान देवांनी अत्यंत गुप्तपणे चालू केले. आम्ही अग्निहोत्रहोम करीत आहो असा बाहेर बोभाटा करून त्यांनी एकांत अशा स्थळी सोमयागाची दीक्षा घेऊन दुग्धाहारावर राहण्याचे व्रत स्वीकारले. ज्याप्रमाणे सायंकाळी आणि सकाळी अग्निहोत्र होम देण्यात येतो त्याप्रमाणे दीक्षेसंबंधी दुग्धाहाररूपी व्रतही सायंकाळी व सकाळी याप्रमाणे दोन वेळ करीत जावे. आम्ही पौर्णमासेष्टी करीत आहो असा बाहेर गवगवा करून आतून त्यांनी अग्निष्टोमीय पशूचे यजन केले. नंतर आम्ही दर्शेष्टी करीत आहोत असे बाहेर प्रसिद्ध करून एकांतात त्यांनी अग्निदेवतेला उद्देशून सवनीय पशूचे यजनरूप अनुष्ठान केले. नंतर चातुर्मास्य यज्ञासंबंधी 'वैश्वदेव' संज्ञक पर्वाचे अनुष्ठान आम्ही करीत आहो असा सर्वत्र बोभाटा करून अंतस्थ रीतीने त्यांनी सोमयागाच्या मुख्य दिवशी करावे लागणारे प्रात:सवनसंज्ञक अनुष्ठान केले. वरुणप्रघास नामक पर्वाचे अनुष्ठान आम्ही करीत आहो अशी चोहोकडे प्रसिध्दी करून देवांनी माध्यंदिन सवन नामक अनुष्ठान अगदी गुप्त रीतीने केले. नंतर साकमेधनामक पर्वाचे आणि त्र्यंबकसंज्ञक यागाचे अनुष्ठान करीत असल्याचे बाहेर प्रसिध्द करून अंतस्थ रीतीने देवांनी तृतीय सवनाचे अनुष्ठान केले. त्यामुळे देवांनी

आज कोणते यज्ञानुष्ठान केले त्याची अत्यंत हिकमतीने छडा काढणाऱ्या असुरांना सुध्दा भुरळ पडली आणि देवांच्याकडून बाह्यात्कारी करण्यात येत असलेला बोभाटाच खरा वाटून देवांनी केलेल्या सोमयागाच्या अनुष्ठानाचा प्रकार असुरांना यत्किंचितही समजला नाही. देवांच्या अनुष्ठानाचे यथार्थ स्वरूप समजून घेण्याच्या कामात अयशस्वी झालेले ते असुर 'आमच्याकडून हे देव आता मारले जाणे अशक्य झाले आहे, म्हणजे देवांच्या वर जय मिळविणे आम्हास अशक्य आहे' असे आपआपसांत बोलू लागले. ज्या सोमयागाच्या योगाने कोणाकडूनही हिंसा केली जात नाही. त्या सोमयागास 'अध्वर' असे म्हणतात. हिंसारहितत्व हेच त्या सोमयागरूप अध्वराचे अध्वरत्व किंवा स्वभावगुण होय. सारांश, अध्वर म्हणजे हिंसारहित असा सोमयाग केल्याने देव विजयी झाले आणि असुर पराभव पावले. सोमयागाचे हे माहात्म्य जाणून जो सोमयाग करतो तो यजमान स्वतःच्या प्रयत्नाने विजयी होतो व त्याचा शत्रू पराभूत होतो. (अनुवाक २).

१ हे सोमराजा, तू अग्नीला सर्व बाजूंनी व्यापून राहणारा आहेस. त्याचप्रमाणे इंद्राला आणि सर्व देवांनाही चोहोकडून व्यापून राहणारा आहेस. ब्रह्मवर्चसाने युक्त होऊन उभा राहणाऱ्या मला तर तू सर्व बाजूंनी व्यापून टाकले आहेस. अशाप्रकारे सर्वव्यापी सोमराजा, तू आम्हाला पवित्र कर. हे राजा, आमच्या गाई, आमचे घोडे, आमचे स्वकीयजन आणि आम्हाला पोषक होणाऱ्या ओषधी म्हणजे धान्ये या सर्वांना तू सुख दे. हे धनपते तुझ्या प्रसादापासून आम्ही केव्हाही तुटून न पडणाऱ्या व सद्गुणांनी शोभणाऱ्या पुत्रांनी आणि मोठ्या धनसंचयाने युक्त होऊन सत्पात्री दान करणारे होऊ यास्तव दान करण्याची इच्छा करणाऱ्या मला भरपूर धन दे. मला सुखी करणाऱ्या हे सोमा तुझा रस योग्य वेळी मी प्राशन करीन. आणि तो प्राशन केल्यानंतर तुझ्याकडून अपेक्षित केलेले सर्व फल मी उत्कर्षाने उज्वल करीन. २ हे उपांशुसंज्ञक ग्रहपात्रा तू बलप्रद आहेस. यास्तव तू माझ्या उच्छ्वासरूपी प्राणाला बलशाली करून मला पवित्र कर. ३ हे अंतर्याम ग्रहपात्रा, तू बलप्रद आहेस त्याअर्थी तू माझ्या निश्वासरूपी अपान वायूला बलसंपन्न व मला पवित्र कर. ४ उपांशुसवन नामक हे पाषाणा (वरवंट्या) तू बलप्रद आहेस यासाठी तू माझ्या कंठामध्ये असणाऱ्या व्यान वायूला बलशाली व मला पवित्र कर. ५ हे ऐंद्रवायव, तू बलप्रद आहेस यास्तव

तू माझ्या वाणीला धनवान करून मला पवित्र कर. ६ हे मैत्रावरुण तुम्ही बलप्रद आहात. माझ्या प्राण व अपान वायूंना तुम्ही बलशाली करून मला पवित्र करा. ७ हे शुक्र व मंथी संज्ञक ग्रहपात्रांनो, तुम्ही बलप्रद आहात त्या अर्थी माझ्या दोन्ही नेत्रांना तुम्ही बलसंपन्न व मला पवित्र करा. ८ हे आश्वीनसंज्ञक ग्रहपात्रा, तू बलप्रद आहेस यास्तव तू माझ्या कर्णेंद्रियाला बलशाली व मला पवित्र कर. ९ हे आग्रयण ग्रहपात्रा, तू बलप्रद आहेस यास्तव तू माझे शरीर बलप्रद करून मला पवित्र कर. १० हे उक्थ्यग्रह, तू बलप्रद आहेस यासाठी तू माझ्या अंगांना बलशाली करून मला पवित्र कर. ११ हे ध्रुवसंज्ञक ग्रहा, तू बलप्रद आहेस त्या अर्थी तू माझे आयुष्य बलशाली करून मला पवित्र कर. १२ हे अतिग्राह नामक पात्रांनो, तुम्ही बलप्रद आहात यासाठी तुम्ही माझे सामर्थ्य बळकट करून मला पवित्र करा. १३ हे द्रोणकलशा तू जणू विष्णूचे जठर असून बलप्रद आहेस. त्या अर्थी तू मला बलशाली व पवित्र कर. १४ हे आहवनीय, तू जणू काय इंद्राचे उदर असून बलप्रद आहेस. म्हणून तू मला बलशाली व पवित्र कर. १५ हे पूतभृत् तू जणू काय सर्व देवांचे उदर असून बलप्रद आहेस. यासाठी तू मला बलशाली व पवित्र कर. १६ हे आहवनीय अग्ने तू प्रजापतीरूप आहेस. 'क' हे तुझे नांवच तू सुखाची मूर्तीच आहेस हे सुचवीत आहे. प्रजापतीचा संतोष होण्यासाठी व मला सुख देण्यासाठीच मी तुझ्याकडे अवलोकन करीत आहे. हे आहवनीय, सोमरसाची आहुती देऊन ज्या अर्थी मी तुला तृप्त केले आहे आणि त्या सोमरसाच्या आहुतीने तुला आनंदित केले आहे त्या अर्थी तुझ्या प्रसादाने मी उत्कृष्ट अशा पुत्रपौत्रादि व सेवकरूपाने असणाऱ्या प्रजेने युक्त असा होईन. पराक्रमी पुत्रांच्या योगाने मी सुवीर म्हणजे पराक्रमी अशा पुत्रांचा पिता होईन. तुझ्या कृपेने मिळालेल्या बलाने मी बलवान, व धनाच्या भरपूर साठ्याने फार मोठा धनिक होईन. १७ सर्वसमष्टिरूपा हे सोमराजा, तू बलप्रद आहेस यास्तव आपल्या सर्व रूपांच्या पासून मला बलसंपन्न व पवित्र कर. सत्पात्री दान करू इच्छिणाऱ्या मला तू पुष्कळ धन दे. वर्णिलेल्या गुणांनी युक्त अशा तुझा रस मी योग्य वेळी प्राशन करीन आणि प्राशन केलेल्या त्या तुझ्या रसाच्या प्रभावाने तुझ्याकडून अपेक्षित अशा सर्व फलाला उज्वल करीन.

ऐश्वर्य प्राप्तीची इच्छा असलेल्या यजमानाने सर्व पात्रांत भरून राहिलेला

हा प्रजापतिरूप सोम आणि त्याच्या योगाने साध्य होणारा प्रजापतीस्वरूप यज्ञ अवलोकन करावा. असे केले म्हणजे यजमानाने त्या प्रजापतीला तृप्त केल्याप्रमाणे होते. व तो तृप्त झालेला प्रजापती त्या यजमानाला प्रजा ऐश्वर्य इ.नी सर्वतोपरी उज्वल करतो. ब्रह्मवर्चस् प्राप्त होण्याची इच्छा असेल त्या यजमानाने सर्व पात्रांत भरून राहिलेला हा प्रजापतीरूप सोम आणि त्याच्या योगाने साध्य होणारा प्रजापतिस्वरूप यज्ञ अवलोकन करावा. म्हणजे त्याने प्रजापतीला तृप्त केल्यासारखे होते. मग तो प्रजापती त्या यजमानाला ब्रह्म वर्चसाने म्हणजे वेदाध्ययनजन्य तेजाने सर्वतोपरी उज्वल करतो. रोगग्रस्त अशा यजमानाने आपल्या रोगमुक्ततेसाठी सर्व पात्रांत भरून राहिलेला हा प्रजापतिस्वरूप सोम व त्याच्या योगाने साध्य होणारा प्रजापतिस्वरूप यज्ञ अवलोकन करावा म्हणजे प्रजापतीला संतुष्ट केल्यासारखे होते. व संतुष्ट झालेला तो प्रजापती यजमानाला रोगमुक्त करून दीर्घायुष्याच्या योगाने सर्वतोपरी उज्वल करतो. शत्रूला ठार मारण्याची इच्छा असेल त्या यजमानाने सर्व पात्रांत भरून राहिलेला प्रजापतिस्वरूप सोम व त्याच्या योगानेच पूर्ण होणारा प्रजापतिरूप यज्ञ अवलोकन करावा. म्हणजे त्याने प्रजापतीला संतोषित केल्याप्रमाणे होते. व संतोषित झालेला तो प्रजापती त्या यजमानाच्या शत्रूला त्याच्या प्राण व अपान या दोन्ही वायूंपासून आणि वाणी, योगक्षेम, दोन्ही नेत्र, दोन्ही कर्णेंद्रिये, शरीर व त्याची सर्व अंगे आणि आयुष्य ह्या सर्वांच्यापासून वियुक्त करतो. आणि मग तो शत्रू तात्काळ मरण पावतो. (अनुवाक ३).

१ वेदीची जागा खणण्यासाठी ठेवलेला स्फ्य, खणलेली जागा सारखी करणारे हे चोपणे, वेदीच्या जागेत उगवलेले गवत काढण्यासाठी असलेले हे खुरपे, आणि वेदीच्या ठिकाणी असलेले झाडझूड तोडण्यासाठी ठेवलेली ही कुऱ्हाड, ह्या वेदी तयार करण्याच्या साधनांपैकी प्रत्येक साधन आमचे कल्याण करणारे असो. त्याचप्रमाणे या सर्व साधनांनी तयार केली जाणारी वेदीही आमचे कल्याण करणारी असो. स्फ्य इत्यादि साधनांनो, तुम्ही यज्ञाला उपयोगी पडणारी व यज्ञाला संपादन करणारी आहात. यास्तव या यज्ञात तुम्ही मला आपल्याजवळ बोलवा. म्हणजे तुम्ही माझ्या सन्निध असा. २ द्युलोक व पृथ्वी हे दोन्ही लोक मला यज्ञाची अनुज्ञा देवोत. ३ बहिष्पवमान स्तोत्र गाण्याचे ठिकाण असलेले हे आस्ताव नामक स्थळ मला यज्ञाची अनुज्ञा देवो. ४ सोमरसाने भरलेला हा द्रोणकलश मला यज्ञाविषयी अनुज्ञा

देवो. ५ सर्व पात्रांत भरून राहिलेला हा सोमरस मला यज्ञाची अनुज्ञा देवो. ६ हा आहवनीय अग्नी मला यज्ञाची अनुज्ञा देवो. ७ यज्ञासाठी येणारे सर्व देव मला यज्ञाविषयी अनुज्ञा देवोत. ८ हा यज्ञ मला त्याचे अनुष्ठान करण्याची आज्ञा देवो. ९ आणि मैत्रावरुण इत्यादि होत्रक ह्या यज्ञाविषयी अनुज्ञा देवोत.

'नमस्कार केला नाही तर रागवून यज्ञाचा नाश करणाऱ्या या आहवनीय अग्नीला माझा नमस्कार असो, त्याच्या प्रसादाने यज्ञाचे यश मला प्राप्त होवो,' अशा अर्थाच्या मंत्राने आहवनीय अग्नीचे उपस्थान करावे. कारण यज्ञ म्हणजे आहवनीय अग्नीच होय. त्याला नमस्कार न केला तर तो यज्ञाचा नाश करतो. म्हणून त्यालाच नमस्कार करून मग सद नामक मंडपात प्रवेश करावा. म्हणजे तो यजमानाच्या शरीराचा नाश करण्याला प्रवृत्त होत नाही.

'नमस्कार न केल्यास रागवून यज्ञाचा नाश करणाऱ्या ह्या आग्नीध्र मंडपातील रुद्ररूपी अग्नीला नमस्कार असो, या माझ्या नमस्काराने संतुष्ट होऊन तू माझे रक्षण कर,' असे म्हणून आग्नीध्र मंडपातील अग्नीची प्रार्थना करावी. असे न केले तर तो यज्ञाचा नाश करतो म्हणून त्यालाच नमस्कार करून सद नामक मंडपात प्रवेश केला असता तो रुद्ररूपी अग्नी यजमानाचा नाश करत नाही.

'होत्याच्या समोर असलेल्या धिष्ण्य नामक स्थलाचे ठिकाणी असणाऱ्या हे इंद्ररूपी अग्निदेवा, नमस्कार न केल्यास रागावून यज्ञविध्वंस करणाऱ्या तुला माझा नमस्कार असो, माझ्या नमस्काराने संतुष्ट होऊन तू माझी इंद्रियशक्ती आणि माझे वीर्य नष्ट करू नकोस', असे म्हणून होत्याच्या समोरील धिष्ण्यसंज्ञक स्थानावर असलेल्या अग्नीचे उपस्थान करावे. म्हणजे यजमानाने जणू काय आपल्या इंद्रियशक्तीचा व वीर्याचा नाश न करण्याविषयी त्या अग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते आणि तो अग्नी त्या यजमानाची इन्द्रियशक्ती व वीर्य यांचा नाश करीत नाही.

ज्या देवता 'सद' नामक मंडपात बसणाऱ्या यजमान, ऋत्विज व इतर सभासद यांना संकटात घालतात त्यांचे सामर्थ्य जाणून जो यजमान त्यांना नमस्कार करून त्यांची प्रसन्नता संपादन करतो तो यजमान सदो

मंडपात प्रवेश केल्यानंतर आपल्या सर्व अनुयायांच्यासह संकटात पडत नाही. यास्तव यजमानाने 'नमोऽग्नये मखघ्ने' इत्यादि मंत्र म्हणून त्या त्या अग्नीची उपस्थानपूर्वक प्रार्थना करावी. अग्न्यादि देवता ह्याच रुष्ट होऊन सदोमंडपात बसणाऱ्यांना संकटात घालीत असतात. म्हणून त्या देवतांना ओळखून जो विद्वान यजमान त्यांना नमस्कार करून सदो मंडपात प्रवेश करतो तो तेथे गेल्यावर त्यांच्या कृपेने सर्व अनुयायांच्यासह संकटात पडत नाही.

१० हे द्यावापृथीवी हो, जो तुमचे उपस्थान करून तुमची प्रार्थना करीत नाही त्याचे विषयी तुमची मनोवृत्ती शिथिल धरसोडीची असेल. परंतु मी तुमची उपस्थानपूर्वक प्रार्थना केली असल्याने तुम्ही मला दृढ मनोवृत्तीने अनुकूल व्हा. आणि माझ्या कल्याणाच्या आड येणाऱ्या पातकांपासून माझे रक्षण करा. ११ द्युलोकासंबंधी मजकडून काही अपराध घडला असल्यास त्याच्या पातकापासून सूर्यदेव मला सुरक्षित ठेवो. १२ अंतरिक्षलोकाविषयीच्या अपराधापासून वायुदेव मला वाचवो. पृथ्वीसंबंधाने मजकडून घडणाऱ्या पातकापासून अग्नी, पितरांच्या विषयी घडलेल्या दोषापासून यम आणि मनुष्यांच्याशी वागण्यात झालेल्या दोषापासून सरस्वती देवी माझे संरक्षण करो. सदनामक मंडपाच्या हे द्वारदेवतांनो, तुम्ही दोघीही मला कोणत्याही प्रकारे ताप देऊ नका. १३ हे सदनामक मंडपा, तुला माझा नमस्कार असो. १४ सदो मंडपात असलेल्या सभासदांचा अधिपतीच असणाऱ्या हे ब्रह्मा, तुला मी नमस्कार करतो. १५ माझ्या यज्ञामध्ये प्रत्येक कामात पुरोगामी असणाऱ्या आणि माझ्याशी मित्रभावाने वागून आपले कर्तव्य करीत राहणाऱ्या हे ऋत्विजांनो, तुम्हाला मी नमस्कार करतो. १६ द्युलोका, तुला मी नमस्कार करतो. १७ हे भूमाते पृथ्वी, तुलाही मी नमन करीत आहे. १८ हे दर्भा, माझ्या बसावयाच्या आसनाच्या ठिकाणी उत्पन्न झालेला तू जणू त्रासदायक असा सर्पच आहेस. यास्तव तू येथून ऊठ आणि माझ्यापेक्षा मतिमंद असा जो दुसरा कोणी माणूस असेल त्याच्या घरी जाऊन रहा. १९ जे पुरुष मजपेक्षा हीन आहेत त्यांच्याहून मी उच्च स्थितीस पोचलोच आहे. पण यापुढे माझ्यापेक्षा आज जे उच्च स्थितीत आहेत त्यांच्याहीपेक्षा मी अधिक उच्च स्थितीस जाईन. २० हे द्यावापृथिवीहो, अग्निष्टोम यज्ञाच्या अनुष्ठानासारखा जो सोन्यासारखा दिवस आज उगवत आहे, त्यामध्ये मजकडून कोणत्याही प्रकारे वैकल्य घडणार नाही अशा प्रकारे तुम्ही उभयता माझे रक्षण करा.

'सद' यज्ञमंडपात यजमान प्रवेश करू लागला म्हणजे त्याच्या मागोमाग पितरही प्रवेश करीत असतात आणि यजमानाने जर त्यांना नम्रपणे नमस्कार केला नाही तर ते रुष्ट होऊन यजमानाचा नाश करण्यास प्रवृत्त होतात. म्हणून सदोमंडपात प्रवेश करताक्षणी यजमानाने त्या मंडपाच्या दक्षिणभागाकडे मुख करून नम्रपणे उभे राहावे आणि, 'हे पितरहो, या आपल्या सदोमंडपात येऊन बसा, आपण येथे येऊन बसलात म्हणजे आपल्यामुळे मी सत्पितरयुक्त आणि तुम्हीही आपल्या सुस्थित अशा अपत्यांनी युक्त व्हाल', अशी त्या पितरांची नमस्कारपूर्वक प्रार्थना करावी. म्हणजे त्या यजमानाला पितरांच्याकडून कोणत्याही प्रकारे त्रास होत नाही. (अनुवाक ४).

१ भक्षण करण्यास योग्य असणाऱ्या हे सोमरसा, मला दीर्घायुष्य प्राप्त व्हावयासाठी, माझे शरीर सुखी राहण्याकरता, धनाची भरपूर पुष्टी मिळावी म्हणून आणि मला बल आणि उत्कृष्ट अशी प्रजा प्राप्त व्हावी यासाठी, तू माझ्याजवळ ये. आमचा निवास सुखाचा होण्याला कारणभूत होणाऱ्या हे सोमरसा, आमची राहाणी सुखाची करण्याकरता तू माझ्या सन्निध ये, सुखाने राहता येण्यासाठी अवश्य अशा धन इत्यादि ज्या वस्तू असाव्या लागतात त्या सर्व वस्तूंमध्ये पहिली वस्तू असणाऱ्या हे सोमरसा ये, तू माझ्याजवळ ये. तू मजला फार आवडतोस. २ देवांचे वैद्य असणाऱ्या उभयता अश्विनीकुमारांच्या बाहूंनीच मी तुला आपल्या दोन्ही हातात धारण करतो. ३ हे सोमरसा, सर्व मनुष्यांच्या ठिकाणी सूक्ष्म दृष्टीने पाहाणाऱ्या तुला मी उत्कृष्ट अशा सूक्ष्म दृष्टीने अवलोकन करीत आहे. ४ माझ्या मुखाच्या ठिकाणी असणारी वाग्देवता सोमरसाचे आचमन करून तृप्त होवो. हर्षोत्पादक, विघ्नांचा नाश करणारी, यज्ञांचे जणू आदिकारण, आनंदाची वृध्दी व्हावी म्हणून सर्वदा मजकडे मुख करून असणारी म्हणजे मला अनुकल राहणारी आणि कोणाकडूनही प्रतिबंध होण्यास अशक्य, अशी ही वाग्देवता सोमरसाचे पान करून तृप्त होवो. विश्वात असणाऱ्या सर्व प्रजा आपल्या स्वाधीन ठेवणाऱ्या आणि सर्वांना शांती व सौख्य प्रदान करणाऱ्या हे सोमरसा, ये आणि तू माझ्या ठिकाणी सुख निर्माण कर. हिरवट रंगाच्या हे सोमरसा, तुझे प्राशन केल्यानंतर तू माझ्या उदरात सुखाने संचार कर. मला वांती न होईल अशा रीतीने माझ्या उदरात प्रविष्ट हो. तेणे करून उत्तम प्रजा मला प्राप्त होवो. माझ्या यज्ञकर्माची उत्तम प्रकारे सांगता होवो. माझा उत्साह

वाढो. धनाचा मोठा संचय मला मिळो. माझ्या उदरात रसरूपाने राहणाऱ्या हे सोमराजा, वांतीसारख्या उपद्रवाने मला भेडसावू नकोस. माझ्या हृदय-कमलाच्या ठिकाणी असलेले माझे मन तुझ्या प्रखर उत्तेजकतेने चैतन्यरहित म्हणजे अशांत होवू देऊ नकोस. माझे मन जर शांत राहिले तर ते माझ्या इंद्रियांना उत्तेजित करण्याला, माझे बल वाढविण्याला आणि माझे आयुष्य वृद्धिंगत करून माझ्या शरीराचे ठिकाणी कांती उत्पन्न होण्याला कारणभूत होईल. ५ हे सोमदेवा, आठ वसूंच्या समुदायात तू राहणारा आणि यजमानाच्या ठिकाणी असणारी तुजविषयीची आदरबुध्दी जाणणारा आहेस. गायत्री छंदातील मंत्रसमूह ज्यामध्ये योजिला होता अशा प्रात:सवनामध्ये इंद्राने ज्या तुझ्या मधुर रसाचे प्राशन केले आणि ज्या रसाचे प्राशन करण्याविषयी माझ्या सहकाऱ्यांनी मला अनुज्ञा दिली आहे त्यांना तो रस पिण्याची अनुज्ञा देऊन मीही तो रस प्राशन करीत आहे. ६ हे सोमरसा अकरा रुद्रांच्या समुदायात तू राहणारा असून यजमानाच्या ठिकाणची तुजविषयीची आदरबुध्दी ओळखणारा आहेस. त्रिष्टुप् छंदातील मंत्र ज्यामध्ये म्हटले गेले अशा माध्यंदिन- सवन-संज्ञक अनुष्ठानात इंद्राने जो तुझा मधुर रस प्राशन केला तो रस प्राशन करण्याविषयी माझ्या सहकाऱ्यांनी ज्या अर्थी मला अनुज्ञा दिली आहे, त्या अर्थी त्यांनाही तशीच अनुज्ञा देऊन मी त्या रसाचे प्राशन करीत आहे. ७ हे सोमदेवा, बारा आदित्यांच्या समुदायात तू राहत असून यजमानाची तुझ्या विषयी असलेली आदरबुध्दी तू जाणत असतोस. जगती छंदात्मक मंत्र पठण करून संपादिलेल्या तृतीय सवनाच्या अनुष्ठानप्रसंगी मी तुझा मधुर रस प्राशन केला. तो रस प्राशन करण्याविषयी माझ्या सहकाऱ्यांनी मला अनुमती दिली आहे. मी त्यांना तशीच अनुमती देऊन हा रस प्राशन करीत आहे. मनुष्यांच्या कडून ज्यांची प्रशंसा केली जाते अशा पितरांनी प्राशन करून उरलेला हा सोमरस मी पीत आहे. ८ हे सोमरसा तू सर्वतोपरीने वृद्धिंगत हो. तुझे वीर्य माझ्या शरीरात सर्वत्र प्रवेश करो. अन्नाशी समरस होण्याला तू योग्य हो. ९ हिरवट रंगाच्या हे सोमरसा, माझी सर्व अंगे तू उल्लसित कर. माझ्या पुत्रादि अनुयायांना तुझे पान करण्याविषयीच्या तृष्णेने रहित करू नकोस. तुझे पान करण्याची त्यांना सर्वदा इच्छा असू दे. कल्याणप्रद असा झालेला तू माझ्या शरीरातील मुखगत सात छिद्रांच्या ठिकाणी संचार करणारे जणू सात ऋषीच असे जे सात प्राण त्यांना तृप्त कर

आणि माझे नाभिस्थान ओलांडून खाली जाऊ नकोस. १० आम्ही सर्वजण सोमरस प्यालो आहोत आणि त्यामुळेच आता आम्ही देवांच्या प्रमाणे अमर झालो आहोत. परमोज्वल स्वरूप आता आम्ही पाहिले असून इंद्रादि देवांचे सान्निध्यही आम्ही मिळविले आहे. पापरूपी शत्रू आता आमचे काय करणार आहे? मनुष्यशरीर धारण करणाऱ्यांना भोगावी लागणारी मरणरूप हिंसा, अमर झालेल्या आम्हाला आता काय करू शकणार? ११ हे माझ्या ऋत्विजांनो, यज्ञाच्या शरीराचे जे अंग तुमच्याकडून घडलेल्या प्रमादामुळे आपल्या मूलस्वरूपापासून च्युत झाले असेल ते यज्ञाचे ठिकाणी उत्पन्न झालेले छिद्र जाणणारा व ते पुन्हा पूर्ववत् करण्यात कुशल असलेला अग्निदेव पुन्हा पहिल्यासारखे करो. १२ यज्ञाचे जे जे अंग अपूर्ण झाले होते ते ते आता पूर्ण झाले असल्याने अग्निदेवाने संतुष्ट होऊन माझे नेत्र मला पुन्हा दिलेले आहेत. देवाधिपती इन्द्र व देवगुरू बृहस्पती यानेही माझ्या दोन्ही नेत्रांच्या ठिकाणची नष्ट झालेली अवलोकनशक्ती मला पुन्हा दिली आहे. देवांचे वैद्य असलेल्या दोघा अश्विनीकुमारांनीही माझ्या दोन्ही डोळ्यांचे नष्ट झालेले अवलोकनसामर्थ्य त्यांच्या तिकाणी पुन्हा स्थापन केले आहे. १३ हे सोमदेवा, यज्ञसाधनभूत अशा यजुर्मंत्रांनी यजन केलेल्या, पुन: पुन्हा आळवून गाईलेल्या साममंत्रांनी स्तविलेल्या आणि उक्थ किंवा शस्त्रसंज्ञक मंत्रसमूहाने प्रशंसिलेल्या आणि वर्णाने हिरवट अशा ज्या तुझ्या मधुररसाचे इंद्राने पान केले त्यातील उरलेल्या ज्या अवशेषाचे प्राशन करण्याकरिता माझ्या सहकाऱ्यांनी मला अनुज्ञा दिली आहे त्यांनाही मी तो प्राशन करण्याविषयी अनुज्ञा देऊन मी तो उरलेला रस प्राशन करीत आहे. १४ हे सोमावशेष धानांनो ! तुम्ही मी प्राशन केलेल्या सोमरसाला सर्वतोपरी पूरकच होऊन राहिला आहात. यास्तव पुत्रपौत्रादि प्रजा आणि जीवनास अवश्य असे सर्व प्रकारचे धन या दोन्ही प्रकारांनी मला तुम्ही परिपूर्ण करा. १५ हे ताता (पितृदेवा) तुम्हाला आणि तुमच्या बरोबर असणाऱ्यांनाही तृप्त करण्यासाठी हे पुरोडाशशकलरूपी अन्न मी देत आहे. १६ हे परमपूज्य पितामह, तुम्हाला आणि तुमच्या बरोबर येणाऱ्यांना संतुष्ट करण्यासाठी हे पुरोडाशशकलरूप अन्न मी तुम्हाला समर्पण करीत आहे. १७ हे वंद्य प्रपितामहा, आपण आणि आपल्या बरोबर येणाऱ्या सहचरांना तृप्त करण्यासाठी हे पुरोडाश शकलरूपी अन्न मी आपल्याला समर्पण करीत आहे. १८ हे पूज्य पितरहो, या यज्ञामध्ये तुम्हाला जो

जो भाग अर्पण केला आहे तो आपआपला भाग प्रेमाने सेवन करा आणि आनंदित व्हा. १९ हे पितरहो, तुमच्या जवळ असलेल्या सारभूत रसाला नमस्कार असो. तुमच्या बलाला नमस्कार असो. तुमच्या जीवात्म्याला नमस्कार असो. तुम्हाला हविर्द्रव्यरूप अन्न देणाऱ्या स्वधा देवतेला नमस्कार असो. तुमच्या क्रोधाला नमस्कार असो. तुमच्या विध्वंसक कार्यसामर्थ्याला नमस्कार असो. हे पितर हो, तुम्हालाही नमस्कार असो. तुम्ही ज्या पितृलोकी गेला आहात त्या ठिकाणी तुमच्या बरोबर जे अन्य पितर राहत आहेत ते तुम्हाला अनुकूल असेच वागोत. आणि जेव्हा तुम्ही पुन्हा येथे भूलोकावर जन्माला याल तेव्हा मला अनुकूल होऊन वागा. पितृलोकात तुमच्या बरोबरीच्या पितृसमूहात तुम्ही वरिष्ठ होऊन रहा आणि या भूलोकावर माझ्या बरोबर जे कोणी असतील त्यांच्या मध्ये तुमच्या कृपेने मी वरिष्ठ होऊन राहीन. २० हे सृष्टिकर्त्या प्रजापतिदेवा, या जगड्व्याळ विश्वामध्ये उत्पन्न ज्या अनंतावधी वस्तू दिसत आहेत त्यांची उत्पत्ती आणि विनाश तुझ्यावाचून दुसरा कोणीही करू शकणार नाही. म्हणून ज्या कामना मनात धरून आम्ही तुझे आवाहन करीत आहोत त्या कामनांचे फल आम्हाला प्राप्त होवो. तुझ्या प्रसादाने आम्हाला पुत्रपौत्रादि प्रजा व धन यांचे स्वामित्व प्राप्त होवो. २१ हे समित्शकल देवांच्या संबंधी आमच्याकडून केले गेलेले जे पातक असेल त्याचा तू नाश करणारे हो. हे समित्शकल मनुष्यांच्या संबंधात आमच्या हातून जे पाप आमच्याकडून केले गेले असेल त्याचा तू नाशक हो. हे समित्शकल, पितरांच्या विषयी जे काही पातक आम्ही केले असेल त्याचा तू नाश करणारे हो. २२ हे सोमदेवा, पाण्यात धुऊन स्वच्छ केलेल्या, यज्ञामध्ये ऋत्विज म्हणून नियुक्त झालेल्या मनुष्यांनी कुटून तयार केलेल्या, यजुर्मंत्रांनी यजन केलेल्या, पुन: पुन: आळवून गाइलेल्या साममंत्रानी स्तविलेल्या, उक्थ संज्ञक मंत्रांनी प्रशंसिलेल्या अशा तुझा जो भक्षणयोग्य अंश अश्व आणि गाई यांना प्रदान करण्यासाठीही सुयोग्य करण्यात आला होता, आणि पितरांनीही त्यांना भक्षणयोग्य म्हणून ज्याचा स्वीकार केला होता, अशा त्या भक्षणयोग्य अंशाचे सेवन माझ्या इतर सहकार्यांच्या अनुमतीने त्यांच्यासह मीही अवधाणपूर्वक करीत आहे. (अनुवाक ५).

१ हे पृषदाज्या, तुझ्या मूळ रूपाच्या दृष्टीने तुझ्याकडे पाहिल्यास तू गाईचे दूधच आहेस. तू सर्व देवांचे जणू शरीरच आहेस. अंगावर ठिपके

असलेल्या मरुतांच्या पृषत्‌नामक घोडयांचा भक्षणीय असा भाग समजूनच मी तुला आज वृध्दिंगत करतो. पृषत्‌संज्ञक अश्वांचे तू सेवनीय असे भक्ष्यच आहेस. यज्ञरूपी विष्णूला तू हृदयाप्रमाणे प्रिय आहेस. सर्व देवांनी ज्याची इच्छा करावी अशा यज्ञस्वरूपी विष्णूने मुख्यत्वे करून तुझा एकटयाचाच स्वीकार केला आहे. तुझ्या ठिकाणी एकरूप झालेल्या घृताने व दह्याने तुझे माहात्म्य वृद्धिंगत होवो. वर्णन केलेल्या गुणांनी युक्त, यजनरूपाने देवांना अर्पण केलेल्या आणि देवांनी भक्षण केलेल्या तुजपासून जे फळ निष्पन्न होणार आहे ते सारे मजजवळ येवो. सर्व मानवांना त्यांचे हित दाखवून देणारी तू जणू प्रकाशाची ज्योतच आहेस. जिच्या अंगावर ठिपके आहेत अशा पांढऱ्या गाईचे तू दूधच आहेस. २ हे इन्द्रदेवा, द्युलोक आणि पृथ्वी ही दोन्ही स्वकीय अशा माहात्म्याने जितक्या कालावधीपर्यंत विस्तारलेली राहतील आणि क्षारोद, इक्षुरसोद, सुरोद, घृतोद, दधिमंडोद, क्षीरोद व शुध्दोद हे सात समुद्र जावत्काल विद्यमान राहतील तावत्काल तुला सेवन करण्यास पुरेल इतक्या दह्याने मी ग्रहपात्र भरून घेतो. सर्व देशांत आणि सर्व काळी तुझे हे दह्याने भरलेले ग्रहपात्र सारभूत अंशाने परिपूर्ण भरून राहील आणि केव्हाही नष्ट होणार नाही अशा प्रकारे मी हे दह्याने भरून घेत आहे.

काळ्या रंगाचा शकुन पक्षी जर पृषदाज्याला शिवेल तर त्या यजमानाच्या सेवेत असणारे शूद्र मरतील. जर कुत्रा स्पर्श करील तर त्या यजमानाचे सर्व चतुष्पाद पशू मरण पावतील. पृषदाज्याचे बिंदू जर भूमीवर सांडले तर स्वत: यजमानच मरून जाईल. कारण पशू हे पृषदाज्यरूप आहेत. यजमानाच्या पृषदाज्याचे बिंदू जेव्हा भूमीवर सांडतात तेव्हा जणू पशूंचे प्राणच भूमीवर सांडतात. यासाठी पृषदाज्याचे बिंदू भूमीवर सांडलेच तर पुन्हा आणखी पृषदाज्य स्थालीत भरून घ्यावे. असे केल्याने पशूंचे प्राण जणू यजमानाने पुन: ग्रहण केल्यासारखे होते. प्राण हे पृषदाज्यस्वरूप आहेत. पृषदाज्याचे थेंब जर भुईवर सांडले तर यजमानाचे जणू प्राणच भुईवर सांडल्यासारखे होते. यास्तव जर कदाचित् पृषदाज्याचे थेंब भूमीवर सांडलेच तर स्थालीत पुन्हा पृषदाज्य भरून घेतले असता यजमानाने भूमीवर सांडलेल्या स्वत:च्या प्राणाचे पुन्हा ग्रहण केल्यासारखे होते. मात्र पृषदाज्य पुन्हा भरून घ्यावयाचे झाल्यास स्थालीमध्ये प्रथम सुवर्ण टाकून मग पृषदाज्य भरून घ्यावयाचे. कारण हिरण्य हे अमृतरूप आहे. आणि प्राण पृषदाज्यरूप आहे. यास्तव

अशाप्रकारे स्थालीत हिरण्य टाकून त्यावर पृषदाज्य भरून घेतलेल्या यजमानाने स्वतःच्या प्राणाच्या ठिकाणी अमृत ठेवल्यासारखे होते. स्थालीमध्ये टाकावयाचे हिरण्य शतप्रमाण भरेल इतक्या वजनाचे असावे. मनुष्य हा आयुष्याच्या परमावधीच्या दृष्टीने शंभर वर्षांचा आणि शंभर लहानमोठ्या इंद्रियांनी युक्त असतो. यास्तव शंभरमान वजनाचे हिरण्य पृषदाज्य भरून घेण्याच्या स्थालीत टाकले म्हणजे शंभर वर्षांच्या आयुष्याच्या ठिकाणी व शंभर इंद्रियांच्या ठिकाणी यजमानाने स्वतःला प्रतिष्ठित केल्यासारखे होते. अशा प्रकारे पृषदाज्य पुन्हा स्थालीत भरून घेतले म्हणजे ते अश्वाला हुंगावयास द्यावे. कारण अश्व हा प्रजापतीचा नेत्र असल्यामुळे प्रजापतीशी संबध्द आहे. प्राणाची उत्पत्ती प्रजापतीपासून होत असल्याने तोही प्राजापत्य म्हणजे प्रजापतिसंबध्दच आहे. म्हणून पृषदाज्य घोडयाकडून हुंगविले असतां तो प्रजापतिदेव स्वकीय अशा अश्वरूप योनीपासूनच यजमानासाठी प्राण निर्माण करतो. ज्या यजमानाचे पृषदाज्य स्थालीच्या बाहेर पडून भूमीवर सांडते त्याचा यज्ञ त्या यजमानापासून विच्छिन्न होतो. तथापि 'विष्णो त्वं नो अंतमः' ही विष्णुदेवतात्मक ऋचा म्हणून स्थालीत पृषदाज्य पुनः भरून घ्यावे. कारण यज्ञ हा विष्णुरूप आहे. यास्तव विष्णुदेवतात्मक पृषदाज्य भरून घेतले असता विष्णुस्वरूप अशा यज्ञाने विच्छिन्न झालेल्या यज्ञाला पुन्हा जोडून घेतल्याप्रमाणे होते. (अनुवाक ६).

१ सर्व कार्याची प्रेरणा करणाऱ्या हे सवित्या देवा, 'आम्ही तुझे स्तवन करणार आहो', असे जे तुला उद्गाता म्हणाला ते ऐकून घेऊन तुला त्याने जे स्तोत्र गावे असे वाटेल ते स्तोत्र गाण्याविषयी तू त्याला मनःपूर्वक अनुज्ञा दे. आणि परम उत्कर्षप्रद यागाचे निष्पादन कर. हे उद्गाते हो, ब्रह्मा नांवाचा ऋत्विज झालेला मी एक सामान्य मनुष्य आहे अशी भावना न करता मी बृहस्पतीच आहे अशी भावना ठेवा आणि तो बृहस्पतीच तुम्हाला आज्ञा करीत आहे असे समजा. 'आयुष्मती' नामक ऋचेचे तुम्ही गायन करा. त्या ऋचेपासून तुम्ही दूर जाऊ नका. त्या ऋचेतील प्रत्येक अक्षर सावधानतेने व्यक्त करून तिचे गायन करा. कारण ऋचा हेच सामाचे शरीर आहे. अर्थात् त्या ऋग्रूपी शरीराचे रक्षण उत्तम रीतीने होईल अशा सामाचे प्रमादरहित गायन करा. यजमानाचे कल्याण होण्यासाठी तुमच्या ज्या कामना मनात धरून तुम्ही सामगान कराल त्या तुमच्या सर्व कामना सत्य

होवोत. संकल्परूप अशा तुमच्या सर्व मन:कामना सफल होवोत. सत्य असेल तेच मनाने स्मरा आणि सत्य असेल तेच वाचेने बोला. सविता देवाची तुम्हाला आता आज्ञा मिळाली आहे असे समजून तुम्ही सामे गावयास लागा. २ उद्गात्यांच्याकडून गाइले जात असलेल्या हे स्तोत्रा, गायनयोग्य अशा सर्व स्तोत्रांत तू उत्कृष्ट आहेस. यथायोग्य असे उद्गात्यांनी गाइले गेल्यानंतर तू माझ्यासाठी तुझ्या ठिकाणच्या सारभूत रसाचे दोहन कर. गानयोग्य अशा सर्व स्तोत्रांत उत्तम असलेले तुझ्यासारखे स्तोत्र मजपासून केव्हाही विसरले जाऊ नये. ते मजजवळ स्मरणरूपानें टिकून राहावे. ३ होत्रकांकडून पठण केल्या जाणाऱ्या हे शस्त्रा, तू शस्त्रांमध्ये उत्तम असे शस्त्र आहेस. तुला पठण केल्यावर तू मजकरता तुझ्या ठिकाणच्या सारभूत रसाचे दोहन कर. तुझ्यासारखे शस्त्रांत उत्कृष्ट शस्त्र मजपासून विस्मरणामुळे कधीही दूर न जाता माझ्या स्मरणात सदैव राहो. स्तोत्र आणि शस्त्र या तुम्हा उभयतांच्या प्रसादाने केव्हाही थकवा न येणाऱ्या इंद्रियांनी युक्त झालेले आम्ही आम्हाला अपेक्षित अशा सर्व फलांचा उपभोग घेऊ. उत्कृष्ट प्रजा आणि अन्नही भरपूर संपादन करू. देवांच्या विषयी आम्ही त्यांचे सदैव यजन करू अशा प्रकारची जी आमची कामना असते ती सफल होवो. यज्ञानुष्ठानजन्य असे ब्रह्मवर्चस् नामक तेज माझ्या ठिकाणी प्राप्त होवो. ते माझ्यापासून दूर न जाता माझ्या ठिकाणी वाढत राहो. आता चालू असलेला यज्ञ योग्य वेळी समाप्त होईल. तो यज्ञ आमच्याकडे पुनश्च येवो. तो यज्ञ निरलसपणाने अनुष्ठान करणाऱ्या आम्हाला पूर्ण जाणत आहे आणि म्हणूनच तो यज्ञ आमच्या घरी पुन: पुन्हा अनुष्ठानरूपाने वाढत राहो. तो यज्ञ आम्ही ज्या देवतांचे यजन करीत आहोत त्या देवतांचे अधिकतेने पालन करो. आणि आम्हालाही वाढत्या अनुष्ठानाचे पालक करो. यज्ञपुरुषाच्या प्रसादाने यज्ञाला साधनभूत अशा धनांचे आम्हीही अधिपती होऊन राहू.

यज्ञ हा यज्ञपती असलेल्या यजमानाचे दोहन करतो किंवा यज्ञपती यजमान यज्ञाचे दोहन करतो, असा विचार मनात उद्भवतो. त्याचे समाधान असे की, यज्ञापासून दोहन कसे करून घ्यावे याचे ज्ञान असलेला आणि नसलेला या दोन प्रकारचे यजमान असतात. या दोहोंपैकी जो कोणी यजमान दोहनात्मक अभिमंत्रण मंत्र पठण न करता यजन करतो त्या अजाण यजमानाचे दोहन यज्ञ करतो. म्हणजे त्या यजमानाच्या ठिकाणी असलेले सत्त्व काढून

घेऊन त्याला निकामा करतो. अर्थात् तो यज्ञ केल्यानंतर दरिद्री होतो. आणि दुसऱ्या प्रकारचा, अभिमंत्रण मंत्र जाणणारा जो यजमान त्या मंत्राचे पठण करून यजन करतो तो यज्ञाचे दोहन करतो म्हणजे यज्ञाच्या ठिकाणी असणाऱ्या सारभूत फलाचीच जणू धार काढतो. अर्थात् यज्ञ केल्यानंतर तो धनसंपन्न होतो. 'स्तोत्रांतले उत्कृष्ट असे तू स्तोत्र आहेस. तुझे गान झाल्यानंतर तू माझ्यासाठी तुझ्या ठिकाणच्या सारभूत रसाची धार पाड. स्तोत्रांतील उत्तम स्तोत्र असणारे तू माझ्यापासून दूर न जाता माझ्याच जवळ टिकून रहा. हे शस्त्रा, तू शस्त्रांत उत्कृष्ट शस्त्र आहेस. तुझे पठण केल्यानंतर तू माझ्यासाठी तुझ्या ठिकाणच्या सारभूत रसाचे दोहन कर. म्हणजे सारभूत रसाची धार पाडव. शस्त्रांतील उत्कृष्ट शस्त्र असलेले तू माझ्याजवळून केव्हाही दूर जाऊ नकोस. माझ्याजवळच रहा'. हाच स्तोत्र व शस्त्र यांचे दोहन करण्याचा साधनीभूत असा अभिमंत्रणमंत्र होय. जो कोणी यजमान हा मंत्र जाणून स्तोत्र चालू असताना या मंत्राने या स्तोत्रशस्त्रांचे अभिमंत्रण करून यजन करतो त्यानेच यज्ञाचे दोहन केल्यासारखे होते व यज्ञ समाप्त झाल्यावर तो धनसंपन्न होतो. (अनुवाक ७):

१ ससाण्याप्रमाणे गगनात भरारी मारणाऱ्या सोमरसाजवळ त्याचे प्राशन करण्यासाठी आपण होऊन येणाऱ्या देवाला अवश्य देण्यायोग्य अशी ही सोमरसाची आहुती आणि २ नमस्कार समर्पण असो. ३ शत्रूंचा विनाश करणे व आमचे पालन करणे हाच ज्याचा धर्म आहे आणि जो सोमरसाचे प्राशन करण्यासाठी आपण होऊन त्याच्या जवळ येतो त्या देवाला अवश्य देण्याजोगी ही सोमरसाची आहुती आणि ४ नमस्कार अर्पण करतो. ५ आपणासभोवती जमविलेल्या उपासक जनांची सर्वत्र प्रसिध्दी होण्यासाठी जो तत्पर राहून सोमरसाचे पान करण्याच्या आतुरतेने त्याच्याजवळ येतो त्या देवाला अवश्य अर्पण करण्याजोगी ही सोमरसाची आहुती आणि ६ नमस्कार मी अर्पण करतो. ७ हवन करणारांना रसरूपी अन्न देणाऱ्या आणि सोमपान करण्याची इच्छा धरील त्याच्या सन्निध आपण होऊन येणाऱ्या देवाला अवश्य देण्यायोग्य अशी ही सोमरसाची आहुती आणि ८ नमस्कार अर्पण करतो. ९ हवन करणाऱ्या ऋत्विक् यजमानाला दूध देणाऱ्या व सोमरसाचे पान करण्याकरता त्याच्याजवळ स्वयंस्फूर्तीने येणाऱ्या देवाला अवश्य अर्पण करण्यायोग्य अशी ही सोमरसाची आहुती आणि १० नमस्कार मी अर्पण

करीत आहे. ११ आम्ही ज्याचे सदैव चिंतन करावे अशा, समस्त प्रजांचे पालन करणाऱ्या व सोमरसाजवळ त्याचे प्राशन करण्याकरता आपण होऊन येणाऱ्या देवाला तृप्त करण्यासाठी अवश्य देण्यायोग्य असलेली ही सोमरसाची आहुती आणि १२ नमस्कार मी समर्पण करीत आहे. १३ सत्याचे पालन करणाऱ्या आम्हाला स्वर्गलोकाला घेऊन जाणाऱ्या तसेच सत्यस्वरूप अशा आमच्या यज्ञाचे पालन करणाऱ्या आणि सोमपान करण्यासाठी स्वतःच्या स्फूर्तीने त्याच्याजवळ जाणाऱ्या देवा, तुला अवश्य देण्याला योग्य अशी ही सोमरसाची आहुती मी तुला समर्पण करीत आहे. १४ तुला नमस्कार असो. १५ मधुर अशा घृताच्या या 'आहुतीने ज्यांच्याकरिता ही आहुती दिली जात आहे ते देव तृप्त होवोत. १६ ज्यावेळी सर्व प्रजा अन्नरहित होऊन भुकेने संतप्त होतात त्यावेळी सर्वच ऋषी 'यज्ञाच्या अधिपतीकडून घडलेल्या अपराधामुळेच घडून येणाऱ्या पर्जन्यवृष्टीचे अभावी अन्नाचा अभाव झाला आहे, आणि त्या मुळेच सर्व प्रजांना क्षुधेचा अत्यंत अनुताप उत्पन्न झाला आहे', असे म्हणू लागतात. कारण वसंतऋतूतील चैत्र व वैशाख हे दोन महिने ज्योतिष्टोमसंस्थ असा अग्निष्टोम नांवाचा यज्ञ करून देवतांना संतोष करण्याला योग्य असे असताना ते दोन्ही महिने यज्ञ न करतां फुकट घालवून यज्ञाला योग्य अशा त्या मासांचा यजमानाने नित्यशः अपराध केलेला आहे. अशा प्रकारचा योग्य समयी यज्ञ न करणारा यजमान पापी आहे असे ऋषींच्या मुखाने वदले जाणे हे क्रमप्राप्तच आहे. यासाठी हा विश्वकर्मा देव त्या यज्ञयोग्य अशा चैत्र व वैशाख या दोन महिन्यांच्याशी आम्हा यज्ञपतींना संलग्न करो म्हणजे त्या दोन्ही महिन्यात अग्निष्टोमसंज्ञक सोमयाग करण्याची आम्हाला प्रेरणा देवो. १७ चैत्रवैशाखात देवतांच्या संतुष्टीसाठी सोमयाग न केल्याचा आमचा अपराध लक्षात घेऊन 'हा यजमान महान् पातकी आहे' अशा प्रकारची निंदाव्यंजक घोषणा लोकांच्या समोर करणाऱ्या त्या उग्र ऋषींना आमचा नमस्कार असो. आमच्या नमस्काराने ते ऋषी शांत होवोत आणि आमची निंदा न करोत. आमच्यावर खवळलेल्या ऋषींच्या रागीट नेत्रांची व आमच्या मनाची अनुकूल अशी एकवाक्यता घडवून आणण्याविषयी आम्ही देवगुरू बृहस्पतीला प्रार्थना करीत आहो. ज्या योगाने आमच्यावर खवळलेले ऋषी आमच्यावर अनुग्रह करून सुखसंपन्न दृष्टीने आमच्याकडे पाहू लागतील आणि आम्हीही चैत्र व वैशाख या दोन महिन्यांच्या यज्ञयोग्य

काळात यज्ञानुष्ठान करून, अपराधरहित होऊन भक्तियुक्त अंत:करणाने देवांचे यजन करू शकू, अशा प्रकारचे महत्कार्य करण्याची बृहस्पती आमच्यावर कृपा करो. आमचे कार्य सिध्दीस नेणाऱ्या त्या बृहस्पतीला आम्ही भक्तिरसाने अत्यंत उत्तेजित होऊन प्रदीर्घ म्हणजे साष्टांग आणि बृहस्पतीचा आमच्यावर अनुग्रह होईपर्यंत याच स्थितीत टिकून राहणारा नमस्कार करीत आहो. अखिल विश्वाविषयीचे सृष्टिस्थितिविनाशादि सर्व कार्य करणाऱ्या त्या प्रजापती देवाला आमचा नमस्कार असो, आणि तो विश्वकर्मा प्रजापतीही आम्हाला यज्ञानुष्ठानास प्रवृत्त करून आमचे रक्षण करो. १८ हे विश्वकर्मन् लोकसमाजात ज्या प्रमाणे एखादा शांत स्वभावाचा थोर मनुष्य दुसऱ्याच्या प्राणावर आलेले संकट जाणून युध्दाच्या प्रसंगी अत्यंत करुणापूर्ण मनोवृत्तीने त्याचे रक्षण करतो त्याप्रमाणे आमच्यावर करुणा करून आमचे रक्षण करण्यास तूच एकटा समर्थ आहेस. तुझ्यावाचून आम्हाला अन्य गतीच नसल्यामुळे आम्ही तुला शरण आलो आहो. हे विश्वकर्मन् वसंत ऋतूत हे यजमान अग्निष्टोम यज्ञ करून सोमपान करणारे आहेत, असे स्वत: तू मानणारा आणि इतरही तसेच मानू लागतील असा अनुग्रह तू आमच्यावर करून आमचे संरक्षण कर. हा 'अमुक एक' यजमान प्रमादामुळे किंवा आळसामुळे तामस वृत्तीने बध्द होऊन देवांच्या संतुष्टीसाठी करावयाचे यज्ञानुष्ठान न केल्यामुळे क्रोधवश झालेल्या व एकत्र जमून निंदाव्यंजक घोषणा करणाऱ्या ऋषींचा मोठा अपराधी झाला आहे. त्या यजमानावर तू अनुग्रह करून त्याचे रक्षण करण्यासाठी त्याच्याकडून घडलेल्या अपराधातून त्याला सत्वर मुक्त कर. १९ यज्ञ करावयाचा आहे असे लोकांना सांगून धनार्जन करतात, परंतु यज्ञ न करता त्या धनाचा स्वत:च्या उदरभरणासाठी संचय करतात आणि त्यामुळेच त्यांच्या अग्निहोत्राशाळेतील कुंडांमधून असणारे अग्नी त्यांना उद्देशून 'यज्ञासाठी द्रव्यार्जन करून यज्ञ न करता ते धन स्वत:च उपभोगणारे हे आहिताग्नी केवढे शोचनीय आहेत', असे खेदोद्गार काढीत असतात. अशा प्रकारच्या आहिताग्नींना सोमयाग न केल्यामुळे लागणाऱ्या पातकाची निवृत्ती करणारी जी इष्टी असेल ती विश्वकर्मा देव आमच्याकडून करवून घेवो. २० जे आमच्यावर सर्वतोपरी कृपादृष्टी ठेवून आमच्याकडून यज्ञ करविणारे अथवा आमच्या हातून यज्ञ व्हावा अशी इच्छा बाळगणारे जे देदीप्यमान पितर आहेत त्यांना आम्ही असे म्हणतो की, हे पितरहो, आम्ही प्रमादामुळे किंवा आळसामुळे यज्ञ

करण्याची इच्छा देखील करीनासे झालो. आणि त्यामुळेच ज्या यज्ञात ऋत्विजांना दक्षणा देऊन तुम्हाला उचित असा भाग द्यावयाचा असतो असा यज्ञ न केल्याच्या पातकाने आम्हास कलंकित करू नका.

सद नामक मंडपात भरणाऱ्या विद्वत्सभेत यज्ञ पाहण्यासाठी जे विद्वान लोक येऊन बसलेले असतात ते सर्व दक्षिणा घेण्याला योग्य असेच असतात. त्यांना जो यजमान दक्षिणा देत नाही तो त्यांच्यापासून तुटला जातो व विद्वानांचा उपमर्द केल्याचे पातक त्याला लागते. त्या पातकाच्या निष्कृतीसाठी त्याने 'वैश्वकर्मण' संज्ञक मंत्रांनी अग्नीत आज्याहुती दिली म्हणजे त्याने विद्वत्सभेतील सर्व सभासदांना संतुष्ट केल्याप्रमाणे होते.

२१ हे देवहो आमच्या शरीराची चिकित्सा करून ते निर्दोष होईल असे करा. देवांच्याकडून चिकित्सा झाल्यानंतर जे यजमान आणि यजमानपत्नी यांचे दांपत्य 'आशीर' नामक दह्याच्या योगाने आपल्या शरीराच्या ठिकाणी ज्या प्रकारचे सौंदर्य संपादन करते त्याच्या योगाने त्याच्या ठिकाणी पुत्र होतो व त्याला धनाचीही प्राप्ती होते. त्यांच्या विषयीची ही माहिती झालेले त्यांचे सर्व संबंधी लोकही त्या दांपत्याच्या घरी येऊ लागतात. २२ एकाच घरात एकमेकाशी प्रेमाने राहणारे ते दांपत्य म्हणजे यजमान व यजमानपत्नी 'आशीर' संज्ञक दही देवतांना समर्पण करून कल्याणाला प्राप्त झालेली असतात. अशाप्रकारे 'आशीर' नामक दही देवतांना समर्पण करणारा हिंसारहित आणि पत्नीने युक्त असलेला यजमान उत्कृष्ट अशा धनांना संपादन करणारा होवो. जो यजमान प्रीतियुक्त मनाने आशीर नामक दह्याच्या रूपाला प्राप्त झालेले दूध ज्या घटामध्ये विरजलेले असेल त्या दुग्धपूर्ण घड्याने सोमरसामध्ये निःशेष ओतील तो यजमान दुर्बुध्दिरूपी रोगाला दूर करणारा होवो. २३ आपल्या पत्नीचे सदैव सानिध्य असलेला जो यजमान उत्कृष्ट असा यज्ञ करण्याची इच्छा करून इंद्राला भरलेल्या घटाने आशीर नामक दही अर्पण करतो त्या यजमानाची पत्नी कोमल स्वराने भाषण करणारी आणि सर्व अवयवांनी पुष्ट अशी होवो. त्या यजमानाचे पुत्र शरीराने पुष्ट असोत. ते केव्हाही रोगादिकांनी कृश न होवोत. २४ हे इंद्रदेवा मी मनोभावनेने केलेली तुझी ही प्रार्थना मला बल देवो. आणि त्या बलाबरोबरच उत्कृष्ट असे अपत्य, अन्न आणि धन यांचाही मला लाभ करून देवो. तुझ्या प्रसादाने

शत्रूंचे सर्व प्रदेश माझ्याकडून बलपूर्वक जिंकले जावोत व ते माझ्या स्वाधीन होवोत. हे इंद्रा तुझ्या कृपेने आमच्याशी वैर करणारे आणखी जे कोणी शत्रू असतील त्यांना आम्ही हीन स्थितीला पोचविणारे व आमच्या आज्ञेत ते राहतील असे करणारे होऊ. २५ हे ध्रुवा, तू सर्वदा आपल्या स्वरूपाने सिध्द म्हणजे अचल असतोस. यास्तव सर्वदा अचलस्वरूप अशा स्वर्गाच्या किंवा परमात्म्याच्या ठिकाणी तू मला स्थापन कर. सोमरसाने भरलेल्या सर्व ग्रहपात्रांत तू प्रमुख आहेस. तुझ्या प्रसादाने मी इतर सर्वांच्या मध्ये प्रमुख होईन. २६ हे ध्रुवा, द्युलोक व पृथ्वी यांच्या समान असलेल्या माझ्या दोन्ही हातांच्या अंजलीने मी तुला उचलून घेतो. २७ हे ध्रुवग्रहा, सर्व मानवांचे हित करणारे सर्व देव तुला तुझ्या स्थानापासून वर उचलोत. तू द्युलोकामध्ये देवांना स्थिरपद कर, अंतरिक्षात पक्ष्यांना स्थिर कर आणि पृथ्वीवर पर्वतांना स्थिर कर. स्वस्थानापासून तुझ्या चळण्याने सर्व जगाला तू चाळवू नकोस. २८ 'ध्रुव' नामक ग्रहपात्रातूनच होत्याच्या चमसात पूर्वी घेतलेल्या सोमरसातच आम्ही यावेळी ध्रुवस्थालीत साठवून ठेवलेला सोमरसरूपी हवी ओतून भर घालीत आहो. ज्या योगाने आमच्या भोवतालचे सर्व जग रोगरहित आणि प्रसन्नचित्त होईल आणि ज्या योगाने इन्द्रदेव आमच्या सर्व प्रजा निरोगी आणि मनाने हर्षयुक्त करील, त्याचप्रमाणे सर्व दिशांच्या ठिकाणी राहणाऱ्या आमच्या प्रजा केवळ आमच्या आधीन होऊन राहतील, अशा प्रकारच्या भावनेनेच आम्ही ध्रुवस्थालीतील सोमरस होत्याच्या चमसात पूर्वी ओतून ठेविलेल्या सोमरसात ओतीत आहोत. (अनुवाक ८).

'शस्त्र' संज्ञक मंत्रांच्या पठणाला 'शंसन' अशी संज्ञा आहे. होता जेव्हा शस्त्राचे शंसन करण्यास प्रारंभ करतो तेव्हा तो आपल्याला प्रोत्साहन देणारा प्रतिगर नामक मंत्र म्हणण्यासाठी अध्वर्यूला आपल्यासमोर बोलावितो. होत्याचे हे बोलावणे म्हणजे होत्याने जणू काय अध्वर्यूवर वज्राचा प्रहार करण्यासाठीच त्याला समोर बोलाविल्यासारखे आहे. या वज्रप्रहाराचा आघात आपल्यावर होऊ नये म्हणून अध्वर्यूनेही 'उक्थशाः' या 'प्रतिगर' संज्ञक मंत्राची ढाल होत्यासमोर धरावी म्हणजे होत्याचे शंसन पूर्ण होताच अध्वर्यूने पूर्वोक्त 'प्रतिगर' मंत्राचा उच्चार करावा. ह्या 'प्रतिगर' मंत्राची तीन अक्षरे आहेत. गायत्री छंद तीन चरणांनी युक्त आहे आणि 'प्रातःसवन' हे 'गायत्र' म्हणजे गायत्री छंदसंबध्द आहे. यास्तव प्रातःसवनामध्ये उगारलेल्या वज्राचा

प्रहार चुकविण्यासाठी त्याने गायत्री छंदाकडूनच आपल्यावर आघात करणाऱ्या आव्हानरूपी वज्राच्या आड प्रतिगररूपी त्र्यक्षरी मंत्राची ढाल धरविल्यासारखे होते.

'माध्यंदिन' सवनामध्ये होत्याचे शस्त्रशंसन संपले म्हणजे अध्वर्यूने 'उक्थं वाचि' हा 'प्रतिगर' मंत्र म्हणावा. या मंत्राची चार अक्षरे आहेत. त्रिष्टुप् छंदाचे चरण चारच असतात. अर्थात् आता सांगितलेला प्रतिगर मंत्र अक्षरसंख्येने 'त्रिष्टुप्छंद'स्वरूपच आहे. माध्यंदिन सवन नामक अनुष्ठानात 'त्रिष्टुप्'छंदातील मंत्राचीच मुख्यत्वे करून योजना होत असल्याने ते त्रिष्टुप् छंदरूपच होते. यास्तव त्रिष्टुप्छंदस्वरूप अशा त्या सवनात होत्याकडून होणाऱ्या आवाहनरूप वज्राचा आघात चुकविण्यासाठी त्रिष्टुप्छंदाकडूनच अध्वर्यूने जणू काय त्रिष्टुप्छंदस्वरूपी पूर्वोक्त चतुरक्षरी प्रतिगर मंत्राची ढाल आव्हानरूप वज्राच्या आड धरविल्याप्रमाणे होते.

तृतीय सवनामध्ये अध्वर्यूने 'उक्थं वाचि' असा 'प्रतिगर' मंत्र म्हणावा. या मंत्राची सात अक्षरे आहेत. शक्वरी छंदाचे चरणही सातच असल्याने सप्ताक्षरी मंत्र अक्षरसंख्येच्या दृष्टीने शक्वरीछंदाशी समानरूप असून 'वज्र' देखील शक्वर म्हणजे शक्वरी छंदच आहे. यास्तव शक्वरीछंदसंबध्द अशा सप्ताक्षरी प्रतिगर मंत्राचा उच्चार केल्याने तृतीय सवनामध्ये होत्याने आव्हानरूपाने अध्वर्यूला केलेला वज्राघात सप्ताक्षरी आणि शक्वरीछंदस्वरूप अशा प्रतिगरमंत्ररूपी वज्राकडूनच अध्वर्यूने रोखून धरल्याप्रमाणे होते.

ब्रह्मवादी असे म्हणतात की ज्या सवनामध्ये ज्या छंदाचे संपादन करणे योग्य असते तो छंद संपादन करणारा जो अध्वर्यू असेल तोच अग्रगण्य असा अध्वर्यू होय. प्रात:सवनात गायत्री छंद, माध्यंदिन सवनात त्रिष्टुप् छंद, आणि तृतीय सवनात जगती छंद संपादन करावयाचा असतो. प्रात:सवनात पूर्वी सांगितलेला तीन अक्षरी, माध्यंदिन सवनात चार अक्षरी आणि तृतीय सवनात सप्ताक्षरी प्रतिगर मंत्र पठण केल्यानंतर अध्वर्यूने गायत्र्यादि छंद संपादन करावयाचे असतात. शिवाय प्रात:सवनाची समाप्ती झाल्यानंतर स्वत:च्या शरीराच्या ठिकाणी तेज, माध्यंदिन सवन संपल्यावर स्वत:च्या शरीराच्या ठिकाणी स्वकार्यक्षम असा 'इंद्रियांचा समुदाय, आणि तृतीय सवन पूर्ण झाल्यावर आपल्या ठिकाणी पशूंचे जो धारण करतो तोच प्रमुख असा

अध्वर्यू होय.

'उक्थशा:' हा प्रतिगर मंत्र प्रात:सवनात अध्वर्यूने म्हणावा. या मंत्राची तीन अक्षरे आहेत आणि गायत्री छंद हा तीन चरणांचा असतो. अर्थात् त्र्यक्षरी प्रतिगर मंत्र गायत्रीछंदोरूप आहे. प्रात:सवनातील बहिष्पवमान नामक स्तोत्रामध्ये गायत्री छंदातील ऋचाच गाइलेल्या जात असून शस्त्रांमध्येही गायत्री छंदातील ऋचाच पठण केल्या जात असल्यामुळे प्रात:सवन हे गायत्र म्हणजे गायत्रीछंदरूपच आहे. यास्तव गायत्रीछंदस्वरूप असा प्रतिगर उच्चारल्याच्या योगाने प्रात:सवनातील प्रतिगराच्या ठिकाणी अध्वर्यू गायत्री छंदाचे धारण करतो. शिवाय गायत्री छंद हा जणू मूर्तिमंत तेजच आहे. कारण गायत्रीच्या उपदेशानेच ब्राह्मण्याची पूर्तता होत असते. प्रात:सवन हे गायत्रीछंदात्मक असल्यामुळे तेही तेजस्वरूपच आहे. यास्तव तेजोरूप अशा प्रात:सवनात तेजोरूपच असलेल्या प्रतिगर मंत्राचा उपयोग केल्याच्या योगाने अध्वर्यू हा प्रात:सवनाच्या अनुष्ठानानंतर स्वत:च्या शरीराचे ठिकाणी तेज धारण करतो.

'उक्थं वाचि' हा प्रतिगर माध्यंदिन सवनात अध्वर्यूने म्हणावा. या मंत्रात चार अक्षरे आहेत. त्रिष्टुप् छंदही चार चरणांचाच असतो. माध्यंदिन सवनातील स्तोत्रात व शस्त्रात त्रिष्टुप् छंदातील ऋचाच सामगायकांकडून उपयोगात आणल्या जात असल्यामुळे माध्यंदिन सवन हे त्रिष्टुप्छंदरूप आहे. यास्तव माध्यंदिन सवनात त्रिष्टुप्छंदस्वरूप प्रतिगर मंत्र पठण केल्याच्या योगाने अध्वर्यू त्या स्तवनातील प्रतिगर मंत्राचे ठिकाणी त्रिष्टुप् छंदाचे संपादन करतो. शिवाय त्रिष्टुप्छंद हा इंद्राच्या बरोबरच उत्पन्न झालेला असल्यामुळे इंद्रियरूप आहे. माध्यंदिन सवनात मुख्यत: इंद्राचेच यजन होत असल्याने माध्यंदिन सवन हे इंद्रियरूप आहे. यास्तव माध्यंदिन सवनाचे अनुष्ठानानंतर अध्वर्यू आपल्या शरीराचे ठिकाणी स्वकार्यक्षम असे प्रत्येक इंद्रिय धारण करतो.

तृतीय सवनामध्ये 'उक्थं वाचींद्राय' असा प्रतिगर मंत्र म्हणावा. या मंत्रात सात अक्षरे आहेत. शक्करी छंद हा सात चरणांचा असतो. अर्थात् अक्षरसंख्येच्या दृष्टीने सप्तचरणात्मक शक्करी छंदाशी सप्ताक्षरी प्रतिगर मंत्राचे स्वरूपसाम्य असल्यामुळे तो शक्करीछंदोरूपच आहे. पशू हे शाक्कर म्हणजे शक्करीछंदस्वरूप आहेत. त्यामुळे शक्करी छंद हा पशूंची प्राप्ती करून देणारा आहे. शक्करी छंदाप्रमाणेच जगतीछंद हा देखील पशूंची प्राप्ती करून देणाराच

आहे. तृतीय सवनात जगती छंदातील मंत्रच स्तोत्रांमध्ये व शस्त्रांमध्ये योजिले जात असल्यामुळे तृतीय सवन हे जगतीछंदस्वरूपच आहे. पूर्वोक्त प्रतिगर मंत्राचा उपयोग करणारा अध्वर्यू त्या प्रतिगर मंत्राचे ठिकाणी शक्करी व जगती या दोन्ही छंदांचे धारण करतो. पशू हे जगतीछंदस्वरूप आहेत व जगती छंदाचा उपयोग केला जात असल्याने हे तृतीय सवनही पशुरूप आहे. यास्तव पूर्वोक्त प्रतिगर मंत्र पठण करणारा अध्वर्यू तृतीय सवनाचे अनुष्ठान केल्यावर आपल्या ठिकाणी पशूंचे धारण करतो.

प्रतिगर म्हणजे प्रोत्साहन देण्याविषयी होता जेव्हा अध्वर्यूला आपल्या समोर बोलावतो तेव्हा तो जणू काय अध्वर्यूच्या ठिकाणी रोगाचीच स्थापना करतो. कारण प्रोत्साहन देण्याविषयी सावधानता ठेवणे हा एक प्रकारचा रोगच आहे. या रोगाचा परिहार जर अध्वर्यू न करील तर त्या संवत्सराच्या आतच त्याच्या घरची प्रजा रोगाने पीडित होईल. यास्तव त्या रोगाचा परिहार करण्यासाठी अध्वर्यूने 'शों सा मोद इव' असे म्हणून होत्याला प्रत्यावाहन करावे म्हणजे प्रोत्साहन द्यावे. हे होत्या; तुझ्या शंसनाने मला फार आनंद होत आहे, असा त्या प्रत्याव्हान मंत्राचा अर्थ आहे. अर्थात् अशा प्रकारे पूर्वोक्त मंत्र म्हणून अध्वर्यूने होत्याला प्रत्याव्हान केले असता त्याने आपल्या ठिकाणच्या रोगाचा परिहार केल्या प्रमाणे होते.

लोकव्यवहारात ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्याला कोणी प्रश्न विचारू लागला असता उत्तर देणारा मनुष्य, जसे त्याचे बोलणे चालू असता सावधान चित्ताने त्याच्याकडे पाहत असतो, किंवा राजा वगैरे आज्ञा करीत असताना सेवक जसा त्याच्याकडे सावधगिरीने पाहत असतो, त्याप्रमाणे प्रतिगररूपी प्रत्युत्तर देताना अध्वर्यूने होत्याकडे सावधानतेने पाहत असावे.

शस्त्र पठण करणाऱ्या होत्रकाची अर्धी ऋचा जेव्हा संपते त्याच वेळी अध्वर्यूने 'शों सा मोद इव' असा प्रतिगर द्यावयाचा असतो. परंतु अध्वर्यू जर त्याची अर्धी ऋचा संपण्यापूर्वी किंवा नंतर प्रतिगर देईल तर उचितकालप्राप्त अशा प्रतिगर मंत्ररूपी वाणीपासून अध्वर्यू च्युत होतो. समयोचित भाषण न करता भलत्या वेळी भाषण करण्यासारखाच तो प्रकार होत असल्यामुळे भलत्याच वेळी प्रतिगर म्हणणाऱ्या अध्वर्यूला हीनत्व प्राप्त होणे क्रमप्राप्तच होत असते.

शस्त्रपठण करणाराची अर्धी ऋचा समाप्त होताच जर प्रतिगर लुप्त झाला म्हणजे अध्वर्यू प्रतिगर देण्याचे विसरला तर आपल्या बरोबर धनाचे गाठोडे घेऊन चोरांचा वगैरे उपद्रव असलेल्या आड रानातून झपाट्याने प्रवास करणाऱ्या मंडळीमधून एखादा माणूस थकल्यामुळे जसा त्यांच्या मागे पडतो व आयताच चोरांच्या तडाख्यात सापडतो तशा प्रकारची त्या प्रतिगर मंत्राचे विस्मरण झालेल्या अध्वर्यूची गती होत असते. यासाठी प्रतिगरमंत्र देण्याच्या वेळेची अध्वर्यूने सावधान चित्ताने प्रतीक्षा करीत रहावे.

गाण्यामध्ये अत्यंत उत्कृष्ट असा जो भाग असतो त्याला उद्गीथ असे म्हणतात. सामगान करणारे उद्गाते, हविर्द्रव्यांचे यजन करणारे अध्वर्यू आणि शस्त्रांचे शंसन करणारे होते ह्या सर्व ऋत्विजांचे 'उद्गीथ' म्हणजे गानविशेष एकच स्वरूपाचे आहेत. सामगानापैकी प्रास्ताविक असा थोडा भाग प्रस्तोत्याने गाईल्यानंतर उद्गाता जो भाग गातो त्याला 'उद्गीथ' असे नांव आहे. उद्गाता ॐ असा प्रणवोच्चार करून तो भाग गात असतो. सारांश, सामगायकांचा ओंकार किंवा प्रणव हाच उद्गीथ होय. होते शस्त्रांचे शंसन आरंभ करतात तेव्हा प्रणवोचारपुरस्सर पहिलीच ऋचा म्हणण्याचा प्रारंभ ॐ कारापासूनच करीत असतात. अर्थात् शस्त्रगायन करणाऱ्या होत्यांचा प्रणव हाच उद्गीथ आहे. प्रतिगर देताना आरंभी प्रणवापासूनच आरंभ करून द्यावयाचा असल्यामुळे यज्ञ करणाऱ्या अध्वर्यूचाही पण प्रणव हाच उद्गीथ आहे.

'प्रणव' संज्ञक मंत्राचे हे स्वरूप जाणणारा जो विद्वान अध्वर्यू ॐ असा प्रणवाचा उच्चार प्रारंभी करून प्रतिगर पठण करतो तो भक्षण करण्यायोग्य अशा उत्कृष्ट अन्नाचे सेवन करणारा होतो आणि त्याच्या प्रजेमध्ये सेवनार्ह अशा अन्नाचा धनी होणारा पुत्र निपजतो.

होता हा पृथ्वीरूप असून अध्वर्यू द्युलोकरूप आहे. एकजागी स्थैर्याने बसून राहणे हा पृथ्वीचा स्वभाव असून सदैव एका ठिकाणी उभे राहणे हाच द्युलोकाचा स्वभाव होय. पृथ्वी नेहमी बसलेली दिसते व द्युलोक सदैव उभा राहिलेला आपण पाहतो. यास्तव होत्याने शस्त्राचे शंसन बसून करावे. असे केल्याच्या योगाने होता भूमीपासून केव्हाही दूर होत नाही आणि यजमान त्या भूमीची धार काढून तिच्या ठिकाणचे सार ग्रहण करतो. अध्वर्यूने उभे राहून होत्याला प्रतिगर द्यावा. असे केल्याने द्युलोकापासून अध्वर्यू केव्हाही

च्युत होत नाही. त्याच्या तशा उभे राहण्याने यज्ञकर्ता यजमान द्युलोकाचे दोहन करून त्याच्या ठिकाणचे सार ग्रहण करतो.

होता पृथ्वीवर बसून शस्त्र पठण करतो म्हणूनच यज्ञकर्त्यांनी समर्पण केलेल्या, या पृथ्वीच्या ठिकाणी निर्माण झालेल्या पदार्थांच्या हविर्भागावर देवतांची उपजीविका होते. अध्वर्यू द्युलोकासारखा उभे राहून प्रतिगर देत असल्यामुळेच त्या देवांनी द्युलोकातून पर्जन्यरूपाने या पृथ्वीवर पाठविलेल्या अन्नावर मनुष्ये आपली उपजीविका करीत असतात.

पूर्वेस मुख करून होता 'शस्त्र' संज्ञक मंत्राचे गायन किंवा पठण करतो म्हणून तो आपल्या समोर बसलेल्या पत्नीच्या जननेंद्रियरूप क्षेत्रात आपल्या ठिकाणच्या रेतरूपी बीजाचे स्थापन करतो आणि पश्चिमाभिमुख होऊन अध्वर्यू होत्याला प्रतिगर देतो, म्हणून प्रजा मातेच्या जननेंद्रियरूपी क्षेत्राच्या पाठीमागे मुख करून उत्पन्न होते.

होता जेव्हा पूर्वाभिमुख बसून 'शों सा वों' असे म्हणून अध्वर्यूला आव्हान करील तेव्हा तो आपल्यावर वज्राचा घावच घालीत आहे असे अध्वर्यूने समजावे आणि प्रथम त्याच्याकडे पाठ फिरवून बसलेल्या अध्वर्यूने होत्याचे आव्हान ऐकताच मागे तोंड फिरवून त्याच्या समोर त्याच्या दृष्टीला दृष्टी भिडवून उभे राहावे. असे केल्याने होता करीत असलेल्या वज्राघाताला प्रत्याघात करून त्याचे स्तंभत केल्याप्रमाणे होते. (अनुवाक ९).

१ हे प्रतिनिर्ग्राह्य, तू उपयामसंज्ञक लाकडी ग्रहपात्रात भरून घेतला जात आहेस. तू जणू काय वाग्देवीच्या गृहातच राहणारा आहेस. आमच्या मंत्ररूप वाणीचे व त्या मंत्रवाणीनेच संपादिल्या जाणाऱ्या त्याच्या यज्ञाचे पालक असणाऱ्या आणि अविनाशी अशा या यज्ञाचे अध्यक्ष असलेल्या इंद्र व वायू या दोघा देवांच्या तृप्तीसाठी मी तुझे ग्रहण करतो. २ हे प्रतिनिर्ग्राह्य, तू उपयाम नामक ग्रहपात्रात भरून घेतला जात असून ऋतरूपी म्हणजे यज्ञरूपी ग्रहात राहणारा आहेस. आमच्या दोन्ही नेत्रांचे पालक आणि विनाशरहित अशा या यज्ञाचे अध्यक्ष असणाऱ्या मित्र व वरुण देवांच्या संतोषाकरताही तुझे ग्रहण मी करीत आहे. ३ हे प्रतिनिर्ग्राह्य तू उपयामसंज्ञक ग्रहपात्रात भरून घेतला जात असून श्रवणेंद्रियरूपी ग्रहात तू राहणारा आहेस. आमच्या दोन्ही कर्णेन्द्रियांचे व यज्ञाचे पालक आणि अविनाशी असणाऱ्या

या यज्ञाचे अध्यक्ष असणाऱ्या उभयता अश्विनीकुमारांना तृप्त करण्यासाठी मी तुझे ग्रहण करीत आहे. ४ इंद्र व वायू देवतांच्यासाठी भरून घेतलेल्या हे प्रतिनिर्गाह्य संज्ञक सोमरसा, देवांच्या तृप्तीसाठी मी तुला ओतून घेत आहे. ५ हे प्रतिनिर्ग्राह्य, विश्वामध्ये राहणाऱ्या समस्त देवांच्या संतोषाकरता मी तुला ओतून घेत आहे. ६ हे प्रतिनिर्ग्राह्यपात्रातील सोमरसा, सर्व देवतांच्या पैकी प्रत्येकाच्या तृप्तीकरता मी तुला ओतून घेत आहे. ७ महान पराक्रमी अशा हे विष्णुदेवा, हा सोमरस तुझ्यासाठी भरून ठेवला आहे. त्याचे तू रक्षण कर. तुझ्यासाठीच येथे ठेवलेल्या या सोमरसाकडे कोणीही पापदृष्टीचा मनुष्य अवलोकन न करो. ८ सर्व धनांमध्ये पुरोगामी राहणारे असे हे सोमस्वरूपी धन माझ्याजवळ आहे. हे धनरूपी सोमा, तू वाणीचा पालक आहेस त्या अर्थी माझ्या वाणीचे रक्षण कर. ९ सर्व प्रकारचे धन लब्ध करून देणारा हा सोम माझ्याजवळ आहे. हे सोमा, तू नेत्रेंद्रियांचे पालन करणारा आहेस. यास्तव माझ्या नेत्रेंद्रियांचे पालन कर. १० उत्कृष्ट अशा सर्व धनाची प्राप्ती करून देणारा हा सोम माझ्याजवळ आहे. हे सोमा, तू श्रोत्रेंद्रियांचा पालक आहेस यास्तव माझ्या श्रोत्रेंद्रियांचे तू पालन कर. ११ माझ्या हातात घेतल्या गेलेल्या हे सोमा, तू मला सुख देण्याची इच्छा करणारा आहेस आणि म्हणूनच तू सुखप्रकाशक अशा सर्व वस्तूंमध्ये श्रेष्ठ आहेस. तूच प्राणाचे पालन करणारा आहेस. यासाठी माझ्या प्राणवायूचे रक्षण कर. १२ हे मैत्रावरुण ग्रहा, तू सर्व दु:खांचा परिहार करणारा आहेस. आणि म्हणूनच सुखप्रकाशक अशा सर्व वस्तूंमध्ये तू श्रेष्ठ आहेस. तूच अपानवायूचा रक्षण करणारा आहेस. त्या अर्थी माझ्या अपानवायूचे संरक्षण कर. १३ हे इंद्रवायू हो १४ हे मित्रावरूण हो, आणि १५ हे उभयता अश्विनीकुमारहो, तुम्ही दोघे दोघे उभयता शुभ अशा यज्ञकर्माचे पालन करणारे आहा. जो कोणी आमचा शत्रू असून आम्हाला त्रास देतो आणि आमची पर्वा न करता आम्हाला टाकून सोमरस पितो त्या शत्रूला मी तुमच्या कृपेने रसातळाला घालतो. हे इंद्रदेवा, ज्या योगाने मी इहपरलोकविषयक सर्व ज्ञानाने माझ्या शत्रूपेक्षाही अधिक संपन्न होईन, अशाप्रकारे तू माझ्यावर अनुग्रह कर. (अनुवाक १०).

१ हे अग्निदेवा, तू ज्याच्याशी सख्यत्व करतोस तो तुझा उपासक यजमान उत्कृष्ट अशा पुत्रपौत्रादि प्रजेच्या प्राप्तीसाठी आणि अन्नाचा लाभ करून घेण्यासाठी करीत असलेल्या उद्योगांमध्ये वारंवार तुझ्याकडून होणाऱ्या

रक्षणामुळे सर्व प्रकारच्या सांसारिक अडचणींतून तरून जातो. २ हे ऋत्विजहो, आमचे हे हवनकर्म ज्याच्यामुळे उत्तमप्रकारे निष्पन्न होऊ शकते, तसेच आम्हाला हितकारक अशा गोष्टींची प्राप्तीही ज्याच्यामुळे आम्हाला होत असते, अशा अग्निदेवाची, प्राचीन ऋषींनी एकवार योजलेल्या अत्यंत प्रौढ म्हणजे अर्थपूर्ण अशा स्तुतिपर वचनांनी, सूर्याचे किरण, त्यांना आधारभूत असलेल्या सूर्यदेवाची त्याच्या संतोषासाठी ज्याप्रमाणे स्तुती करतात, त्याप्रमाणे, प्रशंसा करून जेणे करून तो आमचा प्रतिपाळ करण्याचे मनावर घेईल अशा रीतीने त्याला संतुष्ट करा. ३ हे अग्निदेवा, सोमरस, पुरोडाश आणि सान्नाय्य ही तुझी तीन अन्ने असून तीन लोकही तुझी तीन वसतीस्थाने आहेत. ज्ञानरूपाने उत्पन्न झालेल्या हे अग्निदेवा, इष्टप्राप्ती, अनिष्टपरिहार आणि अभिचारकर्माला प्रवृत्त करणें या तुझ्या पूर्वसिध्द अशा जिह्वा आहेत. देवांच्याकडून प्राप्त झालेल्या अग्नी, विद्युत् आणि सूर्य या रूपांनी असणाऱ्या तुझ्या तीन शरीरांनी, आमच्या स्तवनरूप वाणीमध्ये होणाऱ्या प्रमादांकडे दुर्लक्ष करून तू आमचे रक्षण कर. ४ हे इंद्राविष्णू हो, उत्कृष्ट असे हे अन्न समर्पण करून मी तुम्हा उभयतांचे मनोभावाने पूजन करतो. कारण तुमच्या प्रसादाने आम्ही आरंभिलेल्या यज्ञकर्मातून निर्विघ्नपणे पार पडावे अशी आमची इच्छा आहे. यासाठी जे तुम्ही विनाशरहित अशा अनुष्ठानपध्दतींनी आम्हाला या यज्ञरूपी सागरातून सुखरूपतेने पार घेऊन जाता ते तुम्ही आम्हाला भरपूर धन मिळवून द्या व हा यज्ञ गोड करून घ्या. ५ हे विष्णो, तू व इंद्र दोघेही आजपर्यंत युध्दात विजयी झालेले आहा आणि यापुढेही कधी पराजित होणार नाही. तुम्हा दोघांपैकी कोणीही एकेकटा देखील अद्यापि पराभूत झालेला नाही. तुम्हा दोघांमध्ये प्राप्तीच्या वाटणीविषयी जेव्हा जेव्हा स्पर्धा उत्पन्न झाली तेव्हा तेव्हा दक्षिणारूपाने यज्ञामध्ये ब्राह्मणांना देण्याला योग्य अशा हजारो गाईंचे तीन तीन विभाग तुम्ही दोघांनी सारखेच वाटून घेतलेले आहेत. ६ सर्वज्ञ अशा हे अग्निदेवा, तुझ्या आयुष्याची वृध्दी होण्याला सोम, सान्नाय्य व पुरोडाश ही तीन हविर्द्रव्ये कारणभूत आहेत. उष:काळच्या रात्रीप्रमाणे भास उत्पन्न करणाऱ्या ज्या तुझ्या ज्वाला तीन कुंडांमध्ये प्रकाशित झालेल्या दिसत असतात त्या ज्वालांनी देवांच्याकडून आमचे संरक्षण करणारे असे हे आमचे हविर्द्रव्य तू देवांना समर्पण कर. त्यांना नेऊन दे. आणि नंतर यजमानाला सुखप्रद होऊन त्याचे दु:ख दूर कर. त्रिकालज्ञ असा

जो हा अग्निदेव यज्ञाच्या ठिकाणी एकाहून एक मोठी अशी तीन प्रकारची हविर्द्रव्ये सर्वतोपरी मिळवितो, तो आमच्या या यज्ञकर्मात पृथ्वीवर राहणाऱ्या, अंतरिक्षात राहणाऱ्या आणि द्युलोकात राहणाऱ्या अशा एकादशसंख्याक तीनही देवगणांना तृप्त करो. ८ दूताला योग्य अशा सर्व चिन्हांनी अलंकृत असलेला हा देवदूत अग्निदेव आम्ही त्याच्या स्वाधीन केलेल्या हविर्द्रव्यांनी देवांचे यजन करो आणि देवसमाजातील हा ब्राह्मण आम्हालाही सुख देवो. अग्निदेवाच्या कृपेने आमचे सर्व निंद्य शत्रू नष्ट होवोत. ९ हे इंद्राविष्णू हो, शंबर नांवाच्या असुराची अत्यंत भक्कम अशी नव्याण्णव राजधानीची नगरे तुम्ही उध्वस्त केलीत. इतकेच नव्हे तर त्या असुराचे पक्षातील स्वपराक्रमाने रणांगणात चमकणारे अमात्यप्रभृति मुख्य असे शेकडो हजारो वीर एकदमच ठार करून शंबरासुराच्या पक्षाचे बीजच तुम्ही समूळ उपटून टाकलेत. १० इन्द्रदेवाची माता इंद्र मोठा झाल्यावर त्याला एकदा म्हणाली की, 'बाळा इंद्रा, सर्व शत्रूंचा नायनाट करून तू एकटाच स्वस्थ बसलास तर हे देव देखील केव्हातरी तुला सोडून जातील'. आपल्या मातेचे हे भाषण ऐकल्यावर इन्द्र विष्णूला म्हणाला, 'हे मित्रा विष्णू, तू आता काहीतरी विशेष पराक्रम कर आणि त्या वृत्रासुराला शक्य तितक्या लवकर मार'. अशा प्रकारचे पराक्रम करणाऱ्या हे इंद्र व विष्णू देव हो, आमचे कल्याण होईल असे करा. (अनुवाक ११).

प्रपाठक ३

१ तेजाने संपन्न असणाऱ्या हे अग्निदेवा तू देवांच्या समुदायात तेजस्वी म्हणून प्रख्यात हो व तू आपल्या अनुग्रहाने मनुष्यांच्या समुदायात मला दीर्घायुषी व तेज:संपन्न व बलवान कर. दीक्षा आणि तप यांच्यापासून निष्पन्न होणारे तेज मला प्राप्त व्हावे म्हणून मी तुला ही आहुती देत आहे. २ हे अग्निदेवा, तू तेजाचे महत्त्व जाणणारा आहेस. तुझ्या अनुग्रहाने माझ्या ठिकाणचे तेज मला सोडून दूर न होवो. माझ्याकडून तेजाचा केव्हाही त्याग न केला जावा यास्तव तेज माझा त्याग कधीही न करो. ३ बलोत्पादक अशा आठव्या धातूने संपन्न असणाऱ्या हे इंद्रदेवा, तू देवगणामध्ये ओजस्वी म्हणून प्रसिध्द हो. आपल्या कृपेने मला मानवसमाजात ओज:संपन्न दीर्घायुषी व बलशाली कर. ब्राह्मण व क्षत्रिय या दोन्ही वर्णांच्या ठिकाणी असणाऱ्या

ओजाची मला प्राप्ती व्हावी म्हणून मी तुला आहुती देत आहे. ४ ओज म्हणजे काय हे तू जाणणारा आहेस. तुझ्या कृपेने माझ्या ठिकाणी असणारे ओज माझ्यापासून केव्हाही दूर न जावो. ओजाचा त्याग माझ्याकडून देखील कधीही न होवो. यासाठी ओज माझा त्याग कधीही न करो. ५ शरीरकांतिजन्य प्रभेने संपन्न असणाऱ्या हे सूर्यदेवा, देवसमुदायात तू शरीरकांतिजन्य प्रभेने संपन्न म्हणून प्रसिध्द हो. तसाच मानवसमुदायात मला भ्राजस्वी म्हणजे शरीरकांतिजन्य दीप्तीने संपन्न आणि बलवान कर. वायू आणि उदक यांच्या ठिकाणी असणाऱ्या दीप्तीची प्राप्ती व्हावी म्हणून मी तुला आहुती देत आहे. ६ हे सूर्या स्वर्गाचा मार्ग कोणता हे तू जाणणारा आहेस, स्वर्ग मला सोडून केव्हाही न जावो. माझ्याकडूनही स्वर्गाचा त्याग कधीही न व्हावा यास्तव स्वर्ग केव्हाही माझा त्याग न करो. ७ हा अग्निदेव माझ्या ठिकाणी मंत्र व त्याचा अर्थ धारण करण्याची शक्ती निर्माण करो. पुत्रपौत्रादि प्रजा निर्माण करो. त्याचप्रमाणे माझ्या ठिकाणी शरीरकांती धारण करो. ८ इंद्रदेव माझ्या ठिकाणी धारणाशक्ती, इंद्रियसामर्थ्य आणि पुत्रपौत्रादि प्रजा निर्माण करो. ९ सूर्यदेव माझ्या ठिकाणी धारणाशक्ती, पुत्रपौत्रादि प्रजा आणि दीप्ती निर्माण करो. (अनुवाक १).

१ वायू हा सामगायनाच्या प्रारंभी हिंकार करणारा असून अग्नी हा 'प्रस्तोता' सामगानाचा प्रारंभ करणारा आहे. प्रजापती हा सामरूप असून बृहस्पती हा उद्गाता नामक प्रमुख सामगायक आहे. विश्वेदेव हे उपगाते म्हणजे सामगायकांना स्वरांची साथ करणारे आहेत. मरुत् हे सामगानाचा 'प्रतिहार' संज्ञक भाग गाणारे असून इंद्र हा सामाचे निधन म्हणजे सामाचा अंतिम भाग आहे. प्रणाचे पोषण करणारे वायू, अग्नी, इ. देव माझ्या ठिकाणी प्राण धारण करोत.

अध्वर्यु जेव्हा सामगायक ऋत्विजांना सामगान करण्याची अनुज्ञा देतो तेव्हा त्याने वायू इ. देवांचे हिंकारकर्तृत्वादि सर्व जाणलेले असते. 'प्राणपोषक असे ते देव माझ्या ठिकाणी प्राणधारण करोत,' अशा अर्थाचा मंत्रभाग जेव्हा तो म्हणतो तेव्हाच वायू इत्यादिकांचे हिंकारकर्तृत्वादि सारे आपल्या ठिकाणी तो धारण करतो, आपल्या लक्षात घेत असतो.

२ देवांची गाय असलेली इडा ही देवांना आवाहन करणारी असून

मनू हा यज्ञाचा प्रवर्तक आहे. शस्त्रांच्या योगाने उत्पन्न होणारा आनंद ज्यामध्ये प्रतीत होतो अशी मंत्रवाक्ये बृहस्पती पठण करीत असतो. विश्वेदेव हे सूक्ते पठण करतात. हे भूमाते, निरपराधी अशा माझी तू हिंसा करूं नकोस. तुझ्या कृपेने मधाप्रमाणे प्रिय वाटणाऱ्या कार्याचेच मी चिंतन करीन. मधाप्रमाणे प्रिय होणारे कर्मफल मी निर्माण करीन. मधुर असे कर्म करून मी देवांना मधुर अशी हविर्द्रव्ये नेऊन देईन. कर्णमधुर असे "ओं था मोद इव" हे प्रतिगरसंज्ञक वाक्य मी उच्चारीन. शस्त्रपठणाच्या शेवटी देवांना कर्णमधुर आणि मनुष्यांना श्रवणीय वाटणारी उक्थशा अशी मन्त्ररूप वाणी मी उच्चारीन. मधुर अशा वाणीचा उच्चार करणाऱ्या मला वाचिक प्रमादरहिततेची शोभा संपादन व्हावी म्हणून इडा इ. सर्वदेव माझे संरक्षण करोत. आणि पितरही माझ्या मधुर वाणीचे प्रशंसन करोत. (अनुवाक २).

१ हे सोमलताखंडा, वसु नांवाचे देव वस्त्रात बांधून ठेवलेल्या सोमलतासमूहापासून गायत्री छंदाने तुला वेगळा करोत. अग्नीला प्रिय अशा अन्नाच्या स्वरूपाला तू प्राप्त हो. २ हे सोमलताखंडा रुद्र नांवाचे देव वस्त्रात बांधून ठेवलेल्या सोमलतासमूहापासून त्रिष्टुभ्छंदाने तुला निराळा करोत. रुद्रांना प्रिय अशा अन्नाच्या स्वरूपाला तू प्राप्त हो. ३ हे सोमलताखंडा, आदित्य नांवाचे देव वस्त्रात बांधून ठेवलेल्या सोमलतासमूहातून तुला जगती छंदाने वेगळा करोत. विश्वेदेवांना प्रिय अशा अन्नाच्या स्वरूपाला तू प्राप्त हो. ४ तेजस्वी अशा हे सोमा, तुझ्या ठिकाणी असणाऱ्या देदीप्यमान तेजाचे सार मी मंदगतीने वाहणाऱ्या ५ कल्याणकारक, ६ ज्ञानोत्पादक, ७ अभिनव, ८ शीघ्रगतीने वाहून जमिनीचा भेद करणाऱ्या, ९ वाहात असताना इतर वस्तूंशी स्पर्धा करणाऱ्या, १० झुळझुळ किंवा धो धो असा ध्वनी करणाऱ्या ११ विश्वाचे धारण करणाऱ्या, १२ मधुर रसाने संपन्न, १३ बैलाच्या वशिंडाप्रमाणे प्रधानभूत, १४ शक्तिमंत आणि १५ देदीप्यमान अशा या उदकामध्ये ढवळतो. १६ हे दधिरूपी हविर्द्रव्या, तुझ्या ठिकाणी असणारे दीप्तिमान असे सार सोमलतेच्या ठिकाणी असलेल्या दीप्तिमान सारासह सूर्यकिरणांनी निष्पन्न होणाऱ्या दिवसरूपी रसाने मी ग्रहण करतो. १७ तीव्र वेगाने धावणाऱ्या सोमरसाच्या धारा अंतराळातून या पात्रात येऊन पडतात व त्यामध्येच परस्परामध्ये मिसळून राहतात. १८ पर्जन्यवृष्टी करणाऱ्या इन्द्राचे, वशिंडाप्रमाणे उंच वृष्ट्यात्मक असे ते प्रौढस्वरूप शोभिवंत असते. हा वल्लीरूपी सोम सोमदेवाच्या समोर

जाणारा आहे. हा देदीप्यमान सोमरस देदीप्यमान इन्द्रदेवतेचा पुरोगामी आहे. १९ हे सोमा, कोणाकडूनही तिरस्करणीय न होणारे तुझे नांव सर्वदा जागते राहणारे आहे. हे सोमा, सोम हे नांव धारण करणाऱ्या तुज देवाला ही आहुती समर्पण असो. २० हे सोमदेवा, तू कोणालाही हवासा वाटशील असा सुंदर आहेस. गायत्री छंदाच्या प्रभावाने तू जेणे करून अग्नीला प्रिय अशा अन्नभावाला प्राप्त होशील अशा प्रकारे पुन्हा सोमलतासमूहामध्ये प्रविष्ट हो. २१ हे सोमदेवा, प्राणिमात्राला वश होणारा तू त्रिष्टुभ् छंदाच्या योगाने इन्द्राला प्रिय अशा अन्नाच्या स्वरूपाला प्राप्त होशील अशाप्रकारे पुन्हा या सोमलतासमूहात प्रवेश कर. २२ हे सोमदेवा, आमच्यावर मित्राप्रमाणे प्रेम करणारा तू जगतीछंदाच्या प्रमाणे विश्वेदेवांना प्रिय अशा अन्नाच्या स्वरूपाला एकवेळ प्राप्त होशील अशा रीतीने सोमलतासंघाच्या ठिकाणी पुन्हा प्रविष्ट हो. २३ आमच्या पासून दूरच्या प्रदेशात, अन्तरिक्षात, फार तर काय पण स्वर्गलोकी जाऊन राहिलेला आमचा प्राण पुन्हा आमच्या ठिकाणी परत येवो. हे सुवर्णा, या भूलोकावर तू जणू काय मूर्तिमंत आयुष्य आणि आयुष्याची वृध्दी करणारे अमृतच आहेस. आमच्या प्राणाच्या सुस्थितीसाठी तुला आम्ही या सोमरसात टाकतो. २४ इंद्र व अग्नी हे दोन्ही देव माझ्या ठिकाणी बल निर्माण करोत. सोम व बृहस्पती हे दोघे देव माझ्या ठिकाणी बल उत्पन्न करोत. विश्वेदेव माझ्या ठिकाणी बल निर्माण करोत. त्याचप्रमाणे हे अश्विनीकुमार हो, तुम्ही उभयता माझ्या ठिकाणी बल संपादन करा. २५ ज्याच्यासाठी मी जाणेच योग्य आहे अशा यज्ञाची महनीय अशी जी दीक्षादि अंगे आहेत ती वेद अनुक्रमाने सांगत असतो. असे जर आहे तर त्या वेदालाही मी आपल्या अंतःकरणात सदैव धारण करीन. रथाच्या चाकाला त्याच्या भोवती असणारी धाव जशी व्यापून राहिलेली असते त्याचप्रमाणे हा यज्ञ काव्याप्रमाणे रमणीय पण स्पष्टपणे चटकन ध्यानात न भरणाऱ्या दीक्षादि अंगांना व्यापून राहिला आहे. (अनुवाक ३).

जे मंत्र म्हणून सोमलताखंडांनी उदक ढवळले जाते त्या मंत्रांना 'आधाव' म्हणजे उदकाच्या ठिकाणी कंप उत्पन्न करणारे अशी संज्ञा आहे. या मंत्रांमध्ये 'मान्दाः' 'भन्दनाः' इत्यादि उदकांची नांवे समाविष्ट झालेली आहेत. त्यांपैकी प्रत्येक नांव उदकाचे गुप्त नांव आहे. कारण त्याचा उल्लेख केवळ वेदांतच केला असल्यामुळे त्या नांवांची लौकिकात प्रसिध्दी नाही.

'मान्दासु ते शुक्र शुक्रमाधूनोमि' असा जो मंत्र म्हटला जातो त्या योगाने उदकाच्या गुप्त नांवाचा उच्चार करून देवांना संतुष्ट केल्यासारखे व त्यांच्या अनुग्रहाने द्युलोकाकडून पर्जन्यवृष्टी संपादन केल्यासारखे होते. रात्र ही दिवसाच्या कालमर्यादेचे निदर्शन करणारी आहे. रात्र आणि सूर्याचे किरण या दोघांचे, पर्जन्यवृष्टीच्या ठिकाणी स्वामित्व असते. 'शुक्रं ते शुक्रेण गृह्णामि' या मंत्राचे पठण केले जाते त्या योगाने दिवसाच्या कालमर्यादेची निदर्शक रात्र व सूर्याचे किरण यांनी युक्त असलेल्या कालाकडून द्युलोकातून भूमीवर पर्जन्यवृष्टीचा वर्षाव केल्यासारखे होते. पर्जन्यवृष्टी हेच इंद्राचे प्रधान रूप आहे. यास्तव 'ककुहं रूप वृषभस्य रोचते' या मंत्राचे पठण केले असता इंद्राच्या प्रधान स्वरूपाच्या मिषाने पर्जन्यवृष्टीचे संपादन केल्यासारखे होते. 'आदाभ्य' नांवाचा ग्रह (ककुहापैकी) दह्याने भरून घेऊन त्यातील दह्याची 'यत् ते सोमादाभ्यं' या मंत्राने सोमदेवाला आहुती देतो, तो जणू काय योग्य अशा हविर्द्रव्याने हवि:स्वरूप अशा सोमदेवाचे यजन करतो. 'अंशु' नांवाचा सोमरस जो ग्रहपात्रात भरून घेतो त्याचे आयुष्य व प्राण, त्याच्या पासून दूर जात असते. यास्तव 'आ न: प्राण एतु परावत:' इत्यादि मंत्र पठण केल्याच्या योगाने आयुष्यप्रद असा प्राण पुन्हा आपल्या ठिकाणी स्थापन केल्याप्रमाणे होते. 'हिरण्य' म्हणजे जणू प्राणसंरक्षक असे अमृतच असून प्राण हाच आयुष्यरूप आहे. यासाठी 'अमृतमसि प्राणाय त्वा' या मंत्रभागाचे पठण केले म्हणजे अमृताच्या प्रभावाने आपल्या ठिकाणी आयुष्याचे धारण केल्यासारखे होते. पठण करताना हिरण्याकडे पाहून श्वास कोंडून धरावा. शंभर खंड हे हिरण्याचे परिमाण असून पुरुष शंभर इन्द्रियांनी व शंभर वर्षांच्या आयुष्याने युक्त आहे. यास्तव हिरण्याला अनुलक्षून थोडासा श्वासनिरोध केल्याने स्वत:ला आयुष्य व इंद्रियसमूह यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्याप्रमाणे होते. उदक हे जणू औषधच आहे. त्यासाठी थोडावेळ श्वासनिरोध केल्यानंतर उदकाला स्पर्श करावा. म्हणजे स्वत:ला औषधोपचारच केल्यासारखे होते. (अनुवाक ४).

१ हे सोमदेवा, तू वायुरूप असून प्राण हे तुझे नांव आहे. सर्वप्रेरक अशा परमेश्वराच्या आधिपत्याखाली राहून तू मला हृदयात आकर्षण करून घेतला जाणारा अपान नांवाचा वायू दे. २ अवलोकनशक्ती व श्रवणशक्ती यांचा पोषक असल्यामुळे हे सोमा, तू नेत्ररूप असून श्रोत्र म्हणजे श्रवणेंद्रिय हे तुझे नांव आहे. देह व इंद्रिये यांचा निर्माता असलेल्या धाता देवाच्या

आधिपत्याखाली राहून तू मला आयुष्य दे. ३ शरीरावयवांच्या ठिकाणी असणारे सुंदर रूप तूच असून वर्ण हे तुझे नांव आहे. बृहस्पतीदेवाच्या आधिपत्याखाली राहून तू माझ्या ठिकाणी पुत्रपौत्रादि प्रजा संपादन कर. ४ मानसिक सत्य तूच असून वाचिकसत्यरूपही तूच आहेस. इंद्रदेवाच्या आधिपत्यात राहून मला क्षात्रबल दे. ५ मागे होऊन गेलेले सर्व तू असून पुढे होणारे सर्वही तूच आहेस. पितरांच्या स्वामित्वामध्ये राहून तू उदके व ओषधी यांच्या ठिकाणी गर्भ म्हणजे पशुरूपी शक्ती धारण कर. ६ हे सोमा, ऋताचे विशेष प्रकारे रक्षण व्हावे म्हणून मी तुझे धारण करतो. ७ हे ऋत विपुल प्रमाणात माझ्या ठिकाणी राहो म्हणून मी तुझे ग्रहण करतो. ८ ऋताचे माझ्याकडून विशेष प्रकारे धारण व्हावे म्हणून हे सोमा मी तुझे ग्रहण करतो. ९ प्रमादजन्य अनृतराहित्यरूपी सत्यरूपात ऋत माझ्या ठिकाणी राहो, म्हणून हे सोमा मी तुझे ग्रहण करतो. १० ऋताचे ज्ञानप्रकाशत्व मला प्राप्त होवो म्हणून हे सोमा मी तुझे ग्रहण करतो.

सृष्टिकर्त्या प्रजापतीने सृष्टी उत्पन्न करण्यापूर्वी 'विराड्' रूप असलेल्या "'वायुरसि' इत्यादि मंत्रांचा संघ हा सृष्टी उत्पन्न करण्याचे साधन आहे असे पाहिले. आणि त्या विराट् छंदाच्या प्रभावाने त्याने भूतकालीन व भविष्यकालीन जगत् निर्माण केले. मात्र विराट्छंदस्वरूप असलेला हा पूर्वोक्त मंत्रांचा संघ त्याने ऋषींना कळू न देता गुप्त राखला. परंतु जमदग्नी महर्षीने तप करून प्रजापतीला संतुष्ट करून त्याच्या अनुग्रहाने तो मंत्रसंघ आपणास ज्ञात करून घेतला. त्या विराट्छंदरूपी मंत्रसंघाच्या सामर्थ्याने त्याने धेनुरूप असे भोग निर्माण केले. पृश्नि म्हणजे धेनुरूपी भोग पूर्वोक्त 'वायुरसि' इत्यादि मंत्रांनी निर्माण केले गेल्यामुळे त्या मंत्रांनाही पृश्नि हे नांव रूढ झाले. पृश्नीरूपी भोग उत्पन्न करण्याचे सामर्थ्य हेच त्या पृश्निसंज्ञक मंत्रांचे पृश्नित्व होय. 'वायुरसि' इत्यादि पृश्निसंज्ञक मंत्रांनी निरनिराळ्या ग्रहपात्रात भरून घेतलेले जे सोमरसाचे भाग त्यांनाही पृश्नी हीच संज्ञा आहे. पृश्नीसंज्ञक मंत्रांनी सोमरसाचे भाग ग्रहण करावेत म्हणजे त्यांच्या योगाने कामधेनूसदृश असे अनेक भोग यजमान संपादन करतो. 'वायुरसि प्राणो नाम' या मंत्राच्या प्रभावाने यजमान प्राण व अपान या वायूंना सुस्थितीत धारण करतो. 'चक्षुरसि श्रोत्रं नाम' या मंत्राच्या सामर्थ्याने यजमान आयुष्य संपादन करतो. 'रूपमसि वर्णो नाम' या मंत्राच्या सामर्थ्याने यजमान पुत्रपौत्रादि प्रजा संपादन करतो.

'ऋतमसि सत्यं नाम ' या मंत्राच्या प्रभावाने स्वत:च्या ठिकाणी तो क्षात्रबल निर्माण करतो. 'भूतमसि भव्यं नाम' या मंत्राच्या सामर्थ्याने उदके व औषधी यांच्या ठिकाणी गर्भ म्हणजे पशूंना उत्पन्न करणारे सामर्थ्य संपादन करतो. उदक पिऊन व तृणादि ओषधी भक्षण करून जगणारे पशू हेच उदक व ओषधी यांचे ठिकाणी असणारा गर्भ होय.

प्राण व अपान या वायूंच्या सुस्थितीत पशूंच्या प्राप्तीपर्यंतचे जितके फल असते तेच काय ते पुरुषाला सर्वदा व्यापून राहिलेले असते. अर्थात् प्रत्येक पुरुष या फलाचीच सर्वदा अपेक्षा करीत असतो. पृथ्वी हेच सत्याचे संरक्षणस्थान. 'ऋतस्य त्वा व्योमने' या मंत्राचे जे पठण केले जाते त्या योगाने यजमान या पृथ्वीवर जय मिळवितो. अंतरिक्ष हेच सत्याचे संरक्षण करणारे होय. 'ऋतस्य त्वा विभूमने' या मंत्राचे पठण केले असता यजमान अंतरिक्षावर विजय मिळवितो. द्युलोक हाच सत्याचे विशेषत्वाने धारण करणारा होय. 'ऋतस्य त्वा विधर्मणे' या मंत्राचे पठण केले असता यजमान द्युलोकावर विजय संपादन करतो. दश दिशा सत्याचे प्रमादरहित असे स्वरूप धारण करणाऱ्या होत. 'ऋतस्य त्वा सत्याय' या मंत्राचे पठण केल्याने यजमान दश दिशांना जिंकतो. स्वर्गलोक हाच सत्याचा प्रकाशक होय. यास्तव 'ऋतस्य त्वा ज्योतिषे' या मंत्राच्या पठणाने यज़मान स्वर्गलोकावर जय संपादन करतो. स्वर्गलोकातच देवांची निवासस्थाने असतात. अर्थात् स्वर्गलोकावर जय मिळविल्याने यजमानाने जणू काय सर्व देवलोकांना जिंकल्याप्रमाणे होते. पूर्वोक्त 'वायुरसि' इत्यादि पांच व त्यांनंतरचे 'ऋतस्य त्वा' इत्यादि पांच मिळून एकूण मंत्रसंख्या दहा होते. चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने विराट्छंद हा दशाक्षरीच असतो. संख्यासाम्यतेच्या दृष्टीने आता सांगितलेला दहा मंत्रांचा संघ म्हणजे जणू विराट् छंदच आहे. विराट् छंद हा अन्नस्वरूप आहे. अर्थात् विराट्छंदरूप मंत्रसंघाच्या पठणाने यजमान सेवनीय अशा अन्नरूपाने असणाऱ्या विराट् छंदाच्या ठिकाणी सुप्रतिष्ठित होतो. (अनुवाक ५).

पूर्वी देवांनी यज्ञ केला. परंतु पुढे सांगण्यात येणाऱ्या सोमग्रहांचे ग्रहण न करता केलेल्या त्या यज्ञाचे त्यांच्या अपेक्षित असे फळ प्राप्त झाले नाही. त्यांनी पुढे सांगितलेल्या 'पर' संज्ञक सोमग्रहांचा उपयोग करून जेव्हा पुन्हा यज्ञ केला तेव्हा त्यांना ते अपेक्षित फळ मिळाले. जवळ नसलेले

जे अभीष्ट फळ ते चांगल्या प्रकारे मिळवून देणे त्या 'पर' संज्ञक ग्रहांचे परत्व होय. यास्तव परसंज्ञक सोमग्रह न घेता केलेल्या यज्ञाने जे फल यजमानाला मिळाले नाही ते मिळविण्याकरता परसंज्ञक सोमग्रहाचे ग्रहण करून त्याने यज्ञ करावा. पहिला पर ग्रह घेतला तर त्या यजमानाने हा भूलोक जिंकल्याप्रमाणे होते. दुसरा परग्रह घेतला असता अंतरिक्ष लोक व तिसरा 'पर' ग्रह घेतला असता त्या यजमानाने स्वर्गलोक जिंकल्याप्रमाणे होते. सारांश, हे 'पर' संज्ञक सोमग्रह जर, घेतले तर ते यजमानाला तिन्ही लोकांत जय मिळवून देण्याला कारणभूत होतात.

'विषुवान्' नामक मुख्य दिवसानंतरच्या तीन दिवस 'पर' संज्ञक सोमग्रह घ्यावयाचे ते पूर्वीचा क्रम बदलून घ्यावेत. म्हणजे प्रथम दिवशी तिसरा, दुसऱ्या दिवशी दुसरा व तिसऱ्या दिवशी पहिला पर नामक सोमग्रह घ्यावा. अशा प्रकारचा बदल करून अनुष्ठान करणारा यजमान पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग या तिन्हीही लोकांवर विजयी होतो आणि पुन्हा स्वर्गलोकातून या भूतलावर येऊन प्रतिष्ठित होतो.

विषुवान् दिवसाच्या पूर्वीच्या तीन दिवसांमध्ये ज्या अर्थी पहिला, दुसरा व तिसरा या 'परांच' म्हणजे चढत्या क्रमाने 'पर' संज्ञक सोमग्रह घेतले जातात त्या अर्थी पृथ्वी, अंतरिक्ष, व स्वर्ग हे तीन लोकही 'परांच' किंवा चढत्या क्रमाने-अवस्थित झाले आहेत. विषुवान् दिवसानंतरच्या दिवसांत ज्या अर्थी तिसरा, दुसरा व पहिला या अर्वाच म्हणजे उतरत्या क्रमाने 'परग्रह' घेतले जातात त्या अर्थी स्वर्ग, अन्तरिक्ष व पृथ्वी हे तीन लोक उतरत्या क्रमाने अवस्थित झाले आहेत. आणि म्हणूनच चढत्या व उतरत्या क्रमाने असणारे हे तीनही लोक परस्परविलक्षण आणि त्यामुळेच पुनरावृत्त असे नसल्यामुळे ते साररहित झाले नाहीत आणि म्हणूनच सर्व मनुष्ये सारसंपन्न अशा प्रकारच्या या तीनही लोकांच्या ठिकाणी आपले जीवन उत्तम प्रकारे व्यतीत करत असतात.

ब्रह्मवादी असा प्रश्न विचारतात की, सत्य अशा कोणत्या कारणामुळे उदकांपासून ओषधी उत्पन्न होतात? त्याचप्रमाणे प्रजापतीच्या मागून प्रजा उत्पन्न होण्याचे कारण कोणते? त्यावर, 'पर' नांवाचे सोमग्रह, हेच तीनही प्रश्नांचे उत्तर बुध्दिमान पुरुषाने द्यावे. 'अतिग्राह्य' संज्ञक सोमग्रह भरून

देण्याचे मंत्र उत्कृष्ट असल्यामुळे त्यांना 'पर' म्हणजे श्रेष्ठ अशीच अन्वर्थक संज्ञा आहे. अर्थात् परसंज्ञक सोमग्रहांना अनुलक्षूनच पूर्वोक्त तीनही गोष्टींचा उद्भव होत असतो. ज्या अर्थी 'उदकांच्या पासून ओषदींची (तृण व धान्ये) उत्पत्ती होण्यासाठी मी तुझे ग्रहण करतो' अशा अर्थाचा मंत्र म्हणून पहिल्या 'पर' संज्ञक सोमग्रहाचे ग्रहण केले जाते, त्या अर्थी उदकापासून ओषधी उत्पन्न होतात. 'ओषधीपासून प्रजांचे जीवन व्हावे म्हणून मी तुझे ग्रहण करतो,' अशा अर्थाच्या मंत्राने 'दुसऱ्या' ग्रहाचे ग्रहण केले जाते. म्हणूनच उदकापासून मनुष्यांचे ओषधीरूप अन्न निर्माण होत असते. 'प्रजा आणि त्यांचा निर्माता प्रजापती यांच्यासाठी मी तुझे ग्रहण करतो' अशा अर्थाचा मंत्र म्हणून तिसरा 'पर' संज्ञक ग्रह घेतला जातो. त्यामुळेच प्रजापतीचा आश्रय करून सर्व प्रजा निर्माण होत असतात. (अनुवाक ६).

सृष्टिकर्त्या प्रजापतीने देव आणि असुर उत्पन्न केले. मागोमाग त्यांच्या जीवनासाठी यज्ञ निर्माण केला आणि त्यामागून गायत्र्यादि छंद निर्माण केले. काही काळाने देवांमध्ये परस्परांचे ऐकमत्य न राहिल्यामुळे ते परस्परांना सोडून निरनिराळ्या ठिकाणी राहू लागले. त्यानंतर यज्ञ असुरांना धरून राहिला व देवांच्यापासून दूर निघून गेला. यज्ञाचे अनुकरण करून गायत्र्यादि छंदही देवांना सोडून गेले. पुढे काही काळाने देवांनी आपआपसात एकोपा उत्पन्न केला व परस्परांमध्ये असा विचार केला की, आपण ज्या ऐश्वर्याला प्राप्त होऊन सुस्थितीत राहत होतो ते सर्व ऐश्वर्य आता एकटे असुर भोगून राहिले आहेत. सारांश, पूर्वीच्या ऐश्वर्यापासून मुकल्याने झालेला पराभव देवांना असह्य झाला. तेव्हा त्यांनी प्रजापतीकडे धाव घेतली. देवांनी अनेक प्रकारे प्रजापतीची मनधरणी केल्यानंतर 'गायत्र्यादि' छंदांत असलेल्या वैदिक मंत्रांमध्ये जे मुख्य सार आहे तेवढेच काढून मी तुम्हाला देतो' असे प्रजापतीने त्यांना सांगितले. नंतर छन्दोबध्द अशा वैदिक मंत्रांतील सारभूत असे सामर्थ्य निवडून काढून प्रजापतीने ते देवांना दिले. छंदोमंत्रांतील सारभूत सामर्थ्य देवांना प्राप्त होताच त्या मागोमाग छंदही असुरांना सोडून देवांकडे परत आले. आणि छंदांच्या मागोमाग यज्ञही देवांचे कडे आला. नंतर देव पुन: विजयी झाले आणि असुर पराभूत झाले. सारांश, छंदोमंत्रांमधील सारभूत वीर्य म्हणजे सामर्थ्य जो जाणतो तो स्वत: विजयी होतो. १ आश्रावय २ अस्तु श्रोषट् ३ यज ४ ये यजामहे ५ श्रोषट् व वषट्कार हे पांच

मंत्र म्हणजे छन्दोमंत्रांतील मुख्य सार होय. या पांच मंत्रांना जो जाणतो व त्यांच्या योगाने जो अनुष्ठान करतो तो यजमान विजयी होतो व त्याचा द्वेष करणारा भाऊबंद पराभूत होतो. ब्रह्मवादी असे म्हणतात की कोणत्या कामनेसाठी अध्वर्यू कोणाला उद्देशून आश्रावण करतो? 'प्रजापतीने ज्यांच्या ठिकाणचे सार काढून घेतले आहे अशा छंदोमन्त्रांच्या ठिकाणी पुन्हा सारभूत सामर्थ्य निष्पन्न होण्यासाठी अध्वर्यू आग्नीध्राला अनुलक्षून आश्रावण करतो', असे ब्रह्मवाद्यांच्या प्रश्नाचे उत्तर बुद्धिमान व्यक्तीने द्यावे. 'आश्रावय, अस्तु श्रौषट्, यज, ये यजामहे, वौषट्,' हेच छंदोरूप असणाऱ्या मंत्रांचे सारभूत असे वीर्य म्हणजे सामर्थ्य होय. छंदोमंत्रांच्या ठिकाणचे हे सामर्थ्य जाणून जो कोणी यज्ञामध्ये किंवा लोकव्यवहारांत देवादिकांचे पूजन करतो त्याने जणू काय सवीर्य अशा छंदोमंत्रांनी देवादिकांचे पूजन केल्यासारखे होते. इंद्राने वृत्रासुराचा वध केला हे त्याच्या हातून अपवित्र अर्थात् यज्ञाला अयोग्य असे घडलेले कर्म असून इन्द्राने यतींना लांडग्यांना खावयास देऊन त्यांचा जीव घेतला हे देखील त्याने केलेले अपवित्र असेच पापकर्म होय. असे असताना आरंभापासून शेवटपर्यंत इन्द्राला प्राधान्य देऊन यज्ञ केला जातो हे कसे? असा ब्रह्मवादी पंडित प्रश्न विचारीत असतात. या प्रश्नाचे उत्तर असे की, इन्द्राची दोन शरीरे आहेत. एक यज्ञीय व एक अयज्ञीय. त्यांपैकी 'यज्ञ' हे इन्द्राचे यज्ञयोग्य असे पवित्र शरीर आहे. देवांच्यावर राज्य करणारे व शत्रूंचा नाश करणारे शरीरं अर्थात् यज्ञाला अयोग्य आहे. यास्तव इन्द्राच्या यज्ञरूप अशा यज्ञयोग्य अर्थात् सात्त्विक शरीराचे यजमान यज्ञात यजन करीत असतात. इन्द्राच्या या यज्ञीय स्वरूपाला जो जाणतो त्याच्याजवळ यज्ञ आपण होऊन येतो. (अनुवाक ७).

१ हे अग्ने, तू यजमानाला आयुष्यप्रदाता हो. तुला अर्पिलेल्या हविर्द्रव्यांचे नित्य सेवन करणारा, आघारप्रयाजादिरूपांतील घृताला पुरस्कृत करूनच नित्य उपासिला जाणारा, घृतयोनी म्हणजे घृत हेच ज्याच्या जन्माचे अधिष्ठान आहे, असा तू, हे परिशुध्द केल्याने अत्यंत मधुर झालेले गाईचे तूप पिऊन, पिता पुत्राचे करतो त्याप्रमाणे या यजमानाचे रक्षण कर.

आहवनीय व गार्हपत्य या दोन अग्नींच्या ठिकाणी पुरोडाशरूप हविर्द्रव्य भाजून परिपक्व करून त्या अवभृथासाठी परिपक्व केलेल्या वरुणदेवतात्मक

पुरोडाशाचे हवन त्यांच्या ठिकाणी न करता दूरच्या अंतरावर असणाऱ्या जलप्रवाहासमीप 'अवभृथ' संज्ञक कर्म करण्याकरता यजमान जात असतो. आणि याच अपराधामुळे कोपाविष्ट झालेल्या आहवनीय व गार्हपत्य या दोन अग्नींकडून यजमान चिरडला जात असतो. यास्तव अवभृथासाठी जातेवेळी 'आयुर्दा अग्ने' या मंत्राने आहवनीयाचे ठिकाणी आज्याहुती द्यावी. त्या आहुतीच्या योगाने जणू काय त्या दोघा अग्नींना शान्त केल्याप्रमाणे होते आणि शान्त झालेल्या त्या दोघा अग्नींच्याकडून यजमान कसल्याही संकटाला प्राप्त होत नाही.

२ यमरूपी धनकोचे जे परत देण्याला पात्र असलेले ऋण मजकडून परत न केले गेल्यामुळे माझ्या मस्तकावर ओझ्यासारखे बसून राहिलेले आहे, आणि ज्या ऋणाच्या ओझ्याने लादलेला असा मी या वेळी नगरात वावरत आहे ते यमदेवाचे डोईजड ऋण याच जन्मात यज्ञभूमीच्या ठिकाणी या वेळी बसलेला मी योग्य रीतीने परत करून स्वतःला त्या ऋणापासून पूर्णतया दूर करीत आहे. यास्तव हे अग्निदेवा, त्या यमदेवरूपी धनकोपासून मी आता अनृणी झालो आहे.

३ ओंजळीत भरून घेतलेल्या हे विश्वलोपका सक्तो, तू सर्व पातकांचा नाश करणारा आहेस. सर्व पापांचे दहन करण्यास प्रवृत्त झालेल्या या वणव्याच्या रूपाने पेटलेल्या अग्नीच्या मुखात मी तुझी आहुती दिली आहे.. हवनरूपाने आपणाकडे आलेल्या हविर्द्रव्याचे सेवन करणारा 'अग्धात्' नांवाचा एक, होमरहित अशा द्रव्याचे सेवन करणारा 'अहुतात्' नांवांचा एक आणि सर्वच प्रकारचे सेवन करणारा 'समसनात्' नांवांचा एक, असे जे तीन अग्नी ओंजळीने दिलेल्या पिठाच्या आहुतीने संतुष्ट होत असतात ते आमच्या क्षुधारूप रोगावर औषधोपचार करून त्याचा परिहार करोत, आम्हाला सभेत बसण्यासाठी योग्य स्थान निर्माण करोत, आमच्या ठिकाणी बल निर्माण करोत आणि श्रेष्ठ असे धन वगैरे आमच्या ठिकाणी संपादन करोत. ४ आमच्या घरांचा सर्वतोपरी नाश होण्याचा प्रसंग टळून आमच्या पुरोभागी असणारा आणि स्वतःच्या तेजाने वृद्धिंगत होणारा हा अग्नी आमचे सर्वतोपरी रक्षण करो. अग्नीकडून रक्षण मिळाल्यामुळे आमची अनेक घरे सुरक्षित राहोत. ५ आकाशपालक अशा वायुदेवा, तू अनुग्रहरूप वाणीने आम्हाला अन्नादि रस दे. नष्ट झालेले

अन्नादिरस पुन्हा आम्हाला आणून दे. आम्हाला हवे असलेले धन पुन्हा आम्हाला आणून दे. ६ आपल्या अधिक तेजाने उत्कृष्ट प्रकारे संवर्धित होणाऱ्या हे आदित्यदेवा, तू धन, पशू इ. हजारो प्रकारच्या संपत्तीच्या साठ्यांचा प्रभू आहेस. यास्तव दारिद्र्याचा अभाव, धनसंपत्तीचा भरपूर संचय, पुत्रपौत्रादि संततिसौख्य आणि प्रत्येक वर्षी आमच्यावर येणाऱ्या अनिष्टांची विघटक अशी संपत्ती आम्हाला दे.

अग्नी हाच यमसंज्ञक देव असून ही वेदिरूपी भूमी म्हणजेच यमी होय. यजमान जर वेदिरूपी भूमी दग्ध न करता तेथून निघून जाईल तर अग्निरूपी यमाचे दूत त्याच्या गळ्याला दोरीचा फास घालून त्याला तत्काळ स्वर्गलोकी घेऊन जातील. 'यत् कुसीदमप्रतीत्तं मयि' या मंत्राने वेदिरूपी भूमीचे दहन करावे. म्हणजे या जन्मातच यज्ञप्रदेशामध्येच राहून आपल्यावर असलेले ऋण आता केलेल्या भूमिदहनाच्या योगाने दूर करून अनृणी झालेला तो यजमान स्वर्गलोकी जातो.

यज्ञसंबंधी अंगभूत अशा प्रकारच्या निरनिराळ्या कर्मांमध्ये यजमान जर काही गैरसमज करील तर त्या अपराधाचा परिहार होण्यासाठी वेदिरूपी भूमी दग्ध करणाऱ्या वणव्यामध्ये ओंजळीने सातूच्या पिठाचा होम करील. वणव्याच्या रूपाने वेदिरूपी भूमी दग्ध करण्यास प्रवृत्त होणारा अग्नी हा सर्व पुरुषांच्या ठिकाणी संबध्द असा असून सर्व पुरुषांना अपेक्षित असलेल्या व्यवहारांना पुरेसा असतो. हाच वैश्वानर अग्नी सातूपिठाच्या होमाने संतुष्ट होऊन यज्ञांगभूत अशा निरनिराळ्या कामांमध्ये गैरसमज करणाऱ्या यजमानाला मोड करून घेतो म्हणजे यज्ञांगभूत कामात गैरसमज केल्याच्या अपराधापासून मुक्त करतो.

माघ कृष्ण अष्टमीस एकाष्टका अशी संज्ञा आहे. ही एकाष्टका प्रतिपदादि तिथिरूपाने मानल्या जाणाऱ्या दिवसांना प्रवृत्त करणारी आहे. या एकाष्टकेच्या दिवशी चार शराव मापाचे पीठ मोजून घेऊन त्या पिठाचा घास शिजवून तयार करावा आणि त्या अत्यंत ऊन ऊन घासाने दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी अरण्यामध्ये एका कडेला आग लावावी. घास्यावर निखारे ठेवावेत आणि त्यांवर वाळलेले गवत घालावे. असे केले असता जर त्या घास्याने प्रज्वलित केलेला अग्नी जेव्हा त्या अरण्याची कड जाळील तेव्हा ज्या कार्याच्या उद्देशाने

हे कक्षदहन केले असेल ते कार्य पुण्यसम होऊन उत्तम रीतीने पार पडते. आणि जर त्या अग्नीने अरण्याच्या कडेचे दहन केले नाही तर ते उद्दिष्ट कार्य पापसम होते. अर्थात् शेवटास न जाता नष्ट होते. प्राचीन काळचे ऋषी अशा प्रकारच्या कक्षदहनाचा तोडगा करून आपल्या उद्दिष्ट कार्याच्या निर्विघ्नपणे पार पाडण्याबद्दलचा शकून पाहत आणि त्यावरुन संवत्सरसत्रासारख्या दीर्घकालीन सत्राचा प्रारंभ करीत. जो यजमान उपद्रष्टा, उपश्रोता व अनुख्याता यांना उद्देशून यजन करतो तो इष्ट म्हणजे श्रौत, व पूर्त म्हणजे स्मार्त अशा दोन्ही प्रकारच्या कर्मफलांच्या योगाने स्वर्गलोकी जातो. अग्नी हा उपद्रष्टा म्हणजे सर्व कर्मावर दृष्टी ठेवणारा, वायु हा सर्व कर्मविषयक मंत्रांचे श्रवण करणारा आणि आदित्य त्या मंत्रांचे व्याख्यान करणारा होय. हे जाणून जो त्याचे यजन करतो तो इष्ट व पूर्त या दोन्ही कर्मांच्या फलाने स्वर्गलोकी जातो.

'अयं नो नभसा पुर:' या मंत्राचे पठण केले जाते. आपल्या पुरोभागी ज्वालांनी व्याप्त असा जो अग्नी असतो तोच आपल्या ज्वालांनी आकाशाशी जाऊन भिडतो. पूर्वोक्त मंत्रांनी दिलेल्या आहुतीच्या योगाने 'माझे हे यज्ञकर्मसंबंधी फल तू रक्षण कर, अशी त्या अग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते. आकाशात संचार करून त्याचे पालन करणारा वायू हाच नभसस्पती होय. 'स त्वं नो नभसस्पते' या मंत्राने आहुती दिली जाते तेव्हा, तू माझ्या यज्ञफलाचे संरक्षण कर, अशी त्याची प्रार्थना केल्याप्रमाणे होते. आपल्या किरणांच्या योगाने वर्धमान होत असल्यामुळे आदित्य 'संस्फान' देव होय. 'देव संस्फान' या मंत्राने आहुती दिली जाते तेव्हा माझ्या या यज्ञकर्माचे रक्षण कर अशी त्याची प्रार्थना केल्याप्रमाणे होत असते. (अनुवाक ८).

१ हे गाईंनो, अत्यंत तरुण बैल मी तुम्हाला देत आहे. आपल्या प्रियकर अशा या बैलासह तुम्ही खेळत खेळत संचार करा. तुम्ही जन्मत:च उत्कृष्ट अशा भाग्याने संपन्न आहात. यासाठी तुम्ही आम्हाला शाप देऊ नका. इतकेच नव्हे तर तुम्हाला अत्यंत तरुण असा खेळाडू दिल्याबद्दल आमच्यावर अनुग्रह करा. तुमच्या प्रसादाने आम्ही भरपूर अशा धनाने व अन्नाने समृध्द होऊन आनंदित होऊ. २ मरुत्संज्ञक देवांचा जनक असणाऱ्या हे प्रजापतिदेवा, सृष्टीच्या उत्पादनकर्तृत्व इ. तुझ्या माहात्म्याला आमचा नमस्कार

असो. सर्व जगावर दृष्टी ठेवणाऱ्या तुला आम्ही नमस्कार करतो. तुझ्याविषयी मी जे बोललो ते नीट लक्षात घे. उत्कृष्ट यज्ञाचे साधन अशा या वृषभाच्या योगाने आम्ही तुझे यजन करीत आहो. हे वृषभरूपी हविर्द्रव्य देवांना प्रिय असो. ३ हा वृषभ म्हणजे देवांच्या बंधनाला कारणभूत होणारा आहे. दाव्याने बैल बांधतात त्याप्रमाणे या वृषभाचे ठिकाणी देव अत्यंत प्रेमाने जखडून राहतील. हा वृषभ आहुतीरूपाने दिला गेला म्हणजे तो मेघांच्या ठिकाणी असणाऱ्या उदकाचा गर्भच होऊन बसेल. आणि पुन्हा औषधींच्या ठिकाणी वृष्टिरूपाने अधोमुख होऊन खाली येऊन पडेल. पूषा देवाने सोमरसाचे बिंदू व्यापले. आदित्याने उदकरूपाने असणाऱ्या चंद्राचा अंश आपल्या किरणांनी आकर्षण करून घेतला. तो अत्यंत मोठ्या पर्वतासारखा मेघ बनला. देवांना प्रिय असा हा वृषभ आहुतिरूपाने अग्नीत दिला गेल्यावर आदित्याचे ठिकाणी जाऊन त्याच्याशी एकरूप होतो आणि नंतर किरणांच्या रूपाने चन्द्रसंबध्द असे भूमीवरचे उदक आकर्षण करून घेऊन, मेघरूप होऊन आणि त्या मेघांच्या उदरात जलरूप असा गर्भ होऊन वृष्टिरूपाने पुन्हा खाली आला आहे. ४ गाईंच्या वासरांचा हा वृषभ पिता असून निष्पाप अशा या गाईंचा पती आहे. केवळ आज विद्यमान असलेल्या गाईंच्या वासरांचाच नव्हे तर मोठ्याने डुरकणाऱ्या व धष्टपुष्ट अशा बैलांचाही पिता आहे. गाईंच्या उदरात गर्भरूपाने असणारे वासरू, गर्भाला वेष्टून असणारी अतिसूक्ष्म अशी त्वचा, धार काढण्याच्या पात्रात असलेले दूध, गाईच्या कासेत असलेले अमृताप्रमाणे मधुर दूध, दूध नासल्यामुळे बनणारा आमिक्षा नांवाचा पदार्थ, ती आमिक्षा घुसळून बनलेले लोणी व ते सर्व कढविल्यानंतर बनणारे तूप हे सर्व या वृषभाच्या ठिकाणी रेतरूपाने असणाऱ्या सारभूत रसाचे परिणत असे स्वरूप होय. ५ हे वृषभा, सर्व गाईंनी आपल्यावर राज्य करण्यासाठी तुला राजा म्हणून निवडले आहे. उत्तम प्रकारे पूजा करण्याला योग्य असे मरुत् नामक देव आपले हविर्द्रव्य समजून तुलाच आपल्याकडे बोलावीत असतात. क्षत्रिय जातीचे जणू उच्चतम शिखरच अशा प्रधानभूत शरीराच्या ठिकाणी आश्रय करून बलरूपाने तू राहणारा आहेस. क्षत्रियजातीमधील प्रधानभूत अशा राजशरीरामध्ये तूच बलरूपाने राहिलेला आहेस. यासाठी राजाप्रमाणे उग्र रूप धारण करून तू आम्हाला देण्यासाठी आमच्या शत्रूंच्या जवळची नानाविध संपत्ती त्यांच्यापासून वेगळी कर.

ज्या यजमानाच्या यज्ञात आतापर्यंत सांगितलेली अंगभूत कृत्ये केली जातात त्या यजमानाने सर्वांगसमृध्द अशा पशुयागाने याग केल्यासारखे होते. (अनुवाक ९).

१ द्युलोकात राहणारांच्या अभिवृध्दीसाठी सूर्यदेव, क्षत्रियांच्या अभिवृध्दीकरता धातादेव, प्रजांच्या अभिवृध्दीसाठी वायुदेव आणि प्रजापतीच्या संतुष्टतेकरता बृहस्पतिदेव प्रकाशमान अशा तुझे यजन करो. २ ज्या शेळीचा गर्भ (साररहित) हरितवर्ण असा झाला आहे आणि योनी (जननेंद्रिय) हरितवर्णी अशी साररहित आहें, त्याप्रमाणे ज्या शेळीची निरनिराळी अंगे वेडीवाकडी झालेली आहेत त्या शेळीला मी देवांच्याशी सुसंगत करतो. ३ गर्भाचा प्रवर्तक असणाऱ्या हे देवा, या शेळीचा गर्भ वाटोळा फिरव आणि गर्भाचा निर्गम करणाऱ्या देवा, तू हा गर्भ या शेळीच्या शरीरातून बाहेर काढ. हे ईश्वरा, हे गर्भाच्या ठिकाणी जन्मत: शब्द उत्पन्न करणाऱ्या देवा, भूमीवर असलेल्या प्रशस्त अशा ज्या दिशा आहेत त्यांच्याकडून पुन्हा या गर्भाला व्याप्त कर. ४ हे वशे, तुझ्या गर्भाशयाचे मी छेदन करतो. तुझ्या जननेंद्रियाचे आणि त्यात विशिष्ट गती उत्पन्न होण्याला कारणभूत अंडांच्या जागी असलेल्या गवीनीसंज्ञक भागाचेही मी छेदन करतो. मातेला व पुत्राला वेगळे करतो आणि तुझा गर्भ व त्यावरचा जार यांनाही मी तुझ्यापासून वेगळे करतो. ५ तुझा प्राणवृत्तिरूप आत्मा आता बाहेर पडून सर्वव्यापी होवो. ६ अत्यंत सारभूत, नानारूपधारी, तेजस्वी, शुध्द आणि संतानरूपाला प्राप्त होणारा तुझा गर्भ जन्मान्तराला जावो. ७ एक, दोन, तीन, चार, पांच, सहा, सात व आठ पाय असलेली ही वशा सर्वभूतांच्या ठिकाणी अनुक्रमाने विस्तार पावो. ८ अत्यंत विस्तीर्ण असा द्युलोक आणि पृथ्वी आमच्या या यज्ञांवर आपल्या कृपेने सिंचन करोत. आणि आमचे भरणपोषणाचे जे प्रकार असतील त्या सर्व प्रकारांनी आमचे पालन करोत (अनुवाक १०).

१ हे इंद्र व बृहस्पति देवहो, तुम्हा उभयतांच्या मुखात आहुतिरूपाने मी समर्पण करीत असलेले हे हविर्द्रव्य तुम्हाला प्रिय असो. तुमच्या संतोषासाठीच होता शस्त्र म्हणजेच स्तुतिसूक्त पठण करीत असून त्याला हर्षजनक असा प्रतिगर म्हणजे अनुमोदनात्मक मन्त्र मी म्हणजे अध्वर्यू म्हणत असतो. २ हे इन्द्र व बृहस्पति देवांनो, अत्यंत सुमधुर व हविर्द्रव्यरूप असा हा सोमरस तुम्ही प्राशन करावा आणि त्या योगे तुम्हाला हर्ष उत्पन्न व्हावा म्हणून

अग्निरूपाने असलेल्या तुमच्या मुखात मी ओतीत आहे. ३ हे इन्द्र बृहस्पति हो, शेकडो अश्वांनी युक्त व हजारांनी गणना करावयास योग्य असे धन तुम्ही या यजमानाला द्या. ४ बृहस्पतिदेव आमच्या पश्चिमेस व उत्तरेस उपस्थित राहून आमची हिंसा करू इच्छिणाऱ्या शत्रूपासून आमचे रक्षण करो. त्याचप्रमाणे इन्द्रदेव आमच्या पूर्व दिशेस व मध्यभागी उपस्थित राहून आमचे संरक्षण करो. आमचे परम मित्र बृहस्पती आणि इन्द्र, त्यांच्याशी सख्य करणाऱ्या आम्हाला सुख देवोत. ५ पावित्र्यमूर्ते हे अग्निदेवा, वायूच्या आघाताने गती मिळणाऱ्या, दुसऱ्या अग्नीच्या मिश्रणाने अधिकच भडकणाऱ्या, अनेक वस्तूंना शुध्द करणाऱ्या, ऊर्ध्व गतीने गगनाला जाऊन भिडण्याच्या बेतात येणाऱ्या, आपल्या प्रबल वेगाच्या आड येणाऱ्या सर्वांचा भंग करणाऱ्या आणि अत्यंत पवित्र अशा ज्या तुझ्या तेजस्वी ज्वाला सर्व प्रदेशात संचार करीत असतात, त्या आमची स्पृहणीय अशी हविर्द्रव्ये उत्कृष्ट प्रकारे सेवन करोत. ६ उत्कृष्टभाग्यशाली हे अग्ने, हवनक्रियेतील गूढत्व जाणणारा, परस्परसंमिश्र अशा अग्नींचे पृथक्करण करणारा, मौल्यवान् रत्ने, मणी इत्यादि अनेक धनांचा संपादक, मंत्रातील रहस्यस्थलांच्या ठिकाणी एकांतिकपणाने गढून राहून ती रहस्ये अखिल विश्वाला उघड करून दाखविणारा, इष्ट अशा मनोवृत्तीची प्रकर्षाने वाढ करणारा, उत्कृष्ट व सहजसुलभ असे यजन करण्याची क्षमता असलेला आणि गोघृतालाच आपली मुख्य संपत्ती मानणारा, असा तू असल्यामुळे तुला सर्व मानवी प्रजा स्तुतीने आळवीत असतात. ७ अखिल विश्वाचे धारण करणारा, जगाचा पालनकर्ता व स्वामी असणारा परमेश्वर आम्हाला धन देवो. तो परमेश्वर आमच्या जीवनक्रमास पुरेसे होईल इतक्या धनाशी आम्हाला संयोजित करो. ८ अखिल विश्वाचा धारक असलेला देव, परमेश्वर हा पुत्रपौत्रादि प्रजेचा स्वामी असतो. धनाचाही स्वामी तोच असतो. धाता देवानेच हे सर्व प्राणिजात उत्पन्न केले आहे. तो धाता आपली उपासना करणाऱ्या यजमानाला पुत्र देतो. धातृदेवाला अर्पण करण्याकरताच आम्ही हे घृतयुक्त हविर्द्रव्य तयार करीत आहो. ९ धातादेव, आमच्या जीवनक्रमाला केव्हा उणे न पडता साहजिक पुरेसे होईल आणि ज्याचा आयव्यय आम्हाला अनुकूल असा होत जाईल इतके धन आम्हाला देवो. सत्य अशा यज्ञरूपी साधनाने आराधना करणारे आम्ही त्या धातृदेवाच्या ठिकाणी असणाऱ्या आमच्यावर अनुग्रह करणाऱ्या सद्बुध्दीचे ध्यान करतो. १० पुत्रपौत्रादि प्रजेच्या प्राप्तीची

इच्छा करीत असलेला, स्वत:च्या घरी देवांच्या तृप्तीसाठी आहुतीच्या रूपाने अग्नीच्या ठिकाणी आज्याचा वर्षाव करणारा आणि परोपरीचे हविर्द्रव्य देवांना समर्पण करणाऱ्या अशा यजमानाला धाता देव अनेक प्रकारची धने देवो. अमर, देदीप्यमान व परस्परांवर सारखीच प्रीती करणारे सर्व देव आणि देवमाता अदिती त्या यजमानासाठी त्याच्या घरी एकत्र जुळून राहोत. ११ अनुमती नांवाची ही देवता आज आमच्या या यज्ञाची देवांच्या पुढे प्रशंसा करो. यजमानाने अर्पिलेली हविर्द्रव्ये देवांच्याकडे वाहून नेणारा अग्निदेवही हविप्रदान करणाऱ्या यजमानाला सुखी करो. १२ हे अनुमते, माझ्या यज्ञाला तू सर्वस्वी अनुमती दे. आणि आम्हाला सुखी कर. आणि समृध्द अशा या आमच्या यज्ञाच्या ठिकाणी प्रीती करणारी हो आणि आम्हाला चिरकाल सुखाने जाणारे आयुष्य संपादन करून दे. १३ आमच्या यज्ञात मान्यता देणारी अनुमती देवी पुत्रपौत्रादि प्रजेने युक्त व क्षयरहित असे धन आम्हाला मिळण्याची मान्यता देवो. आम्ही त्या अनुमती देवीच्या क्रोधाच्या सपाट्यात केव्हाही सापडणार नाही अथवा त्याविषयी उदासीनही राहणार नाही. इतकेच नव्हे तर आम्ही तिचा अनुग्रहच संपादन करू. ती अनुमती देवी आमच्याकडून सुखाने आवाहन करण्यास शक्य होऊन आम्हाला सुख देवो. १४ विविध रूपाने भासमान होणारे हे जगत्, सर्वांवर आज्ञा चालविणाऱ्या ज्या अनुमतिदेवतेच्या ठिकाणी समाविष्ट होऊन राहिले आहे त्या अनुमतिदेवीला तिच्याकडे जाणारे उपासक हविर्द्रव्यरूपी अलंकारांनी भूषवीत असतात. इतकेच नव्हे तर विश्वव्यापी असे हे विस्तीर्ण अंतरिक्ष जिच्या मांडीवर बसलेले आहे ती अनुमती देवी आम्हाला बोलाविण्यास सुलभ होऊन आम्हाला सुख देवो. १५ सुखाने बोलावण्यास शक्य अशा राका देवतेला उत्कृष्ट स्तुती करून मी बोलावीत आहे. सौभाग्ययुक्त अशी ती देवी आमचे आवाहन ऐको. आणि आम्हास काय हवे आहे हे आपल्या मनाने जाणो. कधीही न मोडणाऱ्या अनुग्रहबुध्दिरूपी सुईने आमच्या हातून ठिकठिकाणी फाटलेले कर्मरूपी वस्त्र नीट शिवून धड करो. आणि पुष्कळ धनाने युक्त व स्तोत्रशस्त्रादि मंत्रपठणात निपुण असा पुत्र आम्हाला देवो. १६ आपल्या भक्ताला हजारो प्रकारची पोषणसामग्री देणाऱ्या व उत्कृष्टभाग्यशाली अशा हे राकादेवी, उत्कृष्ट क्रियांनी युक्त अशा ज्या तुझ्या अनुग्रहबुध्दी आहेत आणि ज्यांच्या योगाने तुला हविर्द्रव्ये समर्पण करणाऱ्या यजमानाला तू अनेक प्रकारची धने देतेस त्या अनुग्रहबुध्दींनी

युक्त व सुप्रसन्नचित्त होऊन तू आजच्या आमच्या यज्ञात आमच्याजवळ ये आणि आमच्यावर अनुग्रह कर. १७ जिचे स्तवन पुष्कळ विस्तारानेच केले पाहिजे अशा हे सिनीवाली देवते, देवांची तू भगिनीप्रमाणे हित करणारी आहेस. ती तू आमच्याकडून समर्पण केलेले हविर्द्रव्य सेवन कर. आणि आमची पुत्रपौत्रादि प्रजा वृध्दिंगत कर. १८ हे ऋत्विज हो, आणि हे यजमान हो, जिचे हात अत्यंत सुंदर असून जिच्या हाताच्या अंगुलीही सुरेख आहेत, जी सुखाने प्रसूत होते आणि जिने अनेक यज्ञांना जन्म दिला आहे, त्या सर्व प्रजांचे पालन करणाऱ्या सिनीवाली देवतेला तुम्ही हविर्द्रव्यांची आहुती समर्पण करा. १९ सौभाग्ययुक्त अशा आमच्या कर्माला जाणणारी व सुखाने बोलाविण्यास शक्य अशा कुहू नांवाच्या देवतेला या यज्ञात मी अनेक वेळ बोलावीत असतो. ती कुहूदेवता पितृलोकी गेलेल्या आमच्या पूर्वजांना श्रवण करण्यास योग्य असे यश आम्हास देवो. हे कुहूदेवते, आम्ही वर्णिल्याप्रमाणेच असणाऱ्या तुझी हविर्द्रव्याने सेवा करीत आहोत. २० दर्शपूर्णमासादि यज्ञात देवांना अर्पण करण्याकरता अमृताप्रमाणे तयार केलेल्या हविर्द्रव्याचे पालन करणारी ही कुहूदेवता आमच्या हविर्द्रव्यातील सार लक्षात घेवो. निमंत्रणरूप प्रश्न विचारण्यास योग्य अशी कुहूदेवी हविप्रदान करणाऱ्या यजमानाला भरपूर व स्पृहणीय असे पारलौकिक फल उत्तम रीतीने देवो. कुहूदेवतेचा महिमा जाणणाऱ्या यजमानाला ती धनाचा पुष्कळ साठा संपादन करून देवो. (अनुवाक ११).

प्रपाठक ४

ज्या यजमानाच्या ज्या यज्ञात वांझ गाईच्या शरीरावयवाचा हवी द्यावा लागतो त्या यज्ञात आधिक्य उत्पन्न झाले, म्हणजे हवी म्हणून योजलेल्या वांझ गाईचे हनन केल्यावर तिच्या ठिकाणी गर्भ असल्याचे आढळून आले तर त्या यजमानाचा यज्ञ गुणहीन होतो. यास्तव अशा प्रसंगी 'सूर्ये देवो दिविषद्भ्यः' ही ऋचा म्हणून होम करावा. म्हणजे त्या मंत्रात प्रतिपादित असलेल्या 'बृहस्पती' व 'प्रजापती' या दोन देवतांच्या कृपेने त्या यजमानाच्या यज्ञामध्ये हविर्द्रव्याच्या आधिक्यामुळे आलेले वैगुण्य झाकून जाते. एक देवतेच्या उद्देशाने समर्पित केलेला पशू म्हणजे वांझ गाय गर्भधारणेमुळे जर अधिकत्वाला प्राप्त होईल तर त्या पशुरूप हविर्द्रव्यावर राक्षस झडप घालून तो पळवतील.

यास्तव तसे होऊ नये म्हणून 'यस्यास्ते हरितो' या मंत्राने त्या अधिकत्वाला प्राप्त झालेल्या पशुरूप हविर्द्रव्याचे अनुमंत्रण करावे. त्या मंत्रात जिच्या ठिकाणी गर्भ आढळून आला अशी ही वांझ गाय मी देवांच्याशी सुसंगत करतो, ती देवांना पोचवितो, असा अर्थ व्यक्त झालेला असल्यामुळे यजमान त्या मंत्राच्या अनुमंत्रणाने गर्भरूप अधिकतेला प्राप्त झालेल्या त्या वांझ गाईला राक्षसांना दूर झुगारून देवांच्या पर्यंत पोचवितो.

गर्भावर जे अत्यंत पातळ अशा घर्माचे वेष्टन असते ते युक्तीने काढून त्यातला गर्भ 'आवर्तन वर्तय' हा मंत्र म्हणून मोकळा करावा. म्हणजे त्या मंत्राकडूनच गर्भाला मोकळा केल्यासारखे होते. 'हे गोरूप पशो, तुझ्या गर्भाशयाचे मी छेदन करतो', असे त्या मंत्रात म्हटले जात असल्याने त्या मंत्रानुरूप सर्व घडून येते. गर्भातील रस भरून घेण्यासाठी पात्र जवळ घेत असताना म्हटल्या जाणाऱ्या मंत्रात 'हा गर्भरस अत्यंत सारभूत असा एक अवयव असून तो नानारूपधारी आणि तेजस्वी (पांढरा) असा आहे', असे म्हटले आहे. तेजस्वी असणे हेच प्रजा व पशू यांचे ऐश्वर्य असल्यामुळे त्या इंदू म्हणजे मूर्तिमंत तेजच होत. यास्तव पूर्वोक्त मंत्राने तो रस भरून घेण्यासाठी पात्र घेताना तो मंत्र उपयोगात आणला म्हणजे त्या रसाला प्रजा व पशू इत्यादिकांच्या योगाने समृध्द केल्याप्रमाणे होते. पात्रात भरून घेतलेला रसरूप गर्भ थंड अशा भस्मावर ठेवून त्यावर पुन्हा भस्म घालताना जो मंत्र म्हटला जातो, त्या मंत्राच्या पठणाने हविर्द्रव्याच्या ठिकाणी गर्भरूप आधिक्य उत्पन्न झाल्यामुळे यज्ञाचे जे अंग कमी झाले असेल ते द्युलोकात जाते. अधिक झाले असेल ते पृथ्वीत जिरून जाते. यज्ञातील न्यूनत्वाचे किंवा अधिकत्वाचे अशा रीतीने शमन जर न केले तर यजमान संकटात पडेल. म्हणून गर्भरसावर भस्म टाकताना 'मही द्यौः पृथिवी च न' हा मंत्र म्हणावा. म्हणजे द्युलोक व पृथ्वी यांच्याकडून यज्ञाच्या न्यूनाचे व अधिकत्वाचे शमन केल्यासारखे होते. आणि यजमानाला कसलेही संकट प्राप्त होत नाही. गर्भाच्या ठिकाणी जी हृदयादि अंगे आहेत ती जर अवदानात घेतली तर संकल्पित अशा पशूच्या हृदयातून अधिक असे हविर्द्रव्य अवदान म्हणून घेतल्याचा दोष उत्पन्न होईल आणि जर ती कधी अवदानांत घेतली नाहीत तर मारलेल्या पशूचे अवदानात घेतल्याचा दोष लागेल. यास्तव हे दोन्ही दोष टळावेत म्हणून गर्भाच्या नाभीच्या पुढचा आणि मागचा थोडा

थोडा अंश अवदान म्हणून स्रुचीत घ्यावा. असे केल्याच्या योगाने त्या सर्वच गर्भरूपी मृत पशूचे अवदान घेतल्याप्रमाणे होते. कारण नाभीच्या पुढच्या बाजूने प्राण मुखाकडे संचार करतो व नाभीच्या मागच्या बाजूने अपान वायू पुच्छाकडे संचार करीत असतो. अर्थात् प्राणरूप व अपानरूप या दोन अंशांचे अवदान घेतले असता सर्वच पशूचे अवदान घेतल्यासारखे होणे क्रमप्राप्तच आहे. यासाठी गर्भाच्या उजव्या बाजूचा पुढचा पाय तोडून घ्यावा व त्या पायाची एक आहुती शिपविष्टसंज्ञक विष्णुदेवतेला समर्पण करावी. यज्ञाचे ठिकाणी जे आधिक्य उत्पन्न झालेले असते, संकल्पित हविर्द्रव्यरूप पशूच्या ठिकाणी जे आधिक्य उत्पन्न झालेले असते आणि त्या पशूच्या शरीराच्या ठिकाणी जे पुष्टिरूप आधिक्य उत्पन्न झालेले असते ती सर्व आधिक्ये शिपिविष्ट विष्णू आपल्या स्वाधीन करून घेतो. शिवाय असे केल्याच्या योगाने अतिरिक्त म्हणजे अधिक असलेल्या विष्णूच्या ठिकाणी अतिरिक्त अशा यज्ञांगांचे स्थापन केल्यासारखे होईल. आणि असे करणे हे यज्ञाच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या आधिक्यरूपी दोषाचे शमन होण्याला कारणभूत होईल. आठ ठिपके ज्याच्यावर उठविलेले असतात अशा सोन्याच्या तुकड्याला 'अष्टाप्रूट्' हिरण्य अशी संज्ञा आहे. या यज्ञाच्या सांगतेसाठी अष्टाप्रूट् हिरण्य दक्षिणा म्हणून द्यावे. कारण पशुरूप हविर्द्रव्य म्हणून योजून मारलेली समर्थ वांझ गाय ही, गर्भाचे चार व तिचे चार मिळून आठ पायांनी युक्त असते आणि तिचा देह हा नववा असतो, तसेच अष्टाप्रूट् हिरण्य हे देखील तशाच स्वरूपाचे असते. यास्तव हविर्द्रव्यरूपी पशूसदृश असे अष्टाप्रूट् हिरण्य दक्षिणा म्हणून दिले असता ते यजमानाला पशूची प्राप्ती होण्याला कारणभूत होते. कापडाच्या एका पिशवीच्या आत दुसरी व तिच्या आत तिसरी पिशवी घालावी आणि त्या पिशवीत अष्टाप्रूट् नांवाचे हिरण्य पागोट्याच्या वेष्टनात गुंडाळून दक्षिणा म्हणून ते ब्राह्मणाला द्यावे. अष्टाप्रूट् हिरण्य हे जसे पागोटे आणि तीन पिशव्या मिळून चार वेष्टनांनी वेष्टित असते त्याचप्रमाणे पशूचा जीवात्मा हा देखील, उल्ब म्हणजे गर्भाच्यावर असलेली अत्यंत सूक्ष्म अशी त्वचा, त्याच्या आतल्या पशूच्या अंगावरचे कातडे, त्या कातड्याच्या आतील मांस, त्या मांसाच्या आतील अस्थी अशा चार प्रकारच्या चार वेष्टनांनी वेढलेला असतो. सारांश, हविर्द्रव्यरूप पशूसदृश असलेले हिरण्य दक्षिणा म्हणून दिले असता, यज्ञामध्ये जेवढ्या पशुरूप हविर्द्रव्याची अवश्यकता असते

तेवढ्या सर्व पशूला यजमानाने आपल्या स्वाधीन करून घेतल्यासारखे होते. सारांश, हविर्द्रव्य म्हणून मारलेल्या वांझ गाईच्या ठिकाणी गर्भ उत्पन्न झाल्यामुळे ज्या यजमानाच्या यज्ञात वैगुण्य आले असते त्याच्या परिहारार्थ त्याने आता सांगितल्याप्रमाणे प्रायश्चित केल्यासारखे होते आणि त्याच्या हातून यथार्थ अशा प्रकारे यज्ञाचे यजन केल्याप्रमाणे होऊन तो यजमान संपत्तिमान अशा लोकांत श्रेष्ठ असा संपत्तिमान होतो. (अनुवाक १).

१ हे वायुदेव, तू येथे येऊन आम्ही तुला अर्पण करीत असलेल्या या पशूला अलंकृत कर. शुध्द अशा हविर्द्रव्याचे पालन करणाऱ्या हे वायो, तू आमच्याजवळ ये. हे विश्वव्यापका, तुला वाहून नेणारे 'नियुत' नांवाचे हजार घोडे आहेत. पशुरूपी अन्न हे तुला हर्षजनक असल्यामुळे हे वायुदेवा या हविर्द्रव्यरूपी पशुसंबंधी प्रथम पान करण्यात येणाऱ्या सोमरसाप्रमाणेच तू आपल्या मनाची धारणा करतोस तशा प्रकारच्या पशुरूप हविर्द्रव्यासह आम्ही तुझ्याजवळ येत आहो. २ हे पशो, मी केलेल्या संकल्पाची सिध्दी होण्यासाठी, अभीष्टाचे पालन करण्याकरता आणि समृध्दी प्राप्त व्हावी म्हणून मी तुझ्याजवळ येऊन व 'किक्टि' अशा शब्दाने तुझ्या मनाला प्रसन्न करून आहुती देत आहे. हे आज्यद्रव्य प्रजापतिदेवतेला अर्पण असो. ३ हे पशो, 'किक्टि' अशा शब्दाने संतुष्ट करून मी ही आहुती देत आहे. हे आज्यद्रव्य वायुदेवतेला अर्पण असो. ४ हे पशो 'किक्टि' शब्दाने तुझ्या नेत्रांना संतोषित करून मी ही आहुती देत आहे. हे आज्यद्रव्य सूर्य देवतेला अर्पण असो. ५ हे पशो, 'किक्टि' शब्दाने तुझ्या कानांना संतुष्ट करून मी ही आहुती दिली आहे. हे आज्यद्रव्य द्युलोक व पृथ्वी यांना अर्पण असो. ६ हे पशो, तुझ्या वाणीला प्रसन्न करून मी ही आहुती देत आहे. हे आज्यद्रव्य सरस्वती देवतेला समर्पण असो. ७ वांझ अशा हे छागि, पृथ्वी, अंतरिक्ष व द्युलोक या तीन लोकांची गणना केल्यास तू चवथी आहेस. ज्या अर्थी पुरुषाच्या अभिलाषेने युक्त झालेल्या मनाने एकदाच तू पुरुषाला वश झालीस आणि तुझ्या उदरात गर्भाने शयन केले त्या अर्थी तू वशिनी म्हणजे वश करणारी आणि पुन्हा पुरुषाची अभिलाषा न करतां इंद्रियांचा संयम केलास त्या अर्थी तुझ्या ठिकाणी पुन्हा अपत्य न झाल्यामुळे तू वशा म्हणजे वांझ झाली आहेस. वशिनी आणि वशा अशी तू हविर्द्रव्यरूपाने देवांच्या सन्निध जा. तुझ्या त्या जाण्याने यजमानाच्या

कामना सफल होवोत. ८ हे पशो, तू छाग जातीची स्त्री म्हणजे शेळी आहेस. हविर्द्रव्यस्वरूप अशी तू देवांचे धन आहेस. तू प्रथम या पृथ्वीवर बैस. तुला उर्ध्वलोकी नेल्यानंतर म्हणजे तुझे हनन केल्यानंतर तू अंतरिक्षात जाऊन पोच आणि तेथून तुझे तेज द्युलोकाला जाऊन भिडो. ९ हे पशो, हविर्द्रव्यस्वरूप अशा तुझ्या प्रत्येक रज:कणरूपी तंतूचा विस्तार झाल्यानंतर आदित्यापर्यंत जाऊन पोच आणि बुध्दिकौशल्याने संपादन केलेल्या प्रकाशयुक्त अशा आमच्या स्वर्गमार्गाचे संरक्षण कर. १० हविर्द्रव्यरूप पशूच्या शरीराचे ठिकाणी असणाऱ्या हे हृदयादि अंगांनो, आम्ही करीत असलेला यज्ञ निर्विघ्नपणे समाप्त व्हावा म्हणून त्वरा करणाऱ्या आमचे हे यज्ञकर्म उल्हासरहित म्हणजे अपेक्षेबाहेर वाढणार नाही असे करा. मानवसमाजाचा उत्पादक असलेल्या मनूप्रमाणेच तू उत्पादक हो. आणि यज्ञ करणारा हा यजमान पुढच्या जन्मी देवजनाच्या जन्माला घाल. ११ हे पशो यजनयोग्य अशा देवाचा तू हवी असून प्रजापतीसारखे तुझे स्वरूप आहे. हवनशिष्ट अशा तुझ्या अंगांच्या भक्षणाने आम्ही पुष्ट अशा अंगांनी युक्त होऊ. (अनुवाक २).

द्युलोक व पृथ्वी ही पूर्वी एकमेकांना चिकटलेली होती. त्यांना वायूने वेगळे केले. वायूच्या मध्यस्थीने पुन्हा त्या दोघांचा जेव्हा समागम झाला तेव्हा उभयतांनी आपल्या ठिकाणी वशारूप म्हणजे शेळीच्या जातीचा स्त्रीगर्भ धारण केला. त्या गर्भाची वाढ करून सोमाने त्याला जन्म दिला. पण त्याला अग्नीने ग्रासला. तेव्हा त्या वशारूप पशूची किंमत म्हणून अग्नीला आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाची आहुती द्यावी, असे प्रजापतीच्या विचारदृष्टीला दिसले. आणि त्याने त्याप्रमाणे अष्टाकपालात्मक पुरोडाशाने अग्नीसाठी यजन केले. आणि त्याच्यापासून तो वशारूप पशू म्हणजे वांझ शेळी घेतली. प्रजापतीने विकत घेतल्यामुळे त्या वशेची (वांझ शेळी) देवता प्रजापती हीच होय. अग्नीहून प्रजापती देवता जरी भिन्न आहे तथापि त्या वशेचा याग करावयाचा असल्यास तिचे हनन करण्यापूर्वी अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याची आहुती द्यावी. म्हणजे त्या पुरोडाशाच्या यजनाने अग्नीपासून वशा विकत घेतल्यासारखे होते. आणि मग तिचे हनन करावे. प्रजापतीखेरीज इतर देवतांचेही त्या वशेवर आधिपत्य आहे. ते असे की, वशारूपगर्भधारणात्मक द्युलोक व पृथ्वी यांना वायूने वेगळे केले म्हणून वशा ही वायुदेवतात्मक आहे. द्युलोक व पृथ्वी यांनी

तिचा गर्भ धारण केला असल्यामुळे ती द्यावापृथ्वींची आहे. सोमाने तिला जन्माला घातली आणि अग्नीने तिला ग्रासली यामुळे ती अग्निसोमाची आहे. द्युलोक व पृथ्वी ही जेव्हा दुभंग झाली तेव्हा एखाद्या कळकाचा तुकडा उभा चिरतांना जसा आवाज होतो तसा मोठा आवाज झाला. हा शब्द किंवा आवाज सरस्वतीदेवतारूप होय. अशा प्रकारे त्या वशेची सरस्वतीही उपकारक असल्यामुळे ती वशा सरस्वतीदेवतात्मक असून प्रजापतीने तिला अग्नीपासून विकत घेतल्यामुळे ती प्रजापतीदेवतात्मक आहे. सारांश, वशा ही आता सांगितलेल्या सर्व देवतांच्या आधिपत्याखालची आहे. ऐश्वर्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाने वायुदेवतात्मक वशेचे हनन करून तिच्या अंगांचा याग करावा. वायुदेवता ही क्षेपिष्ठ म्हणजे सत्वर प्रसन्न होणारी आहे. यास्तव वायुदेवतेसाठी वशेला घेऊन वायुदेवतेला स्वकीय वाटणाऱ्या हविर्भागासह यजमान वायुदेवतेजवळ धावत गेल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाचा स्वीकार करून वायुदेव त्या यजमानाला ऐश्वर्याला प्राप्त करतो. शेतकी करीत असलेल्या ज्या यजमानाला आपली शेती उत्कृष्ट पिकून आपली प्रतिष्ठा व्हावी अशी इच्छा असेल त्याने द्यावापृथ्वीदेवतात्मक अशा वशेचे हनन करून तिच्या अंगांचा याग करावा. त्या यागाच्या प्रभावाने त्या यजमानाच्या शेतावर द्युलोकातून खूप पाऊस पडेल आणि त्या शेताच्या ठिकाणी अनेक प्रकारची धान्ये भरपूर पिकतील. आणि त्या यजमानाच्या शेतीची भरभराट होऊन तो प्रतिष्ठेला प्राप्त होईल. मला सर्व प्रकारचे धान्य भरपूर मिळावे आणि मी त्याचा उपभोग घ्यावा असे वाटत असेल त्याने अग्निदेवतात्मक वशेचे हनन करून तिच्या अंगांचा याग करावा. त्या यागाच्या योगाने संतुष्ट झालेल्या त्या अग्नीच्या कृपेने त्या यजमानाला अन्न भरपूर मिळेल आणि सोमाच्या अनुग्रहाने त्या अन्नाचा उपयोग घेण्याचे सामर्थ्य उत्पन्न होईल. अर्थात् तो यजमान भरपूर अन्नाने संपन्न होऊन त्या अन्नाचा तो उपभोग करणारा होईल.

वेदशास्त्रपारंगत असल्यामुळे सभेत भाषण करण्याची पात्रता असूनही सभाधीटपणाच्या अभावी भाषण करण्यास असमर्थ असेल, त्याने सरस्वती-देवतात्मक वशेचे आलभन करावे. म्हणजे तिचे हनन करून तिच्या अंगांचा याग करावा. सरस्वती ही वाग्देवता आहे. यास्तव अशा प्रकारचा याग केला असता सरस्वतीच्या स्वकीय अशा वशारूप हविर्भागासह सरस्वती देवतेच्या सन्निध धावत जाऊन तिला तो भाग दिल्यासारखे होते. आणि मग त्या

हविर्भागाने संतुष्ट झालेली सरस्वती देवता त्या यजमानाच्या ठिकाणी समाधीटपणा उत्पन्न करून सभेत भाषण करण्याचे सामर्थ्य निर्माण करते. इतर कोणत्याही उपायांनी जे आपल्याला संपादन करता येत नाही ते संपादन करतो यावे अशी कामना करणाऱ्या यजमानाने प्रजापतिदेवतात्मक वशेचे हनन करून याग करावा. प्रजापती हा सर्वदेवतात्मक आहे. यास्तव अशा प्रकारचा याग केला असता सर्व देवतांच्याकडूनही, तो यजमान, जे संपादन करता येत नसेल ते संपादन करतो. वायुदेवता व्यक्त करणाऱ्या पूर्वोक्त 'आ वायो भूषा' या ऋचेने वशारूप हविर्द्रव्याचे 'उपाकरण' करून समर्पणविधी करावा. म्हणजे वायूपासूनच वशेचे ग्रहण करून तिचे उपालभन म्हणजे हनन केल्यासारखे होते. 'आकूत्यै त्वा कामाय त्वा' इत्यादि मंत्रांनी आज्याच्या आहुती घालाव्यात म्हणजे त्या यजुमंत्रांत 'माझ्या संकल्पाच्या सिध्दीसाठी व माझ्या अभीष्टाचे पालन होण्यासाठी तुला आहुती देत आहे' इ. ज्या भावना व्यक्त केलेल्या असतात त्याप्रमाणे घडून येते. प्रत्येक मंत्राच्या शेवटी 'किक्किट' असा शब्द करून अग्नीत आज्याहुती देत नाहीत. कारण 'किक्किट' अशा शब्दोच्चाराने गाई म्हशी इत्यादि ग्राम्यपशू रमून जातात. म्हणजे खूष होतात आणि हरणासारखे अरण्यपशू वेगाने पळून जातात. यास्तव 'किक्किट' अशा शब्दोच्चाराने हवन केले जाते ते गाई म्हशी इत्यादि ग्राम्यपशूंचे धारण करण्याला समर्थ होते.

आहवनीय अग्नीतून प्रज्वलित असे एक काष्ठ घेऊन त्या काष्ठासह आहवनीय व वशारूप पशू यांच्या भोवती जेव्हा आग्नीध्र नांवाचा ऋत्विज प्रदक्षिणा घालतो तेव्हा अध्वर्यूने पूर्वोक्त आहुती द्याव्यात. म्हणजे जिवंतपणी वशेला स्वर्गलोकी पोचविल्यासारखे होते. व वशेला मारण्यासाठी शामित्रशाळेत घेऊन जाताना 'त्वं तुरीया वशिनी वशा असि' इत्यादि मंत्र म्हणावा. म्हणजे वशेला देवांच्या पर्यंत पोचविल्यासारखे होते. या मंत्राच्या शेवटी 'यजमानाच्या सर्व कामना सफल होवोत' अशा अर्थाचे वाक्य म्हटले जाते. मी करीत असलेला हा यज्ञ निर्विघ्न आणि उत्कृष्ट रीतीने समाप्त व्हावा हीच यजमानाची मुख्यत: कामना असल्यामुळेच ते पूर्वोक्त वाक्य म्हणावयाचे असते. वशेचे हनन केले जात असताना तिचे अनुमंत्रण करतेवेळी 'अजासि रयिष्ठा' हा मंत्र म्हटला जातो. त्यामध्ये 'पृथिव्यां सीद' इत्यादि जो अंश म्हटला जातो त्या योगाने त्या वशेला पृथ्वी, अन्तरिक्ष व द्युलोक या तीनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्यासारखे होते. या मंत्राचा 'तुझे तेज द्युलोकाला जाऊन

भिडो' या अर्थाचा या मंत्राचा जो शेवटचा भाग म्हटला जातो त्या योगाने यजमानासाठी स्वर्गलोकात प्रकाश उत्पन्न करून ठेवल्यासारखे होते. वशेच्या वपेचा होम करताना 'तंतुं तन्वन् रजसो भानुमन्विहि' इत्यादि मंत्र म्हटला जातो. त्या योगाने यजमानासाठी तीन्ही लोकांना प्रकाशित केल्यासारखे होते. 'अनुल्बणं वयत जोगुवामपः' असा पूर्वोक्त मंत्राचा तिसरा चरण म्हटला जातो. त्या योगाने यज्ञामध्ये जे काही उल्बण म्हणजे हविर्द्रव्याचे आधिक्य केले गेलेले असते त्याचे शमन केल्याप्रमाणे होते. 'मनुर्भव जनया दैव्यं जनं' असा शेवटचा चरण उच्चारला जातो. दैव्य म्हणजे देवलोकी उत्पन्न झालेल्या लोकासह सर्व लोकांच्या प्रजा मनूच्या आधीन झालेल्या असतात. अर्थात् या चरणाच्या उच्चाराने प्रसन्न झालेला मनू यजमानाला सर्व ठिकाणच्या प्रजा उपभोगयोग्य करतो. पश्वंगांचा हविर्द्रव्यस्वरूप भाग सुखाने उदरात जावा म्हणून 'मनसो हविरसि' इत्यादि मंत्र म्हणावा. 'तुझ्या अंगांचे भक्षण करून आम्ही पुष्ट अशा अंगांनी युक्त होऊ' अशा अर्थाचा या मंत्राचा उत्तर भाग आहे. म्हणून या भागाचे पठण केले असता त्या भागात व्यक्त झालेल्या भावना पूर्ण होण्याविषयी आशीर्वादच यजमानाने देवांच्या जवळ मागितल्यासारखे होते. वशेचे हनन केल्यावर त्या दिवशी जर आकाशात अभ्र उत्पन्न झाले तर तो एकच दिवस हविर्द्रव्यरूप अशा त्या मृत वशेला देवतेला समर्पण करण्यास अयोग्य करतो. यास्तव वशेचे हनन केले गेल्यावर जर त्या दिवशी आभाळ आले तर मग हवन न करता त्या मृत वशेला उदकात टाकून द्यावी. म्हणजे तिची सर्व अंगे पाण्यात फेकून द्यावी किंवा त्या वशेचे अर्थात् तिच्या सर्व अंगांचे यजमानाने भक्षण करावे. तिची अंगे जर पाण्यात टाकून दिली तर तिचा अपव्यय होऊन यज्ञविघात केल्यासारखे होईल. आणि जर त्या वशेच्या सर्व अंगांचे यजमानाने भक्षण केले तर तो आपल्या ठिकाणी सर्व इन्द्रियशक्ती धारण करील. गवामयनासारखे संवत्सरपर्यंत चालणारे सत्र करणारा, हजाराने मोजता येईल अशी दक्षिणा देणारा आणि संवत्सरापेक्षा कमी दिवस चालणाऱ्या सत्रात गृहपती म्हणजे प्रमुख असणारा अशा या तिघांना 'वशा' स्वाधीन होत असते म्हणजे या तिघा पुरुषांनाच अशा प्रकारच्या वशारूप पशूंचे यजन करण्याचा अधिकार असतो. सारांश, अशा प्रकारातले जे कोणी पुरुष असतात तेच त्या वशेचे यजन करतात आणि त्यांच्याच ती स्वाधीन म्हणजे फलद्रूप होते. (अनुवाक ३).

१ चित्त (सामान्य अशा निर्विकल्प ज्ञानाने प्राप्त होणारी वस्तु) २ चित्ति (निर्विकल्प ज्ञान) ३ आकूत (संकल्पित वस्तु) ४ आकूति (संकल्प) ५ विज्ञात (विशेषत्वाने निश्चित झालेली वस्तु) ६ विज्ञान (त्यावस्तूचा निश्चय) ७ मन (ज्ञानाचे साधन असणारे अंत:करण) ८ शक्वरी (नेत्रादि इन्द्रियांची शक्ती) ९ दर्श (या नांवाची इष्टी) १० दर्शपूर्णमास (या नांवाची इष्टी) ११ बृहत् (या नांवाचे साम) १२ रथंतर (या नांवाचे साम) जयप्राप्तीला कारणभूत होणारे हे जयसंज्ञक मंत्र युध्दाच्या प्रसंगी रणांगणावर पुढे चाल करून शत्रूवर तुटून पडण्याचे कामी अत्यंत तडफदार अशा प्रजापतीने, पर्जन्यवृष्टी करणाऱ्या इन्द्राला दिले. आणि त्या मंत्रांच्या प्रभावानेच सर्व प्रजा इन्द्राशी नमून वागू लागल्या. इतकेच नव्हे तर त्या प्रजांचा इन्द्र हा शिक्षक झाला. त्याने सर्व प्रजांना सुशिक्षित केले. आणि म्हणूनच इन्द्र हा यज्ञामध्ये देवता म्हणून यजन करण्याला पात्र झाला. देव आणि असुर हे जेव्हा परस्परांच्याशी युध्द करू लागले तेव्हा जयप्राप्तीचा उपाय समजून घेण्याकरता इन्द्र प्रजापतीजवळ धावत गेला. तेव्हा प्रजापतीने त्याला जयसंज्ञक मंत्र दिले. इन्द्राने त्या मंत्रांनी होम केला. नंतर देवांनी असुरांना जिंकले. शत्रूवर जय मिळविणे हेच 'जय' संज्ञक मंत्रांचे जयत्व होय. सारांश ज्या कोणाला शत्रूशी स्पर्धा करण्याची इच्छा असेल त्याने या जयसंज्ञक मंत्रांचा होम करावा. म्हणजे तो शत्रूचे जे सैन्य असेल त्यावर जय संपादन करतो. (अनुवाक ४).

सर्व प्राण्यांचा अधिपती असणारा हा अग्नी, श्रेष्ठ अशा लोकपालांचा अधिपती इन्द्र, पृथ्वीचा अधिपती यम, अंतरिक्षाचा अधिपती वायु, द्युलोकाचा अधिपती सूर्य, नक्षत्रांचा अधिपती चन्द्र, ब्राह्मणांचा अधिपती बृहस्पती, सत्यवचनांचा अधिपती मित्र, जलधारांचा स्वामी वरुण, नद्यांचा स्वामी समुद्र आणि सार्वभौम राजाच्या भोग्य वस्तूंचा अधिपती असणारे अन्न हे सर्व माझे पालन करोत. औषधींचा अधिपती असलेला हा सोम, सर्व प्रकारच्या प्रेरणांचा स्वामी सूर्य, पशूंचा अधिपती रुद्र, सर्व प्रकारच्या स्वरूपांचा अधिपती त्वष्टा, गोवर्धनादि पर्वतांचा अधिपती विष्णू आणि वसू इत्यादि गणदेवतांचे अधिपती असणारे मरुत् हे माझे रक्षण करोत. विद्यमान असणाऱ्या हे पित्यांनो, आणि पितामहांनो, त्याचप्रमाणे परलोकी गेलेल्या हे ततांनो, आणि ततामहांनो, सात पिढ्यांच्या मागे व सात पिढ्यांच्या अलीकडे होऊन गेलेल्या हे पितरांनो, येथे येऊन

माझे रक्षण करा. हे अग्न्यादि देवतांनो, आणि हे पितरहो, माझ्या राष्ट्रात असणारा प्रत्येक ब्राह्मण, आमच्या राष्ट्रात राहणारा प्रत्येक क्षत्रिय, मी ज्यांची आशा करावी अशी प्रजा, पशुप्राण्यादि फले, या यज्ञकामात मजकडे असणारे प्राधान्य, माझ्या प्राधान्याने चाललेले हे यज्ञकर्म आणि या यज्ञात देवांना मी केलेले निमंत्रण या सर्वांच्याविषयी तुम्ही माझे रक्षण करा. (अनुवाक ५).

यज्ञामध्ये देव जे जे कर्म करीत ते ते कर्म असुरही आपल्या यज्ञात करीत. त्यामुळे दोघांनाही त्या कर्माचे आताच सांगितलेले सारखेच फळ मिळे. तेव्हा देवांनी विचार करून पाहता 'अग्निर्भूतानां' इत्यादि 'अभ्यातान' संज्ञक मंत्र यज्ञकर्माची समृध्दी म्हणजे विशेष सफलता करणारे होत असे त्यांच्या दृष्टीस पडले, आणि ते त्यांनी संग्रहीत करून त्या मंत्रांनी होम केला. त्यामुळे देवांचे जे यज्ञकर्म होते ते समृध्द अर्थात् विशेष फलप्रद झाले. आणि या मंत्रांच्या होमाखेरीज झालेले जे असुरांचे यज्ञकर्म होते ते देवांच्याप्रमाणे समृध्द झाले नाही. ज्या यज्ञकर्माने समृध्दी होण्याची इच्छा करावी त्या यज्ञकर्माचे ठिकाणी या अभ्यातानसंज्ञक मंत्रांचे पठण करावे म्हणजे अभ्यातानहोमासहित अशा त्या यज्ञकर्माचे हवन करणाराला समृध्दीच निश्चयाने प्राप्त होते. ज्या अर्थी सर्व देवांनी अभ्यातान मंत्रांचा संग्रह केला त्या अर्थी त्या मंत्रांना 'वैश्वदेव' असे म्हणतात. ज्या अर्थी प्रजापतीने इन्द्राला पूर्वीच सांगितलेले 'चित्तं च चित्तिः' इत्यादि 'जय' संज्ञक मंत्र दिले त्या अर्थी त्यांना 'प्राजापत्य' असे लोक म्हणू लागले. आणि पुढे सांगण्यात येणाऱ्या राष्ट्रभृत् संज्ञक मंत्रांनी ज्या अर्थी देवांनी असुरांच्या पासून राष्ट्र हिरावून घेतले त्या अर्थी त्यांना 'राष्ट्रभृत्' या यथार्थ नांवाने लोक उल्लेखू लागले. राष्ट्राचे संपादन करून घेणे, हेच त्या राष्ट्रभृत मंत्रांचे राष्ट्रभृतत्व किंवा स्वभावगुण होय. स्वराष्ट्र संपादन करणाऱ्या त्या देवांनी प्रथम अभ्यातान मंत्रांनी असुरांना वश केले आणि 'जय' नामक मंत्रांनी त्यांना ऐश्वर्यभ्रष्ट केल्यानंतर राष्ट्रभृतसंज्ञक मंत्रांनी त्या असुरांची वस्ती असलेला सर्व प्रदेश त्यांच्याकडून हिरावून घेतला. ज्या अर्थी देवांनी अभ्यातान मंत्रांनी असुरांना वश केले त्या अर्थी इतरांना वश करणे हेच त्या अभ्यातान मंत्रांचे 'अभ्यातानत्व' किंवा स्वभावगुण होय. 'जय' संज्ञक मंत्रांनी देवांनी असुरांच्यावर जय मिळविला त्याअर्थी जय मिळवून देणे हेच त्या 'जय'

संज्ञक मंत्रांचे 'जयत्व' होय. आणि ज्या अर्थी राष्ट्रभृत् मंत्रांनी देवांनी असुरांच्या सत्तेखाली असलेले राष्ट्र संपादन केले त्या अर्थी राष्ट्रसंपादन करून घेणे हेच त्या राष्ट्रभृत् संज्ञक मंत्रांचे राष्ट्रभृतत्व होय. सारांश, अभ्यातान, जय व राष्ट्रभृत् नामक तिन्ही मंत्रांनी जेव्हा देवांनी होम केला तेव्हा त्या होमाच्या योगाने देव विजयी झाले व असुर पराभव पावले. यास्तव ज्याला कोणी शत्रू असेल तर त्याच्या पराभवासाठी त्याने या तीनही मंत्रांचा होम करावा. अभ्यातान मंत्रांनी शत्रू वश होतो. जय मंत्रांनी तो शत्रूंना ऐश्वर्यभ्रष्ट करतो व राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांनी तो होम करणारा शत्रूचे राष्ट्र त्याच्यापासून बळकावून आपण विजयी होतो व शत्रू पराभव पावतो. (अनुवाक ६).

वाचिक व मानसिक या दोन्ही प्रकारच्या सत्याने सर्व अनृताला पराभूत करणारा आणि सत्याचे एकमेव स्थानच असा अग्नी नांवाचा गंधर्व असून ओषधी (देवता) या अप्सरा त्याच्या आवडत्या स्त्रिया आहेत. ओषधी या बलोत्पादक असल्यामुळे त्यांना 'ऊर्ज' असे नांव मिळाले आहे.

अग्नी नांवाचा तो गंधर्व ज्ञान आणि क्रियाशक्ती यांच्या साहाय्याने होणाऱ्या या यज्ञकर्माचे संरक्षण करो. त्याचप्रमाणे 'ऊर्ज' नांवाच्या त्या ओषधिरूप अप्सरा ज्ञान आणि क्रियाशक्ती देणाऱ्या या यज्ञकर्माचे संरक्षण करोत. त्या अग्निनामक गंधर्वालाही आहुती समर्पण असो. त्या ऊर्जानामक अप्सरांना ही आहुती समर्पण असो.

दूर असणारांना एकत्र करणारा आणि सर्व सामे ज्याच्या ठिकाणी साठून राहिलेली आहेत असा 'सूर्य' नांवाचा गंधर्व असून किरणे या त्याच्या त्या शीघ्रगामी असल्यामुळे त्यांना 'आयुव:' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. ज्याच्या दर्शनाने पाहणाराला उत्कृष्ट असे सुख उत्पन्न होते आणि सूर्याप्रमाणेच ज्याला किरणे असतात असा चंद्रमा नांवाचा गंधर्व असून नक्षत्रे या त्याच्या अप्सरा होत. चित्ताला विकार उत्पन्न व्हावयास कारणभूत होणाऱ्या त्या नक्षत्ररूपी अप्सरांना बेकुरी असे म्हणत असतात. विश्वाचे पालन करणारा व ससाण्याप्रमाणे आकाशगामी असा यज्ञ नांवाचा गंधर्व असून दक्षिणा नांवाच्या देवतारूपी अप्सरा ह्या त्याच्या भार्या होत. स्तुती करण्याचाच त्यांचा स्वभाव असल्याने त्यांना 'स्तवा' अशी संज्ञा आहे. प्रजांचा पालक व अखिल विश्वाला निर्माण करणारा मन नांवाचा गंधर्व असून ऋचा व साम यांच्या

अधिष्ठात्री देवता ह्या त्याच्या अप्सरा होत. सौंदर्याच्या वाहक असल्यामुळे त्यांना 'वन्हय:' अशी संज्ञा आहे. इच्छिलेल्या वस्तूंचे संपादन करणारा व विशेषतेने गमन करणारा असा वात नांवाचा गंधर्व असून उदकाच्या अधिष्ठात्री देवता या त्याच्या अप्सरा होत. या सर्वदा आनंदात असल्यामुळे त्यांना 'मुदा' असे नांव आहे.

हे त्रिभुवनपालका, ज्या तुज देवाची वर अंतरिक्षात, द्युलोकात आणि येथे पृथ्वीवर घरे आहेत तो तू, आम्हाला आयुष्यनाशाचा अभाव हीच देणगी दे. अर्थात् दीर्घायुषी कर. त्याचप्रमाणे भरपूर धन, पराक्रमी पुत्र आणि प्रतिवर्षास आमच्या कुटुंबाच्या जीवनास पुरेशी होईल अशी समृध्दी आम्हाला दे.

सर्वोत्कृष्ट अशा स्थानी राहणारा व अधिकत्वाने पालन करणारा मृत्यू नांवाचा गंधर्व असून अखिल विश्वाच्या अभिमानिनी देवता या त्याच्या अप्सरा आहेत. त्यांचे अस्तित्व सर्वत्र असल्यामुळे त्यांना 'भुव:' असे म्हणतात. ज्याची निवासभूमी आणि ऐश्वर्य उत्कृष्ट आहे, जो यजमानाचे कल्याण करतो स्वर्गलोक ज्याच्या स्वाधीन आहे असा पर्जन्य नांवाचा गंधर्व असून विद्युद्देवता या त्याच्या अप्सरा होत. अत्यंत दीप्तिमान असल्यामुळे त्यांना रुच:' अशी संज्ञा आहे. लांब राहून देखील शत्रूवर प्रहार करता येण्याजोगे ज्याचे आयुध आहे आणि ज्याचे नांव ऐकताच सुखाचे पाणी होते, सुख नष्ट होते, असा मृत्युनामक गंधर्व असून प्रजा या त्याच्या अप्सरा होत. मृत्यूला त्या भीत असल्यामुळे 'भीरुव:' असे त्यांना म्हणतात. इंद्रियांच्या शब्दस्पर्शादि विषयांना प्रकाशित करणारा काम नांवाचा गंधर्व असून मनाला पीडा देणाऱ्या व्याधी या त्याच्या अप्सरा होत. लोकांच्या ठिकाणी त्या शोक उत्पन्न करणाऱ्या असल्यामुळे शोचयंती असे त्यांना नांव आहे.

हे सर्वलोकपालका, ज्या तुज देवाची वर अंतरिक्ष व द्युलोकाचे ठिकाणी आणि येथे पृथ्वीवर राहण्याची घरे आहेत तो तू आम्हाला विपुल असे सुख दे. त्याचप्रमाणे आमच्या ब्राह्मण जातीला व क्षत्रिय जातीला स्पृहणीय सुख दे. (अनुवाक ७).

राष्ट्राचे आधिपत्य प्राप्त व्हावयाची इच्छा असलेल्या यजमानाने मागील अनुवाकात सांगितलेल्या राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांचा होम करावा. राष्ट्राच्या प्राप्तीला

कारणभूत होत असल्यामुळे ते मंत्र राष्ट्रस्वरूप समजावे. आणि म्हणून त्यांच्या सोमरूप राष्ट्रात अध्वर्यू जणू काय त्या यजमानाला अत्यंत विस्तीर्ण अशा भूप्रदेशाचे राष्ट्र संपादन करून देतो. आणि तो यजमान राष्ट्राचे आधिपत्य मिळवितो. आपण संपादन केलेल्या भूप्रदेशरूप राष्ट्रामध्ये प्रजादिकांच्या दृष्टीने स्वत:चा उत्कर्ष व्हावा अशी इच्छा पूर्ण व्हावयासाठी अध्वर्यूने राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांचा होम करावा. राष्ट्रभृत्संज्ञक मंत्र हे राष्ट्ररूप होत. त्याचप्रमाणे प्रजा आणि पशू हेही राष्ट्ररूपच होत. प्रजा व पशू यांची समृध्दी असलेले जे राष्ट्र असते ते संपादन केल्यानेच राष्ट्राधिपती सर्वांपेक्षा श्रेष्ठ होत असतो. यास्तव राष्ट्रभृत् मंत्रांच्या होमरूप यागानेच यजमानाला स्वत:चा असा उत्कर्ष होण्याजोगे प्रजा व पशू यांनी समृध्द असे हे राष्ट्र प्राप्त होते आणि बरोबरीच्या सर्व राजांमध्ये तो वरिष्ठ होऊन राहतो. आपल्याला गाव मिळावा, आपण ग्रामाधिपती व्हावे अशी इच्छा सफल होण्यासाठी राष्ट्रभृत् मंत्रांचा होम करावा. राष्ट्रभृत् मंत्र हे राष्ट्ररूप असून सजात म्हणजे आपल्या बरोबरीचे ज्ञातीबांधव आणि एकाच गावी राहणारे लोक हेही राष्ट्ररूपच आहेत. सारांश, राष्ट्ररूप अशा राष्ट्रभृत् मंत्रांच्या होमानेच त्या यजमानाला सजात अशा लोकांनी संपन्न अशा स्वरूपाचे राष्ट्र मिळते व तो यजमान ग्रामाधिपती होतो.

काहीतरी पण लावून जेथे जुगार खेळली जाते त्या स्थलास अधिदेवन म्हणतात. अधिदेवनसंज्ञक स्थली राष्ट्रभृत् मंत्रांनी होम करावा. म्हणजे ते अधिदेवन स्थल त्या यजमानाला सजात अशा लोकांना वश करून देते. आणि मग ते सजात लोक त्या यजमानाच्या आधीन होऊन त्याची सेवा करतात. शरीराच्या ठिकाणी बलनिष्पादक असा जो आठवा धातू किंवा घटक असतो त्यास ओज म्हणतात. ओज प्राप्त व्हावयासाठी अग्नीवर रथाचे मुख म्हणजे रथाच्या दांडयाचे टोक धरून त्यावर राष्ट्रभृत् मंत्राचा होम करावा. राष्ट्रभृत् मंत्र व रथ हे बलोत्पादकच असल्याने राष्ट्रभृत् मंत्र व रथ हे दोन्ही ओज:स्वरूप होत. अर्थात् या उभयरूपी ओजानेच त्या यजमानाला बलोत्पादक असे ओज प्राप्त होऊन तो ओजस्वी होतो. जो राजा स्वत:च्या राष्ट्रापासून च्युत झालेला असतो त्याला म्हणजे त्या यजमानाला त्याचे राष्ट्र पुन्हा त्याला मिळावे म्हणून राष्ट्रभृत् मंत्रांचा होम करावा. आणि त्या यजमानाचे जितके काही रथ असतील ते सर्व रथ जोडून सिध्द करा, असा त्या कामातील अधिकाऱ्याला प्रेष म्हणजे सूचना द्यावी. असे केल्याच्या योगाने

त्या यजमानाला त्याचे राष्ट्र पुन्हा मिळते. पुन्हा प्राप्त झालेले ज्या राजाचे राष्ट्र जर उपभोगक्षम असे नसेल तर ते उपभोगक्षम होण्याचे कामी पूर्वोक्त राष्ट्रभृत् मंत्रांच्या आहुती पुऱ्या पडत नाहीत. (समर्थ होत नाहीत). यास्तव यजमानाने स्वतःचा जो रथ असेल त्याचे उजवे चाक अग्नीवर धरावे आणि त्या चाकाच्या मधोमध असलेल्या भोकात राष्ट्रभृत् मंत्रांच्या आहुती द्याव्यात. म्हणजे त्या आहुती राष्ट्राला उपभोगक्षम करण्यास समर्थ होतात. आणि त्या यजमानाचे राष्ट्र उपभोगक्षम होते. राष्ट्र संपादन करण्यासाठी राजे परस्परांच्याशी युध्दाला प्रवृत्त झाले असताना राष्ट्रभृत् मंत्रांचा होम करावा. राष्ट्रभृत् मंत्र हे राष्ट्ररूप आहेत. आणि राष्ट्र संपादनाच्यासाठी हे राजे परस्परांच्याशी कलह करून युध्दाला प्रवृत्त होत असतात. अशा प्रकारे जे राजे राष्ट्र संपादनासाठी परस्परांच्याशी लढत असतील त्यांपैकी ज्या राजाचा राष्ट्रभृत् होम इतर सर्व राजांच्या अगोदर केला जाईल तोच राजा युध्दाला अधिक समर्थ होतो व तो युध्द जिंकतो. अशा प्रकारचा होम करावयाचा असेल तेव्हा अग्नी प्रज्वलित करण्यासाठी मधूक वृक्षाच्या काष्ठांचा इध्म उपयोगात आणावा. जितके राजे आपल्या विरुध्द लढत असतील त्यांपैकी प्रत्येकाच्या उद्देशाने नेरनिराळा अग्नी स्थापन करून तो मधूक वृक्षाची लाकडे घालून प्रज्वलित करावा. आणि त्याचे ठिकाणी राष्ट्रभृत् मंत्रांचा होम करावा. मधूक वृक्षाच्या या काष्ठांपासून जे अंगार म्हणजे निखारे उत्पन्न होतील ते त्या यजमानाशी वेरोध करणाऱ्या राजांच्या प्रत्येक सैन्याला वेढून टाकतील. सारांश, शत्रूंच्या न्यात अग्नीची बाधा उत्पन्न होईल अथवा शत्रूंच्या सैनिकांच्या शरीराचे ठकाणी ज्वरादि संताप उत्पन्न होईल. ज्या कोणा यजमानाला उन्माद रोग ाला असेल त्याच्या रोगमुक्तीकरता राष्ट्रभृत् मंत्रांचा होम करावा. गंधर्व आणि प्सरा उन्माद उत्पन्न करीत असतात. गंधर्व आणि अप्सरा याच राष्ट्रभृत्संज्ञक त्रांच्या देवता असल्यामुळे राष्ट्रभृत् मंत्रांच्या ठिकाणी व्यक्त होणाऱ्या सर्व धर्वांपैकी प्रत्येक गंधर्वास उद्देशून मंत्राच्या शेवटी 'तस्मै स्वाहा' असे म्हणून णि अप्सरांच्या उद्देशाने मंत्राच्या शेवटी 'ताभ्यः स्वाहा' असे म्हणून आहुती वी. अशा प्रकारे केलेल्या होमाने यजमानाच्या ठिकाणी उन्माद उत्पन्न रणाऱ्या गंधर्व व अप्सरांना शांत केल्यासारखे होते. व तो यजमान उन्माद ापासून मुक्त होतो. अशा प्रकारच्या होमाचे कामी अग्निप्रज्वलनाकरता वड, र, पिंपळ किंवा नांदुरवी यांपैकी कोणत्या तरी वृक्षाच्या काष्ठांचा इध्म

उपयोगात आणावा. कारण आता सांगितलेले चार वृक्ष ही गंधर्व व अप्सरा यांची घरे आहेत. यास्तव या चार वृक्षांच्यापैकी एखाद्या वृक्षाच्या इध्मावर होम केला असतांना गंधर्व आणि अप्सरा यांना त्यांच्या राहत्या घरातच शांत केल्यासारखे होते. अभिचार करावयाचा असल्यास म्हणजे कोणा एखाद्या वैऱ्याला मारावयाचा असल्यास राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांचा होम उलट्या क्रमाने करावा. म्हणजे शेवटीच्या मंत्रापासून प्रारंभ करून पहिल्या मंत्राने होमातील शेवटची आहुती द्यावी. अशा प्रकारे उलटापालट करून होम केल्याच्या योगाने ज्याला मारावयाचा त्या पुरुषाचे पंचप्राणच उलटे सुलटे करून ठेवल्यासारखे होते. अर्थात् पंचप्राणांचे प्रती प्रतिकूलता उत्पन्न होताच तो पुरुष अनायासाने मरतो. अभिचाराच्यासाठी करण्याचा होम स्वाभाविकपणे जेथे जमीन ऊषर झालेली असते त्या भूमीवर अथवा पोकळ भेगा असलेल्या (भुसभुशीत) जागेत करावा. निर्ऋति नांवाच्या अभिचारदेवतेला अशा प्रकारचेच स्थान राहावयास आवडत असते. अर्थात् ऊषर किंवा भेगाळलेली भूमी हे निर्ऋतीगृह म्हणजे निर्ऋती देवतेचे निवासस्थान होय. यास्तव त्या ठिकाणी होम केला असता ते निर्ऋती देवतेचे निवासस्थानच यजमानाच्या त्या शत्रूला निर्ऋती देवतेकडून घेरते. वाणीला जितका क्रूरपणा आणता येईल तितक्या क्रूर वाणीने वषट्कार करून आहुती द्यावी म्हणजे त्या क्रूर किंवा कठोर वाणीने उच्चारलेल्या वषट्काराने शत्रूच्या शरीराचा विशेषत्वाने विच्छेद होतो व तो लौकरच मरतो.

ज्या शत्रूचे अन्नाद्य म्हणजे सेवनीय असे अन्न किंवा अन्नसेवनशक्ती हरण करावी अशी जर यजमानाला इच्छा होईल तर त्याने त्या शत्रूच्या सभेमध्ये उताणे पडावे आणि 'भुवनस्पते' इत्यादि मंत्रांनी गवताच्या काड्या गोळा करून घ्याव्यात. प्रजापती हा ब्रह्मांडरूप भुवनाचा पालक आहे. अर्थात् 'भुवनस्पते' इत्यादि मंत्रांनी गवताच्या काड्या गोळा केल्या असता प्रजापतीकडूनच त्या शत्रूचे सेवनीय अन्न किंवा अन्नसेवनशक्ती धारण केल्यासारखे होते. 'भुवनस्पते' मंत्रानंतर 'इदमहममुष्याऽमुष्यपणस्यान्नाद्यं हरामि' म्हणजे 'मी अमुक नांवाच्या व अमुक गोत्राच्या माझ्या शत्रूचे सेवनीय अन्नाचे किंवा अन्नसेवनशक्तीचे हरण करीत आहे,' असे म्हणावे. म्हणजे तो यजमान आपल्या शत्रूच्या अन्नाचे किंवा अन्नसेवनशक्तीचे धारण करतो.

'भुवनस्थपते' येथून 'सतो भुवनस्थपते' येथपर्यंतच्या सहा मंत्रांनी

सहा गवताच्या काड्यांचे हरण करावे. म्हणजे त्या गोळा कराव्यात. ऋतू सहा आहेत. यास्तव सहा मंत्रांनी सहा गवताच्या काड्या घेतल्या म्हणजे सहा ऋतूंचेच जणू काय संपादन केल्याप्रमाणे होते. सारांश, ते ऋतू प्रजापतीकडून त्या शत्रूचे अन्न किंवा अन्नसेवनशक्ती हरण करून घेतात आणि मग यजमानाला देऊन टाकतात. बरोबरीच्या बांधवांमध्ये वस्तुत: श्रेष्ठ असताना जो कोणी त्या श्रेष्ठत्वापासून खाली येईल त्याने उंच असे जे स्थल असेल त्या स्थलावर बसून चार परळ तांदूळ मोजून घेऊन त्यांचा ब्रह्मौदन नामक चरू शिजवावा आणि आपले श्रेष्ठत्व पुन्हा मिळविण्यासाठी त्या चरूच्या आहुती देऊन राष्ट्रभृत् मंत्राचा होम करावा. राष्ट्रभृत् मंत्र हे शरीररुप असून उंच असलेले स्थल हेही शरीरच होय. यास्तव उंच जागी राष्ट्रभृत् मंत्रांचा होम केला असता उभयविध शरीराचे संपादन केल्यासारखे होते. आणि त्या उभयविध शरीराच्या प्रभावाने अध्वर्यू जणू काय आपल्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या बांधवांमध्ये शरीराप्रमाणे श्रेष्ठत्वाला नेऊन पोचवितो. म्हणजे हस्तपादादि अवयवांपेक्षा मुख्य शरीर जसे प्रधानभूत किंवा श्रेष्ठ असते त्याप्रमाणे तो यजमान पूर्वीप्रमाणे आपल्या बरोबरीच्या बांधवांत श्रेष्ठतेला प्राप्त होतो. ब्रह्मौदन नामक चरू चार परळ मापून घेतलेल्या तांदुळाचा करून त्याचा होम केल्याने तो यजमान चारी दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. ब्रह्मौदन चरू दुधात शिजवावा म्हणजे तो रुचकर होतो व त्याचा होम केल्याने अध्वर्यू यजमानाच्या शरीराच्या ठिकाणी कांती उत्पन्न करतो. तो दुधातला चरू चांगला शिजावा व कच्चा राहू नये म्हणून पळीने वरचेवर ढवळीत असावा. आणि शिजत येण्याचे सुमारास त्यात तूप घालावे. अशा प्रकारे तुपाच्या मिश्रणाने सिध्द झालेला तो दुधातला चरू अधिक पवित्रतेला प्राप्त होतो. होम झाल्यावर उरलेला भात ऋषितुल्य अशा चार ब्राह्मणांनी भक्षण करावा. असे केल्याच्या योगाने चार दिश्यांच्या ठिकाणी प्रज्वलित केलेल्या अग्नीच्या ठिकाणी होम केल्यासारखे होते. (अनुवाक ८).

विशिष्ट अशा फलाचे प्रकाशन करणाऱ्या ज्या देवता त्या 'देविका' होत. पुत्रपौत्रादि प्रजेची इच्छा असेल त्याने 'देविका' संज्ञक देवतांच्या प्रीत्यर्थ इष्टी कराव्यात. देविका या गायत्र्यादिछंद:स्वरुप आहेत. गायत्र्यादि छंद हे जसे अभीष्टफलप्राप्तीला कारणभूत होणारे अर्थात् सुखकर असे आहेत तशाच पुत्रपौत्रादि प्रजा देखील अभीष्टफलप्राप्तीला कारणभूत व सुखकर अशा

असल्याने त्या गायत्र्यादि छंदांसमानच आहेत. यास्तव अध्वर्यू जणू काय देविकारूपी छंदांच्याकडून यजमानासाठी पुत्रपौत्रादि प्रजा उत्पन्न करतो. प्रथमत: धाता देवतेच्या अनुग्रहासाठी इष्टी करावी. त्या योगाने यजमानाचा त्याच्या पत्नीशी समागम केल्यासारखे होते. नंतर अनुमती देवतेची इष्टी करावी. अनुमती देवता ही यजमानाला त्याने आपल्याशी केलेल्या व पत्नीच्या समागमरूप एकतेला अनुमोदन देते. मग 'राका' देवतेप्रीत्यर्थ इष्टी करावी. राका देवता पत्नीच्या ठिकाणी प्रजोत्पादक अशा गर्भाची धारणा करते. यानंतर सिनीवाली देवतेसाठी इष्टी करावी. सिनीवाली ही गर्भाच्या ठिकाणी बीजरूपाने असणाऱ्या प्रजेला जन्म देते. मग कुहू देवतेच्या अनुग्रहासाठी इष्टी करावी. 'कुहू' ही देवता त्या प्रजांच्या ठिकाणी वाचा उत्पन्न करून त्यांना संभाषणक्षम करते.

गाई, घोडे इत्यादि पशूंच्या प्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाने त्याच धाताप्रभृति देविकासंज्ञक पांच देवतांच्या संतुष्टतेसाठी इष्टी कराव्यात. देविका या छंदोरूप असून पशू हेही छंदोरूपच आहेत. यास्तव या देविकांच्यासाठी इष्टी केल्या असता अध्वर्यू जणू काय छंदांच्या द्वारा यजमानाच्या घरी पशू निर्माण करतो. प्रथमत: धाता देवासाठी इष्टी करावी म्हणजे त्या योगाने गाई इ. स्त्रीपशूंच्या ठिकाणी तो धाता गर्भरूपी बीज रुजवितो. अनुमती देवतेचे यजन केले असता ती धात्याने रुजविलेल्या गर्भरूपी बीजाला अनुमती देते. 'राका' देवी त्या गर्भरूप बीजाची वाढ करते. सिनीवाली देवता त्या गर्भबीजापासून पशुरूप प्रजा उत्पन्न करते आणि कुहू देवतेकडून उत्पन्न झालेल्या त्या पशूंना चारा व पाणी देऊन त्यांना सुखी करते.

एखाद्या गावाचे आधिपत्य मिळावे अशी कामना करणाऱ्याने याच पांच देविकांना उद्देशून इष्टी कराव्या. देविका या छंदोरूप असून 'गांव' हेही छंद:स्वरूपच आहे. यास्तव छंदोरूप अशा देविकांकडूनच अध्वर्यू जणू काय यजमानाला गावाचे आधिपत्य प्राप्त करून देतो. मात्र या पांच इष्टींच्या क्रमात असा बदल करावा की अनुमती व 'राका' यांच्या नंतर आणि सिनीवाली व कुहू यांच्या पूर्वी अर्थात् मध्यंतरी धाता देवतेचे यजन करावे. त्या योगाने संतुष्ट झालेला धाता यजमानाला गावाच्या आधिपत्याचे जागी स्थापन करतो.

जो कोणी नेहमी काहीतरी रोगाने पिडित झालेला असतो त्या यजमानानेही

आपल्या रोगमुक्तीसाठी याच देविकासंज्ञक पांच देवतांच्यासाठी इष्टी कराव्यात. देविका या छंद:स्वरूप आहेत व त्याच क्रुध्द होऊन यजमानाच्या ठिकाणी रोगाची पीडा निर्माण करतात. यास्तव देविकासंज्ञक पांच देवतांचे यजन केले असता संतुष्ट झालेल्या त्या देवतांच्या कडूनच यजमानाला रोगमुक्त केले जाते. यावेळी देखील आताच सांगितल्याप्रमाणे धाता देवतेचा याग अनुमती व राका आणि सिनीवाली व कुहू यांच्या मध्यंतरी करावा. म्हणजे त्यायोगे संतुष्ट झालेल्या धात्याच्या ज्या यजमानाच्या उदरामध्ये आरोग्याला विधातक अशी अशक्तता निर्माण झालेली असते ती दूर करून त्या ठिकाणी आरोग्यास आवश्यक अशा प्रकारचे सामर्थ्य तो धाता उत्पन्न करतो.

ज्या यजमानांना अनेक प्रकारच्या अडचणीमुळे यज्ञाची प्राप्ती होत नाही म्हणजे त्यांच्या हातून यज्ञ घडत नाही त्यांनी देखील याच पांच देवतांचे यजन करावे. कारण देविका या छंदोरूप असून त्याच देवता रुष्ट झाल्यामुळे यजमानाला यज्ञाची प्राप्ती होऊ देत नाहीत. यास्तव ज्याला यज्ञाची प्राप्ती होत नसेल त्याने मागे सांगितलेल्या क्रमाप्रमाणे प्रथमत: 'धाता' देवतेचेच यजन करावे. त्या योगाने तो संतुष्ट होऊन त्या यजमानाला स्वत:च्या प्रमुखतेने छंदोरूप अशा सर्वच देविकांची अनुकूल कृपा संपादन करून देतो. आणि मग साहजिक यज्ञकर्मात येणाऱ्या सर्व अडचणी दूर होऊन त्या यजमानाला यज्ञाची प्राप्ती होते.

एकदा यज्ञ केल्यावर ज्याच्या हातून त्याची इच्छा असताही पुन: यज्ञ घडत नाही त्याने त्याच देविकासंज्ञक पांच देवतांच्यासाठी इष्टी कराव्यात. देविका या छंदोरूपच आहेत. यजमानाने पूर्वी केलेल्या यज्ञातच गायत्र्यादि छंदांचा उपयोग केला गेल्यामुळे त्यांच्या ठिकाणचे सार कमी होऊन ते शिळे झालेले असतात. आणि त्यामुळेच त्या यजमानाच्या हातून पुन्हा यज्ञ घडविण्यास ते असमर्थ असतात. परंतु छंदोरूप देविकांचे यजन केले म्हणजे गायत्र्यादि छंदांच्या ठिकाणी पुन्हा सारभूत रस उत्पन्न होऊन ते पुन्हा ताजेतवाने होतात. सारांश, आपल्या हातून पुन्हा यज्ञ घडावा अशी इच्छा करणाराने पूर्वोक्त पांच इष्टी कराव्यात. मात्र धाता देवतेची इष्टी शेवटी करावी. अशा प्रकारे इतर देवांच्यावर धात्याची योजना केली असता तो त्या यजमानाला पुन्हा ताजेतवाने झालेल्या गायत्र्यादि छंदांचे संपादन करून देतो. आणि मग साहजिकच

यज्ञ त्याच्याजवळ येतो. त्याच्या हातून यज्ञ घडतो व तो यजमान पुन्हा प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

अभ्यासकांच्या मेंदूत ग्रंथांचे धारण करण्याची जी शक्ती असते तिला 'मेधा' असे नांव आहे. ज्या यजमानाला मेधा प्राप्त व्हावी अशी कामना असेल त्याने सुध्दा या देविकांच्या प्रीतीसाठी त्यांचे यजन करावे. देविका याच गायत्र्यादि छंदांच्या अभिमानिनी असल्यामूळे त्या छंदोरूप आहेत. असंतुष्ट असलेल्या छंदोरूप देवताच यजमानाला मेधा म्हणजे ग्रंथधारणशक्ती मिळू देत नाहीत. यास्तव ज्याला मेधाप्राप्तीची इच्छा असेल त्याने प्रथमत: धाता देवतेसाठी यजन करावे. म्हणजे सर्व देविकांमध्ये प्रमुख स्थान दिले गेलेला तो धाता प्रसन्न होऊन आपल्या प्रामुख्याने सर्व छंदांची यजमानाला अनुकूलता मिळवून देतो आणि अर्थातच त्या यजमानाला ग्रंथांचे धारण करणारी मेधा प्राप्त होते.

आपल्या शरीराचे ठिकाणी उत्कृष्ट कांती उत्पन्न व्हावी असे इच्छिणाऱ्याने याच पांच देवतांच्यासाठी हविर्द्रव्यांचा निर्वाप करून इष्टी कराव्यात. गायत्र्यादि छंदांच्या देवतांच्या ठिकाणी देविकांचे आधिपत्य असल्यामुळे तेजस्विता म्हणजे कांती निर्माण झालेली असते. अर्थात् देविका छंदोरूपच आहेत. आणि छंद हे मूर्तिमंत कांतीच होत. यास्तव छंदोरूप अशा देविकांची सुप्रसन्नता संपादन करून अध्वर्यू जणू काय त्यांच्याकडून यजमानाच्या शरीराचे ठिकाणी उत्कृष्ट कांती उत्पन्न करतो.

धाता देवतेखेरीज इतर चार देवतांच्या इष्टींमध्ये शिजविले जाणारे चरू दुधात शिजवावेत. दूध हे कांती निर्माण करणारे व कांतीचे संवर्धन करणारे असल्यामुळे दुधात शिजविलेल्या चरूंच्या समर्पणाने संतुष्ट झालेला तो चार देवतांचा समुदाय यजमानाच्या शरीराचे ठिकाणी उत्कृष्ट कांती धारण करतो. या पांच इष्टींमध्ये धाता देवतेची इष्टी मध्यंतरी अर्थात् तिसऱ्या खेपेस करावी. अशा प्रकारे इतर देवतांच्या मध्यस्थानी यजन करण्यात आलेला धाता यजमानाच्या शरीरामध्ये कांती निर्माण करतो.

गायत्र्यादि छंद व देविकासंज्ञक पांच देवता या इच्छिलेल्या अभीष्टाची प्राप्ती करून देणाऱ्या असल्यामुळे छंद देविकासमानरूप आहेत. गायत्री छंद म्हणजेच जणू अनुमती देवता असून त्रिष्टुप्छंद हा राकादेवतास्वरूप होय.

जगती छंद हा जणू सिनीवाली देवता असून अनुष्टुप् छंद हीच कुहु देवता समजावी. यजनाने प्रसंगी गायत्र्यादिछंदात्मक मंत्रांच्या शेवटी उच्चारला जाणारा 'व्रौषट्' हा वषट्कार म्हणजे देविकांमध्ये प्रमुख असलेला धाता देव होय. पूर्णत्वाने चंद्रोदय ज्या तिथीस होतो ती म्हणजे 'राका' देवता होय. 'राका' ही शुक्लपक्षरूप असून चंद्रकलेचा लेशही नसलेली अमावास्या तिथी ही कुहु देवता असून ती कृष्णपक्षस्वरूप आहे. जिच्या ठिकाणी अल्प अशा चंद्रकलेचे अस्तित्व असते ती चतुर्दशीमिश्र अशी अमावास्या तिथी म्हणजे 'सिनीवाली' देवता असून किंचित् कलाहीन असा चंद्र जिच्या ठिकाणी असतो ती चतुर्दशी-संबध्द पौर्णिमा तिथी ही अनुमती देवता होय. धाता देव हा शुक्ल व कृष्ण या दोन्ही पक्षांचा व त्यांच्या तीन तिथींचा निष्पादक असा चंद्र समजावा. गायत्र्यादि छंदांच्या स्वरूपाने असणाऱ्या अनुमत्यादि देविका वसू इत्यादि देवांच्या समानरूपत्वाला प्राप्त झाल्या आहेत. आठअक्षरी चरण असलेला गायत्री छंद हा आठ वसूंच्या स्वरूपाला प्राप्त झाला असून अकरा अक्षरांचा एक एक चरण असलेला त्रिष्टुप्छंद हा अकरा रूद्रांच्या स्वरूपाला प्राप्त झाला आहे. प्रत्येक चरणाची बारा अक्षरे असणारा जगतीछंद हा बारा आदित्यांच्या स्वरूपत्वाला प्राप्त झाला असून आठ अक्षरी चार चरण असलेला अनुष्टुप्छंद हा प्रजापतीस्वरूपाला प्राप्त झाला आहे. छंदोमंत्रांच्याशी वषट्कार हा मुख्यत्वाने संलग्न होत असतो. त्याचप्रमाणे धाता हा सर्व देवतांमध्ये प्रमुख आहे. यास्तव वषट्कार हा धातादेवतास्वरूप समजावा. सारांश, या देविकासंज्ञक अनुमती इत्यादि पांच देवता गायत्र्यादिछंदस्वरूप असून सर्व देविका याच वषट्कारस्वरूप आहेत. देविकासंज्ञक अशा या पांच देवतांच्यासाठी मिळून एकदाच निर्वाप केला म्हणजे सर्व देवता मिळून एकच इष्टी केली तर त्या पांच देवता यजमानाला दग्ध कण्यास समर्थ होतात. यास्तव अनुमती व राका या दोन देवतांच्या इष्टी प्रथमतः क्रमाने करून नंतर तिसऱ्या खेपेस धाता देवतेची इष्टी करावी. आणि नंतर सिनीवाली व कुहु ह्या दोन देवतांच्या इष्टी क्रमाने कराव्यात. असे केल्याच्या योगाने देविकासंज्ञक देवता यजमानाला दग्ध करीत नाहीत. इतकेच नव्हे तर या देवतांच्या ज्या कामनेने इष्टी केल्या असतील त्या सर्व कामना तो यजमान परिपूर्ण करून घेतो. (अनुवाक ९).

१ ज्या गृहामध्ये अग्निहोत्ररूप उपासना चालू राहत असते त्या

गृहाचे पालन करणाऱ्या हे अग्निदेवा, ग्रामांतरास जाण्यास निघालेल्या आम्हाकडे तुझे लक्ष असू दे. आणि आम्ही जेथे जाऊ तेथे तेथे आमचा निवास सुखाने होईल अशी योजना करणारा आणि आम्हाला उत्पन्न होणाऱ्या रोगांचे निवारण करणारा असा तू हो. जे कार्य सफल होण्याच्या उद्देशाने आम्ही तुझी प्रार्थना करीत आहो ते कार्य आमच्यावर प्रेम ठेऊन झटून कर. त्याचप्रमाणे आमच्या सहवासात असणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या व पशूच्या सुखाला कारणभूत हो. २ सर्व प्रकारचे अर्थसाह्य करण्यास समर्थ, रमणीय, सर्व गोष्टीविषयी अवगती असलेल्या तुझ्या सभेशी आम्ही संलग्न होऊन राहू. अप्राप्त अशा वस्तू आम्हाला प्राप्त होण्याविषयी आणि प्राप्त झालेल्या वस्तूंचे परिपालन व्हावयाकरता येणाऱ्या अडचणीतून तू आमचे उत्तम प्रकारे संरक्षण कर. हे अग्निदेवा, अनेक प्रकारच्या कल्याणांच्या योगाने तुम्ही आमचे सर्वदा रक्षण करा.

जो अग्निहोत्री यजमान सांज सकाळ अग्निहोत्र होम करतो, तो जणू काय आहुतीरूपी विटांचेच उपधान म्हणजे मांडणी करतो. या विटा जरी मातीच्या केलेल्या असतात तरी जो अग्निहोत्री पुरुष असतो त्याने आहुती देऊन व्यतीत केलेले अहोरात्र याच जणू काय त्याने एकावर एक रचलेल्या विटा होत. वास्तव जो आहिताग्नी सांज सकाळ नियमाने अग्निहोत्रविषयक आहुती देऊन एक एक अहोरात्र क्रमाने संपादन करील तो जणू काय अहोरात्ररूपी काळाच्या विटा तयार करून त्यांची एकावर एक मांडणी करतो. विराट् छंदांचा प्रत्येक चरण दहा अक्षरांचा असतो. अर्थात् चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने विराट्छंद दशाक्षरी आहे. आहिताग्नी यजमान दहा दिवस एकाच ठिकाणी राहून जेव्हा अग्निहोत्र होम करतो तेव्हा तो त्याचे जणू काय संख्यासाम्य असलेल्या विराट् छंदालाच संपादन करतो. आणि म्हणूनच विराट् छंदाला प्राप्त झालेल्या अग्निहोत्र्याने विराट् छंदाचीच जणू वीट तयार करून मांडल्या प्रमाणे होते. इतकेच नव्हे तर विराट् छंदाच्या प्राप्तीमुळे अग्निष्टोम यज्ञच त्याला प्राप्त झाल्यासारखे होते. सारांश, दहा दिवस एका ठिकाणी राहून सांज सकाळी अग्निहोत्र होम करणाऱ्या अग्निहोत्र्याला चयन मांडल्याचे श्रेय प्राप्त होते. ज्या अर्थी दहा अहोरात्र एका ठिकाणी राहून केलेल्या अग्निहोत्र होमाने 'विराट्' छंदोरूप संपत्तीचा लाभ होतो त्या अर्थी जो अग्निहोत्री दहा दिवस ज्या एका स्थळी राहून नंतर अन्य ठिकाणी प्रयाण करतो

ते स्थळ 'यज्ञभूमी' या संज्ञेला निश्चयाने पात्र होत असते. आणि ज्या स्थळी दहा दिवसांपेक्षा कमी दिवस वस्ती करून अग्निहोत्री अन्य स्थळी जातो ते स्थळ 'अयज्ञभूमी' या संज्ञेला पात्र होत असते. अग्निहोत्री होमाच्या निमित्ताने दहा दिवस एका स्थळी वास्तव्य करून राहिला म्हणजे त्या स्थलावर गार्हपत्याग्नीची सत्ता उत्पन्न होत असते. दहा दिवस वस्ती केलेल्या वास्तूचा अर्थात् यज्ञभूमीचा पालक असलेला गार्हपत्याग्नी हाच खरोखर रुद्र हे नांव धारण करणारा देव होय. यास्तव दहा दिवसांचे वास्तव्य संपवून पुढे अन्य स्थळी प्रयाण करणारा अग्निहोत्री जर वास्तुपतीला म्हणजे त्या स्थलाच्या पालकाला आहुती देऊन संतुष्ट न करता पुढे प्रयाण करील तर तो रुद्रनामक गार्हपत्याग्नी क्रुध्द होऊन त्या यज्ञस्थलातून न येता यजमानाचा नाश केल्यावाचून राहत नाही. यासाठी दहा दिवसांनंतर अन्य स्थळी प्रयाण करतांना अग्निहोत्र्याने वास्तोष्पतीचा होम करावा. म्हणजे यज्ञभूमीचा पालक असलेल्या रुद्रनामधारी गार्हपत्याग्नीला त्याला प्रिय असलेला आहुतीरूप भाग देऊन संतुष्ट करावे. आणि मग दुसरीकडे प्रयाण करावे. अशाप्रकारे वास्तोष्पतीचा होम करून गार्हपत्याग्नीला शांत करून पुढे प्रयाण केल्याच्या योगाने यजमान मरणाच्या संकटातून वाचतो. प्रयाण करण्यासाठी गाड्याला दोन्ही बैल जोडल्यानंतर जर वास्तोष्पतीचा होम केला तर होम दिला जाण्यापूर्वीच यज्ञभूमीने अन्यत्र प्रयाण केल्यासारखे होऊन लौकिक अर्थात् अयज्ञभूमीच्या ठिकाणी वास्तोष्पतीच्या होमाच्या आहुती दिल्याप्रमाणे होते. बरे, दोन्ही बैल गाड्याला जोडण्यापूर्वीच वास्तोष्पतीचा होम केला तर क्षेम असताना म्हणजे प्रयाणाचा प्रसंगच नसतांना वास्तोष्पतीचा होम दिल्याप्रमाणे होते. तात्पर्य, गाड्याला दोन्ही बैल जोडल्यावर अथवा दोन्ही बैल जोडण्यापूर्वी केला जाणारा वास्तोष्पतीचा होम करून न केल्यासारखा होतो. यास्तव गाड्याला एक बैल जोडल्यानंतर दुसरा बैल जोडण्यापूर्वी वास्तोष्पतीचा होम करावा. असे केल्याच्या योगाने प्रयाणासंबंधी प्रसक्ती व अप्रसक्ती या दोन्ही साधल्यासारख्या होतात. आणि शिवाय कोणत्याही प्रकारची कसर न राहता यज्ञभूमीचा पालक असलेल्या रुद्ररूप गार्हपत्याग्नीला यजमानाने शांत केल्यासारखे होते. एकाच ऋचेने होम केला तर अग्निहोत्र्याने हविर्होम केल्यासारखा होतो. व तो देवाला फारसा प्रिय होत नाही. यास्तव वास्तोष्पतीहोमाला 'सदेवत्व' प्राप्त व्हावे म्हणजे तो होम देवाला अत्यंत प्रिय व्हावा म्हणून पूर्वोक्त 'वास्तोष्पते प्रतिजानी' इत्यादि पुरोनुवाक्यासंज्ञक

ऋचेचे पठण करून 'वास्तोष्पते शग्मयेत्' या याज्यासंज्ञक ऋचेने वास्तोष्पतीदेवाला आहुती द्यावी. अग्निहोत्र होम केल्यानंतर जर प्रवासात बरोबर न्यावयाची भांडीकुंडी गाड्यावर ठेवली तर त्यांच्या मागोमाग रुद्रनांव धारण करणाऱ्या गार्हपत्याग्नीला देखील गाड्यावर स्थापन करणे क्रमप्राप्तच आहे. आणि तसे जर केले तर गाडाच जळून जाईल. कारण अग्निहोत्र होम झाला म्हणजे अग्नी त्या पूर्वस्थळी तत्त्वत: राहतच नाही. त्यापूर्वी मात्र होमासाठी राहत असतो. यास्तव अग्निहोत्र होम करण्यापूर्वी प्रवासात लागणारी भांडीकुंडी गाड्यावर चढवावीत. अंगाररूपाला प्राप्त झालेल्या प्रज्वलित काष्ठांना 'अवक्षाण' अशी संज्ञा आहे. अवक्षाणसंज्ञक अंगार विझविल्यावाचून जर अग्निहोत्री प्रयाण करील तर काही तरी करण्याने यज्ञाचा घात करावा किंवा आपले राहते घरच दग्ध करावे अशासारखे होईल. यास्तव या अडचणीचे निवारण होण्यासाठी 'अयं ते योनि:' या मंत्राने त्या अग्नीचा अरणींच्या ठिकाणी समारोप करावा. म्हणजे तो अग्नी अरणींमध्ये समाविष्ट होतो. दोन अरणींचा जोड ही अग्नीची जन्मभूमीच आहे. अर्थात् अरणींच्या ठिकाणी अग्नीचा समारोप केल्याच्या योगाने त्या अग्नीला त्याच्या जन्मभूमीच्या ठिकाणीच आरूढ केल्याप्रमाणे होते. कोणी असे म्हणतात की, अरणींच्या ठिकाणी समारोपित केलेला अग्नी जर काही कारणाने नाहीसा झाला, म्हणजे तो न पळविल्यामुळे अथवा अन्य कारणाने अरणीच नाहीशा झाल्या तर त्या यजमानाचा अग्न्याधान केल्या जाण्यापासून सपादन केलेला अग्नीच नष्ट झाल्यासारखेच होऊन त्याला पुन: अग्न्याधान केल्यासारखे होते. हा दोष टाळण्यासाठी 'या ते अग्ने.' ही ऋचा म्हणून यजमानाने स्वत:च्याच शरीराचे ठिकाणी अग्नीचा समारोप करावा. कारण यजमान हाच खरोखर अग्नीची जन्मभूमी आहे. यास्तव अशा प्रकारे स्वत:च्या ठिकाणी अग्नीचा समारोप केल्याच्या योगाने स्वकीय अशा जन्मभूमीच्याच ठिकाणी अग्नीची स्थापना केल्याप्रमाणे होते. (अनुवाक १०).

१ हे अग्ने, तुला हविर्द्रव्य समर्पण करणाऱ्या यजमानाला तू भरपूर अन्न किंवा आयुष्य देत असतोस. हे अग्निदेवा, तू दूरदर्शी असा विद्वान्, यजमानाच्या घराचा पालक आणि नित्य तरुण आहेस. २ देवांच्याकडे हविर्द्रव्ये वाहून नेणारा हा अग्नी जरारहित, आमचा पालक, सर्वव्यापी, विशेष स्मरणशक्ती असलेला आणि दिसतांक्षणीच सुख देणारा आहे. हे अग्निदेवा, आमच्या गृहपतित्वाला म्हणजे घरधनीपणाला साजेल, आमची आबाळ होणार नाही

अशा प्रकारचे अनेकविध अन्न तू आम्हाला प्रेमपूर्वक दे. त्याचप्रमाणे तू आमच्या संमुख येऊन श्रवणीय अशा श्रेयस्कर गोष्टी आम्हाला ऐकव. ३ हे सोमा, स्तुतिप्रिय व वनांचा पालक असा तू येथील आमचा जीवनक्रम नीट चालावा म्हणून आमच्याकडून सदैव इच्छिला जाणारा आहेस. म्हणजे आमचे जीवन सुखाचे जाण्यासाठी आम्ही तुझ्या आनुकूल्याची नेहमीच अपेक्षा करतो आणि म्हणूनच तुझ्या कृपेने आम्ही उपाशी मरणार नाही. ४ देवांमध्ये ब्रह्मा, विद्वानांच्यामध्ये पदवाक्यप्रमाण जाणणारा, ब्राह्मणांमध्ये स्वत:च्या अनुष्ठान-सामर्थ्याने अतीद्रिय वस्तूंचा द्रष्टा, पशूंमध्ये अधिक शक्तिमान असा रेडा, पक्ष्यांमध्ये बहिरी ससाणा आणि वनांमध्ये तर तरवारी सारखी लांब व तीक्ष्ण पाने असलेला वृक्ष, त्याचप्रमाणे 'रेभन्' शब्दाने स्तविला जाणारा सोम हा दर्भासारख्या पवित्र पदार्थांमध्ये अधिक श्रेष्ठ आहे. ५ सर्व देवांना आपल्या तंत्राने वागविणारा सन्मार्गाचा पालक व सत्यालाच अनुमोदन देणाऱ्या सवितादेवाची या यज्ञकर्मामध्ये उत्कृष्ट अशा स्तोत्रांनी आम्ही प्रार्थना करीत आहो. ६ सर्वप्रेरक असा सविता देव अमोघ अशा रक्तवर्णी प्रकाशमंडलाने उदयपर्वत आणि अस्तपर्वत यांच्याकडे संचार करीत, अमर अशा देवांच्या शरीरांना आणि मर्त्य अशा मनुष्यांच्या शरीरांना आपापल्या काळात प्रकाशित करीत म्हणजे त्या त्या लोकी व्यवहारक्षम करीत, सुवर्णनिर्मित रथावर आरूढ होऊन सर्व भुवनांचे अवलोकन करीत, प्रतिदिन पूर्व दिशेला येत असतो. ७ अखंडनीय असा रुद्रदेव ज्याप्रकारे अश्वादि पशू, मनुष्ये व गाई आणि पुत्रादि अपत्य यांचे रुद्रामध्ये प्रतिपादिल्याप्रमाणे रक्षणादि करील त्याप्रकारे त्या रुद्राची आम्ही आराधना करीत आहो. ८ हे रुद्रदेवा, तू आमच्या मुलांवर व नातवांवर क्रुध्द होऊन त्यांना मारू नकोस. त्याचप्रमाणे आमच्यावर रागावून आमच्या आयुष्यावरही घाला घालू नकोस. आमच्या गाईंच्या व अश्वांच्या वर क्रुध्द होऊन त्यांना मारू नकोस. हे रुद्र देवा, क्रोधवश होऊन तू आमच्या पराक्रमी अशा सेवकांना मारू नकोस. तुला अर्पण करण्याकरता हविर्द्रव्ये तयार करून ठेवून आम्ही तुझी नमस्कारपूर्वक सेवा करीत आहो. ९ उदकाचा भूमीवर वर्षाव करून, अन्नोदक निष्पन्न करणाऱ्या प्राणीमात्राच्या आयुष्याचे पालन करणाऱ्या, मेघाप्रमाणे अपमृत्यूचा परिहार करून सर्वांच्या आयुष्याचे रक्षण करणाऱ्या, अभ्रांच्या समूहाप्रमाणे उच्चस्वरात गरजणाऱ्या, नदीतीरावर असलेल्या पर्वतांना धडकत राहणाऱ्या, नदीच्या लाटांप्रमाणे हर्षजनक

आणि देवतांच्या पूजनाला कारणभूत होणाऱ्या माझ्या स्तुतिरूप वाक्यांनी देवगुरू बृहस्पतीला उद्देशून स्तवन केले आहे. १० या बृहस्पती देवाने आमच्या हविर्द्रव्याचा स्वीकार केल्यामुळे झालेल्या संतोषाचा द्योतक असा उच्च ध्वनी केला. इतकेच नव्हे तर स्वत:ला झालेल्या संतोषाचे निदर्शन करणाऱ्या वाक्यांचाही उच्चार केला. आम्ही केलेली सेवा लक्षात घेऊन संतुष्ट झालेला बृहस्पती देव प्रतिबंध करणाऱ्या आमच्या पातकांना दूर करून हर्षोत्कर्षाने गाऊ लागला. आत जाण्याला अडथळा करणारे दगडी दरवाजे उघडून प्रवेशाचा मार्ग मोकळा करावा त्याप्रमाणे इच्छित फलालां प्रतिबंध करणाऱ्या आमच्या पातकांना दूर करून, संन्यासाश्रम स्वीकारलेल्या अधिकारी पुरुषांनी स्तविलेला परमेश्वर त्यांच्या पुरुषार्थाला प्रतिबंध करून दोषांना दूर करतो त्याप्रमाणे, अत्यंत स्तुती करणाऱ्या आमच्या मित्रभूत अशा ऋत्विजांनी संतुष्ट केलेला बृहस्पतिदेव आमच्या पुरुषार्थाला प्रतिबंधक अशा दोषांना दूर करतो. ११ हे इंद्रा, पुष्कळांना दान देण्यास पुरे होईल इतके, विजयशाली अशा आमच्या पुत्रादिकांनी पराक्रमाने मिळविलेले, आम्हाला सर्वदा विरोध करणारांची खोड मोडण्यास समर्थ होईल असे, भरपूर धन आमच्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी घेऊन ये. १२ अनेक यज्ञांत होम दिला जाणाऱ्या हे इंद्रदेवा, तुझ्याशी शत्रुत्व करणारांचा तू सर्वदा अत्यंत तिरस्कार करीत असतोस. तुझे बल फार मोठे आहे. ते या यज्ञकर्मात आम्हाला फळ मिळवून देणारे असो. हे इंद्रा, आम्हाला देण्याकरता तू आपल्या उजव्या हाताने धन घेऊन ये. समुद्रासारख्या अफाट प्रजांचा तू पालक आहेस. १३ हे सत्कर्मशील इंद्रा, कुटून तयार केलेल्या सोमरसाचे पान करण्यासाठी तू तत्काळ अत्यंत उल्लसित झालेला असतोस. हे तुझे वागणे सर्व देवांमध्ये तुझ्या श्रेष्ठत्वाला शोभून दिसते. १४ हे इंद्रदेवा स्तुतिरूप अशा वेदवाक्यांनी तू वृध्दिंगत होत असतोस आणि सोमयागातील तीनही सवनांच्या ठिकाणी यजन करण्याला तू योग्य होतोस. प्रतिकूल अशा शत्रूंना नाहीसे करून तू राहिलेला असतोस. सर्व मनुष्यांचा स्वामी असलेला तू सर्व यज्ञांत मननीय आणि श्रेष्ठ असा होतोस. १५ मनुष्यांचे धारण करणाऱ्या मित्रदेवाचे श्रवणयोग्य यश फार मोठे आहे. फलदानशील, सार्थवादी आणि अत्यंत आश्चर्यजनक कीर्ती असलेल्या सविता देवाचे आम्ही यजन करीत आहो. १६ हा मित्रदेव सर्व लोकांना त्यांचे त्यांचे अधिकार जाणून त्यांच्या कर्तव्याविषयी प्रयत्न करण्यास लावतो. मित्रदेवाने

पृथ्वीचे आणि द्युलोकाचे धारण केले आहे. मित्रदेव मनुष्यांना व पापण्यांची उघडझाप न करणाऱ्या देवांना सर्व बाजूने पाहत असतो. अमोघ फल देणाऱ्या त्या मित्रदेवाला घृतयुक्त असे हे चरुरूपी हविर्द्रव्य आम्ही अर्पण करतो. १७ हे अदितिपुत्रा, मित्रदेवा, जो कोणी मनुष्य तुझ्या प्रसन्नतेसाठी अवश्य अशा कर्माने अनुष्ठान करण्यास समर्थ होण्याची इच्छा करील तो मनुष्य त्याने केलेल्या कर्माच्या फलाने अत्यंत संपन्न होतो. तुझ्याकडून संरक्षित असा तो मनुष्य केव्हाही रोगाने पछाडला जात नाही आणि वैऱ्यांच्या हातून पराभूतही होत नाही. तुझ्याकडून संरक्षिल्या गेलेल्या माणसाला कसलेही पाप जवळून किंवा लांबूनही स्पर्श करीत नाही. १८ हे वरुणदेवा, सर्व लोक तुझ्या प्रसन्नतेसाठी जे काही कर्म करणे अवश्य असेल ते करण्याविषयी प्रत्येक दिवशी आम्ही विचार करीत असतो. तुझ्या सुप्रसन्नतेसाठी अवश्य अशा कर्माचा आम्ही सर्वदा विचार करीत असल्यामुळेच आम्ही तुझी सेवा करीत आहो. १९ हे वरुणदेवा, आम्ही मानव देवलोकी वास करणाऱ्या लोकांसंबंधी अज्ञानामुळे कमी अधिक द्रोह करीत असतो आणि तुझ्यासाठी कराव्या लागणाऱ्या कर्माचा आम्ही तद्विषयक अज्ञानामुळे नाश करतो म्हणजे त्या कर्माचे आचरण करीत नाही. त्या दोन्ही प्रकारच्या पातकांबद्दल तू आमचा नाश करू नकोस. २० ठग लोकांसमान असलेल्या स्वार्थसाधू ऋत्विजांनी विधिदृष्ट अशा कर्माचे जे अंग नष्ट केले असेल, तुझ्या स्तवनाचे कामी, योग्य प्रकारे जे अंग प्रवृत्त झाले नसेल अथवा अवश्य असलेले सर्व जाणून किंवा अजाणपणाने जे केले नसेल अशाप्रकारे ऋत्विजांकडून जाणून अथवा अजाणता झालेली सर्व पातके तू शिथिल कर म्हणजे विसरून जा. असे करशील तेव्हाच आम्ही तुला प्रिय होऊ.(अनुवाक ११).

प्रपाठक ५

१ पंधराही चंद्रकलांनी परिपूर्ण होणारी पौर्णमासी किंवा पौर्णिमा ही तिथी यज्ञभूमीच्या पश्चिम आणि पूर्व या दोन्ही दिशांच्या ठिकाणी विजयी झाली आहे. इतकेच नव्हे तर पूर्व व पश्चिम यांच्या मध्यप्रदेशातही तिने उत्कृष्ट विजय संपादन केला आहे. दिग्विजयी अशा या पौर्णिमेच्या सान्निध्यात राहून आमच्या ह्या यज्ञात मनःपूर्वक उपस्थित होणारे सर्व देव उत्कृष्ट व भोगविपुल अशा स्वर्गलोकामध्ये आम्ही गेल्यावर आम्हाला आनंद देवोत.

२ हे अमावास्ये, ज्या अर्थी तुझ्या महिम्याच्या आश्रयाने राहणाऱ्या देवांनी यज्ञामध्ये हविर्भाग मिळविला, त्या अर्थी सर्व अनिष्टांचा परिहार करणारी तू आमचा हा यज्ञ पूर्ण कर. हे भाग्यशाली अमावास्ये, तू आम्हाला धन व उत्कृष्ट पुत्र प्राप्त करून दे. ३ सर्व प्रकारच्या सोयींनी युक्त अशा उत्तम घरांच्या ठिकाणी आम्हाला चिरकाल प्रविष्ट करणारी, तेथे गेल्यावर आम्हाला अवश्य त्या धनाची प्राप्ती करून देणारी, नाना प्रकारच्या मौल्यवान् वस्तू आमच्या घरात आणून भरणारी, हजारो, लाखोंनी गणना करण्याजोगा धनाचा मोठा संचय आम्हाला प्राप्त करून देणारी, सौभाग्याने अलंकृत आणि आम्हाला बलांशी संयोजित करणारी ती पौर्णिमा तिथीची अधिष्ठात्री देवता आमच्या जवळ येवो. ४ हे अग्नीषोमहो, स्वपराक्रमाने सर्व देवांमध्ये अग्रमान मिळविणारे तुम्ही या यज्ञामध्ये वसु, रुद्र व आदित्य संज्ञक देवांना संतुष्ट करा. आणि स्तुतिरूपी मंत्राने संतुष्ट झालेले व उत्तमप्रकारे अनुष्ठित केलेल्या कर्माने अपेक्षित फल देणारे तुम्ही पौर्णमासी देवतेकडून सुरक्षित अशा पूर्व व पश्चिम दिशांच्या मध्यभागी करण्यात येत असलेल्या पौर्णमासेष्टी संबंधी हविर्द्रव्याचे सेवन करा. आणि नंतर आम्हाला पुत्रांसहवर्तमान भरपूर धन द्या.

आदित्यनामक देवांनी व अंगिरसनामक ऋषींनी अग्न्याधान केले. नंतर दर्शपूर्णमासेष्टींचा आरंभ करावा अशी जेव्हा त्यांना इच्छा झाली, तेव्हा अंगिरसांनी दर्शपूर्णमासेष्टींच्या आरंभासाठीच प्रथम कराव्या लागणाऱ्या 'अन्वारंभणीया' नामक इष्टीसंबंधी हविर्द्रव्याचा निर्वाप केला. इकडे देवांनीही अन्वारंभणीया करावयाची ठरविली आणि तिच्या अंशभूत अशा 'सारस्वत' संज्ञक दोन आज्याहुती अगोदर द्याव्यात असा त्यांनी निश्चय केला व त्याप्रमाणे पूर्वी सांगितलेल्या दोन मंत्रांनी त्यांनी दोन आज्याहुती दिल्या. त्या योगाने त्यांची अन्वारंभणीयेष्टी सांग झाली आणि अंगिरसांच्या पूर्वीच दर्शपूर्णमासेष्टींचा आरंभ करता येणे त्यांना शक्य झाले.

यास्तव, दर्शपूर्णमासेष्टींच्या प्रारंभासाठी अंगभूत अशी अन्वारंभणीयेष्टी करण्यापूर्वी यजमानाने पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'पूर्णा पश्चात्.' व 'यत् ते देवा अदधु' या दोन मंत्रांनी सरस्वती व सरस्वान् ह्या दोन देवतांना दोन आज्याहुती द्याव्यात. म्हणजे त्या यजमानाची पुढे करण्यात येणारी अन्वारंभणीयेष्टी सांग होऊन तो यजमान दर्शपूर्णमासेष्टींचा प्रारंभ करण्याला सत्वर योग्य होतो.

ब्रह्मवादी अशी शंका उपस्थित करतात की, त्या यजमानाने पौर्णमासेष्टी प्रथम करून मग दर्शेष्टी करावी? किंवा दर्शेष्टी प्रथम करून नंतर पौर्णमासेष्टी करावी? त्याचप्रमाणे ह्या दोन इष्टींच्या काळांचे अनुलोम म्हणजे सुलट आणि प्रतिलोम किंवा उलट स्वरूप कोणते? कारण, ह्या दर्शपूर्णमाससंज्ञक दोन इष्टींच्या काळांचे 'पौर्वापर्य' स्वरूप जो नीटपणे जाणतो, तोच यजमान दर्शपूर्णमासेष्टींचा मुख्यत: अधिकारी होत असतो. यावर कोणी बुध्दिमान पुरुष म्हणतो, अमावास्येच्या दुसऱ्याच दिवशी शुक्ल प्रतिपदा लागते आणि त्या दिवसापासून दररोज चंद्राची एक एक कला वाढत जात असते. अर्थात् अमावास्येनंतरच्या काळाचे जे स्वरूप ते अनुलोम म्हणजे सुलट होय. पौर्णिमेच्या पुढे कृष्ण प्रतिपदेपासूनच्या काळात चंद्राची एक एक कला दिवसानुदिवस कमी कमी होत असल्यामुळे त्या काळाचे स्वरूप प्रतिलोम म्हणजे उलट समजावे. आणि असे असल्यामुळे जो कोणी यजमान पौर्णमासेष्टी करून नंतर दर्शेष्टी करील त्याने उलट क्रमाने दर्शपूर्णमासेष्टींचा प्रारंभ केल्यासारखे होते. व त्यामुळे दुसऱ्याच दिवसापासून चंद्र जसजसा क्षीण होत जाईल, तसतसा यजमानही उत्तरोत्तर क्षीण होत जाऊन नाश पावेल.

परंतु, अशी आपत्ती यजमानावर येऊ नये आणि त्याने पौर्णमासेष्टी प्रथम केल्यामुळे त्याला प्रतिलोम किंवा उलट क्रमाने प्रारंभ केल्याचा दोषही लागू नये, ह्यासाठी दर्शपूर्णमासेष्टींच्या प्रारंभाची निदर्शक अशी 'अन्वारंभणीया' इष्टी करते वेळी, पूर्वोक्त 'सारस्वत' संज्ञक दोन होम करावेत. म्हणजे 'पूर्णा पश्चात्' व 'यत्ते देवा' या दोन मंत्रांनी दोन आज्याहुती द्याव्यात. अमावास्या हीच 'सरस्वती' देवता असून पौर्णिमा हीच 'सरस्वान्' संज्ञक देवता होय. अर्थात् पहिल्या आहुतीने अमावास्येला प्रथम संतुष्ट करून नंतर पौर्णिमेला संतुष्ट केल्याप्रमाणे होते. आणि त्या यजमानाला पौर्णमासेष्टी प्रथम केल्यामुळे लागणाऱ्या प्रतिलोमत्वाचाही परिहार होऊन अनुलोम क्रमानेच त्याने दर्शपूर्णमासेष्टींचा प्रारंभ केल्यासारखे होते. अर्थात् तो यजमानही क्षीण न होत जाता, चंद्रकलेप्रमाणे उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत जातो.

अन्वारंभणीयेष्टीमध्ये अग्नाविष्णू देवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप प्रथम करावा. नंतर सरस्वती देवतेसाठी चरू आणि सरस्वान् देवतेसाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करावा. आणि त्याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून अग्नाविष्णू, सरस्वती आणि सरस्वान् ह्या तीन देवतांचे यजन

करावे. अग्याविष्णू या जोडीसाठी जो एकादशकपालात्मक पुरोडाश तयार केला जातो त्यापैकी अष्टकपालात्मक जो भाग असतो तो अग्नीचा भाग असतो व त्रिकपालात्मक जो भाग असतो, तो विष्णूचा भाग असतो. अग्नी हा जणू यज्ञाचे मुखच आहे. यास्तव त्या भागाच्या आहुतीने संतुष्ट झालेला अग्नी यजमानालाही समृध्द करून लोकसमाजात प्रमुख करतो. विष्णूचा भाग विष्णूला अर्पण केल्याने विष्णुस्वरूप अशा यज्ञाचाच त्याने प्रारंभ केल्यासारखे होऊन त्याच्या यज्ञाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जातो. चरू तयार करण्यात येतो, तो सरस्वतीचा हविर्भाग असून द्वादशकपालात्मक पुरोडाश हा 'सरस्वान्' देवतेचा हविर्भाग होय. अमावास्या म्हणजेच सरस्वती आणि पूर्णमास किंवा पौर्णिमा हीच सरस्वान्संज्ञक पुरुषदेवता होय. सरस्वतीचे चरूने यजन केले म्हणजेच अमावास्येला प्रारंभी संतुष्ट केल्याप्रमाणे आणि पुरोडाशाने 'सरस्वान्' देवतेचे यजन केल्याने सरस्वान्रूपी पौर्णिमेला नंतर संतुष्ट केल्यासारखे होते. आणि त्या दोन्ही देवतांच्या अनुग्रहानेच दर्शपूर्णमाससंज्ञक दोन इष्टींचा अव्यवधानतेनेच उपक्रम केल्याचे श्रेय यजमानाला प्राप्त होते व तो समृध्द होतो. सरस्वती ह्या स्त्रीदेवतेच्या यजनानंतर सरस्वान् ह्या पुरुषदेवतेला द्वादशकपालात्मक पुरोडाशाने संतुष्ट केल्याने स्त्रीपुरुषदेवतात्मक दांपत्याचे यजमानाने जणू संयोजनच केल्यासारखे होते व ते यजमानाला प्रजोत्पत्ती प्राप्त करून देते.

'अन्वारंभयणीया' इष्टीच्या सांगतेसाठी गाईबैलांच्या दोन जोड्या दक्षिणा म्हणून द्याव्यात.अशा प्रकारची दक्षिणा यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होते. (अनुवाक १).

इंद्राच्या मुखातून विशिष्ट असे काही मंत्र आपणास ऐकावयास मिळावेत, अशा इच्छेने वसिष्ठप्रभृति काही ऋषी इंद्राकडे गेले. परंतु वसिष्ठाखेरीज कोणाला इंद्र प्रत्यक्ष भेटला नाही. वसिष्ठ एकटेच इंद्राला भेटू शकले. तेव्हा इंद्र त्यांना म्हणाला, हे वसिष्ठ मुने, ज्या योगाने सर्व प्रजा तुझ्या पुरोहितत्वाखाली, तुझ्या आज्ञेनुसार वागणाऱ्या निपजतील अशा प्रकारचे सोमयागातील ब्रह्मत्व करणाऱ्या ऋत्विजाला उपयुक्त होणारे मंत्र प्रतिपादन करणारे 'ब्राह्मण' म्हणजे सोपपत्तिक विवेचन मी तुला सांगतो. मात्र ते ऐकल्यावर अनधिकारी अशा इतर तुझ्याबरोबर आलेल्या ऋषींना मुळीच सांगू नको. ह्यानंतर पुढे सांगण्यात

येणारे 'स्तोमभाग' संज्ञक विशिष्ट मंत्र व त्यांचे सोपपत्तिक विवेचन इंद्राने वसिष्ठ ऋषींना सांगितले आणि त्या मंत्रांच्या प्रभावाने सर्व प्रजा वसिष्ठाला आपला पुरोहित म्हणजे पुरस्कर्ता म्हणून मानावयास लागून त्याच्या आज्ञेत वागणाऱ्या निपजल्या. यासाठी सोमयाग करू इच्छिणाऱ्या पुरुषाने वसिष्ठाच्या कुलात उत्पन्न होऊन ज्याने परंपराप्राप्त असे 'स्तोमभाग' संज्ञक मंत्रांचे ज्ञान संपादन केले आहे अशा ब्राह्मणाला, निदान वसिष्ठांच्या परंपरेतूनच ज्याने 'स्तोमभाग' मंत्रांचे पध्दतशीर ज्ञान मिळविले आहे, अशा वसिष्ठकुलेतर ब्राह्मणाला 'ब्रह्मा' करावा. म्हणजे तो यजमान सर्व प्रजांना आपल्या पुरस्कर्तृत्वाखाली वागविणारा होतो.

'हे आदित्य देवा, तू उज्वल अशा किरणांनी युक्त आहेस. देवांच्या संघासाठी मी तुझे स्मरण करीत आहे. यास्तव, देवांच्या संघाला तू संतुष्ट कर', अशा अर्थाचा 'स्तोमभाग' संज्ञक मंत्र म्हणून ब्रह्माने सामगायक ऋत्विजांना सामगान करण्याची आज्ञा द्यावी. देव हेच 'क्षय' म्हणजे संघ करून राहणारे आहेत. यास्तव, पूर्वोक्त 'स्तोमभाग' मंत्र म्हटल्याच्या योगाने ब्रह्माने देवांनाच जणू काय यज्ञाचे निवेदन केल्याप्रमाणे होते. 'हे धर्माभिमानी देवा, तू प्राणिमात्रांची प्रगती करणारा आहेस. स्वधर्मानुसार वर्तन करणाऱ्या मनुष्याच्या हितासाठी मी तुझे स्मरण करीत आहे. तर तू स्वधर्मानुसार वर्तणूक करणाऱ्या मनुष्याला संतुष्ट कर' असा 'स्तोमभाग' मंत्र म्हणून सामगान करण्याची आज्ञा द्यावी. कारण, मनुष्येच धर्माचरणामुळे मूर्तिमंत धर्मस्वरूप होत असतात. यास्तव पूर्वोक्त स्तोमभागाच्या पठणाने मनुष्यांनाच जणू काय ब्रह्माने यज्ञविषयक वृत्त कथन केल्यासारखे होते. 'हे द्युलोकाभिमानी देवा, देवांच्याविषयी आपल्या मनाची गती अनुकूलतेने ठेवणारा तू आहेस. म्हणून देवांची वस्ती असणाऱ्या द्युलोकाच्या कल्याणासाठी मी तुझे स्मरण करीत आहे. यास्तव, त्या द्युलोकाला तू संतुष्ट ठेव,' अशा अर्थाच्या स्तोमभाग मंत्राचे पठण करावे. म्हणजे ब्रह्माने जणू काय पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तिन्ही लोकांना यज्ञाचे निवेदन केल्यासारखे होते. 'हे वृष्ट्यभिमानी देवा, तू विशेषत्वाने उदकाचे धारण करणारा आहेस. वृष्टीसाठीच मी तुझे स्मरण केले आहे. यास्तव, तू वृष्टीला सुखरूप कर,' अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र म्हणावा. म्हणजे ब्रह्माने जणू काय प्राणिमात्राच्या जीवनास आवश्यक अशा वृष्टीलाच जवळ केल्याप्रमाणे होते. 'हे दिवसाभिमानी देवा, तू सर्व जगाला इकडून तिकडे 'प्रवास' करावयास लावणारा व हे

रात्र्यभिमानी देवा, प्रवास थांबवून त्याला स्वस्थ निजावयास लावणारा आहेस', असा अर्थ असलेला स्तोमभाग मंत्र पठण करावा. कारण सर्व स्त्रीपुरुष दिवसा इकडे तिकडे फिरतात व रात्री त्यांचा संयोग होत असतो. यास्तव, ह्या स्तोमभागाचे पठण केले असता, दिवस व रात्र या दोहोंचे 'मिथुनत्व' म्हणजे यथायुक्त असा संयोगच घडवून आणल्यासारखे होते. 'वसु इत्यादि देवगणांचा पालक असणाऱ्या हे देवा, तुझीच इच्छा सर्वांनी करावी असा तू आहेस, वस्वादि देवगणांच्या करिताच मी तुझी आठवण करीत आहे, यास्तव, तू वसुप्रभृति देवगणांना संतुष्ट कर,' अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र म्हणावा. वसूंचे आठ, रुद्रांचे अकरा व आदित्यांचे बारा गण आहेत. व या एकतीस गणांतच सर्व देव अंतर्भूत झालेले आहेत. पूर्वोक्त स्तोमभाग म्हटला असता ब्रह्माने जणू काय त्या वसुप्रभृति देवांनाच यज्ञ निवेदन केल्यासारखे होते. 'हे पितृपालक देवा, तू बलरूप आहेस. पितरांच्यासाठीच मी तुझे स्मरण करीत आहे, तर तू पितरांना संतुष्ट कर' अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र ब्रह्म्याने म्हणावा म्हणजे त्याने जणू काय देवांचे व पितरांचे यथायुक्त असे संयोजन केल्यासारखे होते. ' हे प्रजाभिमानी देवा, तू पुत्रपौत्रादि प्रजेचा विस्तार करणारा जणू तंतूच आहेस, प्रजांच्या हितासाठीच मी तुझे आता स्मरण केले आहे, यासाठी आमच्या पुत्रपौत्रादि प्रजांना तू संतुष्ट कर,' असा अर्थ व्यक्त करणारा स्तोमभाग पठण करावा. म्हणजे ब्रह्म्याने जणू काय पितरांचे आणि प्रजांचे नैरंतर्य म्हणजे दृढ संघटनच करून दिल्यासारखे होते. 'पशुपालका हे देवा, तू शत्रूसैन्याची पीछेहाट करणारा आहेस, पशूंच्या कल्याणाकरिताच तुझी मी आठवण केली आहे, तर, परकीयांच्यापासून आमच्या पशूंचे रक्षण करून तू त्यांना संतोषित कर', अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र म्हटला असता, ब्रह्म्याने जणू काय प्रजा व पशू यांचे चिरकालीन सातत्य घडवून आणल्यासारखे होते. 'ओषधींचे पालन करणाऱ्या हे देवा, तू धनसंपन्न आहेस. ओषधींच्या अभिवृध्दी करता तर मी तुझे यांवेळी स्मरण करीत आहे. यास्तव सर्व ओषधींना तू सुखाने वाढीव,' असा अर्थ व्यक्त करणारा स्तोमभागमंत्र म्हटला म्हणजे ब्रह्म्याने जणू काय, सर्व प्रकारच्या ओषधींच्या ठिकाणी पशूंना स्थापन केल्यासारखे होते. ' हे वज्रा, तू एकत्र झालेल्या अनेक वरवंट्यांच्या इतका कणखर आणि म्हणूनच सर्व ठिकाणी निश्चयाने जय मिळविणारा आहेस. इंद्राचे व तुझे सान्निध्य व्हावयासाठीच तुझे मी

स्मरण करीत आहे. यास्तव, तू इंद्राला सदैव संतुष्ट कर,' अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र म्हणावा. म्हणजे ब्रह्म्याने जणू काय आपल्या यजमानाला शत्रूंवर विजय मिळवून देणाऱ्या वज्रधारी इंद्राच्या अनुग्रहाचाच लाभ मिळवून दिल्याप्रमाणे होते. 'प्राणांचा अभिमानी असणाऱ्या देवा, तू पंचप्राणांचा अधिपती आहेस. माझ्या प्राणाच्या म्हणजे पांचही प्राणांच्या समुदायाच्या हितासाठीच मी तुझे स्मरण करीत आहे. तर, तू माझ्या प्रत्येक प्राणाला संतुष्ट कर', अशा अर्थाचा मंत्र म्हणावा. म्हणजे त्या ब्रह्म्याने सर्व प्रजांच्या ठिकाणी पंचप्राणांची यथायुक्त स्थितीच निर्माण केल्यासारखे होते. 'स्त्रीपुरुषांचा मिथुनीभाव म्हणजे रतिसंभोग घडवून आणणाऱ्या हे देवा, तू त्रिगुणात्मक म्हणजे पुरुष, स्त्री व त्यांना संयोग अशा तीन अवस्थांनी युक्त आहेत. आणि म्हणूनच तू स्त्रीपुरुषांना मैथुनाकडे प्रवृत्त करीत असतोस', असा अर्थ असलेला स्तोमभाग म्हणावा म्हणजे ब्रह्माने यजमानाचे व त्याच्या पत्नीचे मिथुनत्वच जणू संपादन केल्यासारखे होते. 'मैथुनप्रसंगी यथायुक्त हालचाल करणाऱ्या जननेंद्रियाचा अधिष्ठाता असणाऱ्या हे प्रजापते, तू संरोह आहेस. पुरुषाचे वीर्य व स्त्रीचे रक्त यांच्या योग्य मिश्रणाने गर्भाला व्यक्तदशेस तूच आणतोस. 'नीरोह' देखील तूच आहेस. कारण, व्यक्त झालेल्या गर्भाच्या ठिकाणी सर्व अवयवांचे व्यक्तीकरण तूच करीत असतोस', या अर्थाचा स्तोमभाग म्हणावा. म्हणजे ब्रह्म्याने यजमानाकडून प्रजांचे संपादन करविल्यासारखे होते. 'हे प्रजाभिमानी देवा, तू प्रजांचे सुखाने वास्तव्य करणारा आहेस. प्रत्येक माणसाला अवश्य अशा वेषाला साजेल अशी संपत्ती तू मिळवून देणारा आहेस आणि त्याचप्रमाणे कर्तबगार माणसाला तू सर्वव्यापी होण्याला समर्थ करणारा आहेस,' अशा अर्थाचा स्तोमभाग मंत्र म्हणावा म्हणजे त्या ब्रह्म्याने यजमानाच्या ठिकाणी सर्व प्रकारच्या प्रतिष्ठेचे संपादन केल्यासारखे होते. (अनुवाक २).

अग्निदेव, 'गायत्री' छंद, 'त्रिवृत्' स्तोम, रथंतर साम आणि वषट्काररूपी वज्र यांच्या कृपेने मी शत्रूंच्या सर्व सैन्याचा पराभव करीन आणि आमच्या वाडवडिलांच्या पासून आमच्याशी परंपरागत एकसारखे शत्रुत्व करणाऱ्या दुष्ट लोकांना मी जमीनीवर लोळवीन. त्यांचा चोहीकडे अपमान होईल अशाप्रकारे मी त्यांच्या पायात श्रृंखला अडकवून त्यांचा छळ करीन. त्यांच्यापैकी प्रत्येकाला ठार करीन. इतकेच नव्हे, तर माझ्या ह्या राहत्या घरात, फार तर काय पण या भूलोकामध्ये जो कोणी आमचा द्वेष करीत असेल आणि आम्ही

ज्याचा द्वेष करीत असतो अशा कोणाही शत्रूच्या मस्तकावर विष्णुस्वरूप असा मी यजमान आपले पाऊल ठेऊन पुढे चाल करीन.

इंद्रदेव, 'त्रिष्टुप्' छंद, 'पंचदश' स्तोम, 'बृहत्' साम आणि वषट्काररूपी वज्र यांच्या अनुग्रहाच्या बळावर मी सर्व शत्रुसेनेचा पराजय करीन. आणि माझ्या सापत्न मातेच्या चिथावणीने माझ्याशी वैर करणाऱ्या सहज शत्रूंना मी धुळीस मिळवीन.

सर्वदेव, 'जगती' छंद, सप्तदश स्तोम, 'वामदेव्य' साम आणि वषट्काररूपी वज्र यांच्या प्रसादाने मी शत्रूंच्या सर्व सैन्याचा नि:पात करीन. आणि अलीकडे माझ्या कार्यात निष्कारण लुडबूड करून माझ्या कार्याचा बिघाड करणाऱ्या नवीन शत्रूंना मी रसातळास नेऊन पोचवीन. परमोच्च अशा ऐश्वर्याने युक्त अशा आहवनीयरूपी इंद्राशी सख्य संपादन केलेले आम्ही आमच्यावर आक्रमण करू इच्छिणाऱ्या शत्रूंचे सर्व आघात लीलेने सहन करण्यास समर्थ होऊ. आणि ज्या योगाने ते पुन्हा केव्हाही आमच्याशी प्रतिकूलतेने वागणार नाहीत अशा प्रकारे त्या शत्रूंना आम्ही चांगलेच ठोकून काढू.

हे अग्निदेवा, तुझे जे कांतिरूप तेज आहे, त्या तेजाने मीही कांतिमान् होईन. हे अग्निदेवा, तुझ्या ठिकाणी जे बल आहे, त्या बलाने मी बलिष्ठ होईन. आणि हे अग्निदेवा, तुझे जे किरणरूप तेज आहे, त्या तेजाने मी तेजस्वी होईन. (अनुवाक ३).

१ यज्ञांतील हविर्भागाला पात्र नसलेले, आणि त्यामुळेच आमच्या यज्ञशाळेची जाळपोळ करून यज्ञाचा विध्वंस करणारे, व ग्रह, चमस, सोमरस इत्यादि यज्ञसाधने चोरून नेऊन आमच्या यज्ञात विघ्न आणणारे असे जे काही देव या भूतलावर राहत असतील त्या देवांच्यापासून अग्निदेव माझे संरक्षण करो. यज्ञाचे उत्कृष्ट रीतीने अनुष्ठान करणारे आम्ही यज्ञफलाला प्राप्त होऊ. २ श्रेष्ठ अशा हे मित्रावरुणहो, यज्ञकर्मात व्यतीत होणाऱ्या अनेक रात्रींपैकी आजच्या रात्री तुम्हा दोघांचा वशा व अनुबंध्या संज्ञक पशुयागसंबंधी जो हविर्भाग असतो, तो आम्ही तुम्हा दोघांनाही अर्पण केला असल्यामुळे सुकृतरूप असा हा यज्ञ जेथे झाला, त्या पृथिवीपासून तिसऱ्या टप्प्यावर असणाऱ्या द्युलोकाच्या पृष्ठभागी अर्थात् अत्यंत उज्वल भासणाऱ्या स्वर्गलोकाच्या ठिकाणी दु:खरहित व शाश्वत असे सुख भोगण्यासाठी आताच जणू आम्ही

येऊन पोचलो आहोत. ३ यज्ञाचा विघात करणारे व यज्ञसाहित्य चोरून नेणारे असे जे देव अंतरिक्षलोकात राहत असतील त्यांच्यापासून वायुदेव माझे संरक्षण करो. यज्ञाचे यथार्थ अनुष्ठान केलेले आम्ही यज्ञफलाला प्राप्त होऊ. ४ हे सर्वप्रेरका, देवा सवित्या, द्युलोक व पृथिवी यांच्या मध्ये दीक्षणीयासंज्ञक इष्टीपासून सोमरसाचे यजन केले जाणाऱ्या मुरव्य दिवसांपर्यंत देवांची एकसारखी ये, जा, चालत असणाऱ्या ज्या रात्री व्यतीत होत असतात, त्या सर्व रात्रींच्या ठिकाणी अवश्य असे ते ते कर्मानुष्ठान उत्तम रीतीने केलेले आम्ही आमच्या घरी असणाऱ्या पुत्रपौत्र व चाकरलोक इत्यादिकांच्या सह स्वर्गलोकी येऊन पोचलेले आहोत. यास्तव, सवितृप्रभृति सर्व देवहो, आम्हा यजमानांना तुम्ही मनोरंजक अशी सर्व सुखे प्राप्त करून द्या. ५ कापटयाने आमच्या यज्ञाचा नाश करणारे आणि यज्ञातील साहित्याची चोरी करून आमच्या यज्ञात विघ्न उपस्थित करणारे जे काही देव द्युलोकात राहत असतील त्यांच्या पासून सूर्यदेव माझे संरक्षण करो. उत्कृष्ट प्रकारे यज्ञानुष्ठान केलेले आम्ही यज्ञफळाला अवश्य प्राप्त होऊ. ६ सर्वज्ञ अशा हे अग्निदेवा, उत्कृष्ट अशा हविर्द्रव्यरूपाने अनेक प्रकारचे क्षीररस व स्वादिष्ट असे सोमरस तू इंद्राला माझ्या यजमानाच्या विज्ञप्तीवरून पोचते केलेस त्या उत्कृष्ट हविर्द्रव्यांच्या समूहाने तू ह्या यजमानाला वृध्दिंगत कर. ७ जो यजमान यज्ञामध्ये ऋत्विजांना दक्षिणा देतो, त्याच्या गाई इत्यादि दक्षिणाद्रव्याचा अपहार करणारे व जो यजमान यज्ञामध्ये देवांचे यजन करतो, त्याच्या ग्रहचमसादि यज्ञासाहित्याची तोड मोड करून त्याला छळणारे असे यज्ञविघाती व यज्ञातील साहित्याचे लुटारू असे जे देव असतात ते ह्या पृथिव्यादि तीन लोकांतच राहत असतात. 'यज्ञाचा विघात करणारे जे देव ह्या पृथ्वीवर राहत असतात, जे अंतरिक्षात राहतात आणि जे द्युलोकात राहत असतात,' अशा प्रकारचा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'अतिमोक्ष' संज्ञक मंत्रांचा जो जप करतो, तो यजमान त्या मंत्रांच्या प्रभावाने ह्या तिन्ही लोकांतून उत्तीर्ण होऊन आपली स्त्री, आपले पुत्र व पशू इत्यादिकांच्या सह स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

जो यजमान सोमयाग करतो, त्याच्यापासून देवता व यज्ञ दूर निघून जातात. कारण, आता या यजमानाशी आपले काही काम राहिले नाही असे त्यांना वाटत असते. यास्तव, देवता व यज्ञ हे यजमानापासून दूर

जाऊ नयेत म्हणून शेवटच्या 'उदवसानीया' नामक इष्टीमध्ये अग्निदेवतेच्या उद्देशाने पांच कपालांच्या समुदायावर भाजून तयार केल्या जाणाऱ्या पुरोडाशाचा निर्वाप करून त्याचे यजन करावे. कारण, अग्नी हा सर्वदेवतात्मक आहे. आणि यज्ञ हा पांक्त म्हणजे धाना, करंभ, परिवाप, पुरोडाश व पयस्या म्हणजे आमिक्षा ह्यां पांच हविर्द्रव्यांच्या पंक्तीने युक्त आहे. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे सर्वदेवतात्मक अग्नीला, पांच कपालांच्या पंक्तीवर तयार केलेला अर्थात् पांक्त असा पुरोडाशरूप हवी अर्पण केला असता, यजमानाने जणू काय देवता आणि यज्ञ या दोघांनाही आपल्या सन्निध ठेवल्यासारखे होते.

प्रजापतीच्या मुखापासून अग्नी व गायत्रीछंद यांची उत्पत्ती झाली असल्यामुळे अग्नी हा गायत्र म्हणजे गायत्रीछंदसंबध्द आहे. यास्तव, पंचकपालात्मक पुरोडाशाने जर त्याचे यजन केले तर त्याच्या स्वकीय अशा गायत्री छंदापासून त्याची ताटातूट केल्यासारखे होते. यास्तव, अग्निदेवतेसाठी पंचकपालात्मक पुरोडाश न करता अष्टकपालात्मक म्हणजे आठ कपालांच्या गटावर भाजला जाणारा पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. गायत्री छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने अष्टाक्षरी असून अग्नी हा गायत्री छंदाशी संबध्द असल्यामुळे तो जणू गायत्रछंदस्वरूप आहे. अर्थात् अष्टाकपालात्मक पुरोडाशाचे यजन करून अग्नीला संतुष्ट केले असता, तो स्वकीय अशा छंदाच्या द्वारे यजमानाला सर्वतोपरी समृध्द करतो. ह्या यजनाचे प्रसंगी पंक्तिछंदात्मक ऋचा याज्या-पुरोनुवाक्या म्हणून उपयोगात आणाव्यात. म्हणजे ते यजनही पांक्त होते व त्यामुळे पांक्तस्वरूप अशा यज्ञापासून यजमानही वियुक्त होत नाही. म्हणजे यज्ञ यजमानाला सोडून जात नाही. (अनुवाक ४).

१ आदित्यग्रहरूपी हा सूर्यदेव यज्ञविघात करणाऱ्या देवांच्यापासून माझे रक्षण करो. यज्ञाला विघ्न करणारे देव जेथे राहतात त्या अंतरिक्षापासून वायुदेव माझे रक्षण करो. आणि यज्ञाचा जणू यजमान असा अग्निदेव आमचा विरोध करणाऱ्या देवांच्या पापी दृष्टीपासून माझे रक्षण करो. हे सोमदेवा, योग्य असेल त्याचीच संगत करणारा, अयोग्य असेल त्याला तोडून टाकणारा सर्वप्रेरक आणि सर्व मनुष्यांच्या वर अनुग्रह करणारा तू असल्यामुळे तुझ्या ठिकाणच्या गुणांची निदर्शक अशा हे सक्ष, हे शूष, हे सवितः व हे विश्वचर्षण, ह्या तुझ्या चारही नांवांची तुला मोठ्या प्रेमाने आळवून मी तुझी सेवा

करीत आहे. आणि सूर्य, वायू व अग्री ह्या तुझ्या पूर्वोक्त तिन्ही नांवांनीही मी तुझी उपासनारूप सेवा करीत आहे. २ मी ह्या आदित्यसंज्ञक ग्रहाला अलीकडून आणि पलीकडून दोन्ही बाजूंनी हस्तस्पर्श केला आहे. आदित्यग्रहाच्या प्रकाशाने मी अंधकाराचे विशेषतः निवारण केले आहे. ह्या 'आदित्य' संज्ञक ग्रहपात्राचा अंतरिक्षरूप असा मी हाती धरलेला मध्यभाग तर पित्याप्रमाणे जणू माझा पालकच झाला आहे. मी ह्या आदित्यग्रहरूपी सूर्याला खालून आणि वरून दोन्ही बाजूंनी पाहिला आहे. आणि म्हणूनच माझ्या बरोबरीच्या सर्व यजमानांमध्ये मी श्रेष्ठतेला प्राप्त होईन. ३ सृष्टिकर्ता प्रजापती ह्या समुद्रासमान असलेल्या आदित्यग्रहाला या पृथ्वीच्या चारही दिशांना वेढून राहिलेल्या समुद्रांपर्यंत चालवितो आणि वर अंतरिक्षापर्यंतही चालवितो. गाईच्या कासेला पान्हा फुटतो तसा इंद्रदेव ह्या आदित्यग्रहाला पान्हा फोडो. आणि मरुत् देव मेघांतून पर्जन्याच्या एकसारख्या धारा पडाव्यात त्याप्रमाणे ह्या आदित्यग्रहातून सोमरसाच्या अखंड धारा पाडवोत. ४ हे आदित्य देवा, पर्जन्यवृष्टीच्या योगाने सारी पृथ्वी भिजवून चिंब कर. द्युलोकात असलेल्या मेघाच्छादित गगनमंडलाचा तू भेद कर. आणि द्युलोकात साठून राहिलेल्या उदकाची तू आम्हाला समृध्दी प्राप्त करून दे. सर्वकार्यसमर्थ असा तू पाण्याने तुडूंब भरून राहिलेली ही मेघरूपी पखाल मोकळी कर. ५ पशुप्राप्तीला कारणभूत असल्यामुळे आदित्यग्रह हा जणू काय पशुसमुदायरूपच असून हा अग्री म्हणजे जणू क्रूर असा रुद्रदेवच आहे. यास्तव, आदित्यग्रहातील सोमरसाची आहुती देण्यापूर्वी अग्रीवर थोडेसे दर्भ टाकावेत आणि मग आदित्यग्रहातील सोमरसाची आहुती द्यावी. असे केल्याच्या योगाने रुद्ररूपी अग्रीपासून आदित्यग्रहरूपी पशूंना दडवून ठेवल्यासारखे होते. आणि ओषधींच्या ठिकाणी पशूंनाही प्रतिष्ठित केल्याप्रमाणे होते. ५ हे अग्रिदेवा, कर्मानुष्ठानाचा ज्ञाता, यजमानाला स्वर्गीय फल मिळवून देणारा व देवांचा दूत असलेला तू आम्ही अर्पण केलेले हविर्द्रव्य देवांना पोचते करण्यासाठी येथून निघाल्यानंतर ज्या मार्गाने जात असतोस तो द्युलोकाच्या पृष्ठभागावर असणारा अत्यंत देदीप्यमान अशा स्वर्गलोकाचा मार्ग, हा ग्रहरूपी आदित्य रुंद करतो. ६ हे अग्रिदेवा, भूलोकाच्या ठिकाणी असणाऱ्या यज्ञस्थळी आणि सूर्याच्या ठिकाणी तुझ्या ज्या अत्यंत प्रदीप्त होणाऱ्या ज्वाला आहेत, त्या सर्वच ज्वाला आम्ही दिलेल्या घृताहुतीपर्यंत जाऊन पोचोत. आणि देवांची आपल्यावर कृपा व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानाला

सुख देवोत. ७ हे 'यूप'स्तंभा, बृहस्पती देवाने यजमानाला अनेक प्रकारची धने मिळावीत म्हणून त्याच्या स्वाधीन केलेला तू उत्कृष्ट भोगसामर्थ्याने युक्त, उत्तमोत्तम अश्वांच्या सहित व भरपूर असे धन यजमानाला व मला मिळावे अशी देवांची प्रार्थना करीतच येथे उभा रहा. (अनुवाक ५).

१ हे यजमानपत्नी, यज्ञाचे कामी लागणारे दूध व तूप तुझ्याकडून वेळच्या वेळी आम्हास दिले गेले पाहिजे, या गोष्टीची तुला पक्की आठवण रहावी म्हणून मी तुझ्या कमरेला हे दर्भाचे योक्त्र बांधीत आहे. आम्हाला लागेल ते वेळी निरनिराळी धान्ये आणि उदक यांचा पुरवठा करण्याची विस्मृती तुला होऊ नये, यासाठीच मी तुला या योक्त्राचे बंधन घालीत आहे. तुझ्या पुत्रपौत्रादि प्रजेकडूनही चालू असलेल्या यज्ञकार्यात योग्य ते साहाय्य होईल अशी दक्षता घेण्याचीही काळजी तू घ्यावीस याकरता मी या यज्ञाचा अध्वर्यू आज या यजनकर्मामध्ये या योक्त्राचा कमरपट्टाच तुला घालीत आहे. स्वकर्तव्याविषयी बध्दपरिकर झालेली ही यजमानपत्नी आम्हाला भरपूर अन्न देण्याची दीक्षा ग्रहण करो. २ यज्ञकर्त्या ब्राह्मणाची पत्नी पत्नीशाळेतून सत्वर बाहेर निघो आणि वेदीमध्ये जाऊन बसो. ३ मी वेदीपर्यंत तर आले. आता मी यज्ञाचा यजमान असलेल्या माझ्या पतीच्या इच्छेनुसार वागण्याची इच्छा असलेली मी माझ्या या स्थानावर बसत आहे. ४ हे अग्निदेवा, सद्गुणाने शोभणाऱ्या अपत्यांनी युक्त आणि आमच्या पतींना अनुरूप अशा सुपत्नी म्हणजे सुगृहिणी झालेल्या आम्ही, कोणाकडूनही तिरस्कृत न होता सर्वांच्या आदराला पात्र होऊन वैऱ्यांचा नाश करणाऱ्या व कोणाकडूनही तिरस्कार न केल्या जाणाऱ्या तुझ्याजवळ येऊन बसलो आहोत. ५ शोभन ज्ञानाने युक्त असणाऱ्या, अंतर्यामी आणि सर्वकर्मप्रेरक अशा सवितृदेवाकडून जो हा योक्त्ररूप वरुणाचा पाश पूर्वी मला बांधण्यात आला होता तो आता मी मोकळा करीत आहे. त्या योगाने सुकृताचे जणू फलच अशा उत्तम लोकात, परमेश्वराच्या सन्निध बसून मी पतीसह सुखाचा उपभोग घेईन. ६ हे पत्नी, तू आता येथून उठून पन्नेजनी या नांवाची स्थाली आणण्यासाठी त्वरेने चालू लाग. ऊठ, उशीर करू नकोस. यज्ञाचा प्रेरक असा हा अग्निदेव तुझ्या जाण्याला अनुमोदन देऊन तुला पुढे पाठवो. अखंडनीय अशी भूमाता तुला इकडे तिकडे न जाऊ देता सरळ मधला मार्ग दाखवून देवो. क्रूर स्वभाव असल्यामुळे सदैव उपद्रव देणाऱ्या रुद्राने तुला जाण्याला

पूर्ण मोकळी केली आहे. तो तुला कसलाही उपद्रव देणार नाही. कारण उपद्रव देण्याला पात्र अशा स्त्रियांच्याहून तू निराळी आहेस, हे तो जाणतो. तुझी योग्यता यथार्थ जाणणाऱ्या मज नेष्ट्याला तू कसलाही त्रास होऊ देऊ नकोस. ७ हे उदकांनो, वसू, रुद्र, आदित्य व विश्वेदेव यांच्यासाठी मी तुम्हाला या पन्नेजनी नांवाच्या स्थालीत भरून घेत आहे. यज्ञानुष्ठानाच्या उपयोगासाठीच मी तुम्हाला पन्नेजनी स्थालीत भरून घेत आहे. ८ हे उदकांनो, वसू आदि देवतांच्यासाठी व यज्ञाच्या उपयोगाकरिता पन्नेजनी स्थालीत भरून घेतलेल्या तुम्हाला मी या ठिकाणी ठेवीत आहे. ९ हे अग्निदेवा, विश्वात्मक, अखिल विश्वाला प्रिय आणि अत्यंत बलशाली अशा तुज देवाच्या कृपाकटाक्षाने अत्यंत सुंदर व रमणीय अशा यज्ञानुष्ठानाचा प्रवर्तक असलेला मी पुष्कळ पुत्रांच्या प्राप्तीला कारणभूत होणारी सर्वच वीर्ये पत्नीच्या ठिकाणी स्थापन करीन. १० हा यज्ञ देवांच्यापर्यंत जाऊन पोहचो. देदीप्यमान अशा उदकांनी आमचा हा यज्ञ देवांच्या जवळ अगदी मुक्त कंठाने वाखाणला आहे. सोमवल्ली कुटून देवांच्यासाठी तिचा रस काढणाऱ्या यजमानाच्या ठिकाणी स्वाहाकार मंत्राने संपादन केलेली स्वर्गलोक विषयक अशी सर्व फळे अनुक्रमाने चालत येवोत. यज्ञांचा सर्वथैव प्रवर्तक असलेल्या वायुदेवाची प्रेरणा झाल्यानंतर फलसाधनभूत व सामगायक उद्गात्यांनी गाईलेले सर्व स्तोत्रविशेष गंधर्वांप्रमाणे मला प्रिय असलेल्या माझ्या यजमानाला प्राप्त होवोत. (अनुवाक ६).

'वषट्कार' मंत्राच्या अधिष्ठात्या देवाने काही विरोधामुळे गायत्रीचा शिरच्छेद केला. तेव्हा गायत्रीच्या शरीराच्या विच्छिन्न झालेल्या भागातून जो रस म्हणजे रक्त भूमीवर सांडले, त्यापासून 'खैर' या नांवाचा वृक्ष उत्पन्न झाला. यास्तव, होमासाठी 'स्रुवा' जो करावयाचा, तो खैराच्या लाकडाचा करावा. म्हणजे त्या स्रुव्याने जे अवदान भरून घेतले जाते, ते सर्व गायत्री छंदाच्या रसानेच भरून घेतल्याप्रमाणे होते. आणि त्यामुळे यजमानाने दिलेल्या आहुती सरस, म्हणजे रसभरित होतात.

या भूलोकापासून तिसऱ्या, अर्थात् द्युलोकाचे ठिकाणी पूर्वी वल्लीरूप 'सोम' होता. तो गायत्रीने ह्या भूलोकावर आणला. तो आणीत असतांना त्याचे एक पान जमीनीवर पडले. आणि त्या पानापासून 'पळस' नांवाचा वृक्ष उत्पन्न झाला. पर्णापासून उत्पन्न झाला असल्यामुळे त्या वृक्षाला 'पर्ण'

हेच नांव प्राप्त झाले. पर्णापासून उत्पन्न होणे हेच त्या पर्ण वृक्षाचे 'पर्णत्व' म्हणजे स्वाभाविक स्वरूप होय. यासाठी ज्या यजमानाची 'जुहू' नांवाची स्रुची सोमाच्या पानापासून उत्पन्न झालेल्या पर्ण वृक्षाची, अर्थात् पळसाच्या लाकडाची केलेली असते, त्या यजमानाच्या जुहूने अग्नीच्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सर्व आहुती जणू काय सोमरसरूपच होतात व त्या आहुती देव मोठ्या प्रेमाने सेवन करतात.

देवांनी 'ब्रह्म' तत्त्वासंबंधी एकमेकांमध्ये जेव्हा पळसाच्या वृक्षाच्या सावलीत बसून वादविवाद केला, तेव्हा त्यांचे सर्व भाषण पळसवृक्षाभिमानी देवाने एकाग्रतेने ऐकले. तेव्हापासून त्याला 'सुश्रवा' म्हणजे 'उत्कृष्ट असा तत्त्वसंवाद ऐकणारा' असे नांव पडले. यास्तव, ज्या यजमानाची 'जुहू' पळसाच्या लाकडाची केलेली असते तो यजमान कोणाच्याही मुखातून आपली निंदा कधीही ऐकत नाही. सर्व उत्तमप्रकारची स्तुतीच ऐकतो.

पर्ण किंवा पळस हा ब्रह्मरूप आहे व वैश्य जातीचे अभिमानी असल्यामुळे 'मरुत्' नांवाचे देवही वैश्यरूप आहेत. शेतकी करणाऱ्या वैश्यांनी संपादन केलेले अन्न हे देखील वैश्यरूपच होय. अश्वत्थ वृक्ष हा जणू मरुतांचे ओज म्हणजे बल आहे, असा श्रुतीमध्ये अर्थवाद असल्यामुळे अश्वत्थ किंवा पिंपळाचा वृक्ष हा 'मरुत्' म्हणजे मरुद्रूपच समजावा. म्हणून जो यजमान पळसाच्या लाकडाची 'जुहू' तयार करतो, त्याने 'उपभृत्' नांवाची स्रुची पिंपळाच्या लाकडाची करावी. जुहूस्वरूपी ब्राह्मणाकडून उपभृत्स्वरूपी वैश्यांचे वैश्यरूप असे हविर्द्रव्यरूपी अन्न ग्रहण केल्यासारखे होते व वैश्यजातीवर ब्राह्मणांचे वर्चस्व स्थापन केल्याचेही श्रेय मिळते. पर्ण म्हणजे पळसाचा वृक्ष हा राष्ट्रस्वरूप आहे. कारण, वृक्षामधला तो ब्राह्मण आहे व ब्राह्मण हे सर्व राष्ट्राचे मार्गदर्शक असल्यामुळे पळस हा राष्ट्रस्वरूप मानणे सयुक्तिक होय. अश्वत्थवृक्ष हा मरुत्संबध्द असल्यामुळे तो वैश्यरूप आहे. यास्तव, पळसाच्या लाकडाची जुहू व पिंपळाच्या लाकडाची उपभृत् असली म्हणजे ब्राह्मणरूप असे राष्ट्रच जणू वैश्यांच्या विपुलतेने प्रस्थापित म्हणजे सुसंघटित केल्यासारखे होते.

प्रजापतीने जेव्हा पूर्वी यजन केले त्यावेळी त्याने दिलेली आहुती जेथे पडली, त्या स्थानापासून विकंकत वृक्ष उत्पन्न झाला. व त्या वृक्षाच्या

लाकडापासून यज्ञसाधनभूत अशी पात्ररूपी प्रजा निर्माण झाली. यास्तव ज्या यजमानाची 'ध्रुवा' नामक स्रुची विकंकत नामक वृक्षाच्या लाकडाची केलेली असते त्या यजमानाच्या सर्व आहुती प्रतिष्ठितपणाला प्राप्त होतात आणि तो यजमान आपल्या ठिकाणी प्रजा उत्पन्न करतो.

सारांश, याप्रमाणे जुहू, उपभृत् व ध्रुवा ह्या तीनही स्रुचांचे स्वरूप आहे. यास्तव ज्या यजमानाच्या स्रुचा या स्वरूपाच्या असतात त्या यजमानाला गाई, घोडे इत्यादि सर्व स्वरूपाचे पशू प्राप्त होतात आणि त्या यजमानाच्या पोटी विरुध्द अशा स्वरूपाचे, अर्थात् कुरूप असे अपत्य केव्हाही उत्पन्न होत नाही. प्रत्येक अपत्य सुखरूप असेच उत्पन्न होते. (अनुवाक ७).

१ हे दधिरूपी हविर्द्रव्या, तू पार्थिव म्हणजे पृथ्वीवर उत्पन्न झालेल्या वृक्षाच्या लाकडापासून बनविलेल्या 'उपयाम' नांवाच्या पात्रात भरून घेतला जात आहेस. अत्यंत प्रकाशमान अशा प्रजापतिदेवाला अर्पण करण्यासाठी कर्तव्यदक्ष अर्थात् कर्मकुशल असतील त्यांना उत्तेजन देऊन वृध्दिंगत करणाऱ्या दक्षनामक देवाला अनेक कर दिल्या गेलेल्या आणि अग्निरूपी जिव्हेनेच हविर्द्रव्याचा रस चाखणाऱ्या, सत्याची चाड बाळगणाऱ्या, इंद्राला श्रेष्ठ मानणाऱ्या, वरुणाला आपला राजा समजणाऱ्या, वायूलाच आहार करणाऱ्या व पर्जन्यवृष्टीला सहन करणाऱ्या देवांना अनेकदा समर्पण करण्यात आलेल्या अत्यंत प्रकाशित अशा तुज दधिद्रव्याचे मी ग्रहण करीत आहे. द्युलोक, अंतरिक्ष व पृथ्वी या तीनही लोकांच्या संतोषासाठीही मी तुला या ग्रहपात्रात भरून घेत आहे. २ हे इंद्रदेवा मजजवळ असलेल्या धनादिकांच्यावर झडप घालून माझा नाश करणारा, माझे द्रव्य पळविण्यावरच तृप्त न राहता माझ्या प्राणाचा घात करण्यास टपलेला आणि माझ्या नडीचे वेळी मला देण्याजोग्या अनेक वस्तू जवळ असून देखील मला कधी एक सुध्दा वस्तू न देणारा, अशा तीनही प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारे माझ्याशी द्वेष करणारा जो शत्रू असेल त्याच्या मनोवृत्तीला तू नष्ट कर. माझ्याशी शत्रुत्व करू इच्छिणाऱ्यालाही तू मजपासून दूर कर. प्राण, अपान व व्यान ह्या तिन्ही वायूंना संतुष्ट करून त्यांचे आनुकुल्य संपादन करण्यासाठी, प्रवृत्तीचा लाभ आणि असत् मनोवृत्तीचा त्याग माझ्या ठिकाणी उत्पन्न होण्यासाठी, त्याचप्रमाणे, उदक, ओषधी, सर्व प्रकारची धान्ये मला प्राप्त व्हावी आणि विश्वामधल्या सर्व प्राण्यांचे प्रेम मला

संपादन करता यावे ह्या हेतूने विश्वांतील सर्व प्राण्यांना ऐश्वर्य प्राप्त करून देणाऱ्या अत्यंत देदीप्यमान अशा प्रजापती देवाला मी प्रकाशमान अशा तुज दधिद्रव्याची ही आहुती देत आहे. (अनुवाक ८).

सोमयागामध्ये पुष्कळच देवतांचे यजन करावयाचे असल्यामुळे अध्वर्यू आणि यजमान प्रमादामुळे ज्या देवतेला हविर्भागाची आहुती देण्याचे विसरतील त्या देवतेची व त्यांची ताटातूट होते. तसे न व्हावे, यास्तव प्रजापतिदेवतेच्या उद्देशाने दधिग्रहाचे ग्रहण करावे आणि त्याची प्रजापतीला आहुती द्यावी. प्रजापती हा सृष्टिकर्ता असल्याने तो सर्वदेवतारूपच आहे.

प्रजापतिदेवतेसाठी घेण्यात येणारा दधिग्रह इतर सर्व ग्रहांच्या अगोदर घेण्यात येत असल्यामुळे तो इतर ग्रहांच्याहून ज्येष्ठ आहे. ज्या यजमानाच्या यज्ञात प्रथम दधिग्रह घेतला जातो तो यजमान सर्वांच्या मध्ये प्रमुखत्वाला प्राप्त होतो. प्रजापती देवासाठी जो दधिग्रह घेतला जातो, तो जणू सर्व देवतांचे स्वरूपच आहे. यास्तव, ज्या यजमानाच्या सोमयज्ञात हा ग्रह घेतला जातो त्या यजमानाला गाई, घोडे इत्यादि सर्व स्वरूपाचे पशू प्राप्त होतात.

हे दधिग्रहा, तू उपयामसंज्ञक ग्रहपात्रात भरून घेतला जात आहेस. 'प्रकाशमान अशा प्रजापती देवाला अर्पण करण्याकरिता प्रकाशमान अशा तुज दधिग्रहाचे मी ग्रहण करीत आहे', इत्यादि अर्थाचा जो मंत्र दधिग्रह घेते वेळी अध्वर्यू म्हणत असतो त्या योगे तो जणू काय आपल्या यजमानाला तेजोयुक्तच करतो.

अग्निरूपी जिव्हेने हविर्द्रव्याचा रसास्वाद घेणाऱ्या व सत्याची चाड बाळगणाऱ्या देवाच्या करता तुला मी घेत आहे, असे अध्वर्यू म्हणत असतो. त्या योगाने ह्या मंत्रांत जितक्या देवता व्यक्त केल्या गेल्या आहेत तितक्या त्या सर्व देवतांच्यासाठीच जणू काय तो दधिग्रहाचे ग्रहण करतो. 'हे इंद्रा माझ्याशी द्वेष करणाऱ्या शत्रूचे माझ्यावर खिळून राहिलेले मन माझ्यापासून दूर कर', अशा अर्थाचा जो मंत्रांश अध्वर्यू म्हणतो तो यजमानाच्या शत्रूला त्याच्यापासून दूर करण्याला कारणभूत होतो. माझ्या प्राणाकरिता व अपानाकरता तुला घेत आहे, असे अध्वर्यू म्हणतो म्हणजे तो जणू काय यजमानाच्या ठिकाणी प्राणांचे यथायुक्त धारणच करतो. विश्वातील सर्व प्राण्यांना ऐश्वर्य देणाऱ्या व अत्यंत देदीप्यमान अशा त्या प्रजापती देवाला प्रकाशमान अशा

तुज दधिग्रहाची मी आहुती देत आहे, असे अध्वर्यूने म्हटल्याच्या योगाने सर्व देवतांच्यासाठी त्याने दधिग्रहाची आहुती दिल्याप्रमाणे होते.

तेजाची प्राप्ती व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'दधिग्रह' न घेता 'आज्यग्रह' घ्यावा. कारण, आज्य हे तेजोरूप आहे. यास्तव आज्यग्रह घेतला म्हणजे तो यजमान तेजस्वीच होतो. वेदाध्ययनजन्य तेजाची प्राप्ती व्हावी अशी इच्छा असेल त्या यजमानाच्यासाठी 'सोमग्रह' भरून घ्यावा. सोम हा ब्रह्मवर्चसरूप आहे. यास्तव सोमग्रह घेतल्याच्या योगाने यजमान वेदाध्ययनजन्य तेजाने युक्त होतो. पशूंची प्राप्ती होण्याविषयी इच्छा करणाऱ्या यजमानाकरिता अध्वर्यूने दधिग्रहाचेच ग्रहण करावे. कारण, दही हे अन्नरूप असून पशू ही अन्नरूपच आहेत. अन्नरूपी दधिग्रहानेच अध्वर्यू यजमानाला अन्न आणि पशू यांचे संपादन करून देतो. (अनुवाक ९).

हे अतिग्राह्य, तुझ्या ठिकाणी ऋत्विज सर्व क्रतू समाप्त करीत असतात. कारण पांचही पात्रात भरून घेतलेले हे सोमरस क्रतूंचे संरक्षक होत असल्यामुळे चार पात्रांच्या मध्यभागी असलेल्या तुझ्या ठिकाणी क्रतूची समाप्ती करणे युक्तच आहे. यास्तव, तू देखील स्वादामधला उत्कृष्ट असा जो स्वाद असेल त्या स्वादाशी समरस हो. इतकेच नव्हे तर तुझ्या स्वादिष्टपणात माधुर्यामध्ये सर्वोत्कृष्ट असे जे माधुर्य असेल त्या माधुर्यानेही तू युक्त हो. हे अतिग्राह्या, 'उपयाम' संज्ञक ग्रहपात्रात तू भरून घेतला जात आहेस. इतर चार पात्रांतून प्रजापतीला अत्यंत प्रिय असा हा ओतून घेतलेला सोमरस मधल्या पात्रात साठवून ठेवलेल्या तुझ्या मध्येच मी मिसळून घेत आहे. 'खर' नांवाचे हे स्थळ तुझे निवासस्थान आहे. यास्तव, प्रजापतीला अर्पण करण्याकरता मी तुला येथे ठेवतो.

वल्लीरूप सोम हा यज्ञाचा जणू प्राणच असल्यामुळे सोमवल्लीच्या जुड्या मोजून घेण्याच्या क्रियेस 'प्राणग्रह' म्हणजे प्राणांचे ग्रहण अशी संज्ञा आहे. यास्तव, गवामयन नामक सत्रामध्ये अध्वर्यूने 'प्राणग्रह' घ्यावेत. म्हणजे 'अयं पुरोभुवः' इत्यादि 'प्राण' शब्दघटित मंत्रांनी सोमवल्लीच्या जुड्या मोजून घ्याव्यात. अशा प्रकारे 'प्राणग्रह' घेणे हेच 'गवामयम' सत्रामध्ये मुख्यतः अपेक्षित असते. म्हणून 'प्राणग्रह' घेतले असता त्रिवृत, पंचदश इत्यादि सर्व 'स्तोम', गायत्र्यादि सर्व छंद आणि माध्यंदिन पवमानानंतर गाइली

जाणारी 'सर्वस्तोत्रे' इत्यादि जे जे काही अपेक्षित असते, ते सर्व संपादन केल्यासारखे होते.

सर्व दिशांच्या ठिकाणी जय प्राप्त करून देणाऱ्या श्रेष्ठ अशा प्राणग्रहांचे ग्रहण करून ज्यांनी गवामयन सत्र केले ते प्राचीन काळचे सर्व ब्राह्मण सर्व दिशांच्या ठिकाणी विजयी झाले. यास्तव, ज्या गृहपती झालेल्या यजमानाच्या गवामयनसत्रात हे प्राणग्रह घेतले जातात, तो गृहपती म्हणजे सत्रातील प्रमुख असा यजमान दशदिशांच्या ठिकाणी श्रेष्ठत्वाला प्राप्त होतो. आणि सर्व दिशांच्या ठिकाणचे कार्यकर्ते पुरुष त्याच्या अनुरोधाने वागू लागतात.

पांच 'प्राणग्रह' घ्यावेत म्हणजे पूर्वोक्त पांच मंत्रांनी सोमवल्लीच्या पांच जुडया मोजून घेऊन त्यांचा रस काढावा. कारण, पूर्व इत्यादि चार व ऊर्ध्व दिशा मिळून पांचच दिशा आहेत. अर्थात् पांच प्राणग्रह घेतले म्हणजे सत्र करणारे सर्व यजमान पांचही दिशांच्या ठिकाणी समृध्दीला प्राप्त होतात.

सोम कुटावयाच्या वेळी प्रत्येक खेपेस सोमवल्लीचे नऊ नऊ 'अंशु' म्हणजे तुकडे कुटण्यासाठी पाट्यावर घेत जावेत. कारण, मस्तकाच्या ठिकाणी दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या व मुख ह्या सात व खाली शिस्न व गुदद्वार ह्या दोन मिळून नऊ छिद्रांच्या ठिकाणी संचार करणारे प्राण नऊच आहेत. यास्तव, सोमवल्लीचे नऊ तुकडे प्रत्येक खेपेस कुटावयास घेतल्याने सत्रकर्त्या यजमानाच्या ठिकाणी अध्वर्यूने त्या नऊ प्राणांची व्यवस्थित अशी स्थापना केल्यासारखे होते. संवत्सरपर्यंत चालू राहणाऱ्या गवामयन सत्रातील प्रारंभाच्या दिवशी होणाऱ्या सोमयागास 'प्रायणीय' व समाप्तीच्या दिवशी केल्या जाणाऱ्या सोमयागास 'उदयनीय' असे म्हणतात. 'प्रायणीय' व 'उदयनीय' ह्या दोनच सोमयागात आता सांगितल्याप्रमाणे सोमवल्लीचे नऊ नऊ तुकडे दर खेपेस कुटावयास घ्यावेत. कारण, मुख्यभूत अशा प्राणरूपी सोमवल्लीचेच ते नऊ अंश असल्यामुळे त्यांचे ग्रहण करणे म्हणजे नऊ प्राणांचेच ग्रहण करणे होय. असे केले, म्हणजे नऊही प्राणांच्या अनुकुलतेने यजमानानी संवत्सरात्मक अशा दीर्घकालीन गवामयन सत्राचा प्रारंभ केल्यासारखा होतो व त्याच नऊ प्राणांच्या सुस्थितीने सत्राची समाप्ती केल्याप्रमाणे होते.

सतत बारा दिवस सोमरसाचे यजन केल्या जाणाऱ्या 'द्वादशाह'

नामक सोमयागाचीच 'गवामयन' सत्र ही विकृती किंवा विशिष्ट प्रकार असल्यामुळे संवत्सरपर्यंत चालणाऱ्या गवामयन सत्रात असे द्वादशाह क्रतू अनेकवार केले जात असतात. अशा द्वादशाह क्रतूंतील दहाव्या दिवशीही आग्न सांगितल्याप्रमाणे प्राणग्रहांचे ग्रहण करावे. दहाव्या दिवशी केल्या जाणाऱ्या माध्यंदिन सवनामध्ये 'वामदेव्य' नांवाचे जे साम गावयाचे असते, ते एरवीच्या सोमयागातील पध्दतीप्रमाणे 'कया नश्चित्र आ' या तीन ऋचांच्या आधाराने गाइले न जाता दुसऱ्याच तीन ऋचांच्या आधारे उद्गाते गात असतात. परंतु त्यामुळे मूळच्या 'कया नश्चित्र' इत्यादि स्वकीय अशा तीन ऋचांच्यापासून 'वामदेव्य' सामाला च्युत म्हणजे स्वस्थानभ्रष्ट केल्याचा अपराध उद्गात्यांना लागतो आणि त्यामुळे सर्व प्रजाच प्राणांच्यापासून च्युत होतात. अशाप्रकारे प्रजांचा व प्राणांचा वियोग न व्हावा, म्हणून अध्वर्यूकडून जर द्वादशाहाच्या दहाव्या दिवशी 'प्राणग्रह' घेतले गेले तर प्राणांच्या पासून प्रजा वियुक्त होत नाहीत. (अनुवाक १०).

१ हे ऋत्विग्यजमान हो, उत्पन्न झालेल्या सर्व जगाचे ज्ञान असणाऱ्या ह्या अग्निदेवाचे विवेकयुक्त अशा बुध्दीने तुह्मी उत्तम रीतीने पोषण करा. सर्व जगाला जाणणारा तो अग्निदेवही आम्हाविषयी आदरयुक्त होऊन आमची हविर्द्रव्ये देवांच्याकडे नेऊन पोचवो. २ आपल्या मनात सदैव देवांचीच इच्छा करणारा, होमाचा निष्पादक, आपल्या ठिकाणी आरूढ होणाऱ्या माणसाला रथ ज्याप्रमाणे अनेक माणसांमधून निराळा करून दुसऱ्या गांवी नेतो, त्याप्रमाणे आपल्या ठिकाणी आहुतिरूपाने दिलेले हविर्द्रव्य इतर हविर्द्रव्यापासून पृथक् करून त्या त्या देवांच्या ठिकाणी नेऊन पोचते करणारा, यजमानांच्या कडून प्रामुख्याने स्वीकारला गेलेला आणि तेजःकिरणांनी युक्त असा हा अग्नीच यज्ञाकरिता उत्तर वेदीवर अगत्याने नेला जात असतो. आणि वर्णिलेल्या गुणाने युक्त असा तो अग्निदेव आपण होऊनच यजमानाच्या ठिकाणी आपल्या विषयी असलेली भक्ती बरोबर ओळखतो. ३ अमृतपान करून आपण अमर व्हावे अशी इच्छा एखादा करतो त्याप्रमाणे उत्तर वेदीकडे नेण्यांत येत असलेला अग्नी जन्मताक्षणीच प्रबुध्द म्हणजे जाणता होण्याची इच्छा करीत असतो. प्राणिमात्राच्या जीवनासाठी अत्यंत अवश्य असे जणू दिव्य औषधच असा हा बलवंतापेक्षाही प्रबल अग्निरूपी देव परमात्म्याने निर्मिला आहे. हा जेव्हा प्रबळ होतो तेव्हा स्वतःचे जीवन विनाशरहित करतोच आणि यज्ञाच्या द्वारा यजमानालाही चिरकाळ जगवितो. ४ हे जातवेदा अग्निदेवा,

देवांच्याकडे हविर्द्रव्ये पोचविण्याचे कार्य करण्यासाठी आम्ही तुला उत्तरवेदीरूपी पृथ्वीचे जणू नाभिस्थानच आणि इडारूपी गाईच्या पावलाप्रमाणे सदैव घृताने माखलेले राहणाऱ्या अशा या आहवनीयायतनामध्ये स्थापन करीत आहोत.
५ हे अग्निदेवा सर्वदेवरूपी सैनिकांनी युक्त असे उत्कृष्ट सैन्य बाळगणारा तू, आणि सर्व देवांत अग्रगण्य असा तू, पक्ष्यांच्या घरट्याप्रमाणे कुशलतेने तयार केलेले लोकरीचे मऊ आसन पसरून ठेव व घृताहुतींना आधारभूत होणाऱ्या या आहवनीयसंज्ञक तुझ्या निवासस्थानावर येऊन बैस. आणि यज्ञानुष्ठान करणाऱ्या या यजमानाला उत्तम रीतीने त्याच्या कर्तव्यातून पार पाड. ६
हो निष्पादका, हे अग्निदेवा, ज्ञानसंपन्न असा तू उत्तरवेदिरूपी आपल्या आसनावर बैस. आणि, पुण्यकर्माला योग्य अशा स्थानाचे ठिकाणी तू या यज्ञाला स्थापन कर. देवांना प्रिय असा तू हविर्द्रव्यांनी देवांचे यजन करतोस. हे अग्ने, यजमानाच्या ठिकाणी दीर्घायुष्य स्थापन कर. ७ यज्ञासाठी देवांना बोलावणारा, आपल्या स्थानाचे महत्त्व जाणणारा, कांतिमान्, देवांना हविर्द्रव्य देणारा, अत्यंत कुशल, हिंसारहित अशा कर्माविषयी आदरबुध्दी असलेला, उपासकाची वस्ती सुखाची करणारा व पवित्र अशी जिव्हा असलेला अग्निदेव होमनिष्पादकाला योग्य अशा उत्तरवेदिस्थानी उत्कृष्ट प्रकारे बसला आहे.
८ हे अग्निदेवा, तू देवांचा दूत आहेस. तूच आमचा अत्यंत प्रतिपाल करणारा आहेस. ह्या यज्ञकर्मात गढून राहण्यास तूच योग्य आहेस. हे देवश्रेष्ठा तूच येऊन यज्ञाला प्रारंभ करतोस. हे अग्ने, आमच्या अल्पवयी बालकांच्या शरीरांची वाढ हयगय न करता उत्तम प्रकारे करून देवांना हविप्रदान व यज्ञाचे पालन करण्याविषयी सदैव सावधगिरी ठेव. ९ सर्व कार्याची प्रेरणा करणाऱ्या परमेश्वरा, निवारण करण्याला योग्य अशा विघ्नांचे निवारण करण्यास समर्थ अशा तुझ्या जवळ येण्याची आम्ही इच्छा करीत असतो. सर्वकाळ आमचे संरक्षण करणाऱ्या देवा, तुझ्या प्रसादाने सेवा करण्यास योग्य अशा अग्नीजवळ आह्मी येऊन पोचलो आहो. १० अत्यंत विस्तीर्ण असा द्युलोक व तशीच असणारी पृथ्वी ही दोघेही आज्य, सोमरस इत्यादि पातळ हविर्द्रव्यांनी आमच्या ह्या यज्ञाचे ठिकाणी वर्षाव करण्याची इच्छा करोत आणि आमच्या योगक्षेमास अवश्य असणाऱ्या वस्तू आम्हाला भरपूर पुरवोत. ११ हे अग्निदेवा, अथर्वा नामक ऋषीने मस्तकाप्रमाणे प्रशस्त व सर्व जगाचे निर्वाहक अशा कमलपत्राच्या पृष्ठभागी तुला अरणींचे मंथन करून उत्पन्न केला. १२ हे अग्निदेवा, अथर्वणाचा

पुत्र असलेल्या दध्यङ्. नावांच्या ऋषीने वैऱ्यांचा नाश करणाऱ्या व रुद्ररूपाने असुरांच्या तिन्ही नगरांचा विध्वंस करणाऱ्या तुला प्रज्वलित केला. १३ हे अग्निदेवा, श्रेष्ठ अशा कोण्या 'पाथ्य' नामक ऋषीने चोरांचा पुरता नायनाट करणाऱ्या व निरनिराळ्या रणांगणावर शत्रूंची संपत्ती जिंकून आणणाऱ्या तुलाच उत्कृष्ट प्रकारे प्रज्वलित केले. १४ शत्रूंचा घात करणारा व प्रत्येक रणसंग्रामात शत्रूंचे धन जिंकणारा अग्निदेव, जन्माला आला, असे सर्वलोक एकमेकांमध्ये बोलू लागोत. १५ प्रजांची कोणाकडूनही हिंसा न होण्याविषयी उत्तम प्रकारे काळजी घेणाऱ्या व हविर्द्रव्यांचा भक्षक अशा ज्या अग्नीला, नुकत्याच जन्मलेल्या बालकाला दोन्ही हातांच्या ओंजळीत घेतात त्याप्रमाणे, ऋत्विज एखाद्या पात्रात खालून उचलून धरीत असतात, त्या अग्निदेवाला आम्ही समोर असलेला पाहत आहोत. १६ हे ऋत्विज हो, देवांच्या हविर्द्रव्यांचे आस्वादन करण्यासाठी देदीप्यमान व हविर्द्रव्यरूपी धनाचा अभिज्ञ अशा अग्नीला त्याच्यावर काष्ठे घालून चांगला पुष्ट करा. तो अग्नी येथे येऊन पूर्वाग्निरूप अशा स्वकीय स्थानाचे ठिकाणी पूर्णपणे प्रविष्ट होवो. १७ हे ऋत्विज हो, सुखरूप अशा पूर्वीच्या अग्निरूपी शय्येवर आताच उत्पन्न झालेल्या व, प्रिय अशा अतिथीप्रमाणे पूजनीय आणि यजमानाच्या गृहाचा पालक अशा अग्निरूपी बालकाला आता तुम्ही सुखाने झोपवा. १८ त्रिकालज्ञ, यज्ञगृहाचा पालक, नित्यतरुण, देवांच्याकडे हविर्भाग वाहून नेणारा व जुहूरूपी मुखाने युक्त, असा हा, प्रणयन करून आताच आणलेला अग्नी पूर्वसिध्द अशा अग्नीशी एकरूप होऊन उत्तम प्रकारे प्रज्वलित होत असतो. १९ हे नूतनाग्ने, ब्राह्मण जातीचा अभिमान बाळगून केव्हाही विनाश न पावता सर्वदा टिकून राहणारा व इतर अग्नींच्या ठिकाणी मित्राप्रमाणे प्रीती करणारा असा तू ब्राह्मणरूप व सख्यत्वाने वागणाऱ्या पूर्वसिध्द अशा अग्नीसह उत्कृष्ट प्रकारे प्रज्वलित होत असतोस. २० हे ऋत्विज हो, क्रतूंचा उत्तम निष्पादक, रणांगणावर जाताना सर्वांच्या पुढे चालणाऱ्या आपल्या उपासक यजमानाच्या घरात भरपूर अन्न साठविणाऱ्या या मंथनोत्पादित अग्नीला तुम्ही नीट जपा. त्याला काळजीपूर्वक वृध्दिंगत करा. २१ देवत्वाला प्राप्त होऊ इच्छिणाऱ्या यजमानांनी यज्ञसाधनभूत अशा मंथनोत्पादित नव्या अग्नीसह यज्ञसाधनभूत अशा पूर्वसिध्द अग्नीचे पूजन केले. त्या दोन अग्नींच्या एकत्र मेलनाने साध्य झालेली उत्कृष्ट अशी यज्ञकर्मे सर्व ठिकाणी मुख्य होऊन राहिली. जे यजमान अशा प्रकारे एकत्र संयुक्त झालेल्या दोन अग्नींच्या

ठिकाणी यज्ञकर्मांचे अनुष्ठान करतात ते महात्मे यजमान या स्वर्गलोकात पूर्वी यज्ञ करून गेलेले **साध्य** नांवाचे देव राहतात तेथे देवस्वरूप होऊन राहतात. आणि दुःखरहित **अशा** शाश्वत सुखाचा उपभोग घेतात. (अनुवाक ११).